चरित्र:

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

सन १८५७

कोळंबसाचा वृत्तांत

महादेव गोविंद शास्त्री कोल्हटकर

2/[illegible]2—

# THE LIFE OF COLUMBUS.

TRANSLATED INTO MARATHI

FROM ROBERTSON'S HISTORY OF AMERICA, BOOK II.

BY

MAHÁDEO GOVINDA SHÁSTRÍ.

THIRD EDITION.

REVISED BY

PARASHURÁM PANT,

PANDIT TO THE MARATHI TRANSLATOR E. D.

BOMBAY:

PRINTED BY THOMAS GRAHAM.

1857.

---

*Price, Ten Annas.*

# कोलम्बसाचा वृत्तांत.

रोबर्त्तसनकृत अमेरिकेच्या इतिहासाच्या
द्वितीय पुस्तकावरून

महादेव गोविंद शास्त्री कोल्हटकर
यांनीं

महाराष्ट्र भाषेंत केला.

आवृत्ति तिसरी.

परशुरामपंत गोडबोले
विद्याखात्याचे मराठी त्रान्स्लेटर यांचे पंडित यांनीं शोधिली.

ती

मुंबईमध्यें
टामस ग्रेहाम यांनीं छापिली.
सन १८५७.
किंमत दाहा आणे.

# कोलम्बसाचा वृत्तांत.

कोलम्बसाचा जन्म आणि विद्या.

**पोर्तुगीज** लोकांनीं नवीन देश शोधून काढिले, तेणें करून जी त्यांची कीर्त्ति झाली त्या कीर्त्तीस भुलून अन्यदेशींचे लोक त्यांच्या चाकरीस राहिले होते, त्यांत **ख्रिस्तोफर कोलोन** अथवा **कोलम्बस** ह्मणून एक पुरुष होता. हा, **जिनोवा** देशींच्या प्रजासत्ताक राज्याच्या ताब्यांतला होता. याचा जन्मकाल आणि जन्मभूमि यांतून एकही निश्चितपणें ठाऊक नाहीं; परंतु हा ज्या कुळांत उत्पन्न झाला तें कूळ अनेक दुर्दैवप्रसंगांनीं जरी गरिबीस मिळालें होतें, तरी तें संभावित असे इतकें मात्र ठाऊक होतें. **कोलम्बसाच्या** वाडवडिलांनीं आपल्या निर्वाहाकरितां सफरी लोकांचें काम पत्करिलें होतें; त्या उद्योगांत मनुष्याची प्रख्याति करणारे असे विशेष गुण व बुद्धि, हीं **कोलम्बसाच्या** ठायीं लहानपणींच दिसूं लागलीं. हा जो याच्या बुद्धीचा मुळचा कल त्यास याच्या आईबापांनीं प्रतिबंध न करितां याजकडून विद्याभ्यास करवून तो कल वाढवून स्थिर केला, असें दिसतें. त्या काळीं शास्त्रविद्या शिकविण्याविषयीं काय ती **लाटिन** भाषा असे, त्या भाषेचें कांहीं ज्ञान यानें संपादित केल्यानंतर यास भूमिति, भूसृष्टिविद्या, ज्योतिष, व नकाशे काढण्याची कला, हीं शिकवूं लागले; तेव्हां नौकागमन-

विद्या ह्मणून जो याचा आवडता विषय त्याचा आणि त्या विद्यांचा परस्पर संबंध आहे ह्मणून त्यांजकडेस हा इतकी उत्कंठा व ओढ धरून प्रवृत्त झाला, कीं त्या विद्यांचें अध्ययन त्वरित होऊन त्यांत याची गति झाली.

असा गुणसंपन्न होऊन, चवदा वर्षांच्या वयांत हा समुद्रावरील सफरीकामांत शिरला. आणि यास इतक्या महत्वास चढविण्याविषयीं कारणभूत असा जो समुद्र त्याच्याठायीं यानें आपला वर्तनक्रम आरंभिला. भूमध्यसमुद्राच्या ज्या बंदरास

हा सफरी कामांत शिरला. इ० स० १४६१

**कोलम्बसाच्या** देशचे ह्मणजे **जिनोवा** देशांत राहाणारे लोक वारंवार जात असत, त्याच बंदरीं हा प्रथम जाऊं लागला. परंतु, हें कृत्य याच्या चपल मनास फारच स्वल्प होतें, याजकरितां यानें उत्तरेकडील समुद्राकडे पर्यटन केलें, आणि हा **ऐसलान्दाच्या** किनाऱ्याच्या प्रदेशीं गेला तेथें इंग्लिश लोक व दुसरे लोक मासे धरण्याच्या कामाकरितां नुकतेच जाऊं लागले

इसवी स० १४६७.

होते. त्या काळीं नौकागमन व्यापार हा पराक्रमाचा उद्योग होय, असें चोहींकडे मानूं लागले होते. याकरितां **कोलम्बस**, **ऐसलान्द** बेट, ज्याला प्राचीन कालचे लोक मरशेवटची मर्यादा मानीत, त्याच्या पलीकडे जाऊन तेथून ध्रुववृत्तामध्यें कितीएक अंशापर्यंत गेला. यानें समुद्रपर्यटन केलें तेणेंकरून याची अपूर्व दर्शनाची हौस पूर्ण होऊन यास तादृश संपत्तीची प्राप्ति न होतां याच्या नाविकविद्येच्या ज्ञानाची मात्र वृद्धि झाली. नंतर याच्या नांवाचा व याच्याच कुळांतला एक गलबतांचा सरदार मोठा नामांकित होता, त्याच्या जवळ हा चाकरीस राहिला. तो

मनुष्य, आपल्या पदरच्या खर्चावर थोडींशीं लढाऊ गलबतें आपल्या ताब्यांत ठेवून, कोणे समयीं व्यापारामध्यें आपल्या देशाची बरोबरी करणारे जे **विनीशिअन** लोक यांजवर, व कोणे समयीं **मुसलमान** लोकांवर, गलबतें हाकारून जाई, तेणेंकरून त्यानें संपत्ति आणि लौकिक हीं दोन्ही संपादिलीं होतीं. ह्या सरदाराजवळ **कोलम्बस** कितीएक वर्षेंपर्यंत राहिला होता. खलाशाच्या कामांत माहितगारी चांगली ह्मणून जशी **कोलम्बसाची** प्रख्याति होती, त्याप्रमाणेंच याच्या धैर्याचीही प्रसिद्धि असे. एके वेळेस असें झालें, कीं **पोर्तुगाल** देशाच्या किनाऱ्याच्या दूर **नेथर्लान्द** देशापासून पुष्कळ माल भरून कांहीं **विनीशिअन** लोक तारवें नेत होते; त्यांबरोबर निकराची लढाई होत असतां याच्याकडे ज्या तारवाचें काम होतें तें तारूं, शत्रूंच्या ज्या तारवाशीं भिडून लढत होतें त्यासुद्धां पेटलें. अशा मोठ्या भयप्रद प्रसंगीं, याचा निर्भयपणा आणि धारिष्ट यांनीं यास सोडिलें नाहीं. यानें समुद्रांत उडी टाकून तेथें एक वल्हें तरंगत होतें त्यास गच्च धरून त्याच्या आश्रयानें, व आपल्या पोंहण्याच्या सफाईनें तेथून दोन तीन कोसांवर किनाऱ्यास लागून, ज्यापासून पुढें मोठमोठे पराक्रम घडायाचे होते असा जो आपला जीव तो वांचविला.

हा पोर्तुगीज लोकांची चाकरी पत्करितो.

प्रवास करण्यापुरतें बल याच्या अंगीं येतांच, हा **लिस्बोन** एथें निघून गेला. तेथें याच्या देशचे बहुत लोक राहत असत. याचे गुण व बुद्धिकौशल्य, यांविषयीं त्यांच्या मनांत लवकरच हितावह विचार वागूं लागले, ह्मणून त्यांनीं यास

आग्रह करून विनंती केली कीं, या राज्यांत आपण राहावें. कारण नाविकविद्येंत जी आपली कुशलता व जी प्रवीणता त्यांहींकरून आपण एथें उदयास आल्यावांचून राहणार नाहींत. नवीन देश पाहाण्याची ज्यांस फार आवड, अथवा आपली प्रसिद्धि व्हावी ह्मणून ज्यांस फार इच्छा, असे जे उद्योगी पुरुष यांचें मन फार लागायाजोगा रोजगार **पोर्त्तुगीज** लोकांच्या दरबारांत त्या काळीं असे. **कोलम्बसास** जो याच्या मित्रांनीं बुद्धिवाद सांगितला तो यानें चांगला कान देऊन ऐकिला; आणि **पोर्त्तुगाल** देशची एक संभावित स्त्री यास थोर मानूं लागल्यावरून तिजबरोबर यानें लग्न केलें, आणि **लिस्बोन** शहरांत स्थायिक होऊन राहिला. या संबंधामुळें सफरी कामापासून **कोलम्बस** मोकळा झाला असें नाहीं, तर तेणेंकरून उलटें, यास जें नाविकविद्येचें ज्ञान होतें तें वाढवून त्या ज्ञानाची आणखी वृद्धि करावी अशी यास इच्छा उत्पन्न झाली. **कोलम्बसाची** बायको **बार्थोलोमेओ** ही **पेरेस्त्रेल्लो** याची मुलगी होती. **प्रिन्स हेनरी** यानें प्रथम गलबतांतून स्वाऱ्या केल्या त्या वेळेस जे सरदार नेमिले होते त्यांमध्यें **पेरेस्त्रेलो** हा होता त्यानें, **हेनरीच्या** आश्रयानें **पोर्तोसान्तो** आणि **मडेरा** हीं दोन बेटें शोधून काढून तीं वसविलीं. **पेरेस्त्रेलो** नाविकशास्त्रामध्यें पुरा माहितगार होता; तो देशपर्यटन करीत असतां त्यानें जें दर दिवसाचें वृत्त लिहून ठेविलें होतें तें, व जे समुद्रकिनाऱ्याचे नकाशे काढिले होते ते, सर्व **कोलम्बसास** प्राप्त झाले; आणि त्यां-

लग्न करून लिस्बोन शहरांत स्थायिक होऊन राहतो.

पेरेस्त्रेल्लोचें दर दिवसाचें वृत्त आणि समुद्र किनाऱ्याचे नकाशे यास प्राप्त होतात.

पासून **पोर्तुगीज** लोकांनीं ज्या मार्गानें शोध केले तो मार्ग व तो उद्योग करण्यास ज्या गोष्टी उपयोगीं पडल्या, व ज्यांपासून त्यांस उमेद येऊं लागली, त्या सर्व **कोलम्बसास** समजल्या. या सर्व गोष्टींचा यानें चांगला अभ्यास केल्यावर याचे मनांतील जी गोष्ट होती तीस पुष्टीकरण होऊन अधिकच उत्तेजन आलें; आणि जेव्हां यानें **पेरेस्ट्रेलोनें** जे नवीन देश पाहिले होते त्यांच्या नकाशांचा मन लावून अभ्यास केला आणि वर्णनें वाचिलीं, तेव्हां तर ते देश पाहण्याविषयीं अनिवार्य उत्कंठा झाली. ती उत्कंठा तृप्त करण्याविषयीं हा समुद्रांतून **मडेरा** बेटास गेला आणि कितीएक वर्षेपर्यंत त्या बेटाबरोबर, व **कानेरी** बेटें, **आझोर्झ** बेटें, **गिनि** देशांतील सर्व वसाहतींच्या जागा, आणि **पोर्तुगीज** लोकांनीं **आफ्रिका** खंडांत जितकीं स्थलें शोधून काढिलीं होतीं त्या सर्वांबरोबर व्यापार करीत असे.

पोर्तुगीज लोकांनीं शोधून काढिलेल्या स्थलांबरोबर हा व्यापार करितो.

त्या वेळीं, जलमार्गानें पृथ्वीवरील ज्या ज्या प्रदेशीं व्यापार चालत असे, त्या त्या प्रदेशीं **कोलम्बसानें** गलबतांतून पर्यटनें केलीं. अशा नानाप्रकारच्या पर्यटनांमुळें यास जी माहितगारी झाली होती, तिच्या योगानें **यूरोप** खंडामध्यें जे नाविकविद्येमध्यें अत्यंत कुशल होते त्यांत याची गणना होऊं लागली. परंतु इतक्या प्रशंसेनें याचें समाधान न होऊन यास जी महापदप्राप्तीची इच्छा होती तिणेंकरून याचें लक्ष कांहीं अधिक संपादन करण्याकडे लागलें. **पोर्तुगाल** देशांतील नाविक लोकांचें पर्यटन सफल होऊं लागल्यामुळें अपूर्व दर्शनाची इच्छा आणि ईर्षा हीं जागृत झालीं; आणि ज्यांहींकरून

या शोधाचें फळ.

**पोर्त्तुगीज** लोकांनीं शोध केले व ज्यांपासून नवीन अचाट कृत्य आरंभिलें असतां सिद्धीस जाईल अशा त्यांस उमेदी आल्या, त्या गोष्टींचा सर्व विद्वान् लोक विचार करूं लागले. **पोर्त्तुगीज** लोकांनीं ज्यावरून शोध करण्याच्या युक्ति बांधिल्या तें तत्व, आणि ज्या रीतीनें शोध चालविले ती रीति, या दोन गोष्टींच्या विचाराकडे, स्वभावतः शोधक, खोल विचार करण्यास समर्थ, आणि नवीन पराक्रमाच्या कृत्यांविषयीं तत्पर, असें जें **कोलम्बसाचें** मन, तें बहुधा इतकें लागलें, कीं तेणेंकरून **पोर्त्तुगीज** लोकांची युक्ति सुधारायास, आणि आजपर्यंत जे शोध करायास त्यांनीं केलेले प्रयत्न व्यर्थ झाले होते ते तडीस न्यावयास, उपयुक्त अशी कल्पना हा प्रथम योजूं लागला.

हा हिंदुस्थानांत जाण्याकरितां नवीन मार्गाची कल्पना बांधितो.

समुद्रांतून **हिंदुस्थान** एथें जाण्याकरितां मार्ग शोधून काढणें, हाच काय तो त्या काळच्या लोकांचा मुख्य हेतु होता. आणि **पोर्त्तुगीज** लोकांनीं **केपडेवेर्ड** ह्मणून जें **आफ्रिका** खंडाचें पश्चिम टोंक त्यास ज्या वेळीं वळसा घातला त्या वेळापासून जितकीं पर्यटनें झालीं, तितक्यांमध्यें त्या हेतूकडेसच त्यांचें लक्ष होतें. त्या गोष्टीची **आफ्रिका** खंडांत जितके शोध केले, त्यांच्यांशीं तुलना करून पाहतां ते शोध जमेस धरायाजोगे नाहींत असें दिसलें. **हिंदुस्थानांतील** फार पिकाऊ जमीनीची व तेथील द्रव्याची बहुत काळापासून माहिती होती; तेथील मसाले व दुसरे मोलवान जिन्नस यांची सर्व **युरोप** खंडांत फार इच्छा असे. या व्यापारांत **विनीशिअन** लोक अगदीं गढून गेले होते,

तेणेंकरून त्यांस अतिशय संपत्ति प्राप्त झाली, यामुळें सर्व अन्यदेशींच्या लोकांत त्यांच्याविषयीं हेवा उत्पन्न झाला. ज्या देशीं जाण्यास **पोर्तुगीज**लोकांची इच्छा होती त्या देशास जावयास नवा रस्ता शोधून काढण्याविषयीं ते कितीही तत्पर असोत,

आजपर्यंत नवीन शोधाविषयींचा मंदक्रम.

परंतु ते दक्षिणेकडे मात्र जाऊन त्या रस्त्याकरितां शोध करीत होते, व **आफ्रिका** खंडाच्या दूरच्या टोंकाभोंवतीं गलबतें हाकारल्यावर **हिंदुस्थानांत** पोहोंचूं अशी आशा बाळगीत होते. तथापि हा मार्ग अज्ञातच होता आणि तो जरी शोधून काढिला असता तरी त्याच्या अतिशय दूरपणामुळें **युरोप** खंडांतून **हिंदुस्थानांत** जाणें म्हटलें म्हणजे त्या काळीं तें एक मोठें दुर्घट आणि सिद्धीस न जाण्याजोगें कृत्य आहे, असें दिसलें असतें. **केपनोन** यापासून विषुववृत्तापर्यंत जाण्याच्या कामांत पन्नास वर्षें मोडलीं; त्यापेक्षां त्या स्थलापासून **हिंदुस्थानांत** जावयास दूरचें जें समुद्रपर्यटन तें सिद्धीस नेण्याकरितां फारच काळ लागेल; तशांत **पोर्तुगीज** लोक ज्या मार्गानें जात तो मार्ग केवळ अशाश्वत, जोखमीचा आणि फार त्रासदायक, असा **कोलम्बसानें** विचार करितांच, **हिंदुस्थान** एथें जाण्याकरितां जवळचा असून सरळ असा रस्ता निघेल किंवा नाहीं याविषयीं स्वभावतः तो विचार करूं लागला. नाविकविद्येच्या सिद्धांतांत व ते सिद्ध करण्यांत जें यास चांगलें ज्ञान होतें त्यामुळें जी जी कल्पना याच्या मनांत येई तिचा फार वेळ आणि पुर्तेपणीं विचार करून, व प्राचीन ग्रंथकारांचे तर्क आणि सूचना यांमध्यें व अर्वाचीन कालच्या नावाडी लोकांच्या प्रत्यक्ष पाहण्यामध्यें विचारपूर्वक तारतम्य पाहून

शेवटीं **कोलम्बसानें** असा सिद्धांत केला कीं, **आट्लान्तिक** महासागरांतून नीट पश्चिमेकडे गलबत हाकारून गेलें असतां जे नवीन देश, फार विस्तीर्ण जें **हिंदुस्थान** त्यामध्यें असावे असा संभव होतो, त्यांचा निखालस शोध लागेल.

यानें केलेल्या सिद्धांतांचीं मूलतत्वें.

असा **कोलम्बसानें**, नानाप्रकारचे व अनेक कारणांपासून उपस्थित झालेले असे जे नियम व प्रमाणें, यांवरून जो हा सिद्धांत केला होता, तो जसा नवीन व लोकोत्तर, तसाच दिसण्यांत असत्कल्पनेचा दिसे. पृथ्वीची आकृति गोलरूप आहे असें तेव्हां ठाऊक होतें, व तिच्या आकृतीच्या मानाचा बऱ्याच शुद्ध रीतीनें निर्णय केला होता, यावरून पाहतां उघड दिसून येतें कीं, **युरोप**, **एशिआ**, आणि **आफ्रिका**, हीं तीन खंडें त्या काळीं जितकीं माहीत होतीं, तितकीं मिळूनही या भूगोलावरील एक लहानसा प्रदेश होईल. तस्मात् ज्या विस्तीर्ण प्रदेशाचा आपणांस शोध लागला नाहीं, त्यास अनुपयुक्त सागरानें आच्छादिलें नाहीं, तर मनुष्यास राहावयास योग्य असे देश त्या प्रदेशांत आहेत, असें मानणें हें, सृष्टिकर्त्याचें चातुर्य आणि लोकोपकार यांविषयींच्या ज्या आपल्या कल्पना त्यांस उचित आहे. याप्रमाणें असेंही दिसूं लागलें, कीं भूगोलाच्या या बाजूवरील महाद्वीपांत जितकी जमीन आहे, तितकीच दुसऱ्या गोलार्धांत बहुतकरून असावी. पृथ्वीची आकृति आणि रचना यांवरून दुसरें एक महाद्वीप असावें ह्मणून जे हे निर्णय केले, त्यांचें अर्वाचीन काळीं गलबतांतून पर्यटन करणाऱ्या लोकांच्या प्रत्यक्ष अवलोकनावरून व तर्कांवरून दृढीकरणही झालें होतें; तें असें कीं, **पोर्तुगीज** लोकांतील

एक नावाडी त्या काळीं पश्चिमेकडे जाण्याची जी मर्यादा होती, तिच्याही पलिकडेस गेला होता, तेव्हां कृतीनें कोरलेला एक लांकडाचा तुकडा समुद्रांत तरंगत होता तो त्यानें उचलिला. आणि ज्यापक्षीं तो पश्चिमेकडील वाऱ्यानें लोटत त्याजकडे आला, त्यापक्षीं त्या भागाकडे आपणास अज्ञात असे जे देश आहेत, तिकडून हा तुकडा इकडे आला, असें त्यानें अनुमान केलें. **मडेरा** बेटांच्या पश्चिमेस **कोलम्बसाच्या** मेहुण्यानें त्याच तऱ्हेचा आणि त्याच वाऱ्यानें आलेला एक तुकडा पाहिला, आणि मोठमोठ्या आकृतींचे वेतही लाटांवर तरतां पाहिले. **टालेमीनें हिंदुस्थान** एथेंच उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें जें वर्णन केलें आहे, त्याप्रमाणेंच ते वेत दिसले. पश्चिम वाऱ्यामुळें मुळांसकट उपटलेले वृक्ष **आझोर्झ** बेटांच्या किनाऱ्याकडे वाहून येत असत, आणि एका वेळीं दोन मनुष्यांचीं प्रेतें त्या किनाऱ्यास लागलीं होतीं. त्यांचे चेहरे विलक्षणच होते. ते **युरोप** व **आफ्रिका** या दोनही खंडांतील लोकांसारिखे नव्हते.

गंगे पलीकडील देशांविषयीं प्राचीन विद्वानांचें मत.

शास्त्रीय सिद्धांत व प्रत्यक्ष दर्शनें यांपासून जीं जीं प्रमाणें सांपडलीं त्या त्या प्रमाणांच्या आधारावरून पश्चिम समुद्रांत नवीन देशांचा शोध लागेल, अशी **कोलम्बसास** आशा प्राप्त झाली; आणि अन्य कारणांवरून ह्या देशांचा आणि **हिंदुस्थानाचा** संबंध असावा, असेंही हा मानूं लागला. प्राचीन कालचे लोक **हिंदुस्थानांत भागीरथीच्या** कांठापर्यंत देखील गेले नव्हते; तथापि तिच्या पलीकडील प्रांतांचींही वर्णनें लिहावयास कितीएक **ग्रीक** ग्रंथकार प्रवृत्त

झाले. जें दूर किंवा अज्ञात त्याविषयीं अतिशयोक्तीनें कथन करावयास मनुष्यें प्रवृत्त होतात, आणि तसें करण्यास कोणाचा प्रतिबंधही नसतो. यावरूनच त्या ग्रंथकारांनीं त्या देशाचें मान अमर्याद लिहिलें आहे; **क्तीसिआस** असें लिहितो कीं, **हिंदुस्थान** विरहितकरून **आशिआ** खंड जेवढें मोठें आहे तेवढेंच **हिंदुस्थान** मोठें आहे; पदार्थविज्ञानी **प्लिनि** हा ज्याच्या अनुरोधानें चालतो, त्या **ओनिसीक्रिटसानें** असा वाद केला आहे कीं **हिंदुस्थान**, पृथ्वीच्या जितक्या प्रदेशावर वस्ती आहे त्याच्या तृतीयांशा एवढें आहे. **निआर्कसानें** असें सांगितलें आहे कीं, **हिंदुस्थानाच्या** एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सरळ नीट गेलें तर चार महिने लागतील. **मार्कोपोलो** हा पूर्वेकडे इतका दूर गेला होता कीं तेथपर्यंत युरोपीअन लोकांतून कोणीएक कधींच गेला नव्हता. त्यानें पर्यटन करीत असतां जें दर दिवसाचें वृत्त लिहून ठेविलें होतें, त्यावरून पाहतां प्राचीन लोकांनीं जीं अतिशयोक्तीचीं वर्णनें लिहिलीं होतीं, त्यांस बळकटी येते. **काथे** आणि **सिपांगो** हीं राज्यें, तसेच बहुत दुसरे देश, ज्यांचीं नांवें **युरोप** खंडांत माहीत नव्हतीं, त्यांचीं जीं **मार्कोपोलोनें** प्रौढ रीतीनें वर्णनें केलीं होतीं त्यांवरून **हिंदुस्थान** देश फार विस्तीर्ण आहे असें दिसे. हीं वर्णनें जरी अपुरीं होतीं, तथापि **युरोप** खंडांतील लोकांस पूर्वेकडील दूरदूरच्या प्रदेशांचीं जीं वर्णनें त्या काळीं मिळालीं होतीं, त्यांमध्यें हीं फारच यथार्थ

क्तीसिआस.

ओनिसीक्रिटस.

निआर्कस; यांचीं मतें.

मार्कोपोलोचें दर दिवसाचें वृत्त.

होतीं; त्यांपासून **कोलम्बसानें** वास्तव सिद्धांत काढिला. यानें असा वाद केला कीं, इटापक्षां **हिंदुस्थान** पूर्व दिशेकडे फार विस्तृत झालें आहे, त्यापक्षीं तें पृथ्वीच्या गोलाकृतीमुळें **आफ्रिका** खंडाच्या पश्चिमेस आलीकडे जीं बेटें शोधून काढिलीं आहेत त्यांच्या जवळजवळ असावें. यावरून त्या बेटांमध्यें आणि **हिंदुस्थानामध्यें** फार अंतर नसावें, आणि पूर्वेकडील सर्वांपेक्षां जे दूरचे देश, तेथें जावयास फार सरळ आणि जवळ असा रस्ता शुद्ध पश्चिमेकडेच गलबतें हाकारून गेलें असतां सांपडावा. **युरोप** खंडाच्या पश्चिमेकडील प्रदेशांच्या जवळ **हिंदुस्थान** असावें, अशी जी **कोलम्बसाची** कल्पना तीस प्राचीन काळच्या कितीएक शिष्ट ग्रंथकारांचींही प्रमाणें सांपडलीं. त्याकाळीं असें होतें कीं, कोणतेंही मत त्या ग्रंथकारांच्या प्रमाणांवांचून लोक आदरानें मानीत नसत. **हरक्युलीज**, याचे स्तंभ अथवा **जिब्राल्टरची** सामुद्रधुनी ही **ईस्तइंडीज** एथून फार दूर नसावी, आणि तीमध्यें येण्याजाण्यास समुद्रांतून मार्ग असावा, असें **आरिस्तोटेलीज** यानें कल्पिलें. यापेक्षां विशेष समजूत पडण्याजोग्या शब्दांनीं **सेनेका** निश्चयपूर्वक ह्मणतो कीं, वारा जर चांगला लागला तर **स्पेन** देशांतून **हिंदुस्थानांत** थोड्या दिवसांत गलबत पोहोंचेल. **आतलान्तिक** बेट मोठें प्रख्यात आहे ह्मणोन **प्लातोनें** वर्णिलें आहे, आणि कितीएकांनीं त्यास वास्तविक देश ह्मणोन कल्पिलें आहे, त्याच्या पलीकडे अज्ञात महाद्वीप आहे. तें बेट **स्पेन** देशापासून जवळच आहे, असें तो ह्मणतो. या सर्व गो-

हिंदुस्थान युरोपाच्या पश्चिमेस असावें ह्मणून जी याची कल्पना तीस प्राचीन विद्वानांचीं प्रमाणें.

ष्टींचें **कोलम्बसानें** मनन केलें. **कोलम्बसाच्या** अंगीं कल्पना योजण्याचा फारच आवेश असे, तथापि आपली कल्पनाशक्ति खरीच आहे असा यास अभिमान नसे, परंतु उलटी तद्विषयीं शंका असे. याकरितां आपल्या प्रमाणांवर तसाच प्राचीन लोकांच्या लेखांवर केवळ भरंवसा न ठेवितां, यानें आपल्या मताचें प्रतिपादन करण्याकरितां जीं प्रमाणें योजिलीं होतीं, त्यांचें स्वरूप समजण्याविषयीं जे त्या वेळचे पुरुष समर्थ होते, त्यांचेंही मत घेतलें. गलवतांतून पश्चिमेस गेलें असतां नवीन देश शोधून काढण्याचा संभव आहे, याविषयींच्या ज्या आपल्या कल्पना त्या यानें **फ्लोरेन्स** एथें **पाउल** ह्मणोन एक वैद्य होता त्यास विदित केल्या. या गृहस्थास भूसृष्टिरचनेच्या
१४७४ शास्त्राचें चांगलें ज्ञान आहे असा त्याचा लौकिक होता. त्याच्या विद्वत्तेवरून, व त्याच्या निष्कपटपणाच्या, उत्तरावरून **कोलम्बसानें** जो त्याच्या ठायीं विश्वास ठेविला होता त्यास तो पात्र होता असें दिसून येतें. त्या वैद्यानें मनःपूर्वक **कोलम्बसाची** कल्पना मान्य केली, व तिच्या दृढीकरणार्थ कितीएक ज्या झालेल्या गोष्टी त्याही सुचविल्या, आणि असा वर्णनीय उद्योग सतत चालविण्याकरितां **कोलम्बसास** उत्तेजन देऊन त्या उद्योगापासून परिणामीं तुमच्या देशास कीर्ति आणि **युरोप** खंडास सुख, यांची प्राप्ति होईल असें सांगितलें.

आपला सिद्धांत तडीस नेण्याच्या याच्या युक्ति.

प्रौढ कल्पना योजायास आणि त्या सिद्धीस न्यावयास **कोलम्बसा** इतकें ज्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं त्यांस हे सर्व तर्क, व विचार, आणि प्रमाणें, हीं बाह्यतः रमणीय, आणि निष्फल, अशा

एकाद्या मताचें मूलकारण सिद्ध करावयास मात्र उपयोगीं पडलीं असतीं; आणि त्या मतापासून चातुर्यानें संभाषण करायास, अथवा मनःकल्पित तर्क चालवायास मात्र एक विषय उपस्थित झाला असता; परंतु **कोलम्बसाच्या** मनांत त्या कल्पना येतांच, याच्या विचारशक्तीमुळें व उत्सुकता आणि साहसी स्वभाव यामुळें केवळ तर्कच करून न बसतां, त्या सिद्धीस नेण्याविषयीं हा प्रवृत्त झाला. आपलें मत खरें आहे अशी याची पुर्तेपणीं खात्री झाल्यावर त्याचा प्रत्यय पाहण्याकरितां नवीन शोध करावे ह्मणून समुद्रांतून पर्यटन करण्याकरितां **कोलम्बस** उतावीळ झाला. परंतु हें करण्याकरितां **कोलम्बसास** या अशा महत्कृत्याचा अंगीकार करण्याविषयीं समर्थ असे जे **युरोप** खंडांत मोठ्या अधिकाराचे गृहस्थ होते, त्यांतून कितीएकांचा प्रथमतः आश्रय संपादावा लागला. **कोलम्बसास** स्वदेश सोडून जरीं फार दिवस झाले होते, तरीं त्याजवर जी त्यांची प्रीति होती ती उडाली नव्हती. याजकरितां याला अशी इच्छा झाली कीं, आपल्या श्रमाचें आणि नवीन कल्पनेचें फळ आपल्या देशास प्राप्त व्हावें, याकरितां **कोलम्बसानें** आपली युक्ति **जिनोवा** देशांतील सेनेट ह्मणजे वृद्ध-वृद्ध जे मुख्य सभासद त्यांस दर्शित केली.

हा जिनोवा एथील लोकांस अर्ज करितो.

आणि आपले देशानें प्रथम आपल्या चाकरीचा स्वीकार केल्यास जे नवीन देश शोधून काढायाचे आहेत त्या देशांच्या शोधार्थ, मी एथील प्रजासत्ताक राज्याच्या वाहुल्याखालीं गलवत हाकारीन, असें यानें कबूल केलें. परंतु **कोलम्बस** दुसऱ्या देशीं फार दिवस जाऊन

राहिला होता त्यामुळें याची शक्ति आणि गुण याचे देशच्या लोकांस माहित नव्हते, आणि ते लोक जरीं समुद्रतीरीं राहणारे होते, तरीं त्यास समुद्रांतून दूरदूरचीं पर्यटनें करण्याची तादृश सवय नव्हती. त्यामुळें **कोलम्बसास** आपली कल्पना सिद्धीस जाईल ह्मणून ज्या कारणावरून आशा प्राप्त झाली होती, त्या कारणाची वास्तव कल्पना करायासही ते समर्थ नव्हते. त्या लोकांनीं विचार न करितां, छांदिष्ट कल्पना करणाऱ्या पुरुषांचें जसें स्वप्न त्याप्रमाणें **कोलम्बसाचें** बोलणें मानून, यास अमान्य केलें; व आपलें प्रजासत्ताक राज्याची प्राचीन काळीं जशी भरभर होती तशी भरभर होण्याचा जो हा समय प्राप्त झाला होता, तो अगदींच हातचा घालविला.

पोर्त्तुगालच्या राजास — आपल्या देशाविषयीं जें करणें उचित होतें तें केल्यानंतर, तेथील लोकांनीं जरीं **कोलम्बसाचा** हिरमोड केला, तरीं याची उमेद खचली नाहीं, परंतु उलटा आपला अंगीकृत उद्योग न सोडितां, तो यानें मोठ्या उत्कंठेनें पुढें चालविला. **पोर्त्तुगाल** देशचा दुसरा **ज्योन** राजा याच्या राज्यांत **कोलम्बसानें** फार दिवस वस्ती केली होती, त्यामुळें आपल्या सेवेवर त्याचीही सत्ता आहे असें जाणून, यानें त्या राजासही आपलें मत दर्शित केलें. एथें याच्या मताचा अधिक आवडीनें स्वीकार होईल, अशा सर्व गोष्टी दिसत होत्या. हा राजा महाकृत्यास हात घालणारा, व समुद्रांतील व्यापारामध्यें अभिज्ञ, आणि नवीन देश शोधून काढायास जे प्रयत्न करतील त्यांस आश्रय देण्याविषयीं अभिमानी, असा समजून **कोलम्बसानें**

त्याचे जवळ विनंती केली. ह्या राजाची प्रजा **यूरोप** खंडांत जितके नौकाशास्त्र जाणणारे होते, त्यांपेक्षां फारच माहितगार असे. आणि समुद्रांतून मोठ्या धारिष्टाचें, अथवा कधींच केलें नाहीं, असें नवीन पर्यटन करण्याचें आल्यास त्याचें तीस भयही वाटत नसे. **कोलम्बस** जो रोजगार करीत होता त्यामध्यें याची कुशलता आणि याच्या अंगींचे चांगले गुण यांची **पोर्त्तुगाल** देशांत पक्की माहिती होती. **कोलम्बसाची** जी युक्ति ती केवळ स्वप्नवत् नसावी असें याच्या कुशलतेवरून दिसून आलें. आणि **कोलम्बसानें** कांहीं असदुद्देशानें तो बेत योजिला असेल, अशी जी शंका ती याचे विषयीं मानूं नये, असें याच्या गुणांवरून दिसून आलें; नंतर त्या राजानें मोठ्या सुप्रसन्नतेनें **कोलम्बसाचा** सर्व मजकूर ऐकून घेतला, आणि याच्या युक्तीचा विचार करण्याकरितां **स्यूता** एथील बिशप **डिएगो ओर्तीज** आणि दोघ याहुदी वैद्य यांस ती विदित केली. हें भूसृष्टिविद्येंत फार निपुण होते, आणि अशा जातीचा विषय आला असतां त्यांचें संमत घेण्याचा या राजाचा परिपाठ असे. **जिनोवा** देशांतील लोकांच्या अज्ञानानें **कोलम्बसास** आडवें येऊन जशी याची निराशा केली, त्याप्रमाणेंच **लिस्बोन** शहरामध्यें, तेथील लोकांस स्वमताचा जो अभिमान होता, तोच एक यास भयंकर शत्रु उभा राहिला. ज्या पुरुषांच्या निर्णयांवरून **कोलम्बसाची** युक्ति मान्य अथवा अमान्य व्हावी असें होतें, ते पुरुष **पोर्त्तुगाल** देशांतील नौकागमनांविषयींील मुख्य अधिकारी असत.

त्यानें याचें बोलणें ऐकून घेण्याकरितां मंडळी नेमल्या.

त्यांनीं **हिंदुस्थानांत** जावयास **कोलम्बसानें** जो अधिक जवळचा व अधिक निश्चयात्मक असा मार्ग काढिला होता, त्याजहून केवळ उलट्या रोखानें गलबत चालवून **हिंदुस्थानांत** जायाचा मार्ग शोधून काढायास सांगितलें होतें. याकरितां आपले मताचा धिक्कार करणें, अथवा **कोलम्बसाचें** मत चांगलें ह्मणोन स्वीकारणें, या दोनही खेदकारक गोष्टी सहन केल्यावांचून, **कोलम्बसाच्या** युक्तीस त्यांच्यानें मान्य करवेना. **कोलम्बसाच्या** मताचें स्वरूप पुरतेपणीं बाहेर पडायाजोगें यानें आपल्या कल्पनेचें विशेष विवरण करावें, ह्मणून त्यांनीं कपटानें **कोलम्बसास** हवेतसे प्रश्न विचारून व हजारों दूषणें देऊन यास त्रासविलें, आणि शेवटील निर्णय करायाचा तो लांबणीवर घातला. **कोलम्बसाची** युक्ति सिद्धीस गेली असतां त्यास जी प्रतिष्ठा आणि हित प्राप्त होणार, त्या दोहोचेंही आपण हरण करावें, असा त्यावेळेस त्यांनीं कट केला. आणि **कोलम्बसानें** जो मार्ग दर्शित केला त्या मार्गानेंच जाऊन यानें जे शोध योजिले होते, त्यांविषयीं यत्न करून पाहायास गुप्तपणें एक गलबत पाठवावें अशी राजास शकल सांगितली. त्या प्रसंगीं राजास योग्य ज्या कल्पना त्यांचा त्यास विसर पडून, त्यानें आपल्या थोरपणास अनुचित अशी जी विश्वासघाताची त्यांची मसलत ती कबूल केली. परंतु **कोलम्बसाची** युक्ति चोरून सिद्धीस नेण्याकरितां जो मालीम योजिला होता, त्याचे अंगीं याचें बुद्धिकौशल्य आणि धैर्य यांचा अभाव होता. तेव्हां असें

यानें केलेल्या शोधाविषयीं यत्न करायास तो प्रवृत्त होतो.

झालें कीं तोंडचा वारा सुटला, आणि जाऊन उतरावें अशी कोठें जमीनही दिसेना, तेव्हां त्याचें धैर्य सुटून तो परत **लिस्बोन** शहरांत आला, आणि जळो ही केवळ विपरीत आणि संकटांत घालणारी युक्ति, असे अपशब्द बोलूं लागला.

हा पोर्तुगाल देश सोडून स्पेन देशाच्या दरबारास जातो.

ज्यांचें अंतःकरण निष्कपट त्यांस अशा प्रसंगीं जसा साहजिक राग येतो; त्याप्रमाणेंच हें अयोग्य कृत्य उघडकीस येतांच **कोलम्बसास**ही संताप आला. नंतर त्या रागाचे उकळींत असा धडधडीत विश्वासघात करणारे लोकांबराबर कोणताही संबंध ठेवूं नयें, असा **कोलम्बसानें** निश्चय केला; हा तत्क्षणींच तें राज्य सोडून इसवी सनाच्या १४८४ च्या समाप्तीस **स्पेन** देशांत जाऊन उतरला. **कोलम्बसाची** युक्ति मान्य करायास, आणि ती सिद्धीस न्यावयास, कोणी साहाय्यदाता मिळाला असतां त्याचा आश्रय संपादण्याविषयीं कांहीं प्रतिबंध नव्हता, ह्मणून **फर्डिनान्द** आणि **इसाबेला**, ज्यांकडेस ते वेळीं **कास्तील** आणि **आरागोन** या दोन एकत्र झालेल्या राज्यांचा अधिकार होता, त्यांस आपण स्वतांच आपली कल्पना निवेदित करावी असा यानें निश्चय केला. परंतु राजे आणि प्रधान यांस विज्ञप्ति केली असतां तीपासून निश्चयेंकरून फळ उत्पन्न होईल असा त्यास भरंवसा येईना, कां कीं याचा यास नुकताच अनुभव आला होता; त्यामुळें आपला भाऊ **बार्थोलोमेओ** यास **इंग्लान्द** एथें पाठविण्याची प्रथम यानें सावधगिरी राखिली. **युरोपांतील** अत्यंत चतुर आणि श्री-

आपल्या भावास इंग्लान्दास पाठवितो.

मान असे जे राजे त्यांतलाच सातवा **हेन्रि** असा त्याचा लौकिक होता; त्याजशीं बोलणें चालवावें याजकरितां **कोलम्बसानें** आपल्या भावास आपलें मत पुर्तेपणीं समजवून दिलें.

स्पेन देशांत याचे कार्यसिद्धीम जे अडथळे आले ते.

**स्पेन** देशचे दरबारांत आपले बोलण्याचा स्वीकार करतील किंवा नाहीं याविषयीं जे संशय आणि भयें **कोलम्बसाचे** पोटांत आलीं होतीं, त्यांस कारण होतें; तें असें कीं, त्या संधीस **अरब** लोकांचें **स्पेन** देशांत **ग्रनाडा** ह्मणून जें अखेरीचें राज्य त्याजबराबर जिवावरची लढाई करण्यांत **स्पेन** देश गुंतला होता. **फोर्डिनान्द** याचा स्वभाव दिक्कतखोर आणि संशयी असे, त्यामुळें साहसी आणि असाधारण अशा

त्या लोकांची चाल व ज्या लढाईंत ते गुंतले होते ती लढाई याचे कार्यसिद्धीस अनुकूल नव्हती.

कृत्यांची त्यास आवड नसे. **इसावेल्ला** ही जरी मोठी उदार आणि मोठी साहसी होती तथापि हरएक बाबतींत ती आपल्या नवऱ्याच्या ताब्यांत असे. **स्पेन** देशचे लोकांनीं प्राचीन काळची जी मर्यादा तिचे पलीकडेस गलबतांतून पर्यटन करण्यास आजपर्यंत प्रयत्न केले नाहींत, आणि त्यांच्या शेजारचे **पोर्तुगीज** लोक आश्चर्य वाटायासारिखे नवीन शोध करीत चालले होते हें पाहिल्यावरही, त्यांचे सारिखा व्यापार आपणास साधेल किंवा नाहीं हें पाहण्याचा, व त्यांची बरोबरी करण्याचाही यत्न केला नाहीं. ख्रिस्ती धर्मावर विश्वास न ठेवणारे जे **अरब** लोक त्यांची लढाई चालली होती, तींत आपली उद्योगशीलता आणि जयश्रीविषयक उत्साह हीं दाखविण्याचा त्या **स्पेन देशीय** लोकांस चांगला योग

आला होता. परंतु ही गोष्ट **कोलम्बसास** प्रतिकूळ होती; त्यामुळें जे लोक स्वभावतः कोणत्याही गोष्टीचा निश्चय करण्यामध्यें आळसी आणि मंद, अशा लोकांपासून त्वरित काम करून घेणें यास परम अशक्य होतें. परंतु ज्या लोकांपासून अभय व आश्रय **कोलम्बसानें** मागितला होता, त्यांचे व याचे स्वभावास फार चांगलें पडत असे. **कोलम्बस** मन मिळावू रीतीचा असूनही भारदस्त होता; आणि आपले भाषणांत व कृतींत पदोपदीं दृष्टि देणारा, सदाचरणांत कोणी दोष न ठेवण्याजोगा, आणि धर्मसंबंधी सर्व कर्मानुष्टानांकडे जें याचें लक्ष असे त्यांत लोकांनीं याचें उदाहरण घेण्याजोगा, असा होता. असे प्रतिष्ठा मिळण्याजोगे जे याचे अंगीं गुण होते, त्यांहींकरून यास पुष्कळ अंतरंग मित्र मिळाले एवढेंच नाहीं, तर सर्वांपासून मान्यताही मिळाली. **कोलम्बसाची** जी मध्यम प्रतीची संपत्ति तीस उचित असा जरी याचा साधेपणा असे, तथापि यास दारिद्र्यामुळें स्वभवत् युक्ति सुचून, हा कोणीएक यःकश्चित् प्रयासकर्ता आहे, असें लोकांनीं कल्पिलें नाहीं; तर ज्या पुरुषाच्या सिद्धांतांकडेस मोठें लक्ष देणें योग्य अशा पुरुषासारिखा याचा आदर केला.

याचे युक्तीचा विचारशून्य न्यायाधीशांनी तपास केला.

**फर्डिनान्द** आणि **इसाबेला** हीं उभयतां **अरब** लोकांबरावर लढाई करण्याचे कामांत जरीं अगदीं गुंतलीं होतीं, तथापि त्यांनीं **कोलम्बसाची** इतकी मान्यता ठेविली कीं **इसाबेला** राणीनें **फर्डिनान्द डितालावेरा** ह्मणून जो तिचा गुरू होता, त्यास याचे युक्तीचा विचार करण्यास सांगितलें. त्या गुरूनें अशा जातीचे विषयांचा निर्णय कर-

ण्यास जे त्याच्या देशचे लोक फार समर्थ होते, त्यांचा तद्विषयीं विचार घेतला. परंतु **स्पेन** देशांत आजपर्यंत खऱ्या विद्येची इतकी थोडी प्रवृत्ति झाली होती कीं, अशा गहन विषयांचा विचार करायास जे उगीच विद्येचा डौल घालणारे असे विद्वान् निवडिले होते, त्यांस **कोलम्बसानें** ज्या मूलपीठिकेवरून आपले तर्क रचिले, आणि तद्विषयक आशाही धरिली, ती मूळपिठिकाच पुर्तेपणीं समजली नाहीं. त्यांमधील कितीएकांनीं पृथ्वीचे मानाविषयीं जें त्यांस विपरीत ज्ञान झालें होतें, तेणेंकरून असा वाद केला, कीं, **कोलम्बसानें** पूर्वेकडील जे दूरदूरचे देश शोधून काढण्याविषयीं योजिले आहेत, तेथें जलमार्गानें जाण्यास तीन वर्षांपेक्षां कमी काळ पुरणार नाहीं. दुसऱ्यांनीं असा निर्णय केला, कीं प्राचीन कालच्या विद्वान् लोकांचें समुद्राचा अंत नाहीं ह्मणोन जें मत आहे, त्याप्रमाणेंच **कोलम्बस** समुद्रांतून गेला असतां याचे अनुभवास येईल. अथवा जर तसाच आग्रह धरून हा पश्चिमेची जी मर्यादा तिच्या पलीकडेस तारूं हाकारून गेला, तर पृथ्वी गोलाकार आहे, यामुळें याचे परत येण्यास प्रतिबंध होईल. आणि ईश्वरानें ज्या पृथ्वीच्या दोन खंडांचा संबंध तोडून ठेविला आहे, त्यांमध्यें व्यापार चालू करायास जर **कोलम्बसानें** वृथा प्रयत्न केला, तर त्यांत तो प्राणास मात्र मुकेल. बहुतेक लोकांनीं या विषयावर विशेष वादविवाद करण्यांत नाशि. रतां, सामान्यतः **कोलम्बसाची** युक्ति लोकांत एक ह्मण आहे तिच्या आधारावरून निषेधिली. अज्ञानी, आणि मोठे कृत्यास ज्यांच्यानें हात घालवत नाहीं, अशा लोकांस बहुधा या ह्मणीखालीं लपायास जागा असत्ये. ती ह्मण ही

कीं, "सर्व मनुष्यांमध्यें मी काय तो शाहणा असें आपणास मानणें हें पोकळ अभिमानाचें होय." ते असें बोलले कीं, **कोलम्बसानें** जें हें ढोंग माजिवलें आहे, त्याप्रमाणें जर खरोखर देश असते, तर आजपर्यंत ते गुप्त राहिले नसते; आणि प्राचीन कालचें शाहणपण आणि चातुर्य, यांनीं या अपूर्वकल्पनेचें यश **जिनोवा देशां**तील एके यःकश्चित् गलवतहाक्यास मिळावयाकरितां वगळून ठेविलें नसतें.

त्यांनीं त्याविषयीं प्रतिकूळ समजाविलें.

असे विलक्षण तर्क घेणाऱ्या पुरुषांबरावर बोलणें चालवायास, **कोलम्बसास** आपली सर्व कुशलता आणि सहनशीलता खर्चावी लागली. **कोलम्बसास** अज्ञानाच्या दुराग्रहा बरावर झुंजावें लागलें एवढेंच नाहीं, परंतु यापेक्षां अधिक अनिवार्य जो असत्य ज्ञानाचा अभिमान त्याबरोबरही झुंजावें लागलें. असे पुष्कळ वादविवाद झाल्यावर, योग्य रीतीनें यांविषयाचा निवाडा करायास असमर्थ अशा न्यायाधीशांस आपला विषय समजवून देण्यांत, व त्यांची खात्री करण्यांत, निष्फळ प्रयत्न करण्यामध्यें पांच वर्षें घालविल्यानंतर, परिणामीं **टालेवरा** यानें **फेर्डिनान्द** आणि **इसाबेला** यांस **कोलम्बसा**-विषयीं प्रतिकूळ समजाविलें; त्यावरून **अरब** लोकांबरावर जी लढाई चालली आहे, तिचा शेवट होईपर्यंत नवीन आणि खर्चाचे कृत्यांत शिरणें हें फार वेडेपण, अशी **कोलम्बसा-ची** समजूत घालणें त्या उभयतांस प्राप्त पडलें.

ह्या सांगण्यामध्यें कठोरपणा दिसूं नये ह्मणोन जी युक्ति **फेर्डिनान्द** आणि **इसाबेला** यांनीं योजिली होती, ती आपल्या बोलण्याचा शेवटचा निषेध करण्यासाठीं योजिली

आहे, असें **कोलम्बसानें** कल्पिलें. परंतु मनुष्यमात्र च्या कल्याणार्थ असा नियम आहे कीं, मो आणि असाधारण, असे विचार योजण्यास समर्थ, अशी जी उत्तम कल्पनाशक्ति, तिच्या बरोबर नेहमीं मोठ्या आवेशाचा उत्साह असतो; तो उत्साह, दिवसगतीमुळें थंडा पडत नाहीं, आणि निराशेमुळें भग्नही होत नाहीं

याचे बोलण्याचा शेवटचा निषेध झाला तरीं याचा उत्साह थंडा पडला नाहीं.

अशा प्रकारचाच **कोलम्बसाचा** स्वभाव मोठा आवेशी असे. **कोलम्बसाची** जरी अशी मोठी निराशा झाली, आणि ज्या दरबारांत इतके दिवस उगीच व्यर्थ आशा लावून याचें मन रिझवलें होतें, त्या दरबारापासून जरीं एकाएकीं परतला, तरीं आपले स्वकीय कल्पनेच्या प्रामाणिकपणाविषयीं जो **कोलम्बसाचा** निश्चय होता तो कमी झाला नाहीं; आणि आपल्या कल्पनेचा खरेपणा प्रत्ययास आणून देण्याविषयीं जी याचे अंगीं उतावळी होती, ती पहिल्यापेक्षां अधिक वाढली. राजकीय संस्थानाचा आश्रय मिळावा ह्मणून निरर्थक उपार्जना केल्यानंतर **कोलम्बसानें** राजापेक्षां कमी पदवीच्या गृहस्थांस अर्ज केला. आणि **मेडीनासिडोनिआ**, व **मेडीनासिली** एथील ड्यूक पदवीचे गृहस्थांस अनुक्रमानें विनंती केली. हे लोक जरीं रयतेंतले होते, तथापि **कोलम्बसानें** जें साहस कृत्य योजिलें होतें त्यास पुरून उरे इतकी शक्ति आणि द्रव्य त्याजपाशीं होतें. हा कालपर्यंत ज्या बोलण्यामध्यें **कोलम्बस** गुंतला होता त्यांत जसें कांहीं फळ झालें नाहीं, त्याप्रमाणेंच हें बोलणेंही निष्फल झालें; असें होण्याचीं दोन कारणें दिसतात, तीं अशीं कीं, या गृहस्थांपेक्षां मोठ्या पदवीचे गृह-

त्यांस **कोलम्बसाचे** हेतूंचा जसा बोध झाला नव्हता, तसाच यांसही झाला नसावा; अथवा **फेर्डिनान्द** यानें जी युक्ति निषेधिली, तीस आपण अनुकूळ झालों तर त्याच्या मीपणास धक्का लागेल, आणि त्याची आपणावर वक्रदृष्टि होईल असें त्यांस भय वाटलें असावें.

इंग्लान्दामध्यें याच्या भावानें जें बोलणें चालणें चालविलें तें.

अशी निराशा होत गेल्यामुळें **कोलम्बसास** परम दुःख झालें, आणि यानें जो आपला भाऊ **इंग्लान्दचे** दरबारांत पाठविला होता, त्याजकडील कांहीं वर्तमान न आल्यामुळें तर त्या दूःखांत फारच भर पडली. **बार्थोलोमेओ** हा जलमार्गानें **इंग्लान्दास** जात असतां, दुर्दैवामुळें तो समुद्रांतील चांचे लोकांच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्यास सर्वस्वीं नागवून कितीएक वर्षें बंदिशाळेंत अडकवून टाकिलें होतें. शेवटीं तो तेथून पळून गेला आणि लंडन शहरास जाऊन पोंचला. परंतु ते वेळेस त्यास दरिद्रानें इतकें पीडिलें होतें, कीं दरबारांत घालून जाण्याजोगा आमानिमा करण्या पुरता तरी पैसा मिळविण्याकरितां, बरेच दिवस त्याला नकाशे काढून विकण्याचें प्राप्त पडलें. नंतर **कोलम्बसानें इंग्लान्दचा** राजापाशीं निवेदित करण्याकरितां ज्या गोष्टी त्यास सांगितल्या होत्या, त्या त्यानें त्या राजापाशीं निवेदित केल्या. **हेन्री** राजा अतिशयित संशयी आणि कृपणस्वभावाचा होता, त्यामुळें तो नवीन आणि खर्चाचे कामांत मन घालीत नसे, तथापि **कोलम्बसाचे** बोलण्याचा त्यानें जसा अधिक खुष मर्जीनें स्वीकार केला, तसा ज्या अन्य राजांकडे तें बोलणें लाविलें होतें त्यांनीं केला नाहीं.

कोलम्बसास स्पेन देशांत उत्तेजन मिळण्याच्या कांहीं आशा आहेत.

इकडेस **कोलम्बसास** आपल्या भावाचें वाट काय झाली, हें न समजल्यामुळें आणि **स्पेन** देशांत आतां उत्तेजन मिळण्याची आशा न राहिल्यामुळें, **इंग्लान्दचे** दरबारांत आपले युक्तीचा स्वीकार अधिक आवडीनें करितील या आशेनें स्वतः तेथें जाण्याचा यानें निश्चय केला. या कामाकरितां यानें तयारी केली, आणि आपले पाठीमागें आपल्या मुलांचा बंदोबस्त राखण्याविषयींही यानें तर्तूद करून ठेविली. इतक्यांत **पालोसचे** जवळच्या ज्या **राबिडा** मठांत **कोलम्बसाचे** मुलांनीं विद्याभ्यास केला होता, त्या मठाचा अधिपति **जुवान पीरेज** यानें येऊन थोडें दिवस प्रवासास जाण्याचें ठेवावें, अशी **कोलम्बसास** अंतःकरणपूर्वक विनंती केली. **पीरेज** हा मोठा विद्वान होता, आणि त्याची व **इसाबेला राणीची** ओळख असून तिचेजवळ त्याची कांहीं मान्यताही असे. या गृहस्थाची मनापासून **कोलम्बसावर** भक्ति असे, कारण कीं, **कोलम्बसाचें** सामर्थ्य आणि प्रामाणिकपणा, हीं त्यास अनेक प्रसंगीं विदित झालीं होतीं. त्या गृहस्थास नवीन पदार्थ पाहण्याची इच्छा असे ह्मणून, अथवा **कोलम्बसाशीं** स्नेहभाव असे ह्मणून, त्यास उत्तेजन येऊन तो, आपले शेजारीं गणित विद्येमध्यें पुरा असा एक वैद्य होता त्यास समागमें घेऊन, **कोलम्बसाचे** युक्तीचा यथार्थ रीतीनें विचार करावा ह्मणून प्रवृत्त झाला.

याचे युक्तीचा विचार केल्यानंतर ती खरी आहे अशी खात्री होते.

असा विचार केल्यानंतर त्याचें पुर्तेपणीं समाधान झालें कीं ज्या मूळपीठिकेवरून **कोलम्बसानें** आपले मताची उभारणी केली ती मूळपीठि-

का सुदृढ आहे, आणि **कोलम्बसानें** जी योजना केली ती सिद्धीस जाण्याचाही संभव आहे. या अशा महत्कृत्यास आश्रय देणारांस जी कीर्त्ति व लाभ प्राप्त होतील तीं, स्वदेशास प्राप्त व्हावीं ह्मणून, **इसाबेल्ला** राणीस त्यानें विनंतीपत्र पाठविलें, आणि या कल्पनेस जें लक्ष उचित आहे तें देऊन तिचा पुनः विचारकरणें आपणास आवश्यक आहे अशी विज्ञप्ति केली.

ज्या पुरूषाची **इसाबेल्ला** मान्यता राखीत होती त्याचे विनंतीवरून तीस द्रव आला, आणि त्या मोठ्या विषयावर त्याजबरोबर संभाषण करण्याकरितां त्यास **सान्टाफे** या गांवीं तत्काळ येण्याकरितां आज्ञा केली, कारण **ग्रनाडास** वेढा पडला होता त्यामुळें त्या काळीं दरबार तेथें भरत असे. त्या उभयतांच्या भेटीपासून प्रथम हें निष्पन्न झालें कीं **कोलम्बसास** परत येण्याची तयारी करण्यापुरतें थोडेसें द्रव्य पाठवून पुनः दरबारास येण्याकरितां मोठ्या आदरसत्कारानें बोलावणें पाठविलें. त्याच वेळेस असा रंग दिसून आला होता, कीं **ग्रनाडा** देश ताब्याखालीं आणिला असतां **अरब** लोकांबरोबर जी लढाई चालली आहे तिचा लवकरच चांगला परिणाम होऊन **स्पेन** देशांतील लोकांस नवोनकृत्यांत शिरायास मोकळीक होईल; यावरून, व राजाची कृपा होऊन नुकतीच **कोलम्बसाची** मानमान्यता झाली होती यावरून, **कोलम्बसाचे** मित्रांस याचे युक्तीस आश्रय मिळेल याविषयीं पूर्वीपेक्षां अधिक विश्वास धरायास उमेद आली. या मित्रांमध्यें **आलोन्सो दिक्विन्तानिल्ला** ज्याचेकडे **कास्तील** एथील व

कोलम्बसाच्या कल्याणाकडे ज्यांचें लक्ष होतें अशा वहुत संभावित पुरूषांस यास नेऊन भेटवितात.

सुलाचा अधिकार होता हा एक, आणि **लूइझादिसान्तां जेल** ज्याचेकडे **आरागोन** एथील धर्मखात्यांतील वसूल घेण्याचें काम होतें हा दुसरा, हे पुढारी होते. हा मोठा उद्देश सिद्धीस नेण्याविषयीं जी त्यांचे अंगीं यथायोग्य उत्कंठा होती, तिणेंकरून त्यांचे नांवास इतिहासांत उत्तमस्थलीं लिहिण्याची योग्यता प्राप्त झाली आहे. या गृहस्थांनीं **कोलम्बसास** मोठ्या पदवीचे गृहस्थांस भेटविलें. आणि याचे कार्याकडे त्यांचें चित्त लागे असें केलें.

परंतु **फर्डिनान्द** याचे मनांत **कोलम्बसास** हितावह अशा कल्पना उत्पन्न करणें फार कठीण होतें, कारण कीं **कोलम्बसाची** योजना अति विलक्षण आणि छांदिष्ट आहे, असें तो अद्यापि मानीत होता. **कोलम्बसाच्या** पक्षाचे लोकांचा श्रम निष्फल करण्याकरितां पूर्वी याची युक्ति दुःसाध्य आहे असें ज्यांनीं ह्मटलें होतें, त्यांचीच सांप्रत जें याच्याशीं बोलणें चालणें करायाचें त्यांत योजना करण्याची युक्ति **फर्डिनान्द** यानें काढिली. पूर्वी निश्चयेंकरून सिद्धि होईल अशी जी **कोलम्बसास** आशा होती तीच आशा धरून ज्या वेळीं हा त्यांचे पुढें आला, आणि पूर्वी जें मोठें बक्षीस मागत होता तेंच मागूं लागला, तेव्हां त्यांस आश्चर्य वाटलें. **कोलम्बसानें** असें बोलणें लाविलें, कीं नवीन शोध करण्याकरितां माझे हाताखालीं थोडेशे आरमाराची संजोगणी करून द्यावी; आणि पुढें मी जितके समुद्र व देश शोधून काढीन तेथील आरमाराचा अधिकार आणि राजकीयसत्ता मला वंशपरंपरा असावी; तसेंच मला व माझे मुलांबाळांस तेथें जो नफा होईल त्याचा दाहावा हिस्सा

प्रथम जें मोठें बक्षीस मागत होता तेंच पुनः मागतो.

सतत मिळावा; आणि या महत्कृत्यापासून जे लाभ होतील त्यांचा माझ्या द्रव्यानुसार मला वांटा मिळावा अशा करारानें, आपला उद्देश सिद्धीस जाण्याकरितां जितकें द्रव्य पाहिजे होतें, त्याचा अष्टमांश **कोलम्बसानें** आगाऊ देऊं केला. जर हें मोठें कृत्य सफल झालें नाहीं, तर बक्षीस अथवा लाभ याविषयींचें माझें कांहींच बोलणें नाहीं. या वर्त्तणुकीवरून **कोलम्बसाची** आपले मताच्या खरेपणाविषयीं पक्की खात्री आहे असें जें निभ्रांत प्रमाण दिसून आलें त्याचा विचार न करितां, आणि इतका विलंब लागला व इतके प्रतिबंध आले तथापि **कोलम्बसाचे** मनाचा रोंख याचें मुळचें जें ह्मणणें होतें त्यावांचून दुसरे हलक्या बोलण्याकडेस वळला नाहीं, असें पाहून आश्चर्यभरित न होतां, **कोलम्बसाचे** युक्तीचा जे पुरुष विचार करीत होते, ते याचे पर्यटनास खर्च किती लागेल, आणि यानें जें बक्षीस मागितलें त्याचें मौल्य काय होईल, याविषयींच विचार करूं लागले. **कोलम्बसाचे** पर्यटनाचा खर्च तर विशेष नव्हता, तथापि त्यांनीं असें समजाविलें कीं सांप्रत **स्पेन** देशाची जमा, खर्च होऊन फार उणी झाली आहे याकरितां, या देशास हा एवढा मोठा खर्च फार भारी आहे. त्यांनीं असा वाद केला, कीं **कोलम्बसानें** जें कबूल केलें आहे तें सर्व जरीं केलें, तथापि अधिकार आणि प्राप्ति यांविषयींचें जें **कोलम्बसानें** मागणें घातलें आहे तें फार जरब आहे; आणि जर करितां याच्या सर्व मोठमोठ्या आशा स्वप्नवत् झाल्या, तर असें आचाट कृत्य करणारास अशा मोठ्या देणग्या केवळ अविचाराच्याच दिसणार नाहींत, तर उप-

याच्या मागण्या फार खर्चाच्या आहेत असें बोलतात.

हासासही पात्र होतील. अशा प्रकारें सावधगिरी आणि शाहाणपण यांचे टवदार भूषणावरून त्यांचें मत खऱ्यासारिखें भासलें, आणि त्या मतास फेर्डिनान्द याचाही मोठा आश्रय होता; त्यावरून इसाबेल्ला राणीनें कोलम्बसास कोणत्याही प्रकारें आश्रय देण्याचें सोडिलें, आणि याचे बरोबर जें नवीन बोलणें चालणें आरंभिलें होतें, तेंही त्वरित बंद केलें.

या अकल्पित संकटावरून याची उमेद फारच खचली.

**कोलम्बसाचे** आजपर्यंत जितके हिरमोड झाले त्यांमध्यें या हिरमोडापासून त्यास फारच दुःख झालें. तें असें कीं, प्रकाशाच्या अकल्पित किरणाप्रमाणें **इसाबेल्ला** राणीकडून **कोलम्बसास** जें आमंत्रण आलें होतें, तेणेंकरून सिद्धि होण्याचे असे रंग दिसून आले, कीं त्यावरून **कोलम्बसास** आतां आपले श्रमाची परिसमाप्तिच झाली अशी आशा धरायास उमेद आली होती; परंतु आतां अंधकार आणि अनिश्चय यांचें पुनः परावर्तन झालें तेणेंकरून, **कोलम्बसाचें** मन दृढनिश्चयाचें असतांही, याच्यानें जें हें अकल्पित संकट प्राप्त झालें त्याचा धक्का सोसवेनासा झाला. तेव्हां **इंग्लान्दास** जाण्याचा एक शेवटचा उपाय राहिला होता तो करावा या बेतानें **कोलम्बस** त्या दरबारांतून परम संतापानें बाहेर पडला.

याचे आश्रयदाते ही संधि चांगली पाहून यांच्या कल्याणार्थ पुनः एक वेळ प्रयत्न करितात.

सुमारें त्याच वेळीं **ग्रनाडा** देश स्वाधीन झाला, आणि **फेर्डिनान्द** आणि **इसाबेल्ला** या उभयतांनीं मोठ्या जयजयकाराच्या समारंभानें तें शहर स्वसत्तात्मक केलें. या शहराचें स्वामित्व हातीं आलें यामुळें त्यांचे राज्यांत अन्य राज्याचा अधिकार समूळ नाहींसा झाला.

आणि **पिरिनिज** पर्वताच्या तळापासून **पोर्त्तुगाल** देशाचे हद्दीपावेतों अवघे प्रांत त्यांचे ताब्यांत आले. मनुष्यास यश प्राप्त झालें असतां त्याच्या वृत्ति उचंबळूं लागतात, आणि तींहींकरून त्याचे मनास हुशारी आणि मोठ्या कृत्यास हात घालण्याची उमेद येत्ये. **क्विन्तानिल्ला** आणि **सान्तांजेल** ह्मणून जे **कोलम्बसाचे** सावध आणि विचारी आश्रयदाते होते त्यांस आपले मित्राच्या कल्याणाकरितां पुनः एक वेळ प्रयत्न करायास ही संधि चांगली सांपडली. त्यांनीं **इसाबेल्ला** राणीस स्वतः विनंती केली, कीं आपण मोठमोठ्या कृत्यांस आजपर्यंत महान् महान् आश्रय दिले असें असतां, कोणत्याही राजास आजपर्यंत ज्या युक्ति निवेदित झाल्या त्यांमध्यें सर्वोत्कृष्ट असी जी **कोलम्बसाची** युक्ति तिचा अंगीकार करायास आपण इतका वेळ मागें पुढें करितां ही केवळ आश्चर्याची गोष्ट आहे, असें दर्शवून आणखी तीस असें विदित केलें, कीं **कोलम्बसाचें** ज्ञान मोठें गहन आणि त्याची चाल फार प्रामाणिक आहे. **कोलम्बसास** नाविक शास्त्रांत माहिती, आणि भूमितीचें ज्ञान चांगलें, यांमुळें पृथ्वीचे रचनेविषयीं आणि तिजवरील नाना देशांचे स्थितीविषयीं वास्तव कल्पना करायास हा फार समर्थ आहे. स्वकीय योजना सिद्धीस नेण्याकरितां यानें आपलें आयुष्य व संपत्ति भरीस घालायास कबूल केली, यावरून याचे प्रामाणिकपणाविषयीं व कार्यसिद्धि होण्याच्या आशेविषयीं पुरी खात्री होण्याजोगें प्रमाण दिसून आलें आहे. यानें जें आरमार मागितलें आहे तितक्याची संजोगणी करायास जी रक्कम पाहिजे ती फारच थोडी, परंतु याचे कृत्यापासून जे

कोलम्बसाच्या वास्तव गुणांचें यथार्थ वर्णन करितात.

लाभ होतील ते तर फार अपरिमित आहेत. हा, जे नवीन देश आपण शोधून काढील त्यांपासून जें उत्पन्न होईल त्यांशिवाय, आपले अभिनव युक्तीकरितां व श्रमांकरितां बक्षीसही मागत नाहीं. तर मनुष्याची ज्ञानमर्यादा वाढविण्याकरितां, व आजपर्यंत जे देश अज्ञात आहेत त्यांचे बराबर व्यवहार चालू करण्याकरितां, उत्तम प्रकारचा प्रयत्न करणें हें ज्यापक्षीं आपले महात्मतेस उचित आहे, त्यापक्षीं **स्पेन** देशांतील ज्या प्रांतांत ख्रिस्ती धर्म फार दिवस नाहींसा करून टाकिला होता, त्या प्रांतांत त्या धर्माची पुनः स्थापना केल्यानंतर, नवीन देश शोधून काढणें, व तेथें ईश्वरप्रेरित सत्याचा प्रकाश व सुखें प्रकट करणें, हें आपले धर्मपरायण बुद्धीस, व अंतःकरणाचे उल्हासास, अतिशय समाधानकारक होईल.

याच्या पर्यटनापासून जे लाभ होणार, ते.

जर आपण या गोष्टीचा त्वरित निर्णय केला नाहीं तर हा प्रसंग पुनः यावयाचा नाहीं; कारण **कोलम्बस** अन्यदेशीं जाण्याकरितां मार्गस्थ झालाच आहे, आणि यास एकादा अधिक भाग्यवान्, आणि मोठें कृत्य उचलणारा, असा राजा भेटून तो यार्ची बोलणीं मान्य करील, आणि **स्पेन** देशास यश व लाभ मिळविण्याचा एकदा योग आला असतां, तो योग नाशकारक भीतीनें मी आपले हातचा घालविला, असा **स्पेन** देश सर्वकाल शोक करीत बसेल.

अशी चांगली संधि साधून एवढ्या पदवीच्या गृहस्थांनीं सबल कारणें सांगितल्यावरून इच्छिलेली गोष्ट निष्पन्न झाली. या गृहस्थांनीं **इसाबेला** राणीचे सर्व संशय व भयें दूर केल्यानंतर, तिनें तत्काळ **कोलम्बसास** परत बोलवायास

या कारणावरून इच्छिलेली गोष्ट सिद्ध होते.

आज्ञा केली; **कोलम्बसाच्या** ह्मणण्याप्रमाणें त्यास कामास लावायाचा निश्चयही तिणें दर्शित केला; आणि आपले जवळ द्रव्य थोडें ह्मणून फार श्रमी होऊन तिणें, मोठ्या औदार्यानें **कोलम्बसाच्या** समुद्रांतून पर्यटन करण्याचे तयारीस जितकें द्रव्य पाहिजे होतें त्याची उभारणी करण्याकरितां, आपलें जवाहीर गाहाण ठेवायास देऊं केलें. ते वेळीं **सान्तांजेल** यानें कृतज्ञतेच्या परमानंदामध्यें तिच्या हस्ताचें चुंबन करून, द्रव्याची उभारणी करण्याकरितां जी तिणें युक्ति योजिली ती अपमानकारक आहे असें समजून, तीपासून तिचें रक्षण करायास जितक्या द्रव्याची अपेक्षा होती तितकें द्रव्य तत्काळ देण्याचा त्यानें पत्कार घेतला.

**कोलम्बस** मार्गस्थ होऊन कितीएक कोस पुढें गेला होता, इतक्यांत **इसाबेल्ला** राणीकडील जासुदानें यास येऊन गांठिलें. तेव्हां आपले कल्याणार्थ **इसाबेल्ला** राणीचा अकल्पित निश्चय ऐकून हा लागलाच **सान्ताफे** एथें परत आला; त्या समयीं यास जो आनंद झाला त्यांत थोडासा किंतु राहिला होता, परंतु **इसाबेल्ला** राणीनें याचें अंतःकरणपूर्वक आगत स्वागत केल्यामुळें, व याचे ध्यानींमनीं जें जलपर्यटन करायाचें होतें त्यास निघण्याचाही रंग लवकरच दिसून आला यामुळें, **कोलम्बसानें** उपार्जना करण्यांत व कार्य सिद्धि होईल किंवा नाहीं या घोरांत जीं त्रासदायक आठ वर्षें **स्पेन** देशांत परम दुःखानें काढिलीं होतीं, त्या सर्वांचें यास विस्मरण पडलें. या समयीं तहाचें बोलणें मोठ्या त्वरेनें सुरळीत चाललें, आणि **कोलम्बसाब**-

हा परत आल्यावर तहनामा पुनः चालू करितात.

राबर जो तहनामा अथवा कलमबंदी ठरविली तिजवर १४९२ च्या एप्रील महिन्याचे १७ वे तारिखेस सही झाली. त्यांतील मुख्य कलमें.

तहनाम्याचीं कलमें.

१ **फर्डिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांचेकडेस जें साग-राचें स्वामित्व होतें त्या नात्यानें त्या उभयतांनीं, **कोलम्बसास** तो आपल्या उद्योगानें जे समुद्र व बेटें आणि महाद्वीपें शोधून काढील, तेथील आरमाराचे नायकीच्या कामावर योजिलें; आणि असा ठराव केला, कीं **कास्तील** एथील आरमाराचे मुख्य नाइकास आपले इलाख्यांत जेवढे अधिकार आणि हक्क आहेत, तेवढ्याच पदवीनें **कोलम्बस** आणि त्याचे वारस यांनीं या जाग्याचा वंशपरंपरा उपभोग करावा.

२ **फर्डिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांनीं, **कोलम्बस** जीं बेटें आणि महाद्वीपें शोधून काढील त्या सर्वांमध्यें यास राज्यकारभार चालविण्याची मुक्त्यारी दिली; परंतु त्या देशांतील कोणते एके देशांत पुढें कामकारभार यथास्थित चालविण्याकरितां दुसरा कामगार ठेवण्याची गरज लागली, तर **कोलम्बसानें** तिघांचीं नावें लिहून द्यावीं इतका मात्र याचेकडेस अधिकार दिल्हा, आणि त्यां तिघांतून पसंत पडेल तो त्या कामावर त्या उभयतांनीं नेमावा असें केलें, आणि सुभेदारीचा अधिकार सर्व हक्कांसुद्धां **कोलम्बसाचे** कुटुंबास वंशपरंपरा चालावा.

३ **कोलम्बस** जे देश शोधून काढील तेथील उत्पन्न आणि व्यापार यांपासून खर्चवेंच भागून जो नफा होईल त्याचा दाहावा हिस्सा **कोलम्बस** व **कोलम्बसाचे** वारस यांस **फर्डिनान्द** आणि **इसाबेल्ला** या उभयतांनीं द्यावा.

४ शोधून काढलेले देशांत जर व्यापारसंबंधें कांहीं तंटा बखेडा अथवा वाद उत्पन्न झाला तर त्याचा निवाडा करायास स्वतां **कोलम्बसास** अथवा तो जे न्यायाधीश नेमील त्यांस पूर्ण अधिकार आहे.

५ या पर्यटनास, व **कोलम्बस** जे देश शोधून काढील त्यांचे बराबर व्यापार चालवायास, जो खर्च लागेल त्याचा आठवा हिस्सा **कोलम्बसानें** द्यावा आणि त्याबद्दल जो नफा होईल त्याचा अष्टमांश **कोलम्बसानें** घ्यावा.

या तहनाम्यामध्यें **फेर्डिनान्द** याचें नांव **इसाबेला** राणीचे नावाबराबर जरीं जोडिलें आहे, तरीं त्याचा **कोलम्बसावर** इतका अविश्वास होता, कीं त्यानें **आरागोन** एथील राजा या नात्यानें या महत्कृत्यास अगदीं हातभार लाविला नाहीं. **कास्तील** एथील सरकारांतूनच या पर्यटनाचा खर्च भागायाचा होता ह्मणोन **इसाबेला** राणीनें या कार्याचे सिद्धीपासून जो लाभ होईल तो आपले प्रजेसच मिळावा असें करून ठेविलें.

फेर्डिनान्द राजा, आरागोन एथील राजा या नात्यानें याचे कार्यास अगदीं हातभार लावीत नाहीं.

या तहनाम्यावर सही होतांच **कोलम्बसाचे** जलपर्यटनाकरितां सामानसुमान सिद्ध करून देण्यांत मन घालून, व अतिशय त्वरा करून, **कोलम्बसानें** निरर्थक उपार्जना करण्यांत जो काळ व्यर्थ घालविला होता, त्याचा वचपा काढावा याविषयीं त्या राणीनें प्रयत्न केला. मे महिन्याच्या १२ वे तारिखेस **इसाबेला** राणीकडून जें व्हायाचें होतें तें सुपुर्त झालें, आणि **कोलम्बस** राजा आणि राणी यांचा शेवटचा निरोप घेण्याकरितां त्यांचेपाशीं गेला. या पर्यटनामध्यें

याच्या जलपर्यटनाविषयींची तयारी.

अमुक ठिकाणीं उतरणें व अमुक रीतीनें चालणें वगैरे सर्व **कोलम्बसाच्या** शाहाणपणावरून विनदिक्कत त्या उभयतांनीं याचे अंगावरच टाकिलें. परंतु **पोर्तुगाल** देशचे राजास संताप येण्याचें वास्तव कारण टाळावयाकरितां, **गीनि** देशाचे कांठावरील, अथवा जे देश आह्मी शोधून काढिले असें **पोर्तुगीज** लोक ह्मणतात त्या देशांतून कोणतेही एका देशांतील त्या लोकांच्या ज्या वसाहतींच्या जागा असतील त्यांचे जवळ तुह्मी जाऊं नये, असें त्या उभयतांनीं **कोलम्बसास** वजावून सांगितलें. जीं तारवें **कोलम्बसाच्या** ताब्यांत द्यावयाचीं होतीं तीं **आंडालूसिआ** या प्रांतांत समुद्रकांठीं **पालोस** ह्मणून एक गांव होतें तेथील बंदरीं तयार करून ठेवावीं, ह्मणून **इसाबेला** राणीनें आज्ञा केली. पूर्वी लिहिलेला मठाधिपति **जूआन पीरेज**, ज्यानें **कोलम्बसावर** पूर्वींच मोठे उपकार करून ठेविले होते, तो त्या गांवाच्या शेजारींच राहत असे. त्या चांगल्या धर्मोपदेष्ट्याच्या वजनामुळें, व **कोलम्बसाचा** आणि तेथील राहाणवाल्यांचा कांहीं संबंध होता त्यामुळें, **कोलम्बसानें** तहनाम्यामध्यें जें द्रव्य देण्याचें कबूल केलें होतें तितकें त्यांपासून उत्पन्न केलें एवढेंच नाहीं, परंतु त्यांतील कितीएक गृहस्थांनीं आपले बराबर यावें अशी त्यांचेपासून कबुलातही करून घेतली. त्या गृहस्थांमध्यें **पिंझोन** या नांवाचे तिघे बंधु मुख्य होते, हे पुरुष मोठे श्रीमान आणि नाविक शास्त्रामध्यें पुरे माहितगार असून,

पोर्तुगीज लोक ज्या देशांस आपलेसे ह्मणतात त्या देशांत जाऊं नये असें यास सांगतात.

जूआन पीरेज याच्या वजनामुळें यास द्रव्य आणि मनुष्यें यांची कुमक मिळाली.

आपलें आयुष्य व संपत्ति या पर्यटनाचे भरीस घालावी अशी त्यांची इच्छा होती.

परंतु **इसाबेल्ला** आणि **कोलम्बस** या उभयतांच्या सर्व प्रयत्नानें जें आरमार सिद्ध झालें तें, ज्या लोकांच्या हातून तयार झालें त्यांचे थोरपणास, व ज्या कार्याकरितां त्याची योजना केली होती त्या कार्याचे महत्वास, योग्य नव्हतें, कारण त्या आरमारांत सारीं तीन गलबतें होतीं. आरमाराचा अधिपति **कोलम्बस** याजकडे ज्या गलवताचा अधिकार होता तें या तिहींमध्यें मोठें होतें खरें परंतु त्यांतही फार ओझें मावत नव्हतें. **सान्ता मारीआ** या वरदा कुमारिकेची **कोलम्बस** मनापासून भक्ति करीत असे, ह्मणून याणें त्या गलबताचें **सान्ता मारीआ** असें नांव ठेविलें. दुसऱ्या गलबताचें नांव **पिंटा** असें होतें, आणि त्याचा अधिकार **मार्टिन् पिंझोन** याचेकडे होता, व त्याचा भाऊ **फ्रांसिस** याचेकडेस तें गलबत हकारण्याचें काम होतें. तिसऱ्या गलबताचें नांव **नीण्या**, हें गलबत **विन्सेंट यानेझ पिंझोन** याचे हाताखालीं होतें. हीं दोनही गलबतें हलकीं होतीं, आणि त्यांत मोठमोठ्या नावांपेक्षां अधिक ओझें मावत नसे, व त्यांत लढाऊ सामानहीं त्या नावांपेक्षां ज्याजती नसे. या गलबतांस शोभत असल्यास आरमार हें नांव योग्य आहे. ह्या आरमारावर बारा महिनेपर्यंत पुरावयाजोगी सामग्री भरली होती; त्यावर एकंदर मनुष्यें ९०, त्यांत बहुतेक खलाशी, व थोडकेसे **कोलम्बसाचे** दैवावर हवाला देऊन जे पराक्रमी पुरुष निघाले होते ते, आणि कांहीं **इसाबेल्ला** राणीनें आपले दरबारांतील ज्या

गलवताचीं नावें व त्यांचें वर्णन.

गलबतावरील लोक किती.

गृहस्थांस **कोलम्बसा**बरोबर जाण्यास नेमिले होते, ते असे मिळून होते. **स्पेन** देशचे दरबारास ज्या गोष्टींमुळें भ्रांति उत्पन्न होऊन इतका वेळपर्यंत **कोलम्बसा**बरोबर करारनामा ठरवायास विचार पडला, त्या गोष्टींपैकींच जरी या महत्कृत्याचा खर्च होता, तरीं तो चार हजार पौंडांपेक्षां अधिक नव्हता.

या जलपर्यटनाच्या तयारीचा खर्च.

पंधरावे शतकांत गलबतें तयार करण्याची युक्ति पराकाष्ठेचीच अनाडी असे, आणि तसलीं गलबतें माहितीच्या किनाऱ्यानें जवळचें असून सुलभ असें जलपर्यटन करायास मात्र उपयोगीं पडत; असें असतांही, **कोलम्बस** तसाच आरमारानिशीं अज्ञात समुद्र शोधून काढायास प्रवृत्त झाला. त्यासमयीं समुद्रामध्यें मार्ग समजण्याकरितां याचे जवळ समुद्रतीराचे नकाशे नव्हते, व पुढें कोण कोणत्या अडचणी याजवर येऊन गुजरतील त्यांचीही यास माहिती नव्हती; परंतु इतके दिवस हा ज्या महत्कार्याचे विचारांत अगदीं निमग्न होऊन गेला होता, तें कार्य सिद्धीस नेण्याविषयीं जो याचे अंतःकरणांत मोठा उत्साह असे, तेणेंकरून यापेक्षां अल्प साहसी पुरुष ज्या ज्या गोष्टींनीं भयभीत झाले असते, त्या गोष्टींकडे यानें लक्षही दिलें नाहीं; यावरून **कोलम्बसाचें** धैर्य आणि अघटित कल्पना हीं स्पष्ट दिसून येतात. **कोलम्बसानें** मोठ्या उत्सुकतेनें आपले सामग्रीची तयारी केली, आणि **इसाबेल्ला** राणीनें या कामाची ज्याचेकडेस मुक्त्यारी दिली होती त्यांनींही यास फार चांगलें साहाय्य केलें, त्यामुळें या पर्यटनाकरितां ज्या ज्या वस्तूंची अपेक्षा होती त्या सर्व लवकर तयार झाल्या.

**कोलम्बसाचे** मनांत धर्मसंबंधी विचार पुरतेपणीं बिंबून गेले होते, त्यामुळें दुर्घट, आणि जेणेंकरून ख्रिस्ती धर्माचें ज्ञान मुख्यत्वें वृद्धिंगत करावयाचें होतें, अशा जलपर्यटनांत ईश्वरानें आपल्यास सुरक्षितपणें न्यावें ह्मणून सर्व लोकांचे समक्ष त्याची प्रार्थना केल्याशिवाय **कोलम्बस** निघाला नाहीं; याच उद्देशानें **कोलम्बस** आपले ताब्याखालीं जितके लोक होते त्यांसुद्धां सांप्रदायाप्रमाणें **राबिडा** मठास मोठ्या समारंभानें गेला; तेथें जाऊन त्या सर्वांनीं आपापलीं पापें कबूल करून दोषनिर्मुक्त झाले, आणि त्या मठाधिपतीचे हस्तापासून पवित्र प्रसादाचें ग्रहण केलें; त्या मठाधिपतीनें पूर्वीं या महत्कृत्यास मोठ्या उत्साहानें आश्रय दिला होता ह्मणून तोही तें कृत्य सफल होण्याकरितां त्यांचे बराबर प्रार्थना करूं लागला.

ईश्वरानें आपणास सुरक्षित न्यावें ह्मणून सर्वांचे समक्ष याची हा प्रार्थना करितो.

त्याचे दुसरे दिवशीं शुक्रवारीं, ह्मणजे १४९२ च्या आगस्त महिन्याचे ३ तारिखेस, प्रातःकाळीं सूर्योदयाच्या पूर्वीं ही मौज पाहाण्याकरितां जे पुष्कळ तमासगीर लोक जमले होते, त्यांचे समक्ष **कोलम्बसानें** गलबत हाकारिलें. ते समयीं हें जलपर्यटन उत्तम प्रकारें सिद्धीस जावें अशी त्या लोकांची इच्छा होती, परंतु त्यांत कांहीं जडजोखीम प्राप्त होईल, अशी त्यांच्या मनांत भीति येऊन, त्यांनींही ईश्वराची प्रार्थना केली. **कोलम्बसानें** गलबत हाकारल्यावर थेट **कानेरी** बेटांकडे जाण्याचा मार्ग धरून, हा तेथें जाऊन पोंहोचला. या मार्गांत, इतर प्रसंगीं अवश्य अवलोकन करण्यासारखी, अशी एकही गोष्ट घडली नाहीं; परंतु फारच मोठें आणि

स्पेन देश सोडितो.

इ० स० १४९२ 13 आगस्त.

फलद्रूप होण्यासारिखें जें हें जलपर्यटन यामध्यें सर्व गोष्टीं-कडे **कोलम्बसास** लक्ष द्यावें लागलें. बंदर सोडून एक दिवस झाल्यावर **पिंटा** या गलबताचें सुकाणू ढिलें पडलें; त्या गलबतावर जे खलाशी लोक होते त्यांस धर्माचें वेड फार होतें, व त्यांचे अंगीं कलाकौशल्यही नव्हतें, त्यामुळें ही गोष्ट घडतांच हा आपले पर्यटनास अपशकून झाला असें समजून ते फार भयभीत झाले. **कानेरी** बेटें **स्पेन** देशापासून अगदीं जवळ, तेथें जात असतांच तीं गलबतें डबघाईस येऊन अस्ताव्यस्त झालीं तेव्हां ज्या जलपर्यटनास बहुत दिवस लागणार, व ज्यांत अनेक अडचणी प्राप्त होणार, त्या जलपर्यटनास तर तीं तारवें अगदींच उपयोगीं नाहींत असें दिसून आलें; परंतु **कोलम्बसानें** आपली सर्व शक्ति खर्चून तीं तारवें पुनः तयार केलीं, आणि आपले बराबर पुरेशी नवी सामग्री घेऊन कानेरी बेटांतील फार पश्चिमे-कडचें जें **गोमीरा** बेट तेथून हा सेप्तेंबर महिन्याचे ६ तारिखेस निघाला.

सुकाणू ढिलें पडलें हा अपशकून झाला असें खलाशी लोक मानितात.

यानें जो मार्ग धरिला तो.

वास्तविक ह्मटलें तर या जलपर्यटनास एथूनच आरंभ झाला, कारण कीं **कोलम्बसानें** नेहेमी गलबतें चालविण्याचा जो मार्ग असे तो या स्थलापासून एकाएकीं सोडून दिला, आणि आपले जाण्याचा रोख शुद्ध पश्चिमेकडेस धरून ज्या समुद्रांत जाण्याचा नेहेमीचा राबता नसे व जो समुद्र यास अज्ञात अशा समुद्रामध्यें यानें गलबत घातलें. प्रथम दिवशीं वारा अगदीं कमी होता ह्मणून **कोलम्बसाच्यानें** फार लांब जावलें नाहीं, परंतु दुसरे दिवशीं यास **कानेरी** बेटें दिसेनाशीं झालीं.

त्या समयीं बहुतेक खलाशी लोक, जे नुकतेच भयभीत आणि खिन्न झाले होते, त्यांनीं जेव्हां हें अघोरकृत्य मनांत आणिलें, तेव्हां इतःपर आपले दृष्टीस जमीन कधीं पडणार नाहीं असें समजून, त्यांनीं ऊर बडवायास आणि नेत्रांतून अश्रू टाकायास आरंभ केला. ते वेळीं **कोलम्बसानें** आपला उद्योग अवश्य सफल होईल अशी त्यांची खात्री करून, आणि ज्या देशांस आपण जात आहों ते देश अति समृद्धिमान् आहेत यास्तव तेथें गेलें असतां मोठा धनलाभही होईल, अशी आशा दाखवून त्या लोकांचें समाधान केलें. **कोलम्बसा**च्या बरोबरच्या लोकांची उमेद किती होती ती लवकरच दिसून आली, तेणेंकरून **कोलम्बसास** असें ज्ञान झालें, कीं आपले महत्कृत्याचे स्वरूपावरून जीं कितीएक संकटें अवश्य प्राप्त होतील असें दिसतें त्यांचे बराबर, तसेंच आपल्या ताब्यांतील लोकांचें अज्ञान यापासून प्रायः जीं उत्पन्न होतील त्यांचे बराबर झुंजायास आपणास सिद्ध झालें पाहिजे. दुसरें यानें असें पाहिलें कीं आपले मनांत जे शोध कर्तव्य आहेत ते समाप्तीस नेण्याकरितां नौकाशास्त्रसंबंधी कुशलता आणि साहसी धैर्य या दोन गोष्टींप्रमाणेंच लोकांचीं मनें वश करून घेण्याची युक्तिही आवश्यक आहे. **कोलम्बसाच्या** व ज्या देशानें यास कामावर योजिलें त्याच्या भाग्योदयामुळें, **कोलम्बसाचा** स्वभाव मोठ्या उत्साहाचा आणि याची कल्पनाशक्ति मोठी करामतीची असून, दुसरे प्रकारचे सद्गुणही यामध्यें होते; असे गुण व सद्गुण एकत्र जमण्याचे ह्मटलें ह्मणजे विरळा. मनुष्य-

कार्य सिद्धीविषयीं खात्री करून व द्रव्य प्राप्तीची आशा दाखवून खलाशी लोकांस उत्तेजन आणितो.

मात्राचें पुरें ज्ञान, मनोहरण करण्याचें चातुर्य, एकादी मसलत करण्यांत दमादमानें दीर्घ प्रयत्न करणें स्वकीय मनोविकारांचें पूर्ण आकलन करणें, आणि अन्य लोकांचें हुरूप आपले उपयोगीं पाडून घेणें, हे सर्व गुण **कोलम्बसाचे** अंगांत भरले होते; या गुणांच्या योगें **कोलम्बसास** अधिकाराचें काम करण्याची योग्यता आली होती. **कोलम्बसामध्यें** हे सर्व गुण असून, हा जो रोजगार करीत असे त्यामध्यें यास इतकें विशेष ज्ञान होतें कीं तेणेंकरून संकटाचा अथवा जोखिमीचा समय प्राप्त झाला असतां, हा त्याचें निवारण करील असा भरंवसा उत्पन्न होई. भूमध्यसमुद्रामध्यें केवळ कांठानें पर्यटन करण्याची मात्र ज्यांस सवई अशा **स्पेन** देशांतील अडाणी खलाशांस, **कोलम्बसानें** ३० वर्षेपर्यंत अनुभव घेऊन सिद्ध केलेली, आणि **पोर्तुगीज** लोकांनीं नवीन शोधून काढलेल्या युक्तींचें जें यास ज्ञान होतें तेणेंकरून विशेष वृद्धिंगत झालेली जी नौकागमनविद्या, ती फारच मोठी आहे अशी दिसली. ते अपार सागरांत येताक्षणींच **कोलम्बसानें** स्वतः सर्व गोष्टींची व्यवस्था राखिली. जो जो हुकूम बजावयाचा त्याची चौकशी जाग्या राखीत असे, आणि आपण थोडके तासपर्यंत झोंप घेऊन बाकीचा सर्व वेळ तारवाचे वरच्या मजल्यावर बसलेला असे.

यांचें सामर्थ्य चपलता आणि लक्ष.

जे समुद्र पूर्वीं पाहिले नव्हते, त्या समुद्रांतून **कोलम्बसास** जावयाचें होतें, ह्मणून हा पाण्याचा अंत पाहाण्याची दोरी, आणि वेधकरण्याचीं यंत्रें, नेहेमी हातांत बाळगी. **पोर्तुगाल** देशांतील ज्या पुरुषांनीं नवीन देश शोधून काढिले होते, त्या पुरुषांप्रमाणें **कोलम्बस** भरती ओहोटी, आणि

उदकाचे प्रवाह, यांचे गतीकडेस लक्ष देत असे; तसेंच पक्ष्यांचे उडण्यावर, आणि मासे, समुद्रांतील वनस्पति, व लाटांवर तरंगणारी हरएक वस्तु या सर्वांच्या स्वरूपावर, नजर ठेवीत असे; आणि जी जी गोष्ट घडे ती ती आपल्या रोजनाम्यांत सविस्तर लिहून ठेवी. ज्या खलाशी-लोकांस जवळजवळचीं पर्यटनें करण्याची मात्र सवई होती, त्या खलाशी लोकांचे मनांत या पर्यटनाचे दूरत्वामुळें भीति उत्पन्न होण्यास चुकणार नाहीं, असें समजून **कोलम्बस** ते लोक वास्तविक जितकें अधिक दूर चालत तितकें त्यांचेंपासून छपवायास यत्न करी. याच हेतूनें **गोमिरा** बेट सोडल्यावर दुसरे दिवशीं ते लोक जरीं १९ कोस चालले तरीं **कोलम्बसानें** असें दर्शविलें कीं आपण सारे १५ च कोस चालतों, आणि तें पर्यटन समाप्त होईपर्यंत अल्प गणना करायास **कोलम्बस** नेहेमी तीच युक्ति योजीत असे. सेप्तेंबर महिन्याचे १४ व्या तारिखेस **कानेरी** बेटाचे पश्चिमेस २०० कोसांपलीकडे ह्मणजे **स्पेन** देशचे लोक आजपर्यंत कांठ सोडून समुद्रामध्यें जेथपर्यंत गेले होते त्यापेक्षांही दूर, हीं तारवें गेलीं. तेथें जातांच नवीन आणि अद्भुत अशा गोष्टी दृष्टीस पडल्या, तेणेंकरून ते चकित होऊन गेले. तो प्रकार असा झाला, कीं त्या लोकांचे जवळ जीं होकायंत्रें होतीं, त्यांतील लोहचुंबकाचे कांटे शुद्ध ध्रुवाकडेस न वळतां पश्चिमेसही वळूं लागले, आणि ते जसे जसे पुढें गेले तसा तसा अधिकच फेर पडूं लागला. सांप्रत कालीं हें अंतर तर आपले परिपाठांत

यास युक्ति योजावी लागली.

खलाशी लोकांचीं भय आणि धास्ती.

होक्यामध्यें अधिकच फेर पडूं लागल्यामुळें ते भयभीत होतात.

पडून गेलें आहे, व ज्यांचें कारणाचा शोध लावण्यास मनुष्याची कल्पनाशक्ति समर्थ नाहीं. अशा ज्या सृष्टींतील दुर्ज्ञेय गोष्टी त्यांतील हें एक आहे असें आपण समजतों. परंतु **कोलम्बसाच्या** बरोबरचे लोक असें विलक्षण दर्शन होतांच अगदीं भयभीत होऊन गेले. अशा समयीं ते लोक अज्ञात आणि अपार अशा सागरांत होते, आणि हें स्थल नेहेमींच्या पर्यटनापेक्षां फारच दूर होतें. या प्रसंगीं वस्तुस्वभावांतही फेर पडूं लागून आपणास जो एवढाच मार्ग प्रदर्शक उरला आहे तोही आपणास सोडून जाण्याच्या बेतांत आहे, असें त्यांस दिसून आलें; परंतु असें दर्शन कां झालें याविषयीं त्यांची समजूत पाडण्याकरितां **कोलम्बसानें** मोठ्या त्वरेनें आणि चातुर्यानें एक अपूर्व युक्ति काढिली, तिच्या योगानें **कोलम्बसाचें** जरीं समाधान झालें नाहीं, तरीं याचे लोकांस ती युक्ति इतकी सत्य भासली, कीं तिणेंकरून त्यांचे पोटांतील भयें नाहींशीं होऊन कुरकुर बंद झाली.

**कोलम्बस कानेरी** बेटें जितक्या अक्षांशांवर आहेत तितक्याच अक्षांशांच्या सुमारानें, अजूनही शुद्ध पश्चिमेस चालला. या गतीनें जातां जातां, **कोलम्बस** नियमित दिशेच्या वाऱ्याचे हद्दींत येऊन पोंचला. तो वारा, अयनवृत्तांमध्यें व त्याचे पलीकडेस कांहीं अंशपर्यंत, पूर्व पश्चिम एकसारिखा वाहत असतो. ह्या वायूची संत झुळूक लागण्यानें **कोलम्बस** इतक्या एकसारिख्या त्वरेनें चालला कीं, यास हेऱ्या मारण्याची थोडकीच गरज पडली. जेव्हां हा **कानेरी** बे-

नियमित दिशेच्या वाऱ्याच्या हद्दींत येतो.

टांचे पश्चिमेस सुमारें ६०० कोस गेला, तेव्हां तेथील समुद्र, यानें वनस्पतींनीं इतका भरलेला पाहि-ला, कीं, तो यास एका विस्तीर्ण कुरणाप्रमाणें दिसला; आणि कित्येक ठिकाणीं त्या वनस्पती गलबतांचे गतीस प्रतिबंध करीत इतक्या दाट होत्या, असेंही दिसून आलें. अशा विलक्षण दर्शनावरून नवीन भय आणि काळजी उत्पन्न झाली त्यासमयीं नौका चालण्याजोग्या समुद्राचे शेवटच्या हद्दीवर आपण येऊन पोहोंचलों, आणि या तरंगणाऱ्या वनस्पती आमचें पुढें जागें बंद करितील, व यांमध्यें आह्मांस न समजण्याजोगे व घात होण्याजोगे बुडालेले खडक, अथवा जमिनीचा कांहीं विस्तीर्ण प्रदेश, गुप्त असावा, असें त्या खलाशी लोकांनीं कल्पिलें.

समुद्र वनस्पतींनीं वेष्टित.

त्या वेळीं ज्या गोष्टीवरून तुमचे पोटांत भीति उत्पन्न झाली, त्या गोष्टीवरून तर तुह्मांस धैर्य यावें, आणि जमीन जवळ येण्याचें हें चिन्ह आहे, असें तुह्मी मानावें, असें सांगून **कोलम्बस** त्यांची समजूत घालूं लागला. त्याच वेळीं वाऱ्याची चांगली झुळूक लागून ते पुढें गेले; आणि गलबतांच्या समीवतीं कांहीं पक्ष्यांनीं घिरट्या घालून ते पश्चिमेस उडून गेले, असें दृष्टीं पडतांच त्या निराश झालेल्या खलाशी लोकांस थोडेंसें धैर्य येऊन नवीन आशा उत्पन्न झाली.

पक्षी पश्चिमेकडे उडून जातात; अशा दर्शनावरून खलाशी लोकांस पुनः थोडीशी आशा उत्पन्न होत्ये.

अक्तोबर महिन्याच्या १ तारिखेस ते लोक, **कोलम्बसाच्या** गणिताप्रमाणें पाहतां, **कानेरी** बेटांच्या पश्चिमेस ११५५ कोस गेले; परंतु आपले लोक या पर्यटनाच्या अतिशयित दूरत्वामुळें फार भयभीत होऊन जातील, या-

करितां **कोलम्बसानें** असें दर्शविलें, कीं आपण ८७६ कोसच आलों. **कोलम्बस** भाग्यवान् होता ह्मणून याचें गलबत चालीवणारास व दुसरीं गलबतें हाकणारांस, ही **कोलम्बसाची** चूक काढून याची लबाडी उघड करण्यापुरती युक्ति नव्हती. या समयीं त्या लोकांस किनारा सोडून पाऊण महिना अधिकच झाला होता; ते प्राचीनकाळच्या पर्यटन करणाऱ्यांनीं जेथपर्यंत जाण्यास प्रयत्न केला, व जाववेल असें कल्पिलें होतें, त्यापेक्षां ही दूर गेले होते. पक्ष्यांचें उडणें आणि दुसऱ्या कितीएक गोष्टी यांवरून, नवीन शोध लागण्याचीं जीं **कोलम्बसानें** पूर्व चिन्हें काढिलीं होतीं, तीं सर्व खोटीं पडलीं. समुद्रामध्यें जीं जमिनीसारिखीं दर्शनें होत तींहींकरून, **कोलम्बसानें** एक कल्पना योजून, त्या भोळसर लोकांस हुशारी आणून, त्यांचें मनोरंजनही केलें होतें, परंतु तीं दर्शनेंही जेव्हां स्वप्नवत् झालीं, तेव्हां त्या लोकांस कार्यसिद्धि होण्याची आशा सर्वथैव दूर आहे, अशी दिसून आली. या पर्यटनाचा हेतु, व कारणें, यांविषयीं युक्तिसिद्ध कल्पना चालवून वादविवाद करणें, हाच ज्या पुरुषांचा उद्देश व धंदा होता, त्यांचे मनांत अशा प्रकारचे विचार, बहुत वेळ आले. नंतर त्यांनीं ही गोष्ट जे अज्ञानी आणि भित्रे लोक होते, त्यांचे मनांत प्रथम पक्की ठसवून दिल्ही; मग क्रमाक्रमानें ती, जे चांगले माहितगार व आग्रही लोक होते, त्यांच्यापर्यंत नेली; असें होतां होतां सर्व तारवेंभर ती गोष्ट पसरली. नंतर आंत-

जमीन दृष्टी पडण्याचीं सर्व चिन्हें खोटीं पडल्यामुळें खलाशी लोक आंतल्या आंत जी कुरकूर करीत होते ती सोडून देऊन प्रसिद्धपणें फंद वगैरे करायास ते प्रवृत्त होतात.

त्या आंत जी कुचकुच अथवा कुरकुर चालली होती ती सोडून देऊन ते लोक प्रसिद्धपणें फंद वगैरे करायास प्रवृत्त झाले. त्या समयीं त्यांनीं **इसाबेल्ला** राणीस असें दूषण लाविलें, कीं परमुलखांतील एका दरिद्री गृहस्थाच्या निरर्थक प्रतिज्ञा, आणि अयुक्तिक तर्क यांजकडे अशी छांदिष्ट युक्ति सिद्धीस नेण्याकरितां, इतक्या लोकांचे जीव संकटांत पडत, इतकें लक्ष देणें, हें भोळेपण केवळ अविचाराचें होय. नंतर त्या लोकांनीं असा निश्चितार्थ ठरविला, कीं आपण अज्ञात आणि निराश अशा मार्गानें इतकें दूर येण्यास धैर्य केलें, तेणेंकरून आपण आपली चाकरी पुरी बजाविली; इतःपर निश्चयें कांहीं नाश करून घेण्याकरितां अशा जिवावर उदार झालेल्या साहसी पुरुषाबराबर पुढें जाण्यास जरी नाकबूल केलें, तरी आपणास कोणाचा दोष लागणार नाहीं. त्यांनीं असा वाद केला, कीं आपलीं मोडकळीस आलेलीं तारवें समुद्रांतून जाण्यास ठिकाव धरीत अशीं आहेत तोंपर्यंत **स्पेन** देशास परत जाण्याचा विचार योजणें आवश्यक आहे; परंतु हाही प्रयत्न सिद्धीस जाईल असें दिसत नाहीं कां कीं हा वेळपर्यंत जो वारा चांगला लागत आहे तो परतलें असतां विपरीत लागून आपलें परत जाणें बंद करील, असें भय प्रदर्शनही केलें. त्या सर्वांनीं असें कबूल केलें, कीं जेणेंकरून सर्वांचें रक्षण होईल तो मार्ग **कोलम्बसा**कडून जबरीनें धरवावा. त्यांमध्यें जे अधिक उद्धट होते त्यांतून कित्येकांनीं **कोलम्बसाच्या**

त्यास असें भय वाटलें, कीं इतका वेळपर्यंत जो वारा चांगला लागत आहे तो परतलें असतां विपरीत लागून आपलें मार्गे जाणें बंद करील.

औपदेशिक वादांपासून एकाएकीं मुक्त होण्यास, त्याला समुद्रांत ढकलून द्यावें, अशी जलदीची आणि निश्चयाची युक्ति काढिली. कारण त्यांची अशी समजूत होती, कीं आपण परत **स्पेन** देशास गेल्यावर ज्यास सिद्धि प्राप्त झाली नाहीं अशा कुकल्पक पुरुषाच्या मरणानें लोकांचे मनांत विशेष कळवळा उत्पन्न होणार नाहीं, आणि तेणेंकरून याच्या मरण्याची चौकशी कोणीहि शोधकपणाच्या बुद्धीनें करणार नाहीं.

कोलम्बसास समुद्रांत टाकून देण्याची योजना.

त्याकाळीं **कोलम्बसास** आपला नाश होण्याचा समय प्राप्त झाला आहे असें पुरतेपणीं समजून आलें; आणि अज्ञान व भीति यांचे घातकी कृत्यापासून खलाशी लोकांमध्यें अप्रीति उत्पन्न होऊन ते आपणावर उलटून पडायास सिद्ध झाले आहेत असें पाहतांच **कोलम्बसाचे** मनांत चिंताही उत्पन्न झाली. तथापि यानें तेसमयीं मोठें धैर्य धरून त्यांच्या मसलती आपणास ठाऊक नाहींत असें दाखविलें.

त्यांचें शांतवन करण्याचे वेगळे वेगळे उपाय.

**कोलम्बसाच्या** मनांत जरी अस्वस्थता आणि काळजी उत्पन्न झाली होती, तरी ज्या मनुष्यास आपण केलेल्या कृत्यांवरून समाधान वाटतें, व आपली कार्यसिद्धि होईल असा विश्वास असतो, त्या पुरुषाप्रमाणें याचें मुख प्रसन्न दिसे. आपल्या लोकांचें समाधान करण्याकरितां कधीं कधीं त्यांचें मन मिळवून घेण्याच्या सर्व युक्ती हा योजीत असे, आणि जी कीर्त्ति व संपत्ति त्या लोकांस प्राप्त होणार होती तिचीं अतिशयोक्तीनें वर्णनें करून, कधीं कधीं

याचें मुख प्रसन्न दिसतें.

त्यांचें मन मिळवून घेण्याच्या युक्ती योजितो.

त्यांच्या मोठमोठ्या इच्छा आणि द्रव्य लोभ यांस उत्तेजन आणण्यास प्रयत्न करीत असे. कोणे प्रसंगीं अधिकाऱ्याच्या नात्याचें बोलणें बोलून, जर तुह्मीं, आपल्या भिऱ्या गुणांनीं ईश्वराचा महिमा वृद्धिंगत करण्याकरितां, व दुसऱ्या देशांपेक्षां **स्पेन** देशाचें नांव वाढविण्याकरितां, जो मी हा महाप्रयास चालविला आहे, यास प्रतिबंध कराल, तर तुमच्या राजाकडून मी तुमचें शासन करवीन, असें हा भयही दाखवी. जे दंगेखोर लोक होते त्यांजवरही, ज्या पुरूषाचा ते सन्मान राखीत आले होते त्याचे शब्दांचा भार पडला, आणि ते शब्द त्यांच्या मनांतही भरले; व तींहींकरून त्या लोकांनीं आपल्या मनांतील अघोर कर्में सोडून दिल्हीं एवढेंच नाहीं, तर आपले नौकाधिपतीबराबर आणखी कांहीं वेळ पुढें जाण्याचेंही पत्करिलें.

त्यांस एक वेळ आशा लावितो, आणि दुसरे वेळेस भयप्रदर्शन करितो,

अशा वर्तणुकीनें कांहीं फल उत्पन्न होतें.

ते पुढें गेल्यावर जमीन जवळ येण्याचीं चिन्हें जशीं जशीं अधिक निश्चयात्मक दिसूं लागलीं, तशी तशी त्यांस अधिकच आशा येत चालली. पक्ष्यांचे कळपचे कळप नैर्ऋत्य दिशेकडेस जात आहेत असें दृष्टीस पडूं लागलें. पूर्वीं **पोर्त्तुगीज** लोकांतील नावाडी लोकांतून कित्येकांनीं नवीन शोध करते वेळेस पक्ष्यांचे गमनावरून मार्ग काढिला होता, त्याप्रमाणें **कोलम्बस**ही शुद्ध पश्चिमेकडेस जाण्याचें सोडून पक्षी जिकडेस गेले तिकडेसच वळला. परंतु या नव्या दिशेकडे जाण्यांत पहिल्यापेक्षां चांगलीं सुचिन्हें दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून कितीएक दिवस गेले, आणि ३० दिवसांत समुद्र आणि आकाश यांवांचून दुसरा पदार्थ

दृष्टीस पडला नाहीं, तेणेंकरून **कोलम्बसाचे** लोकांच्या मनांत पूर्वी आशा उत्पन्न होण्यास जो वेळ लागला होता

त्यांस पुनः भीति प्राप्त होत्ये. बंडाची भीति.

त्यापेक्षां अल्प काळांतच त्या नष्ट झाल्या. त्या लोकांस पहिल्यापेक्षां अधिक भीति उत्पन्न झाली, आणि प्रत्येकामध्यें उतावीळपणा, संताप, आणि निराशा, हीं दिसून आलीं. त्यांस आपण तावेदार आहों हेंही भान नाहींसें झालें. ज्या कामगारांचें मत आजपर्यंत **कोलम्बसाचे** मतास अनुसरून होतें, व ज्यांनीं याचा अधिकार राखिला होता, तेही सांप्रत त्या पक्षास मिळाले. त्या सर्वांनीं तारवाचे तक्तपोशीवर जमून गर्दी केली, आणि आपले अधिकाऱ्यावरावर उपदेशपर भाषणें बोलूं लागले. या बोलण्यामध्यें दबकावणीचीं भाषणें बोलून यावेळेस **युरोपखंडास** परत चलावें असें त्यांनीं **कोलम्बसास** निक्षून सांगितलें.

कोलम्बसाचें संकट.

**कोलम्बसानें** असा विचार केला, कीं आपल्या पूर्वीच्या युक्तिप्रयुक्ति सांप्रतकाळीं उपयोगीं पडणार नाहींत, कारण त्या बहुतवेळ करून पाहिल्यामुळें त्यांत कांहीं ऐवज राहिला नाहीं; आणि भीतीमुळें ज्या लोकांच्या हृदयांतील दिलदारीचे विचार समूळ नाहींसे झाले आहेत त्या लोकांच्या मनांत हें पर्यटन सफल होईल याविषयीं पुनः उमेद आणणेंही फार कठिण आहे. **कोलम्बसानें** असें पाहिलें कीं, हें बंड जबर आणि सर्वांच्या संमतानें झालें आहे, त्यापक्षीं यास मोडायास सामोपचाराचे किंवा जबरीचे उपाय योजण्याची कल्पनाही निरर्थक आहे; अशा प्रसंगीं ज्या वृत्तींवर याचा शक चालेना त्यांचें समाधान करणें, व ज्या प्रवाहास त्याच्या अतिशय

वेगामुळें याच्यानें कुंठित करवेना, त्या प्रवाहास मार्ग देणें हेंच **कोलम्बसास** आवश्यक पडलें; यानें देवास स्मरून त्या लोकांस असें वचन दिल्हें, कीं जर आणखी तीन दिवसपर्यंत तुह्मी मजबराबर पुढें चलाल, आणि मी सांगेन तें ऐकाल तर मी तुमचे ह्मणण्याचा स्वीकार करीन, आणि जर तीन दिवसांत जमीन दृष्टीस पडली नाहीं, तर मी हें महत्कृत्य सोडून देऊन **स्पेन** देशाची वाट धरीन.

खलाशी लोकांबरोबर जो करार केला तो.

जरी ते खलाशीलोक क्रोधांध आणि स्वदेशास जाण्याविषयीं उतावीळ झाले होते, तथापि तें बोलणें त्यांस अयुक्त दिसलें नाहीं, व इतकी थोडी मुद्दत केल्यामुळें **कोलम्बस**ही मोठ्या संकटांत पडला नाहीं, कारण कीं जमीन शोधून काढण्याचीं चिन्हें सांप्रत इतकीं पुष्कळ आणि इतकीं घडण्याजोगीं दिसत होती कीं तीं कधीं खोटीं पडणार नाहींत असें यास वाटलें होतें. कांहीं दिवसपर्यंत अंत पाहावयाची दोरी तळीं पोंहोचली होती, आणि तिच्या योगानें जी माती वर आणिली होती तिजवरून जमीन लांब नाहीं असें दिसून आलें होतें. पांखरांचे कळप वाढूं लागले आणि त्या कळपांमध्यें केवळ समुद्रावर फिरणारे पक्षी होते असें नाहीं, तर जमीनीवर राहणारे ह्मणजे समुद्रतीर सोडून फार पलिकडेस न जाणारे देखील होते. **पिंटा** या नांवाचे गलबतावरील खलाशीलोकांनीं वेताची छडी पाण्यावर तरंगतां पाहिली; ती नुकतीच तोडलेली होती असें दिसलें. तसाच कृतीनें कोरलेला एक लांकडाचा तुकडाही त्यांचे दृष्टीस पडला होता. **नीण्या** या गलबतावरील खलाशी लोकांनीं वृक्षाची

उत्तेजन येण्याजोगीं दर्शनें.

एक फांदी समुद्रांतून वर उचलून घेतली होती, तीस चांगलीं ताजीं तांबडीं फळें होतीं. सूर्य मावळायास गेला म्हणजे त्याचे सभोंवार जे ढग असत त्यांचेंही स्वरूप पालटूं लागलें होतें. वायु अधिक मंद आणि उष्ण असा झाला होता, आणि रात्रीस जो वारा सुटे तो एकसारिखा नसे, त्यांत बहुत प्रकार होत असत. या सर्व चिन्हांवरून जमीनीजवळ आपण आलों म्हणून **कोलम्बसाची** इतकी खात्री झाली, कीं अक्तोबर महिन्याच्या ११ वे तारिखेस सूर्यास्ताबरावर कार्यसिद्धि होण्याकरितां सर्वांनीं मिळून ईश्वराची प्रार्थना केल्यावर, यानें अवजारें गुंडाळायास व गलबतें स्थिर चालवावयास आज्ञा केली. रात्रीस तीं गलबतें कदाचित् कांठावर जाऊन पोंहोंचतील, म्हणून **कोलम्बस** खडा पाहारा करीत बसला. या गोष्टीविषयीं अनिश्चय आणि संभव हे दोनही उत्पन्न झाले. अशा समयीं कोणीही डोळा मिटला नाहीं, परंतु तारवाच्या तक्तपोशीवर जमून जिकडे जमीन दिसायाचा संभव होता तिकडे एकाग्र चित्तानें टक लावून पाहत बसले, कारण कीं, जमीन शोधून काढणें हा त्यांचे मनांत बहुत दिवस उद्देश होता.

जमीन पाहाण्याविषयीं ते फार उत्सुक झाले होते म्हणून रात्रभर त्यांस झोंप आली नाहीं.

मध्यरात्रीच्या पूर्वी सुमारें दोन तास **कोलम्बस** गलबताचे नाळीवर उभा होता, तेसमयीं याला दूर उजेड दिसला, तो यानें **इसाबेला** राणीचा **पेद्रो गुटियेरस** या नांवाचा जामदार याचे बराबर आला होता, त्यास एकांतीं बोटानें दाखविला. **गुटियेरस** यानें तो उजेड पाहिल्यावर आरमारचा जमाखर्च राखणारा जो **सालसेदो** यास

त्यानें हाक मारली, नंतर त्या तिघांसही, तो उजेड एके जाग्यापासून दुसरे जाग्याकडेस कोणी नेतच आहे काय, असें दिसलें. **पिंटा** या नांवाचें गलबत सार्वकाल सर्व गलबतांच्या पुढें असे, त्यापासून मध्यरात्री नंतर थोडक्याच वेळानें जमीन! हो जमीन! असा आनंदाचा ध्वनि ऐकूं आला. परंतु आभासात्मक दर्शनें होऊन ते इतकावेळ फसले होते, ह्मणून त्यांतून कोणा एकासही ती गोष्ट ते समयीं खरी वाटेना, यास्तव कार्य सिद्धि होईल किंवा नाहीं या चिंतेमध्यें अति उतावीळ होऊन दिवस उगवण्याची वाट पाहत बसले; परंतु प्रातःकाळ होतांक्षणींच सर्व संशय आणि भयें यांची निवृत्ति झाली. प्रत्येक तारवावरून उत्तरेकडेस सुमारें तीन कोसांवर एक बेट दृष्टीस पडलें. त्या बेटांतील शेतें मोठीं आणि हिरवींचार अशीं होतीं, त्यांमध्यें झाडी फार असून पुष्कळ ओढ्यांचें पाणी त्यांस मिळत असे तेणेंकरून तें स्थळ अति सुशोभित अशा देशाप्रमाणें दिसलें. असें दर्शन होतांच **पिंटा** या तारवांतील खलाशी लोकांनीं परमेश्वराचा आभार मानण्याकरितां याचे गुणानुवाद गावायास आरंभ केला. ते वेळेस बार्कीच्या सर्व तारवांतील लोकही, आनंदाश्रु गाळीत, हर्षयुक्त भाषण करण्याच्या परम उल्हासांत, त्यांचेबरोबर गाऊं लागले; अशी भगवंताचे ठिकाणीं कृतज्ञता दर्शविल्यानंतर, त्या लोकांनीं आपले अधिकाऱ्याबरोबर यथान्याय वर्तणूक केली. तो प्रकार असा कीं आपलेकडून जो अन्याय झाला त्याबद्दल आपण शिक्षेस योग्य आहों, असें मनांत

ते, परमेश्वराचा आभार मानून आपल्या वाईट वर्तणुकीकरितां कोलम्बसाची क्षमा मागतात.

जाणून, व **कोलम्बस** आपणास पूज्य आहे, असें समजून ते सर्व जाऊन **कोलम्बसाच्या** पायीं पडले; आणि आमचें अज्ञान, अविश्वास, व उद्धटपणा, ज्यांमुळें आपणास इतकी व्यर्थ चिंता प्राप्त होऊन आपण उत्तम प्रकारेंकरून योजिलेला बेत सिद्धीस जावयास इतकीं विघ्नें उत्पन्न झालीं होतीं, त्यांविषयीं आह्मांस क्षमा असावी, असें ते बोलिले. नंतर सांनदाश्चर्याच्या भरामध्यें **कोलम्बसा**विषयीं जी त्यांची असद्बुद्धि होती ती सोडून त्यांनीं सद्बुद्धि धरिली आणि ज्या पुरुषाची नुकतीच त्यांनीं हेलना केली होती, व ज्यास त्यांनीं भयभीतही केलें होतें, त्या पुरुषास सर्व प्राचीन कालच्या कल्पना आणि विचार यांसही दुःसाध्य अशी जी गोष्ट ती सिद्धीस नेण्याकरितां परमेश्वरानें अमानुष कल्पना आणि धैर्य हीं दिलीं आहेत असें ते बोलूं लागले.

नवीन देशांतील लोकांचें प्रथम दर्शन.

नंतर सूर्योदय होतांक्षणींच सर्व तारवांमध्यें मनुष्यें हत्यारबंद होऊन बसलीं. त्यांनीं आपले बावटे उभारिले, आणि वीररसप्रधान गायनें गावयास आरंभ केला, व दुसरे युद्धविषयक डामडौल करून त्या बेटांजवळ येण्याकरितां तारवें हाकारिलीं. जेव्हां हे किनाऱ्याजवळ येऊन पोहोंचले तेव्हां तो किनारा माणसांनीं भरून निघाला आहे असें त्यांनीं पाहिलें. हा अपूर्व चमत्कार पाहण्याकरितां ते सर्व लोक त्या ठिकाणीं जमले होते; त्यांचे शरीराची स्थिति व हावभाव यांवरून **कोलम्बसाचे** लोकांस असें दिसून आलें, कीं असे विलक्षण पदार्थ आपोआप त्यांचे दृष्टीस पडल्यामुळें त्यांस मोठें आश्चर्य आणि चमत्कार वाटला आहे. **कोलम्बसानें** जी

ही नवीन सृष्टि शोधून काढिली तींत प्रथमतः पाऊल ठेवणारा युरोपीअन काय तो हाच होता. **कोलम्बस** उंच पोषाख आंगावर घालून व नागवी तरवार हातांत घेऊन जेव्हां जमीनीवर उतरला, तेव्हां याचे मागून याचे लोकही उतरले. नंतर या सर्वांनीं गुढघे टेकून जी जमीन पाहण्याची यांचे मनांत इतके दिवस इच्छा होती तिचें चुंबन केलें, आणि क्रूसाची मूर्त्ति उभारून तिचे पुढें साष्टांगनमस्कार घालून, ईश्वरानें आपल्या जलपर्यटनाचा शेवट फार आनंददायक केला ह्मणून, त्याची हे प्रार्थना करूं लागले. अशा प्रकारचे कृत्यांत **पोर्त्तुगीज** लोकांचा नवीन देश शोधून काढल्यावर जो शिष्टाचार करण्याचा संप्रदाय असे तो सर्व करून, **कास्तील** आणि **लियोन** एथील सरकारच्या नांवानें त्या देशामध्यें या सर्वांनीं झेंडा लाविला.

कोलम्बस नवीन खंडांत उतरतो.

**स्पेन** देशांतील लोक जेव्हां अशा कृत्यांत गुंतले होते, तेव्हां त्या नवीन देशांतील पुष्कळ लोक त्यांचे सभोंवार उभे राहिले, आणि **स्पेन** देशीय लोक जीं कृत्यें करीत होते, त्यांमध्यें त्यांची कांहीं समजूत न पडून, व त्यांपासून परिणाम काय होतील हेंही प्रथमतः लक्षांत न येऊन, तोंडांतून एकही अक्षर न काढितां मोठ्या आश्चर्यानें, त्या कृत्यांकडेस त्यांनीं टक लाविली होती. **स्पेन** देशीय लोकांचा वेष, तसाच त्यांचे आंगाचा पांढरेपणा, व त्यांच्या दाढ्या आणि त्यांचीं हत्यारें चमत्कारीक व आश्चर्य होण्याजोगीं, त्यांस दिसलीं. **स्पेन** देशीय लोक ज्या मोठे गलबतांत वसून समुद्रांतून आले, तीं

स्पेन देशीय लोक आणि नवीन खंडांतील लोक परस्पर आश्चर्य मानितात.

गलबतें आपले पक्षांचे योगानें पाण्यांतून चालतात, आणि त्यांपासून मेघगर्जनेसारिखा भयंकर शब्द होऊन वीज आणि धूर हीं उत्पन्न होतात, असें या नवीन देशांतील लोकांचे दृष्टीस पडलें; तेणेंकरून त्यांस इतकी भीति उत्पन्न झाली कीं, तीवरून ते **स्पेन** देशीय लोकांस उत्तम जातीचे लोक मानूं लागले, आणि असें ठरविलें कीं हीं सूर्याचीं लेंकरें पृथ्वी पाहण्याकरितां खालीं उतरलीं आहेत.

युरोपखंडांत ज्या वस्तू पाहिल्या होत्या त्यापेक्षां नवीन खंडांतील त्या वस्तू अगदीं भिन्न दिसतात.

सांप्रत **युरोप** खंडांतील लोकांच्या नजरेस जी तेथील रचना पडत होती ती पाहून त्यांस तद्देशीय लोकांपेक्षां ह्मणजे कमी आश्चर्य वाटलें असें नाहीं. **युरोप** खंडामध्यें ज्या शाखभाज्या, वनस्पति, आणि वृक्ष, उत्पन्न होतात त्यांपासून या नवीन देशांतील ते पदार्थ अगदींच भिन्न होते. एथील जमीन पिकाऊ दिसली; परंतु तीमध्यें लागवडीचीं चिन्हें थोडींच दिसत होतीं एथील हवा जरीं अतिशयित आनंदकारक होती, तरीं ती **स्पेन** देशीय लोकांसही उष्णशी जाणवे. या नवीन देशांतील लोकांचा स्वभाव फारच भोळसर होता, आणि ते अगदीं नम्र असत. त्यांचे काळे सडक व लांब केश खांद्यावर लोंबत, अथवा त्या केशांस गांठी देऊन ते आपले डोक्याच्या सभोंवताले बांधीत. ते दाढ्या राखीत नसत, त्यांचें सर्व शरीर गुळगुळीत असून त्यांचे मुखाचा वर्ण तांबडसर असे; त्यांची आकृति चमत्कारीक असून ती केवळ ओंगळ नसे; आणि त्यांचें स्वरूप शांत आणि भयशील असे. ते जरीं उंच नव्हते तरीं चांगल्या बां-

ध्याचे आणि चंचल असे असत. ते, आपले तोंडांस, व शरीराचे दुसरे कांहीं अवयवांस, तकतकी मारणारा असा मनास वाटे तो रंग, देत असत; ते लोक भीतींमुळें प्रथमतः **स्पेन** देशीय लोकांबराबर संकोचानें वागत होते, परंतु लवकरच यांच्याशीं संघट्टण पडून त्या लोकांनीं, **स्पेन** देशीय लोकांपासून मोठ्या आनंदानें वहिरीससाण्याचे गळ्यांत बांधण्याच्या घाटी, गळेसर, आणि दुसऱ्या कांहीं खेळण्याच्या टूमदार वस्तू घेतल्या, आणि त्यांचे बद्दल आपल्या जवळ ज्या सामग्रीचा संग्रह होता ती सामग्री, आणि कापसाचे सुताच्या गुंड्या, हे पदार्थ दिल्हे; व्यापाराचे मोठे मोलाच्या पदार्थांपैकीं हा कापसाचा पदार्थ मात्र ते लोक उत्पन्न करीत असत.

नवीन खंडांतील लोक त्यांचे बरोबर व्यवहार करितात.

अस्तमानाचे समयीं **कोलम्बस** त्या नवीन बेटांतील बहुतेक लोकांसहवर्त्तमान आपले तारवांकडेस परत आला; ते लोक ज्या नावांत वसून **कोलम्बसा**बराबर गेले त्यांस ते होडक्या असें ह्मणत; त्या होडक्या ओंबड धोबड रीतीनें जरीं झाडाचे बुंध्याच्या केल्या होत्या, तरीं त्या आश्चर्य होण्यासारिख्या कुशलतेनें वल्हीं मारून त्या लोकांनीं चालविल्या.

पहिली भेट मोठ्या सुखासमाधानानें होय.

अशा प्रकारें प्राचीन आणि नवीन महाद्वीपांतील लोकांच्या पहिले भेटींमध्यें हरएक गोष्ट, मोठ्या स्नेहभावानें, आणि उभयपक्षीं सामाधान होई. अशा रीतीनें, घडत गेली. त्यांमध्यें सुज्ञ आणि मोठ्या पदवीची इच्छा करणारे जे **यूरोप** खंडांतील लोक ते, जे जे देश त्यांचे दृष्टीस पडत चालले त्यांपासून जे लाभ त्यांस प्राप्त होणार त्यांविषयीं मोठमोठे विचार करूं लागले. परंतु भोळ-

सर आणि यथायुक्त विचार करण्यास असमर्थ असे जे या नवीन बेटांतील लोक, यांची, स्वकीय देशाचे संनिध प्राप्त झालेले जे अनर्थ आणि नाश यांचेकडेस, प्रथमतः दृष्टी पोंहोंचली नाहीं.

कोलम्बस, आरमाराच्या नाइकीचो, व राजकीय सत्तेची पदवी धारण करितो.

ते समयीं **कोलम्बसानें** आरमारचे अधिपतीची पदवी आणि राजकीय सत्तेचा अधिकार धारण करून, यानें जें बेट शोधून काढिलें त्यास **सान साल्वदोर** असें नांव दिलें परंतु तेथील लोकांनीं जें त्यास **ग्वानाहानें** ह्मणून नांव दिल्हें होतें, त्या नांवानेंच त्याची चांगली प्रसिद्धि होती. हें बेट, ज्यांस **लूकाया** अथवा **वहामा** बेटें ह्मणतात त्यांचे विस्तीर्ण समुदायांतलेंच होय. हें बेट ज्या **गोमिरा** बेटापासून **कोलम्बसाचीं** तारवें निघालीं त्या बेटाच्या पश्चिमेस ३०००० मैलांवर आणि दक्षिणेकडेस ४ च अंशांवर आहे; **कोलम्बसानें** केवळ पश्चिमेकडेस जाण्याचें फार चांगलें ह्मणून जें योजिलें होतें त्यास चार अंशांचेंच अंतर पडलें.

**कोलम्बसानें** त्या बेटाचा किनारा पाहण्यांत दुसरा दिवस घालविला, आणि तेथील सर्व लोकांचें दारिद्र्य पाहून यास असें वाटलें कीं ज्या संपन्न देशाकरितां मी शोध चालविला आहे तो हा नव्हे; परंतु **आशिआ** खंडाच्या पूर्वेकडे जे देश पसरले आहेत त्यांचा शोध लागेल ह्मणून जो याचा सिद्धांत होता त्यावरून **कोलम्बसानें** असें ठरविलें, कीं महासागरामध्यें हिंदुस्थानाजवळ जीं बेटें भूगोलवेत्त्यांनीं वर्णिलीं आहेत त्या बेटांतलेंच **सान् साल्वदोर** हें बेट होय. **कोलम्बसानें** जीं मनुष्यें पाहिलीं त्यांतील वहुतेकांनीं सो-

त्याचीं तकटें जवाहिराप्रमाणें नाकांत घातलीं होतीं, असें अवलोकन करून, ती मौल्यवान् धातु त्या लोकांस कोठून प्राप्त झाली याचा यानें मोठ्या तत्परतेनें शोध केला. त्या समयीं त्या लोकांनीं दक्षिणेकडेस बोट दाखवून त्या भागांतील प्रदेशांत सुवर्ण पुष्कळ आहे, असें **कोलम्बसाचे** मनांत खुणा करून आणून दिल्हें. तेव्हां ज्या समृद्ध देशांकरितां आपण जलपर्यटन आरंभिलें आहे, त्या देशांचा तिकडे शोध लागून, आपणास जे श्रम आणि अरिष्टें भोगावीं लागलीं त्यांचें सार्थक्य होईल, असा पुरा भरंवसा वाटून, **कोलम्बसानें** तत्क्षणीं तिकडे जाण्याचा निश्चय केला. तिकडे जाते समयीं **कोलम्बसानें सान् साल्वदोर** एथील सात आसामी आपले बरोबर घेतले; कारण कीं ते **स्पेन** देशीय लोकांची भाषा शिकून तद्देशीय लोकांचा मतलब समजून देण्याकरितां व वाट दाखविण्याकरितां उपयोगीं पडतील. **कोलम्बसानें** या सातांजणांस आपले बरोबर नेण्याकरितां जेव्हां योजिलें, तेव्हां त्या निष्कपटी पुरुषांनीं, **कोलम्बसानें** आपला बहुमान केला, असें कल्पिलें.

वाट दाखविण्याकरितां व दुसऱ्या बेटांतील लोकांची भाषा समजवून देण्याकरितां नवीन देशांतील सात असामी बरोबर नेतो.

यानें कितीएक बेटें पाहिलीं, आणि मोठमोठ्या बेटांपैकीं तीन बेटांत जाऊन त्यांस **सांता मारीआ दे कोन्सेपशिओन**, **फेर्नान्दीना**, आणि **इसाबेल्ला**, अशीं नांवें दिल्हीं. परंतु तेथील जमीन उत्पन्न व लोक बहुतकरून **सान् साल्वदोर** प्रमाणेंच होते, याकरितां त्या बेटांतून एकांतही हा राहिला नाहीं. हा जिकडे तिकडे सोन्याविषयीं शोध करूं लागला,

कूवा शोधून काढितो.

तेव्हां त्या सर्व लोकांनीं खुणा करून जें त्यास उत्तर दिल्हें, तेणेंकरून तें दक्षिणेंतून आणिलें आहे असें यानें जाणिलें, आणि तिकडेस जाण्याचा मार्ग धरून लवकरच एक देश शोधून काढिला. तो देश फार विस्तृत दिसला, परंतु यानें जे इतर देश शोधून काढिले होते त्यांप्रमाणें या देशाची जमीन सपाट नव्हती, परंतु उंचवटे, टेंकड्या, नद्या, रानें, आणि मैदानें, यांहींकरून तिचे स्वरूपांत इतका भेद पडला, कीं तेणेंकरून तें शेवटीं बेट ठरेल किंवा महाद्वीपाचा प्रदेश ठरेल याविषयीं यास संशय उत्पन्न झाला. याचे गलबतावर जे **सान् साल्वदोर** एथील लोक होते, ते या स्थलास कूबा असें ह्मणूं लागले, आणि **कोलम्बसानें** त्यास जुआना असें नांव दिल्हें.

कोलम्बस जवळ येतांच तेथील लोक पर्वतावर पळून जातात.

**कोलम्बस** आपलीं तारवें घेऊन, त्या स्थळीं एक मोठी नदी होती तींत तिचे मुखाकडून शिरून, त्या बेटाचे जवळ येतांच, तेथील सर्व लोक पर्वतावर पळून गेले. परंतु त्या स्थळीं तारवांची उस्तवारी करण्याचा **कोलम्बसा**चा बेत होता, त्यामुळें यानें **सान् साल्वदोर** एथील लोकांपैकीं एकजण बराबर देऊन आपले लोकांतून कांहीं लोक त्या देशाचा आंतील प्रदेश पाहण्याकरितां पाठविले.

त्या देशाचा आंतला भाग व तेथील लोक यां विषयीं ते बातमी सांगतात.

ते लोक किनाऱ्यापासून ६० मैलांपलिकडेस जाऊन परत आल्यावर, अशी बातमी सांगूं लागले कीं, आजपर्यंत जितक्या जमीनी आपण पाहिल्या त्यांपेक्षां या देशाचे जमीनींत धान्य अधिक उत्पन्न होतें, आणि लागवडही अधिक केली आहे; त्या ठिकाणीं पुष्कळ पसरलेल्या झोंपड्यांशिवाय एक खेडेगांव आमचे दृष्टीस पडलें, त्यांत हजारांपेक्षां

अधिक लोक होते, ते जरीं नग्न होते तथापि **सान् साल्वदोर** एथील लोकांपेक्षां अधिक सुज्ञ असे दिसले. परंतु **सान् साल्वदोर** एथील लोकांप्रमाणेंच त्यांनीं आमच्या पायांचें चुंबन करून, आह्मीं स्वर्गींचे कोणी ईश्वरी पुरुष आहों असें समजून, व अतिशय मान्यता राखून, आमचा आदर सत्कार केला. त्यांनीं आह्मांस जीं कंदमुळें खावयास दिल्हीं होतीं, त्यांची रुचि भाजलेल्या कास्तान्या झाडाच्या फळासारिखी होती; तसेंच दुसरें एक चमत्कारिक धान्य आहे, ज्यास मका असें ह्मणतात, तें सर्व भाजलें असतां अथवा दळून त्याचा कांहीं पदार्थ केला असतां त्यास फारच रुचि येत्ये. त्या देशांत कुत्र्यावांचून चतुष्पाद जनावरें नाहींत, आणि त्या कुत्र्यांस भोकतांही येत नाहीं. तेथें सशासारिखा एक प्राणी होता, त्याची आकृति सशापेक्षां फार लहान होती. आह्मीं त्या लोकांजवळ सोन्याचे कांहीं दागिने पाहिले, परंतु त्यांची किंमत फार मोठी नव्हती.

या वानमीदार लोकांनीं त्या देशांतील कांहीं लोकांस आपले बराबर आणिलें होतें; त्या लोकांनीं **कोलम्बसास** असें समजाविलें कीं आह्मीं हे ज्या सुवर्णाचे अलंकार केले आहेत तें सुवर्ण **कुबानकान** एथें आह्मांस मिळालें. या शब्दाचा त्या लोकांच्या मतानें पाहतां **कूबा** एथील मध्यभाग असा अर्थ होतो; परंतु **कोलम्बसास** त्यांची भाषा समजत नसे, व त्यांचे उच्चाराचाही यास सहवास नसे, आणि **हिंदुस्थान** शोधून काढण्याविषयीं जे याचे सिद्धांत त्यांकडेसच नेहमीं याच्या कल्पना धांवत, याजकारितां **कुबा**-

**नकान** आणि **कूबानखान** या शब्दांच्या उच्चाराचे सारिखेपणावरून **कोलम्बसाचे** मनांत अशी कल्पना आली कीं, त्या लोकांनीं मोठ्या **खाना** विषयीं सांगितलें, आणि त्यावरून यानें असा तर्क केला कीं, **मार्को पोलो** यानें जें **काथे** एथील संपन्न राज्य वर्णिलें आहे तें फार दूर नाहीं. या कल्पनेवरून **कोलम्बसास** हा देश पाहण्यांत कांहीं काळ घालवावा लागला.

त्या देशाविषयीं कोलम्बसाचे तर्क.

**कोलम्बसानें**, **कूबाच्या** उत्तरेकडील किनाऱ्यावर जें **पोर्तो देल् प्रिन्चिपे** ह्मणून स्थल होतें त्यापासून पूर्वेकडील शेवटचे मर्यादेपर्यंत जितकीं बंदरें होतीं, तितकीं बहुधा पाहिलीं; आणि जिकडे तिकडे ज्या रचना आपोआप याचे दृष्टीस पडल्या त्यांचें सौंदर्य पाहून यास आनंद झाला, व त्या जमीनीची अतिशयित फलद्रूपता पाहून यास आश्चर्यही वाटलें; या दोनही गोष्टी अपूर्वच याचे दृष्टीस पडल्या, तेणेंकरून याचे कल्पनाशक्तीसही अधिकच उत्तेजन आलें. इतकें जरीं झालें तथापि, **कोलम्बसाच्या** लोकांची द्रव्यविषयक इच्छा, व ज्या दरबारांत परत जावयाचें होतें त्या दरबारच्या आशा तृप्त होण्याजोगें सुवर्ण, यास सांपडलें नाहीं. **युरोप** खंडांतील लोकांस तद्देशीय लोकांचें अज्ञान व भोळेपणा पाहून जितकें आश्चर्य वाटलें होतें, तितकेंच आश्चर्य **कोलम्बसाची** सुवर्णाचे शोधाविषयींची इतकी उत्कंठा पाहून तद्देशीय लोकांस वाटून, त्यांनीं पूर्वेकडे बोट दाखविलें. कारण कीं त्या दिशेकडेस **हेटी** या नांवाचें बेट होतें त्यांत ती धातू त्या लोकांजवळ जितकी होती ति-

त्याचें सौंदर्य व फलद्रूपता यांहीं करून यास फार आनंद होतो.

इसान्योला हें बेट शोधून काढितो.

नपेक्षां अधिक असे. त्या समयीं **कोलम्बसानें** आपलीं तारवें त्या दिशेकडेस वळवायास सांगितलें, तेव्हां **मार्तिन् आलोन्सो पिंझोन** हा त्या देशांत जें द्रव्य आहे तें प्रथमतः आपल्या हाताखालीं घालायास उतावीळ होऊन, व बाकीचे लोक येऊन मिळत तोंपर्यंत गलबत हळू चालूं दे ह्मणून जें याच्या मुख्य अधिकाऱ्यानें खुणा करून सांगितलें तेंही न जुमानून, आपल्या सोबत्यांचे पुढें गेला. **कोलम्बस** वारा उलटा लागला ह्मणून डिसेंबर महिन्याच्या ६ वे तारिखेपर्यंत **हेटी** बेटास पोहोंचला नाहीं. ज्या बंदरीं तो प्रथम पोहोंचला त्या बंदरास व त्या बेटास, ज्या सरकाराकडून **कोलम्बसाची** नेमणूक झाली होती त्याचे सन्मानार्थ **कोलम्बसानें** क्रमेंकरून **संत निकलास** आणि **इस्पान्योला** अशीं नांवें दिल्हीं. हा काळपर्यंत **कोलम्बसानें** जे देश शोधून काढिले त्यांतून या देशाचें मात्र यानें दिलेलें नांव राहिलें. **कोलम्बसाची** आणि **पिंटा** या गलबताची गांठ न पडल्यामुळें, व त्या बेटांतील लोक भीतीस्तव रानांत पळून गेल्यावरून त्यांच्याशींही याचें दळणवळण न पडल्यामुळें, हा **संत निकलास** या बेटापासून लवकरच निघाला, आणि त्या बेटाच्या उत्तरेकडील तीरानें गलबत हाकारून दुसऱ्या बंदरांत शिरून त्यास यानें **कोनसेप्शिओन** असें नांव दिल्हें. या स्थळीं **कोलम्बसाचें** कांहीं अधिक भाग्य उघडलें; तो प्रकार असा, कीं, **कोलम्बसाचे** लोक ज्या ठिकाणीं उतरले होते, तिकडून एक बायको अतित्वरेनें जात होती, तिला त्या लोकांनीं गांठून मोठ्या नम्रतेनें तिचेबराबर संभाषणादि करून, व कांहीं

एथील लोक कोलम्बस जवळ येतांच रानांत पळून जातात.

खेळण्याचे पदार्थ ज्यांस त्या देशांत किंमत फार पडत असे ते तीस देऊन, तिला वाटेस लाविलें. त्या स्त्रीनें, या अनओळखी लोकांच्या नम्रतेविषयीं, व यांच्यामध्यें आश्चर्यकरण्याजोगे जे गुण होते त्यांविषयीं, स्वदेशीय लोकांजवळ वर्णन करून, त्या लोकांनीं तीस वस्तू दिल्या होत्या, त्या मोठ्या उत्साहानें त्यांस दाखविल्या. ते समयीं त्या लोकांस परम आश्चर्य वाटून त्या परके लोकांची अशीच कृपा आपणावरही व्हावी अशी त्यांस उत्कंठा झाली, तेणेंकरून त्यांचे पोटांतील सर्व भीति दूर होऊन त्यांची बंदरास जाण्याविषयीं प्रवृत्ति झाली. तेथें गेल्यावर त्यांनीं चमत्कारिक पदार्थ पाहिल्यावरून, व **कोलम्बसानें** त्यांस बाहेरून मात्र सुशोभित अशा वस्तू दिल्यावरून, त्यांची जिज्ञासा व मनोरथ हे पूर्ण झाले.

त्यांचीं भयें दूर होतात.

ते लोक बहुतकरून **ग्वानाहानी** आणि **कूबा** या दोन बेटांतील लोकांप्रमाणेंच होते; त्यांप्रमाणेंच ते नग्न, अज्ञानी आणि भोळसर असत, व सभ्य लोकांमध्यें ज्या कळा उपयुक्त अशा दिसतात त्याही त्यांस त्याप्रमाणेंच माहित नव्हत्या, असें दिसतें. परंतु ते लोक फार नम्र, भावार्थी आणि भित्रे होते, ह्मणून **स्पेन** देशीय लोकांस त्यांजवर आपलें वर्चस्व पाडायास आयास लागला नाहीं. असें होण्याचें मुख्य कारण ह्मटलें तर हेंच कीं, तद्देशीय लोकांस पराकाष्ठेचेंच सानंदाश्चर्य झाल्यावरून दुसरे बेटांतील लोकांप्रमाणें **स्पेन** देशीय लोक मनुष्यापेक्षां श्रेष्ठ पदवीचे आहेत, व ते साक्षात् स्वर्गाहून उतरले आहेत, असा त्यांसही भ्रम झाला. त्यांचे जवळ त्यांचे शेजाऱ्यापेक्षां सुवर्ण पुष्कळ

स्पेन देशीय लोक स्वर्गाचे मनुष्य अशी त्यांस भ्रांति होते.

होतें तें देऊन त्यांनीं तत्काळ त्याचे बद्दल घांटा, गळेसऱ्या, व टांचण्या हे पदार्थ घेतले. हा व्यवहार समसमान जरीं नव्हता तरीं यापासून आपणास नफा झाला, असें प्रत्येकानें मानल्यावरून उभय पक्षींही मोठा आनंद झाला. या ठिकाणींच त्या देशचे एके राजपुत्रानें अथवा मुख्यानें येऊन **कोलम्बसाची** भेट घेतली. साधारण लोकांस जितका डामडौल माहित असतो तितका सर्व त्या राजाबराबर होता. तो ज्या पालखींमध्यें बसून आला तींस चार भोई होते, व त्याचे बराबर त्याचे ताब्यांतील जे बहुत लोक होते ते त्या राजाची मोठ्या आदरानें चाकरी करीत. त्या राजाची चाल मोठी प्रौढ व सभ्यपणाची होती, तो आपले लोकांबराबर फार संकोचवृत्तीनें वागत असे, परंतु **कोलम्बस** आणि **स्पेन** देशीय लोक यांचे बराबर तो फारच अघळपघळ वागूं लागला. त्या राजानें **कोलम्बसास** सोन्याचे पातळ पत्रे व मोठ्या करामतीनें केलेला एक कंबरपट्टा देऊन त्यांचे बद्दल जे पदार्थ त्यानें घेतले ते जरीं थोडक्या किमतीचे होते तरीं त्या राजास ते मोठ्या आदरानें ग्रहण करण्यासारिखे होते.

त्यांच्या मुख्यांतील एक्या मुख्याचें वर्णन.

**कोलम्बसाचे** मनांतून अणखीही सोन्याच्या खाणी शोधून काढावयाच्या होत्या, ह्मणून त्या देशांतील ज्या लोकांबराबर याचा सहवास पडला होता त्यांस त्या खाणींच्या स्थलांविषयीं पुसत चालला तेव्हां त्या लोकांनीं एका डोंगरी देशाकडेस बोट दाखविलें; त्यास ते **सिबोआ** असें ह्मणत. तो देश समुद्रापासून पूर्वेकडचे आंगास कांहीं

एशिआ खंडाच्या ज्या दूरच्या प्रदेशाविषयीं हें जल-

पर्यटन चालविलें आहे ते प्रदेश दूर नाहींत अशी कोलम्बसाची खात्री होत्ये.

अंतरावर होता. **कोलम्बस** त्या देशाचा उच्चार ऐकून आश्चर्यभरित झाला, कारण तो उच्चार यास **सिपांगो** या नांवासारिखा वाटला. हें नांव पूर्वेस पर्यटन करणारे प्रवासी लोक व **मार्को पोलो** यांनीं **जपान** बेटास दिलें होतें, यावरून आपण शोधून काढलेले देश, **आशिआ** खंडाच्या दूरदूरचे प्रदेशीं जे देश आहेत त्यांचे शेजारी आहेत, याविषयीं **कोलम्बसा**चे मनांत संशय राहिला नाहीं. ते देश शोधून काढावे हाच याचे पर्यटनाचा हेतु होता ह्मणून तेथें आतां आपण जाऊन लवकर पोंहोचूं अशा भरंवशानें यानें पूर्वेकडची वाट धरली. त्या ठिकाणीं गेल्यावर आपले सोईस पडे असें एक बंदर पाहून तेथें हा उतरला, आणि त्या बंदरास **सेन्त थोमास** असें नांव दिल्हें. नंतर तो प्रांत **ग्वाकानाहारी** ह्मणून एक मोठा अधिकारी होता त्याचे अमलांत आहे असें **कोलम्बसास** समजलें; हा गृहस्थ, पूर्वीं तें बेट ज्या पांचजण राजांनीं वाटून घेतलें होतें, त्यांतलाच होय, असें **कोलम्बसास** पुढें माहित झालें. त्या अधिकाऱ्यास **कोलम्बस** आल्याची बातमी लागतांच त्यानें आपले सेवक **कोलम्बसा**कडे पाठविले; ते समयीं त्या सेवकांनीं आपल्या अधिकाऱ्याचें नांव सांगून मोठे करामतीनें केलेला एक मुखवटा **कोलम्बसास** नजर केला, याचे कान, नाक, आणि मुख, हीं मात्र सोन्याचीं केलेलीं होतीं. आणि पूर्वेकडेस कितीएक कोसांवर एके बंदरापाशीं त्या अधिकाऱ्याचें राहण्याचें ठिकाण आहे तेथें आपण यावें असें

आपल्या लोकांपैकीं जे लोक

आमंत्रण केलें. या बंदरास सांप्रत **केप फ्रांसे** असें ह्मणतात. त्या समयीं **कोलम्ब-**

**सानेंही** त्या राजाची भेट घेण्यारितां आपले लोकांपैकीं कांहीं लोक पाठविले. ते तेथें जातांच, तो राजा मोठ्या थोरपणानें त्यांचे बराबर वर्तला, तेणेंकरून त्या लोकांचें तिकडे चांगले लक्ष लागले असें दिसतें. त्या लोकांनीं परत आल्यावर त्या देशाचें व तेथील लोकांचें चांगल्या तऱ्हेनें वर्णन केलें, तेणेंकरून ज्या **ग्वाकानाहारी**कडून यास आमंत्रण आलें होतें त्याची भेट घेण्याविषयीं **कोलम्बस** परम उतावीळ झाला.

ग्वाकानाहारीची भेट घेण्याकरितां पाठविले होते ते तेथील वर्तमान सांगतात.

याच उद्देशानें डिसेंबर महिन्याच्या २४ वे तारखेस **कोलम्बसानें सेंत थोमास** एथून तारूं हाकारिलें तेवेळेस वारा चांगला असून समुद्रही अगदीं शांत होता, आणि **कोलम्बसाचा**, अतिशयित उद्योगामुळें दोन दिवसांत अगदीं डोळा लागला नव्हता, ह्मणून सुकाणू एके गलबत हाकणाराच्या स्वाधीन करून, व सुकाणूस क्षणभरही विसंबूं नको अशी त्यास वजावून ताकीद करून, मध्य रात्रीस आपण थोडीशी झोंप घेण्याकरितां गेला. त्या सुकाणवाल्यानें संकटांचें भय न मानून, आपल्या जवळचें सुकाणूं गैरसावधपणानें एके अडाणी मनुष्याच्या स्वाधीन केलें. ते समयीं तें गलबत पाण्याच्या प्रवाहानें खालीं वाहात जाऊन एके खडकावर आपटलें; तेव्हां त्या धक्याच्या सपाट्यानें **कोलम्बस** जागृत झाला, आणि मोठ्या लगबगीनें तारवाच्या मजल्यावर गेला; तेथें पाहतो तों सर्व अव्यवस्था आणि निराशा झालेली आहे. तशा प्रसंगामध्यें **कोलम्बसानें** मा-

सेंत थोमास एथून तारूं हाकारितो.

याचें गलबत खडकावर आपटतें.

त्र कायतें धैर्य धरून, कांहीं खलाशीलोकांस होडी घेऊ- नांगर मागें ओढून घ्यावयास आज्ञा केली. परंतु त्या ख लाशांनीं **कोलम्बसाचे** आज्ञेप्रमाणें करावयाचें सोडून, ते थून दीड कोसाच्या अंतरावर **नीण्या** या नांवाचें गलबत होतें तिकडेस चाल केली. नंतर **कोलम्बसानें** गलबता चा भार कमी करण्यासाठीं डोलकाटी कापायास सांगि

नीण्या या गलबतापासून होड्यांची कुमक सांपडल्यामुळें खलाशी लोक आपले जीव वांचवितात.

तली, परंतु याचे हे सर्व प्रयत्न अकाळीं झाले गलबत दुडीं फुटलें तेणेंकरून पाणी इतक्य त्वरेनें आंत भरलें कीं त्या तारवांत नुकसान न होऊं देण्याचा उपाय थकला; परंतु ते समयीं समुद्र खळबळत नव्हता, व **नीण्या** गलबतापासून होड्यांची कुमकही वेळेवर मि ळाली, तेणेंकरून खलाशी लोकांनीं आपले प्राण मात्र वांचविले. या अनर्थाची बातमी त्या बेटांतील लोकांस कळतांच, त्यांचा राजा **ग्वाकानाहारी** आपले

फुटलेल्या तारवांतून ज्या वस्तू निघण्या सारिख्या होत्या तितक्या काढायास त्या बेटांतील लोक साहाय्य करितात.

सर्व लोक घेऊन समुद्राचे काठीं आला. तेथें आल्यावर **स्पेन** देशीय लोक संकटांत पडलेले पाहून, त्यांस उपद्रव करण्याचा हा जरी चांगला योग आला होता, तरीं तसें न करितां, त्या बेटवाल्यांनीं **स्पेन** देशीय लोकांवर असा अनर्थ गुजरला म्हणून फार श्रमी होऊन व नेत्रांतून अश्रू टाकून मोठ्या जिव्हाळ्यानें शोक केला. असा जो त्यांस कळवळा आला तो उगीच शुष्काशुष्कीच दाखवून त्यांचें समाधान न होतां, त्यांनीं पुष्कळ होड्या समुद्रांत घालून फुटलेल्या तारवांतून जितक्या वस्तु निघावयासारिख्या होत्या तितक्या काढायास **स्पेन** देशीय लोकांनीं ज्या-

प्रमाणें सांगितलें त्याप्रमाणें मदत केली. इतक्यांचा प्रयत्न एकत्र झाल्यामुळें त्यांचे हातून ज्या ज्या वस्तु मोठया किमतीच्या होत्या त्यांतून बहुतेक बाहेर निघाल्या. ते जिन्नस किनाऱ्यावर आणितांच **ग्वाकानाहारीनें** स्वतः त्यांजवर देखरेख ठेविली, आणि ते सर्व जिन्नस एके ठिकाणीं रचवून ठेवून तेथें हत्यारबंद शिपाई उभे केले. ते शिपाई, त्या पाहुण्यांचे जिन्नस कोणी गुप्तपणीं चोरून नेऊं नयेत व त्यांकडे कोणीं निरखूनही पाहूं नये ह्मणून, लोकांस त्या जिनसांच्या जवळ येऊं देत नसत. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं **कोलम्बस नांग्या** या नांवाचे गलबतावर असतां, **ग्वाकानाहारीनें** तेथें जाऊन याची भेट घेतली, आणि **कोलम्बसाचें** जें नुकसान झालें होतें त्याची सांदासांद करायास आपले जवळ जितकें होतें तितकें देऊं करून याचें समाधान केलें.

ग्वाकानाहारीच्या औदार्याचें चमत्कारिक उदाहरण.

या समयीं **कोलम्बसाची** अशी अवस्था झाली होती कीं, आपलें कोंगी तरीं समाधान करावें, याचीच या प्रसंगीं यास अपेक्षा होती; कारण **कोलम्बसास** अद्यापि **पिंटा** या गलबताचें वर्त्तमान न लागल्यामुळें, आपला विश्वासघातकी सोबती, हे जे आपण अलौकिक शोध केले यांची बातमी प्रथमतः नेऊन मोठेपणा मिळविण्याकरितां, व हें वर्तमान पूर्वी राजाचे कानावर घालून जी कीर्त्ति व सन्मान वास्तविक पाहतां मला योग्य आहेत, त्यांचें हरण करून घेण्याकरितां, आपण **युरोप** खंडास गलबत घेऊन गेला, असें यास निभ्रांत वाटलें होतें. एथें तर बाकी एकच गलबत या-

कोलम्बसाची संकटावस्था.

चेजवळ राहिलें होतें, आणि तें एवढ्या विस्तीर्ण सागरांतून इतकीं मनुष्यें **यूरोप** खंडास परत न्यावयासही समर्थ नव्हतें, कारण कीं तें गलवत सर्व गलबतांमध्यें फारच लहान आणि गैरमजबुदीचें होतें. या सर्व गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट भयप्रद होती, तिणेंकरून **कोलंबसाचें** मन पराकाष्ठेचेंच चिंताग्रस्त होऊन गेलें. अशा प्रसंगीं **पिंझोन** यास जाऊन गांठावें, आणि तो खोट्या बातम्या सांगून **स्पेन** देशामध्यें आपणास प्रतिकूळ अशा ज्या गोष्टी लोकांच्या मनांत ठसवील त्या काढून टाकाव्या, अशी इच्छा उत्पन्न झाल्यामुळें **कोलम्बसास** विलंब न करितां तिकडे जाण्याचें आवश्यक पडलें. त्या देशाची जमीन पिकाऊ होती, व तेथील लोकांचे स्वभाव नम्र होते, यावरून, **कोलम्बसानें** नुकतीच जी आपले मनांत कल्पना बांधिली होती, ती **नीण्या** या गलबतावरून इतकीं मनुष्यें नेण्याचें संकट पडल्यामुळें दृढ झाली. **कोलम्बसाचे** मनांत असें होतें कीं आपले खलाशी लोकांपैकीं कांहीं लोकांनीं एथें राहून एतद्देशीय लोकांची भाषा शिकावी, त्यांचे स्वभाव कसे काय आहेत ते पाहावे, देश कोणत्या प्रकारचा आहे याचा तपास करावा, खाणींचा शोध लावावा, मी परत येते वेळेस आपले बरोबर जे लोक आणीन त्यांचे वसाहतीकरितां सोईवार जागा तयार करून ठेवावी आणि अशा प्रकारें नवीन शोधून काढलेल्या देशांपासून जे लाभ माझे मनांतून होतील असें आहे त्यांची प्राप्ति आयासावांचून होईल असें करून ठेवावें. याप्रमाणें आपले लोकांतून कांहीं लोकांस ठेवण्याचाही यानें निश्चय केला,

खलाशी लोकांपैकीं कांहीं लोकांस त्या बेटांत ठेवण्याचा निश्चय करितो.

आणि जेव्हां यानें ती गोष्ट आपले लोकांस विदित केली, तेव्हां त्यांनींही ती मान्य केली. **कोलम्बसाचे** लोक बहुत दिवस जें हें जलपर्यटन चालले होतें याचे श्रमास कंटाळले होते, व त्यांस स्वभावतः ख्यालीखुशाली भोगावयास पाहिजे असे, याकरितां, व त्या देशांत द्रव्य मिळण्याची चिन्हें दिसून आल्यावरून तेथील द्रव्य जमा करण्याकरितां, स्वसंतोषानें तेथें राहण्यास कितीएक लोक तयार झाले.

तेथें राहण्याकरितां त्या लोकांतून बरेच लोक तयार होतात.

ही मसलत सिद्धीस नेण्याविषयीं **ग्वाकानाहारी** याचे अनुमोदनावांचून दुसरी कोणतीही न्यूनता नव्हती, आणि तें अनुमोदन मागण्यास **ग्वाकानाहारीच्या** निःशंक भोळेपणामुळें **कोलम्बसास** संधीही चांगली सांपडली. **कोलम्बसानें**, मोठ्या युक्तीनें तुटक तुटक शब्द बोलून, व खुणा मुद्रा करून, आमचीं तारवें जवळ येतांच या बेटांतील लोक इतक्या धांदलीनें पळून गेले, याचें कारण समजून घेण्याचीं इच्छा दर्शित केली; तेव्हां त्या अधिकाऱ्यानें यास असें समजाविलें कीं, आग्नेयी दिशेकडील बेटांतलें **कारिबीअन** या नांवाचे लोक बंडें करून या देशास फार उपद्रव करितात. ते लोक उग्र आणि शूर आहेत, व ते रक्तामध्यें फार आनंद पावून जे हतभाग्य बंदिवान त्यांचे हातीं सांपडतात त्यांचें मांस खातात. एतद्देशीय लोक जरी पुष्कळ असले तरीं त्यांस त्या **कारिबीअन** लोकांबरोबर लढाई करावयास धीर होत नाहीं. **स्पेन** देशीय लोक प्रथम दृष्टीस पडतांच, एथील लोकांनीं, **कारिबीअन** लोकच आले असें समजून, दाट आणि कोणा-

कारिबीअन लोकांच्या भयंकर स्वाऱ्यांची यास वातमी कळवितात.

चाही प्रवेश न होण्याजोग्या झाडींत जाऊन आपली प्राण-रक्षण करण्याची जी नेहेमींची युक्ति, ती स्वीकारिली.

पुढील उपद्रवापासून त्याचे संरक्षण करण्यापुरते खलाशी लोक त्या बेटांत ठेवण्याविषयीं हा बोलणें घालितो.

**ग्वाकानाहारी** त्या भयदायक शत्रूंविषयीं बोलत असतां त्यानें भीतीचीं चिन्हें आणि त्या शत्रूंचा पराभव करण्याविषयीं आपले लोकांच्या असामर्थ्याची मनोमय साक्षी इतकी दर्शविली कीं, तिणेंकरून त्या **कारिबीअन** लोकांच्या उपद्रवापासून एतद्देशीय लोकांचें आपले मतें ज्या युक्तीनें चांगलें रक्षण होईल त्या युक्तीचें **ग्वाकानाहारी**जवळ बोलणें लाविलें असतां त्यास भय प्राप्त होणार नाहीं असें **कोलम्बसानें** ठरविलें; आणि तत्काळ त्या शत्रूंचा पराभव करण्याविषयीं **स्पेन** देशीय लोकांची मदत देण्याचें कबूल केलें. नंतर **कोलम्बस** ज्या राजाचे चाकरीस होता, त्या शक्तिमान् राजाचे आश्रयाखालीं **ग्वाकानाहारी** आणि त्याचे लोक यांनीं राहावें, आणि त्या बेटांतील लोकांचे पुढील उपद्रवापासून रक्षण करण्यापुरते, व मागील उपद्रवांचा सूड उगविण्यापुरते, आपले लोक त्या बेटांत ठेवावे, याविषयीं यानें बोलणें घातलें.

त्या भोळ्या राजानें **कोलम्बसाचें** बोलणें मोठ्या उत्कंठेनें मान्य केलें, आणि स्वर्गाहून उतरलेले, व बलामध्यें मृत्युलोकच्या लोकांपेक्षां वरिष्ठ, अशा लोकांच्या आश्रयानें मी आतां निर्भय झालों, असें तो मानूं लागला. नंतर एक लहानसा किल्ला बांधण्याकरितां जागा नेमिली, तेथें खि-

कोलम्बस एक किल्ला बांधितो.

स्ताचे दिवसीं ह्मणजे डिसेंबर महिन्याच्या २५ व्या तारखेस **कोलम्बस** येऊन उतरला,

ह्मणून त्या किल्ल्यास यानें **नाविदाद** असें नांव दिलें. त्या किल्याभोवतीं एक खोल खंदक खणिला आणि त्याचे तट, लांकडाचे मोठमोठ्या सरांचे टेंके देऊन मजबूद केले, व **कोलम्बसाचे** बुडालेल्या तारवांतून काढिलेल्या मोठमोठ्या तोफा त्यांजवर नेऊन, रोंखून ठेविल्या. हें काम दहा दिवसांत समाप्तीस गेलें, कारण त्या लोकांची ती भोळी जात आपले पारतंत्र्याची जी ही पहिली इमारत ती बांधण्यामध्यें मोठ्या अविचाराच्या तत्परतेनें श्रम करण्यांत गुंतली होती. या काळामध्यें **कोलम्बस**, आपल्या मोहक शक्तीच्या योगानें व औदार्यानें त्या बेटांतील लोकांस **स्पेन** देशांतील लोक मोठे ह्मणून जें वाटत होतें, तेंच वृद्धिंगत करायास श्रम करीत होता. **कोलम्बस, स्पेन** देशीय लोकांचा स्वभाव लोकांचें बरें करावें असा आहे, असें त्या लोकांचे मनांत आणून द्यावयास यत्न करीत असतां, त्यांचा ज्यांवर क्रोध होईल त्यांचें पारिपत्य व नाश करावयास त्यांचे आंगीं सामर्थ्य आहे, याचेंही कांहीं चमत्कारिक उदाहरण तद्देशीय लोकांस दाखवावें, असें याच्या मनांत आलें. याच हेतूनें **कोलम्बसानें** त्या पुष्कळ लोकांच्या समक्ष आपले लोक लढाईच्या क्रमानें उभे केले, आणि **स्पेन** देशांतील तरवारींची तीक्ष्णता, भाल्याचें सामर्थ्य, आणि धनुष्याचें चलनवलन, यांची दिसण्यांत मात्र मोठ्या डामडौलाची, परंतु कोणास उपद्रव न होई, अशी कवाईत जेव्हां त्यांचेकडून करविली, तेव्हां ज्या रानटी लोकांस लोखंडाचा उपयोग कसा करावा हें जन्मांत माहीत नव्हतें, व ज्यांस माशांची

स्पेनदेशीय लोकांच्या युद्धविषयक पराक्रमाचा व त्यांच्या शस्त्र सामर्थ्याचा हा मोठा थाटमाट करून दाखवितो.

हाडें टोंकास बसविलेले वेळूचे तीर, लांकडी तरवार, आणि अग्नींत घालून कठीण केलेले भाले, यांवांचून दुसरी लढाऊ शस्त्रें ठाऊक नव्हतीं, त्यांस आश्चर्य वाटून त्यांचे अंगाचा थरकांप झाला. असें जें त्यांस आश्चर्य आणि भय वाटलें होतें, तें कमी होण्याच्या अगोदरच **कोलम्बसानें** तोफांचे आवाज करविले. हा जो एकाएकीं धडाका झाला तेणेंकरून तर त्यांस इतकें भय वाटलें कीं, ते आपले हात तोंडावर ठेवून जमीनीवर आडवे पडले. नंतर ज्या वृक्षांकडे तोफांचा रोंख धरिला होता त्या वृक्षांवर गोळ्या लागून जो चमत्कारिक परिणाम झाला होता तो जेव्हां त्यांनीं पाहिला, तेव्हां असें ठरविलें कीं, ज्यांचेजवळ अशीं नाशकारक शस्त्रें आहेत, व जे आपल्या शत्रूंवर गर्जना आणि विद्युल्लता यांच्या साह्यानें येतात, अशा लोकांचा पराभव करणें असंभाव्य होय.

आपल्या पाठीमागें ज्यांस राहावयास सांगितलें त्यांस याचे उपदेश.

तद्देशीय लोकांवर **स्पेन** देशीय लोकांचें सहज वर्चस्व पडे, इतकी यांची परोपकारशीलता व सामर्थ्य त्या लोकांचें मनांत पक्कें ठसवून देऊन, **कोलम्बसानें** आपले लोकांपैकीं ३८ असामी त्या बेटांत ठेवण्याकरितां नेमिले, आणि त्या लोकांचा अधिकार **कोर्दोवा** एथील गृहस्थ **दिइगो दिआरादो** यास सांगितला, व **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांपासून जे अधिकार यास मिळाले होते तेच अधिकार यानें त्या गृहस्थास दिले, आणि त्या थोडक्या लोकांची उपजीविका व संरक्षण होण्याकरितां जितक्या वस्तु पाहिजे होत्या तितक्या सर्व त्यांस दिल्या. त्यासमयीं **कोलम्बसानें** आपले लोकांस एकमतानें वागायास,

आपले धन्याची मोकळे मनानें आज्ञा मान्य करायास, जबरदस्ती करून तद्देशीय लोकांस संताप न आणायास, व ग्वाकानाहारी बराबर स्नेहभाव वृद्धिंगत करायास, आणि लहान लहान टोळ्या करून फिरून अथवा किल्ल्यापासून फार दूर जाऊन त्या लोकांचें अमलाखालीं न येण्यास बजावून सांगितलें. नंतर मी लवकरच परत येईन, व येतेवेळेस हा देश अगदीं आपले ताब्यांत घेण्यास व आपले शोध सफल करण्यास पुरे इतकी कुमकही मी आपले बरावर आणीन, असें वचन दिलें; आणि राजा व राणी यांस तुमचीं नांवें सांगून तुमची योग्यता व कामें फलद्रूप होण्यासारिखीं करीन असें त्यांशीं कबूल केलें.

हा नाविदाद एथून निघतो.

अशा प्रकारें आपले लोकांच्या रक्षणाविषयीं प्रथमच पक्की सावधगिरी करून ठेवून **कोलम्बसानें** १७९३ मध्यें ज्यानेवारी महिन्याच्या ४ थ्या तारखेस **नाविदाद** हें स्थळ सोडिलें आणि पूर्वेकडेस गलबत हाकारून त्या बेटाच्या उत्तर किनाऱ्यावर पुष्कळ बंदरें शोधून काढून त्यांस नांवें दिलीं. नंतर ६ वे तारखेस **पिंटा** हें गलबत ज्याचा दीड महिना अधिकच वियोग झाला होता त्याचा शोध लागला, आणि **कोलम्बस** जेव्हां त्या तारवाचे जवळ गेला, तेव्हां वाऱ्याच्या सपाट्यानें माझा मार्ग सुटला आणि तो वारा तोंडचा लागला ह्मणून माझ्यानें परत येववेना असें मिष करून, आपण जें केलें तें गैरशिस्त नाहीं असें दाखवायास **पिंझोन** यानें प्रयत्न केला. ते समयीं **कोलम्बसास** त्याचे कृत्रिमी विचाराविषयीं संशय वाटून, त्यानें आपला बचाव करण्याकरितां जें सांगितलें तें अयु-

कोलम्बस आणि पिंझोन यांची गाठ पडली.

क्तिक आणि असत्य आहे, असें जरीं समजलें, तरीं हा समय त्यास अधिकाऱ्याच्या नात्यानें दबकावण्याचा नव्हे असें वाटून, व जो हा मित्रसमागम झाला तेणेंकरून चिंता उत्पन्न करणाऱ्या भयांपासून मी मुक्त झालों असें समाधान पावून, **पिंझोन** यानें आपलेवरील दोष उडावा ह्मणून जें सांगितलें तें जरीं अगदीं लंगडे होतें तरी त्याचा **कोलम्बसानें** सहज रीतीनें स्वीकार केला, आणि **पिंझोन** याजवर पहिल्याप्रमाणें प्रीति ठेविली. **पिंझोन** यानें, **कोलम्बसास** सोडल्यानंतर, बेटांतील कितीएक बंदरें पाहिलीं, आणि तेथील कोकांबरावर व्यापार करून कांहीं सुवर्णही मिळविलें, परंतु एकादा मोठा शोध केला असें नाहीं.

पिंझोन यानें आपल्या वर्त्तणुकीविषयीं जें सांगितलें तें समाधान होण्या जोगें जरीं नव्हतें तरीं त्याचा स्वीकार करितो.

आपले तारवांची अवस्था आणि आपले लोकांचा स्वभाव या दोन गोष्टी पाहून **यूरोप** खंडास लवकर परत गेलें पाहिजे असें **कोलम्बसास** वाटलें. तो प्रकार असा कीं, तारवांस अशा पुष्कळ दिवस चाललेल्या जलपर्यटनामध्यें फार उपद्रव सोसावा लागला यामुळें त्यांतून पाणी आंत येऊं लागलें होतें, आणि इकडे **कोलम्बसाचे** लोकांस **स्पेन** देश सोडून फार दिवस झाले होते, आणि त्यांस या अशा चमत्कारिक व कधीं ऐकिलेल्या नाहींत अशा गोष्टी **स्पेन** देशीय लोकांस सांगावयाच्या होत्या, ह्मणून त्यांनीं स्वदेश पुनः पाहण्याविषयीं फार उतावळी दाखविली होती. यावरूनच **कोलम्बस** ज्यानेवारी महिन्याच्या १६ वे तारखेस ईशानी कडेस चालू झाला आणि लवकरच जमीन नदि-

यूरोप खंडास परत जाण्याचा निश्चय करितो.

से इतका दूर गेला. **कोलम्बसानें** जीं जीं बेटें शोधून काढिलीं त्यांतून जे कांहीं लोक यानें आणिले होते ते याच्या बरोबर होते, आणि याचे शोधांचा मुख्य उद्देश काय तें सुवर्ण, तें व त्याशिवाय कितीएक देशांमध्यें व्यापार चालू करण्यासारिखे जे पदार्थ होते त्यांचे नमुने, तसेच बहुत अज्ञात पक्षी, व कांहीं स्वतःसिद्ध चमत्कारिक पदार्थ, ज्यांचेकडे विद्वान् लोकांचें लक्ष लागावें, आणि जींहींकरून इतर जनांस आश्चर्य वाटावें असे होते ते सर्व **कोलम्बसानें** गोळा करून आपले बराबर घेतले. हें पर्यटन फेब्रुआरी महिन्याच्या १४ वे तारिखेपर्यंत सुखरूप चालून **कोलम्बस अत्लांतिक** महासागरांतून सुमारें ७५० कोशांवर गेला होता. ते समयीं वारा सुटायास आरंभ झाला, आणि तो अधिकाधिकच वाढत चालला, असें होतां होतां शेवटीं पराकाष्ठेचें तुफान झालें. अशा प्रसंगीं **कोलम्बसाची** नौकाशास्त्रामध्यें जी कुशलता आणि माहिती होती तिच्या योगें जितके उपाय सुचले तितके सर्वही **कोलम्बसानें** आपले तारवांचे रक्षणार्थ केले. परंतु त्या तुफानाच्या झपाट्यापुढें कांहीं चालेना, आणि अजून त्या स्थलापासून जर्मानही फार दूर पडली याकरितां विनाश अपरिहार्य दिसून आला. अशा संकटसमयीं सर्वशक्त जो परमेश्वर त्याची प्रार्थना करणें, साधु पुरुषांचीं नांवें घेणें, नवस व मंत्रजप करणें, इत्यादिक मनुष्याचे भयभीत अंतःकरणास देवभोळेपणामुळें सुचलेले, तसेच स्वधर्मांत सांगितलेले, जे सर्व उपाय त्यांचा मात्र त्या खलाशी लोकांस आधार होता. त्याकाळीं या

कोलम्बसानें महत्प्रयास केला तरीं विनाश अपरिहार्य दिसून येतो.

खलाशी लोक निराश होऊन बसतात.

संकटापासून मुक्त होण्याची अशा न दिसून ते लोक निराश होऊन बसले, आणि प्रतिक्षणीं लाटांमध्यें आपण गरक होऊन जाऊं असें त्यांस वाटूं लागलें. अशा भयानक प्रसंगीं आपलें भयंकर स्वरूप धारण करून जेव्हां अंतकाळ पुढें उभा राहतो तेव्हां जे मनोविकार मनुष्याचे अंतःकरणांत वेदना आणि भीति उत्पन्न करितात त्या विकारांशिवाय **कोलम्बसाचे** अंतःकरणांत एक दुसरीच काळजी उत्पन्न झाली. तो प्रकार असा; त्या प्रसंगीं **कोलम्बसास** असें भय पडलें कीं, आपण जे हे आश्चर्य होण्याजोगे शोध केले यांचें ज्ञान आतां नाशाप्रत पावेल, आणि आपल्या युक्तीची जी ही आनंददायक सिद्धि तीपासून मनुष्यमात्रास जे लाभ झाले असते ते नष्ट होतील, आणि आजपर्यंत जीं पराक्रमाचीं कृत्यें झालीं त्यांमध्यें सर्वोत्कृष्ट जें हें कृत्य तें उपस्थित करून तें पुढें चालिवणारास योग्य अशी जी प्रतिष्ठा तिणेंकरून आपलें नांव वंशपरंपरा चालावयाचें त्याचे बदल आतां एके अविचारी आणि ठक अशा साहस कर्म कर्त्याच्या नांवाप्रमाणें चालेल. हे विचार मनांत आल्यावरून आपल्या प्राणाचे नाशाविषयींची जी भीति ती तर अगदींच नष्ट होऊन गेली. **कोलम्बसानें** प्रयत्न करून जें संपादन केलें होतें त्याचें स्मरण राही असें करून ठेवण्याविषयीं जितकी यास चिंता पडली तितकी आपले आयुष्याच्या नाशाविषयींही पडली नाहीं. यामुळेंच **कोलम्बसानें** तारवांतील खोलीमध्यें जाऊन आपण केलेल्या जलपर्यटनाचे, आपण ज्या मार्गानें गेला त्याचें, आपण

कोलम्बसानें प्रयत्न करून जें संपादन केलें होतें त्याचे रक्षणाविषयीं याची उत्सुकता.

याकरितां जे उपाय योजिले ते.

शोधून काढलेल्या देशाचीं स्थलें व संपत्ति यांचें आणि त्या देशीं ठेविलेल्या लोकांचें संक्षिप्त वर्णन एके कातड्यावर लिहिलें, आणि तें कातडें तेलकट फडक्यामध्यें गुंडाळून व मेणाच्या पोळीमध्यें घालून तें एके लांकडाच्या भांड्यांत घातलें, नंतर त्या भांड्यांचें झांकण चांगलें बसवून इतक्या महत्वाची जी ही गोष्ट ती दैववशात् जगास प्राप्त होईल अशी आशा धरून यानें तें भांडें समुद्रांत सोडून दिलें.

शेवटीं असा चमत्कार झाला, कीं आणखी दुसरे कृत्याकरितां ज्या प्राणाचा उपयोग पडणार त्याचें संरक्षण करण्याकरितां साक्षात् ईश्वरच मध्यें पडला. ते समयीं वारा कमी होऊन समुद्र शांत झाला आणि १५ व्या तारिखेस संध्याकाळीं **कोलम्बस** व याचे लोक यांनीं जमीन शोधून काढिली, आणि तो कोणता प्रदेश याविषयीं जरीं पुरतें ठाऊक नव्हतें तरीं ते तिकडे गेले. तेथें गेल्यावर तें **आझोरेस** बेटें अथवा पश्चिमेकडील बेटें यातील **पोर्तुगाल** देशचे सरकाराच्या ताब्यांतील **सांता मरीआ** या नांवाचें बेट होय असें त्यांस लवकरच समजून आलें. तेथील सुभेदाराबराबर एक मोठी लढाई करून व तींत आपलें शौर्य आणि चातुर्य दाखवून **कोलम्बसानें** नवीन सामग्री तसेंच दुसरें जें त्यास पाहिजे होतें त्या सर्वांची तयारी करून घेतली. इतकें जरी झालें तरीं तुफानाचे पहिल्या दिवशीं **पिंटा** या नांवाचें गलबत दिसेनासें झालें होतें तें अद्यापि दृष्टीं पडलें नाहीं, या गो-

सामग्री तसेच दुसरे जे पदार्थ कोलम्बसास पाहिजे होते ते यास प्राप्त होतात.

ष्टीवरून **कोलम्बसाचें** चित्त फार उद्विग्न होऊन गेलें.

पिंटा या गलबतामुळें यास जे संशय व भय प्राप्त झालीं तीं.

प्रथम **कोलम्बसास** असें वाटलें कीं तें गलबत समुद्रांत बुडून त्यावरील सर्व खलाशी लोक मरण पावले असतील. नंतर याच्या मनांत जे पहिले संशय होते तेच उत्पन्न झाले, आणि **पिंझोन** यानें आपले अगोदर **स्पेन** देशास पोंचून आपण जे शोध केले त्यांची प्रथम बातमी सांगून आपले कीर्त्तीचा कांहीं वांटा मिळवावा ह्मणून त्या देशाकडेस गलबत हाकारिलें असेल असें यास भय पडलें.

दुसऱ्या वादळांत सांपडतो.

ही त्याची मसलत चालूं देऊं नये ह्मणून वारा अनुकूळ होतांच **कोलम्बस आझोरेस** बेटांतून निघाला. नंतर **कोलम्बस स्पेन** देशाच्या किनाऱ्यापासून फार दूर नसतां, ह्मणजे **कोलम्बसाच्या** जलपर्यटनाची समाप्ति जवळच आली असतां, व कांहीं विघ्न होण्याचाही रंग दिसत नसतां, अकस्मात् दुसरें एक तुफान झालें; परंतु याचा झपाटा पहिल्यापेक्षां कांहीं कमी होता. या तुफानामध्यें दोन दिवस आणि दोन रात्री

टेगस नदीमध्यें विश्रांति घेतो.

**कोलम्बस** सांपडल्यामुळें यास **टेगस** नदीमध्यें तारूं थांबवावें लागलें. तेथून **पोर्त्तुगाल** देशाच्या राजास अर्ज केल्यावर त्यास **लिस्बोन** शहरास यावयास परवानगी झाली. आजपर्यंत नवीन नवीन शोध करण्याचें काम ह्मटलें ह्मणजे आमचें असें **पोर्त्तुगीज** लोक मानीत असत; त्या कृत्यांत दुसरे लोक शिरून पहिल्या प्रयत्नानें आमची बरोबरी केली एवढेंच नाहीं, तर आमची कीर्त्तिही ग्रासून टाकिली, असें पाहिल्यावर, जो त्यांचे ठायीं स्वाभाविक मत्सर उत्पन्न व्हावयाचा त्यास

एकीकडे ठेवून अलौकिक आणि असंभाव्य अशीं कृत्यें करणाऱ्या पुरुषास योग्य असा जो सन्मान तो **कोलम्बसास** देऊन त्या लोकांनीं याची भेट घेतली. त्या राजानें **कोलम्बसास** आपले समक्ष आणिलें आणि याचे बराबर मोठ्या सन्मानानें वागून **कोलम्बसानें** आपण केलेल्या जलपर्यटनाचें जें वर्णन केलें तें खेदयुक्त आश्चर्यानें ऐकिलें. ते समयीं **कोलम्बसाची** वृत्ति तर आपले शोधांचा मोठेपणा वर्णन करण्यामध्यें परम समाधान पावली, आणि ज्या लोकांनीं आपणास उपहासास्पद व स्वदेशास नाशावह अशा अज्ञानानें **कोलम्बसाच्या** युक्ति, मिथ्या कल्पना करणारे वठक असे जे साहसी लोक त्यांच्या कल्पनेसारिख्या मानिल्या होत्या, त्या लोकांस आपल्या युक्ति पोकळ नाहींत असें सिद्ध करून देण्याचें याचे आंगीं सामर्थ्य आलें होतें तेणेंकरूनही यास समाधान वाटलें.

पोर्तुगाल एथील राजा याचा आदर सत्कार करितो.

**कोलम्बस स्पेन** देशास परत यावयास फार उतावीळ झाला होता ह्मणून हा **लिस्बोन** शहरांत पांच दिवस मात्र राहिला. नंतर मार्च महिन्याच्या १५ वे तारिखेस हा **पालोस** एथील बंदरीं जाऊन पोहोंचला; त्या बंदराहून **कोलम्बस** निघाल्या दिवसापासून आजपर्यंत ७ महिने आणि ११ दिवस झाले होते. त्या बंदराचे जवळ जवळ **कोलम्बसाचें** गलबत आल्याचा शोध लागतांच, **पालोस** एथील लोक, आपले सोयरेधायऱ्यांस व स्वदेशीय लोकांस भेटण्याकरितां, व त्यांचे जलपर्यटनाची बातमी ऐकण्याकरितां, मोठ्या उत्कंठेनें समुद्रतीरीं धांवतच

स्पेन देशांत जाऊन उतरल्यावर यास जे सन्मान व बहुमान मिळाले ते.

गेले. नंतर त्या लोकांस हें जलपर्यटन सफल झालें असें जेव्हां समजलें, व नवीन शोधून काढलेल्या देशांपासून जे चमत्कारिक लोक व अज्ञात जनावरें आणि तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ **कोलम्बसानें** आणिले होते ते जेव्हां त्यांनीं पाहिले, तेव्हां सर्वांस मोठा हर्ष झाला; आणि त्या समयीं घंटानाद करून तोफा सोडून **कोलम्बस** जेथें उतरला होता तेथें जाऊन यास राजासारिखा मान देऊन याची भेट घेतली, नंतर ते सर्व लोक **कोलम्बस** व **कोलम्बसाचे** खलाशी यांचे सहवर्तमान, देवालयामध्यें गेले; आणि प्राचीनकालीं जितकीं पर्यटनें झालीं त्यांपेक्षां बहुत दिवस चाललेलें व अधिक महत्वाचें जें हें जलपर्यटन तें मोठ्या आश्चर्यानें चालवून, यांत ज्यानें यश दिलें असा जो परमेश्वर त्याची त्यांनीं स्तुति केली. त्याच दिवशीं संध्याकाळीं वादळाच्या झपाट्यामुळें उत्तरेकडेस घसरलेलें **पिंटा** या नांवाचें गलबत त्या बंदरास येऊन लागलें तें पाहून **कोलम्बसास** फारच समाधान वाटलें.

पिंटा हें गलबत येऊन पोहोंचतांच यास आनंद होतो.

वार्सिलोना एथें मोठ्या समारंभानें कोलम्बसास आणावें असा हुकूम होतो.

ते समयीं राजा आणि राणी **वार्सिलोना** एथें होतीं; त्यांस आपण कार्यसिद्धि करून आलों याविषयीं कळीवण्याची **कोलम्बसानें** प्रथमतः सावधगिरी राखिली. **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** यांस ही अकल्पित गोष्ट कळतांच अतिशयित आश्चर्य होऊन परम आनंद झाला, आणि **कोलम्बसाची** लोकोत्तर कृत्यें आणि शोध यांचें साद्यंत वर्तमान याचेच मुखापासून श्रवण करावें ह्मणून त्यांनीं अतिशय सन्मानयुक्त आणि स्तुतिपर अशा शब्दांनीं **कोलम्ब-**

**सास** त्वरित दरबारास येण्याविषयीं आज्ञा केली. **कोलम्बस बार्सिलोना** एथें जात आसतां आसपासच्या गांवचे लोक जमा झाले, आणि हा जिकडेस चालला होता तिकडे याचे पाठीमागून सानंदाश्चर्य करीत आणि वाहवा वाहवा ह्मणतच चालले. ज्या महत्कृत्यामुळें **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांचे राज्यास इतकें तेज चढलें त्या महत्कृत्यास योग्य असा समारंभ करून त्या उभयतांच्या आज्ञेवरून **कोलम्बसास** शहरांत आणिलें. नवीन शोधून काढलेल्या देशांपासून **कोलम्बसानें** जे आपले बराबर लोक आणिले होते ते सर्वांच्या पुढें होते, ते समयीं त्यांचे मुखाचा चमत्कारिक वर्ण, त्यांच्या चमत्कारिक रानवट आकृति आणि त्यांचे विलक्षण पोषाख यांवरून तीं दुसऱ्याच जातीचीं मनुष्यें आहेत असें दिसलें. त्या लोकांचे पाठीमागून तद्देशीय लोकांच्या अशिक्षित कौशल्यानें केलेले सुवर्णाचे अलंकार, व पर्वतांमध्यें सांपडलेले सोन्याचे रज आणि नद्यांमधून जमा केलेला चूर हे पदार्थ आणिले. त्यांमागून नवीन शोधून काढलेल्या देशांतील नानाप्रकारचे जिन्नस व तेथील चमत्कारीक पदार्थ चालविले. नंतर अशा समारंभासहवर्त्तमान स्वतां **कोलम्बस** शहरांत आला; आणि हा चमत्कार पाहण्याकरितां जितके लोक जमले होते तितक्या सर्वांच्या दृष्टी यानें आपलेकडे आकर्षून घेतल्या; व ज्यानें आपले चातुर्यानें आणि धैर्यानें प्राचीन कालीं अज्ञात अशा मार्गानें स्वदेशीय लोकांस नवीन जगाचें ज्ञान करून दिलें अशा लोकोत्तर पुरुषाकडे सर्व लोकही टकटका पाहत राहिले. **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** या उभयतांनीं राज- याची मोठ्या आदर सत्का-

रानें राजा व राणीहीं उयभतां भेट घेतात.

कीय पोषाख करून शोभायमान छताखालील सिंहासनावर बसून कोलम्बसाचें आगत स्वागत केलें तो प्रकार असा कीं, जेव्हां **कोलम्बस** जवळ आला तेव्हां त्या दोघांनीं उभें राहून, त्यांच्या हस्तांचें चुंबन करण्याकरितां **कोलम्बस** गुडघे टेंकून उभा राहिला होता यास वरतीं उठविलें, आणि याचे करितां जी एक खुरशी तयार करून ठेवविली होती तिजवर बसा, आणि आपल्या जलपर्यटनाचें समग्र वर्णन करा, असें यास सांगितलें. त्या समयीं **कोलम्बसानें स्पेन** देशीय लोकांचे स्वभावास व ज्या सभेमध्यें वर्णन करीत होता तिचे मोठेपणास योग्य जो प्रौढपणा व चित्ताचें स्थैर्य या दोन गोष्टींचें धारण करून, तसाच जे मोठमोठे गृहस्थ आपले हातून महत्कृत्यें घडल्यामुळें समाधान पावतात व आपलीं महत्कृत्यें बाह्यात्कारें मोठमोठीं दाखविल्यामुळें लोक जी निरर्थक स्तुति करितात ती ज्यांस प्रिय वाटत नाहीं, त्या पुरुषांचे ठायींच असणारा जो स्वभाविक साधेपणा तो धरून, **कोलम्बसानें** आपल्या जलपर्यटनाचें वर्णन केलें. जेव्हां **कोलम्बसानें** आपलें संभाषण समाप्त केलें तेव्हां, राजा आणि राणी या उक्षयतांनीं, गुडघे टेंकून आपले ताब्यांतील राज्यास ज्या नवीन देशापासून इतके लाभ प्राप्त होतील अशी त्यांस आशा होती, त्या देशांचा शोध लागला ह्मणून, सर्वशक्त जो परमेश्वर त्याची अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली. नंतर कृतज्ञता आणि सानंदाश्चर्य या दोन गोष्टींवरून **कोलम्बसास** जितके सन्मान देण्याचे सुचले तितके सर्व त्यास दिले. पूर्वी **सांता फे** एथें जो करारनामा झाला होता

कोलम्बस व याची संतती यांस

त्यांत जितके अधिकार लिहिले होते तितके सर्व कोलम्बस व कोलम्बसाचे वारस यांस पक्केपणीं ठरवून देण्याविषयीं सनदा लिहिल्या. कोलम्बसाचे कुटुंबास वडे लोकांची पदवी दिली; आणि सर्वांहून मोठे पदवीचे गृहस्थांस जितका आदर सत्कार असे तितका सर्व प्रसंगीं राजा आणि राणी व त्यांचें पाहून सर्व दरबारी लोक कोलम्बसास देऊं लागले. परंतु कोलम्बसानें जे देश शोधून काढिले होते ते हस्तगत करण्याकरितां आणि दुसरे जे अधिक संपत्तिमान् देश याचे मनांतून निश्चयेंकरून सांपडतील असे होते त्यांचा शोध करण्याकरितां पुरेसें आरमार त्वरित तयार करून द्यावें असा जेव्हां हुकूम झाला, तेव्हां तर यास फारच आनंद झाला, कारण ही गोष्ट निरंतर मोठमोठ्या विषयांकडेस प्रवण असें जें कोलम्बसाचें चपल मन त्यास तृप्ति देण्यासारिखी होती.

जीं वक्षिस व ज्या पदव्या दिल्या त्या.

दुसऱ्या जलपर्यटनाची तयारी करायास कोलम्बसास हुकूम मिळतो.

या पर्यटनाकरितां तयारी होत असतां, कोलम्बसाच्या सफल झालेल्या जलपर्यटनाची कीर्ति सर्व युरोपखंडभर पसरून संपूर्ण लोकांचें लक्ष उद्दीपित झालें. कोलम्बसानें एक नवीन खंड शोधून काढिलें आहे, असें जेव्हां त्या सर्व लोकांनीं ऐकिलें, तेव्हां ते लोक आश्चर्यभरित होऊन त्यांचे कल्पनेच्या बाहेरील जी ही गोष्ट तीविषयीं त्यांचा अगदीं विश्वासच पटेनासा झाला; परंतु हा जो कोलम्बसानें महान् शोध केला होता याचें स्वरूप समजण्याविषयीं, व त्यापासून जीं फलें प्राप्त होणार त्यांचा विचार करण्यावि-

याच्या कार्य सिद्धीची किर्त्ति ऐकून युरोपांतील सर्व लोकांचें लक्ष तिकडे लागतें.

षयीं, समर्थ असे जे विद्वज्जन त्यांस, या शोधाचें सुवर्त्तमान समजतांच परमाश्चर्य वाटून, मोठा आनंद झाला. ते विद्वान् लोक **कोलम्बसाचे** जलपर्यटनाविषयींच्या गोष्टी परमानंदानें बोलूं लागले, आणि जितक्या भूगोलावर वस्ती व्हावयाजोगी आहे तितक्या भूगोलाची रचना, व तेथील उत्पन्नें, हीं मनुष्यमात्रास पुरतेपणीं समजावीं इतकी मनुष्याची ज्ञानमर्यादा ह्या अलौकिक गोष्टीमुळें, ज्या कालामध्यें वाढली, आणि नवीन शोध व लक्ष्यपूर्वक अवलोकन करण्यास एक नवीन जागा झाली, अशा कालामध्यें ते असल्यामुळें जें त्यांस सुख झालें त्याविषयीं एकमेकाचें अभिनंदन करूं लागले. नवीन सांपडलेल्या देशांविषयीं आणि ते पृथ्वीच्या कोणत्या प्रदेशांत आहेत याविषयीं ते विद्वान् लोक नानाप्रकारच्या कल्पना आणि तर्क बांधूं लागले, परंतु **हिंदुस्थान** या सामान्य नावाखालीं **आशिआ** खंडांतील ज्या विस्तीर्ण देशांचा समावेश केला आहे त्यांतच या देशाची गणना करावी असें जें **कोलम्बसाचें** मुळचें मत तेंच हा धरून बसला; कारण यानें शोधून काढलेल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें यानें जें लक्ष्यपूर्वक अवलोकन केलें होतें तेणेंकरून त्या मतास दृढता आली होती. तो प्रकार असा. **हिंदुस्थानामध्यें** सुवर्ण पुष्कळ आहे असें ठाऊक होतें, आणि यानें जीं बेटें शोधून काढिलीं होतीं त्यांत त्या धातूचे इतके चांगले मासले आढळले होते कीं, त्यांवरून त्या धातूच्या मोठमोठ्या खाणी सांपडतील असें यास वाट-

आपण शोधून काढलेले प्रांत आशिआ खंडांत असावे असें जें कोलम्बसाचें मत तेंच त्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें लक्षपूर्वक अवलोकनावरून दृढ करितो.

लागलें होतें. **हिंदुस्थान** एथें दुसरा उत्पन्न होणारा पदार्थ कापूस तोही तेथें पुष्कळ होता. त्या बेटांतील कंकोळ **हिंदुस्थानां**तील मिऱ्यांचे जातीचा आहे, असें यानें कल्पिलें होतें. **हिंदुस्थानांत** रेवाचिनी ह्मणून जी औषधि उत्पन्न होते तिच्या सारिखी एक मुळी तेथें याचे दृष्टीस पडली, ती रेवाचिनीच होय असा यास भ्रम झाला होता. **हिंदुस्थानां**तील पांखरांस जसें शोभायमान पंख असतात त्याप्रमाणेंच यानें जीं आपले देशीं पांखरें आणिलीं होतीं त्यांस होते. या देशांतील मगर **हिंदुस्थानां**तील सुसरीसारखा दिसे. या सर्व गोष्टी तोलून पाहिल्यावर **स्पेन** देशीय लोकांनींच **कोलम्बसाची** कल्पना मान्य केली असें नाहीं, तर **युरोप** खंडांतील दुसरे लोकांनींही मान्य केली, आणि जे देश **कोलम्बसानें** शोधून काढिले होते ते **हिंदुस्थाना**चे भागांतील होत असें त्या सर्वांनीं कल्पिलें. याच कल्पनेवरून **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** या उभयतांनीं पूर्वी जो तहनामा केला होता तो **कोलम्बस** परत आल्यावर त्यास बाहाल करते समयीं यानें शोधून काढलेल्या देशांस **इन्दीज** असें नांव दिलें. ज्या चुकीमुळें अशी कल्पना केली ती चूक पुढें उघडकीस येऊन नवीन खंडाची वास्तव स्थिति निश्चित केल्यानंतरही तें नांव राहिलें आहे; परंतु **युरोपां**तील सर्व लोकांनीं त्या देशांस **वेस्त इन्दीज** आणि त्यांतील राहाणारांस **इन्दिअन्स** असें अभिधान दिलें.

सर्व युरोपभर या मताचाच स्वीकार करितात.

ज्या चुकी मुळें त्या देशास वेस्त इन्दीज हें नांव दिलें ती चूक जरीं लवकर उघडकीस आली तरीं तेंच नांव राहिलें

**कोलम्बसानें** जे देश शोधून काढिले होते त्यांची ज्या

नांवानें प्रख्याति केली तें नाव फार मनोहर होतें, व तेथील संपत्तीचे व पिकाउपणाचे यानें जे नमुने दाखविले ते चांगले गणनीय होते, आणि प्रवासी पुरुषांची अतिशयोक्तीनें सांगण्याची जी स्वभाविक प्रवृत्ति असत्ये तोप्रमाणेंच **कोलबसाच्या** लोकांनीं जीं वर्त्तमानें सांगितलीं तीं लोकांस फारच प्रिय वाटलीं, ह्मणून, **स्पेन** देशीय लोकांमध्यें पराक्रमाचीं कृत्यें करण्याची आश्चर्य करण्यासारिखी उमेद उत्पन्न झाली. त्या लोकांस गलबतांतून स्वाऱ्या करण्याची जरीं थोडकीच सवई होती तरीं ते जलपर्यटन करायास निघण्याकरितां उतावीळ झाले. प्रत्येक पदवीचे लोकांनीं आह्मांस चाकरीस ठेवावें ह्मणून स्वसंतोषानें विनंती केली. त्या लोकांचीं जी महापदप्राप्तीची आणि द्रव्यसंपादन करण्याची इच्छा तीस ज्या अशा मोठमोठ्या आशा दिसूं लागल्या त्यांस ते भुलल्यामुळें, जलपर्यटनास जो बहुत काळ लागणार व जीं अनेक संकटें प्राप्त होणार यांचें त्या लोकांस किमपि भय वाटलें नाहीं. **फेर्दिनान्द** जरीं सशंक व नवीन आणि पराक्रमाचे कृत्यास पराङ्मुख असा होता, तरीं त्याचे प्रजेस जी उमेद आली होती ती त्यानेंही धरली. त्या उमेदीच्या भरांत दुसऱ्या जलपर्यटनास आरमाराची तयारी, **स्पेन** देशामध्यें कोणत्याही कामास जी त्वरा कधीं झालीच नव्हती अशा त्वरेनें झाली, आणि ती इतकी मोठी झाली कीं सांप्रतच्या कालामध्यें ती चांगली गणनीय होती. त्या आरमाराम-

स्पेन देशीय लोकांमध्यें पराक्रमाचीं कृत्यें करण्याची आश्चर्य करण्या जोगी उमेद उत्पन्न होत्ये.

फेर्दिनान्द हाही अशीच उमेद धरितो.

दुसऱ्या जलपर्यटनाची अतिशय त्वरेनें मोठी तयारी होत्ये.

ध्यें १७ तारवें होतीं, आणि त्यांतून कितीएक सामानसुमा-नानें भरलीं होतीं; त्या आरमारांत १५०० मनुष्यें होतीं, आणि त्यांमध्यें मोठ्या योगतेच्या चाकऱ्या केलेले असे पुष्कळ कुलीन गृहस्थ होते. त्यांतून बहुतेकांची त्या देशांमध्यें जाऊन राहण्याचीच योजना केली होती ह्मणून तो देश हस्तगत करून तेथें वसाहत करण्याकरितां ज्या वस्तूंची अपेक्षा होती त्या सर्व त्यांनीं बरावर घेतल्या. तशींच **युरोप** खंडांतील सर्व प्रकारचीं घरगुतीं जनावरें, व हजार वात्यांनीं **वेस्त इंदीज** एथील हवेमध्यें जीं बीजें व ज्या वनस्पती उगवण्यासारिख्या होत्या त्या, आणि सर्व प्रकारचीं भांडीं व हत्यारें व तेथील लहानशा वसाहतीमध्यें जे कारागीर फार उपयोगी होते ते सर्व घेतले.

त्या तारवांचें आणि त्यांतील सामानसुमानाचें वर्णन.

परंतु हें आरमार जरीं मोठें भयंकर आणि पुष्कळ सामानसुमानासुद्धां तयार झालें होतें तरीं **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** यांनीं त्या नवीन शोधून काढलेल्या देशांचे स्वामित्वाच्या अधिकाराविषयीं त्या आरमाराच्या कृत्यांवरच भरवसा ठेविला नाहीं; तर यांचे मनांत जे प्रांत घ्यावयाचे होते त्यांची, **पोर्तुगीज** लोकांनीं जी चाल घालून ठेविली होती तीप्रमाणें, व त्या कालच्या असत्य धर्माप्रमाणें, **रोम** देशांतील मुख्य धर्माध्यक्षापासून सनद करून घेण्याचें त्या उभयतांस आवश्यक पडलें. त्या काळीं **पोपास जीजस ख्रिस्त** याच्या जागीं मानून, त्याचा सर्व अधिकार याचेकडे आहे असें समजून, पृथ्वीवर जितकीं राज्यें आहेत तितक्या सर्वांचा

नवीन खंडांत जाऊन राज्य करण्याचा जो हक्क रोम देशांतील मुख्य धर्माध्यक्षापाशीं मागितला तो यास मिळतो.

**पोपा**कडेस अधिकार आहे असें सर्व लोक कल्पीत असत. ते वेळीं **पोपाचे** पदवीवर साहावा **आलेक्सान्दर** होता त्याचे आंगीं मनुष्यत्वास बट्टा लावणारे असे सर्व दोष होते. हा ज्या वेळेस जन्मला त्या वेळेस **फेर्दिनान्दाचे** ताब्याखालीं होता, आणि आपले कुटुंबाच्या कल्याणार्थ महापदप्राप्तीच्या युक्ति सुलभ रीतीनें सिद्धीस न्यावयाकरितां **स्पेन** देशाचा आश्रय संपादित करण्याविषयीं हा उत्सुक होता, ह्मणून **स्पेन** देशच्या राजाचें समाधान करण्याविषयीं याची फार इच्छा असे. **फेर्दिनान्द** आणि **इसाबेला** यांनीं, खिस्ती धर्मावर विश्वास न ठेवणारे लोक ज्यांत राहत असत असे जे देश शोधून काढिले होते, व जे काढणार होते, त्या सर्वांचा पूर्ण अधिकार यानें मोठ्या औदार्यानें त्या उभयतांस दिला; अशा औदार्यामुळें याच्या पदरचें तर कांहीं खरचलें नाहीं, परंतु उलटा हा ज्या स्थानावर होता त्या स्थानाचा ह्मणजे **पोपाचे** पदवीचा अधिकार व स्वामित्ववाद हे मात्र पुरतेपणीं स्थापित झाले. **जीजस खैस्त** याचेपासून जी शक्ति यास प्राप्त झाली होती त्या शक्तीच्या माहात्म्यावरून यानें **कास्तील** एथील सरकारास जे विस्तीर्ण देश बाहाल केले, त्या देशांचे स्वामित्वाची पदवी यास प्राप्त होण्याची इतकी दूरवर होती कीं, यास ते देश कोठें आहेत हेंही माहीत नव्हतें आणि ते देश मुळीं आहेत किंवा नाहींत याची देखील भ्रांति होती. पूर्वी **पोर्त्तुगाल** देशाच्या सरकारास जी सनद करून दिली होती तीस या सनदेपासून कांहीं अडथळा न यावा ह्मणून, एके ध्रुवापासून दुसरे ध्रुवापर्यंत **आझोरेस** बेटांच्या पश्चिमेस १५०

त्या कालीं रोम देशांतील धर्माध्यक्ष कोणत्या प्रकारचा होता याचें वर्णन.

कोशांवर एक रेषा कल्पून ती यानें दोहोंमध्यें मर्यादे सारिखी करून ठेविली; आणि आपले अधिकाराच्या बलावर त्या कल्पितरेषेच्या पूर्वेकडचा प्रदेश **पोर्त्तूगीज** लोकांस आणि पश्चिमेचा **स्पेन** देशीय लोकांस दिला. **फर्दिनान्द** यानें ही सनद करून मागण्याचें, ख्रिस्ती धर्म वृद्धिंगत करण्याची अतिशय उत्कंठा हेंच कारण होय, असें जेव्हां दर्शविलें, तेव्हां **आलेक्सान्दर** यानेंही त्याच मुख्य उद्देशानें मी ती सनद करून दिली असें दाखविलें. या स्तुत्य उद्योगामध्यें आपलें चित्त फार आहे असें उघड करून दाखविण्याकरितां, त्या **पोपानें कातालोनिआ** एथील पाद्रे **बोइल** या नांवाचा जो मोठा कीर्त्तिमान् महंत त्याचे अधिकाराखालीं कांहीं धर्मोपदेष्टे देऊन, त्यानें आपले बदल त्या देशांमध्यें जाऊन तेथील लोकांस उपदेश करावा ह्मणून त्याची **कोलम्बसा**बरोबर पाठीवण्याची योजना केली. **कोलम्बसानें** आपले बरोबर जे **इन्दिअन** लोक आणिले होते त्यांस ख्रिस्ती धर्माचे ज्ञानाचा कांहीं अंश प्राप्त होतांच, त्यांनीं राजा व राजपुत्र आणि त्यांचे दरबारांतील मुख्य कारभारी यांस धर्मपितृस्थानीं मानून मोठ्या समारंभानें बाप्तिस्मा घेतला. अशीं जीं हीं नवीन जगांतलि फलें तीं, धार्मिक पुरुषांनीं जी वृद्धि इच्छिली होती, व ज्या वृद्धिची आशा धरायास त्यांस कारणही होतें, त्या वृद्धिनें पुढें चाललीं नाहींत.

फर्दिनान्द यानें पोपापासून सनद करून घेण्याविषयीं जो हेतु दर्शविला तो.

इंदिअन लोक बाप्तिस्मा घेतात.

याप्रमाणें **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** या उभयतांनीं पृथ्वीच्या इतक्या मोठ्या विस्तीर्ण प्रदेशावर नवीन नवीन

शोध चालवायास व तेथें आपलें राज्य स्थापायास जे अधिकार त्या कालीं पुरतेपणीं सबल असे मानीत त्यांचें संपादन केल्यावर, त्या आरमाराचे निघण्यास कोणत्याही गोष्टीचा प्रतिबंध राहिला नाहीं. **कोलम्बसानें** जे लोक त्या नवीन

*कोलम्बसाचें निघणें.*

देशांत ठेविले होते त्यांस पुनः भेटण्याकरितां, व ज्या कीर्तीचे पंथांत हा शिरला होता तो पंथ पुढें चालविण्याकरितां, हा फार उतावीळ झाला होता, ह्मणून यानें सप्तंबर महिन्याच्या २५ व्या तारिखेस **केडीजचे** अखातापासून तारवें हाकारलीं, आणि **गोमीरा** बेटांवर पुनः येऊन तेथून लागलेंच पहिल्या जलपर्यटनापेक्षां

*यानें जो मार्ग धरिला तो.*

अधिक दक्षिणेकडेस आपलें गलबत चालविलें. असा रोख धरल्यामुळें अयनवृत्तांमध्यें जे नियमित दिशेचे वारे असतात त्यांचें यास अधिक स्थैर्यानें सुख भोगायास सांपडल्यामुळें, यानें जीं बेटें शोधून काढिलीं होतीं त्यांच्या पलीकडे बरेंच पूर्वेस जो बेटांचा समूह होता तिकडेस हा येऊन पोंहोंचला. **गोमीरा** बेटांहून

*जमीन याचे दृष्टीस पडते.*

निघाल्यापासून २६ वे दिवशीं **कारिबी** अथवा **लीवर्ड** या बेटांतील एक बेट याचे दृष्टीस पडलें, आणि नवीन खंडांतील कांहीं भाग शोधून काढण्याविषयीं याचे बराबरचे खलाशी लोक फार उतावीळ झाले होते ह्मणून त्या बेटास **देसिआडा** असें नांव दिलें. नंतर **कोलम्बसानें** क्रमेंकरून **दोमीनिका**, **मारिगालान्ते**, **ग्वाडालूप**, **आन्तीगा**, **सान जूआन दि पुएर्त्तो रीको**,

*तेथील लोक कोणत्या प्रकारचे होते याविषयीं.*

आणि वायव्येकडेस जातांना जीं कित्तीएक इकडे तिकडे पसरलेलीं दुसरीं बेटें यास लागलीं तीं सर्व यानें पाहिलीं. या बेटांत

**ग्वाकानाहारीनें** ज्या हिंसक लोकांचें भयंकर वर्णन केलें होतें त्याच लोकांची जात राहात्ये असें यानें पाहिलें. ते समयीं **ग्वाकानाहारीचीं** वर्णनें अतिशयोक्तीचीं नव्हतीं असेंही यास दिसून आलें, कारण कीं तद्देशीय लोकांची युद्धविषयक आणि निर्भय अशी जी उमेद ती प्रगट झाल्यावांचून **स्पेन** देशीय लोकांस, जमीनीवर उतरण्यास कधीं सांपडलेंच नाहीं; ह्मणजे तद्देशीय लोकांबराबर कज्जा कफावत केल्यावांचून त्यांस उतरायास जागा मिळालीं नाहीं; आणि त्यांनीं लढाईंत जिंकिलेल्या शत्रूंच्या शरीराचें मोठ्या आनंदानें भक्षण करण्यासाठीं ज्या अघोर मेजवान्या केल्या होत्या त्यांत अवशिष्ट राहिलेले कांहीं भाग त्या लोकांचीं जीं राहाण्याचीं ठिकाणें असत, त्यांमध्यें, **स्पेन** देशीय लोकांच्या दृष्टीस पडले होते.

परंतु **कोलम्बसानें** जें ठाणें वसविलें होतें त्याची कशी काय अवस्था आहे हें जाणण्याकरितां व त्यांस सामानसुमानाचा जो तोटा पडला असेल तो पुरविण्याकरितां हा फार उत्कंठित झाला होता, ह्मणून यानें त्या बेटांतून एके बेटांतही न राहतां नीट **हिस्पान्योला** या बेटाची वाट धरली. जेव्हां हा **नाविदाद**, ह्मणजे ज्या ठिकाणीं **आराना** याचे ताब्यांत आपलीं ३८ मनुष्यें यानें ठेविलीं होतीं तें स्थळ, याचें जवळसा येऊन पोंहचला, तेव्हां त्या लोकांतील एकही दृष्टीस पडेना ह्मणून हा चकित होऊन गेला, आणि ते लोक आपले स्वदेशीय लोकांस भेटायाकरितां मोठ्या उल्हासानें धांवत येतील अशी क्षणोक्ष-

आपण वसविलेल्या ठाण्याची पुनः भेट घेण्याविषयीं याची उत्कंठा.

तिकडे आल्यावर याची निराशा.

काठावर आल्यानंतर सर्व प-

दार्थ अस्ताव्यस्त झालेले त्याचे दृष्टीस पडतात.

र्णी मार्गप्रतीक्षा करूं लागला. नंतर ते लोक खुशाल आहेत किंवा नाहींत याविषयीं चिंताक्रांत होऊन त्यांजवर कोणता प्रसंग येऊन गुजरला असेल याविषयीं मनांत विचार करीत लवकर समुद्रकांठावर उतरला. तेथील लोकांपासून याचे लोकांचें यास वर्त्तमान समजायाचें, परंतु तेही लोक पळून गेले होते; **कोलम्बसानें** जो किल्ला बांधिला होता तो अगदीं मोडून तोडून टाकिला होता, व त्या किल्ल्याचे सभोंवतीं फाडून चिंध्या केलेले पोषाख व छिन्नभिन्न झालेलीं शस्त्रें व भांडीं पसरलेलीं होतीं, या चिन्हांवरून त्या किल्ल्यांतील लोकांच्या अपघाताविषयीं संशय धरायास **कोलम्बसास** जागा उरली नाहीं. **स्पेन** देशीय लोक, आपल्या स्वदेशीय लोकांचें स्मरण करून देणाऱ्या या दुःखजनक पदार्थावर अश्रुपात करीत आहेत, इतक्यांत **ग्वाकानाहारीचा** भाऊ त्यांचे जवळ आला. तेव्हां त्यापासून **कोलम्बसानें** तें बेट सोडल्यावर पाठीमागें जें वर्त्तमान झालें त्याची सर्व हकीकत ऐकून घेतली. तो

आपल्या पाठीमागें जें झालें त्याची सर्व हकीकत ऐकून घेतो.

प्रकार असा; **स्पेन** देशीय लोकांबरोबर त्या **इन्दियन** लोकांचें फार दळणवळण पडल्यामुळें त्या भोळे लोकांचे मनांत प्रथमदर्शनीं **स्पेन** देशीय लोकांविषयीं जी देवबुद्धि उत्पन्न झाली होती ती उत्तरोत्तर कमी होत गेली. **स्पेन** देशीय लोकांच्या मूर्खपणामुळें व त्यांच्या वाईट वर्त्तणुकीमुळें तद्देशीय लोकांचे मनांत त्यांचेविषयीं जे कांहीं हितावह विचार ठसून गेले होते त्यांचा लवकरच नाश झाला, आणि मनुष्यांमध्यें ज्या इच्छा व जी अशक्तता व जे मनोविकार असतात ते

सर्व ह्यांच्यामध्यें आहेत असें त्यांस पक्केपणीं समजून आलें. **कोलम्बस** समक्ष असून अधिकार चालवीत असतां त्याचे लोकांस जो सबल प्रतिबंध होता तो नाहींसा होताक्षणींच, त्यानें आपले पाठीमागें जो मुख्य अधिकारी करून ठेविला होता त्यास ते किल्लेकरी लोक अगदीं मानिनातसे झाले. तो अधिकारी जे शाहणपणाचे उपदेश करी त्यांचा अनादर करून त्यांनीं स्वतंत्रपणें आपल्या इच्छा पाहिजे तशा तृप्त करून घेतल्या. एतद्देशीय लोकांचें सुवर्ण व यांच्या बायका आणि यांनीं बेगमी करून ठेविलेले सर्व पदार्थ हीं सर्व, त्या उन्मत्त झालेल्या जुलमी लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. ते किल्लेकरी लोक लहान लहान टोळ्या करून सर्व बेटभर फिरून जिकडेतिकडे नाश आणि दांडगाई करूं लागले. तद्देशीय लोक मित्रे आणि नम्र असे असत खरे, परंतु त्या निष्कारणिक उपद्रवांमुळें शेवटीं त्यांची सहनशीलता जाऊन त्यांचे आंगीं शौर्य उत्पन्न झालें. नंतर असें झालें कीं, **स्पेन** देशीय लोक मुख्यत्वेंकरून ज्या **सिबाओ** एथील अधिकाऱ्याचा देश त्यांतील सुवर्णाकरितां लुटीत असत, त्या अधिकाऱ्यानें ते आपली वर्त्तणूक निरूपद्रविक मानून अगदीं निर्भय फिरत असतां त्यांवर छापा घालून त्यांतून कित्येकांस ठार मारिलें. त्या समयीं त्या अधिकाऱ्यानें आपले रयतेस जमा करून त्या किल्ल्यास वेढा घालून त्यास अग्नि लाविला, तेव्हां **स्पेन** देशीय लोकांतून कितीएक लोक त्या किल्ल्याचें रक्षण करीत असतां व बाकीचे समुद्राचे

स्पेनदेशीय लोकांची नाशकारक आणि दुर्व्यसनी चाल.

त्यांपैकीं कित्येकांवर छापाघालून त्यांस कसें मारून टाकिलें.

बाकीच्यांची दुर्दशा कशी झाली.

एके फांस्यांतून पार पडून पळून जाण्याचा यत्न करीत असतां मारले गेले. त्यांनीं असे जरी जुलूम चालविले होते तरी **ग्वाकानाहारीचा स्पेन** देशीय लोकांवरचा स्नेहभाव कमी झाला नव्हता ह्मणून, तो त्यांचे संरक्षणाविषयीं प्रयत्न करीत असतां, त्यांस जो वार लागला तेणेंकरून तो अद्यापि दुखणाईत होता.

ग्वाकानाहारीची वर्त्तणूक कशी होती, याविषयीं.

**ग्वाकानाहारीच्या** प्रामाणिकपणाविषयीं **स्पेन** देशीय लोकांचे मनांत जो संशय आला होता त्याची या वर्त्तमानावरून निवृत्ति होण्याचें जरीं दूर होतें, तरीं **ग्वाकानाहारीच्या** प्रामाणिकपणाचा बारीक रीतीनें शोध करण्याचा हा योग्य काल नव्हे असें **कोलम्बसास** स्पष्ट दिसून आलें, तेणेंकरून याचे लोकांनीं त्या राजास धरून व त्याचे प्रजेवर हल्ले करून स्वदेशीय लोकांस मारल्याचा सूड उगवावा असा जो यास बुद्धिवाद सांगितला होता त्याचा यानें धिक्कार केला. **कोलम्बसानें** त्यांस असें सांगितलें कीं, तुमचें मनांत जें ठाणें घालायाचें आहे त्याची वसाहत सुलभ रीतीनें होण्याकरितां या देशांतील जे वजनदार गृहस्थ आहेत त्यांची मैत्री अवश्य संपादिली पाहिजे, आणि जर तुह्मी अयोग्य कालीं व्यर्थ करडा अंमल चालवाल तर ऐतद्देशीय लोक आपणावर तुटून पडायास एकत्र होतील असें भय मात्र प्राप्त होईल. **कोलम्बस** मागील उपद्रवाकरितां शिक्षा करण्यांत आपला काळ न घालवितां पुढें तशा गोष्टी न घडाव्या

त्या राजास धरण्याविषयीं याचे लोकांनीं जी यास मसलत दिली तिचा निषेध करण्याविषयीं याचीं कारणें.

पुढें उपद्रव न होण्याविषयीं हा सावधगिरी ठेविती.

याकरितां सावधगिरी ठेवूं लागला. याच हेतूनें **कोलम्बसानें नाविदाद** बेटापेक्षां शरीर प्रकृतीस अधिक चांगलें मानायाजोगें असून सोईस पडे असें स्थल निवडून काढिलें. नंतर एके विस्तीर्ण अखाताजवळ मोठ्या मैदानामध्यें एक नगर वसविण्याकरितां यानें स्थळाची योजना केली, आणि ज्या इमारतीपासून सर्वांचें रक्षण होणार त्या इमारतीचे कामास सगळ्यांनीं हातभार लावावा असें केलें. यामुळें त्यांतील घरें व तट इतके लवकर तयार झाले कीं, त्यांहींकरून त्यांचें संरक्षण होण्यासारिखा त्यांस आश्रय मिळाला. नवीन खंडामध्यें **यूरोपिअन** लोकांनीं पहिल्यानेंच शहर बांधिलें ह्मणून यास **कोलम्बसानें** आपणास आश्रय देणारी जी **कास्तील** एथील **इसाबेला** राणी तिचे सन्मानार्थ **इसाबेला** असें नांव दिलें.

इसाबेला या नांवाचें शहर बांधून त्याचे सभोंवार तटबंदी करितो.

हें उपयुक्त काम चालवीत असतां, **कोलम्बसास** पडित देशामध्यें लहान लहान ठाणीं वसवितेवेळेस जीं संकटें प्राप्त होतात तीं भोगावीं लागून श्रम सोसावे लागले, इतकेंच नाहीं, तर यापेक्षां दुस्तर असा जो याचे लोकांचा आळसीपणा, उतावीळी, आणि दंगेखोर स्वभाव यांवरावरही यास झुंजावें लागलें. उष्ण हवेच्या आंगीं मनुष्यास निःशक्त करण्याची जी शक्ति असत्ये तीणेंकरूनच या नवीन खंडांत **स्पेन** देशीय लोकांचा स्वाभाविक सुस्तपणा वाढत गेला असें दिसतें. त्या मंडळीमध्यें जे बहुतेक संभावित गृहस्थ होते त्यांस आंगें मेहनत करून कष्ट भोगण्याची सवई नव्हती; परंतु पहिलें जलपर्यटन करून जे त्यांचे देशचे

जीं नानाप्रकारचीं संकटें यास भोगावीं लागलीं तीं.

लोक माघारे गेले होते त्यांच्या सुंदर आणि अतिशयोक्तीच्या वर्णनांवरून, अथवा **कोलम्बसानें** जो देश शोधून काढिला तो **मार्को पोलोनें** शोधून काढलेला **सिपांगो** देश होय, किंवा ज्या **ओफिर** देशामधून **सोलमन** राजानें मोठमोठ्या किमतीचे जिन्नस आणिल्यामुळें त्याच्या राज्यांत त्वरित आणि पुष्कळ संपत्ति वृद्धिंगत झाली तो होय, अशी जी **कोलम्बसाची** गैरसमजूत तेणेंकरून त्या कुलीन लोकांचे अंतःकरणांत या महात्कृत्यांत शिरण्याविषयीं अतिशय इच्छा उत्पन्न झाली होती. परंतु श्रम केल्यावांचून व दुःख सोसल्यावांचून आयताच आपणास सुवर्णाचा हंगाम प्राप्त होईल असें जें त्या लोकांनीं इच्छिलें होतें तसें न होतां, संपत्तीचा लाग निश्चयेंकरून लवकर प्राप्त होण्याचा दिसत नाहीं, आणि ती हळूहळू सतत श्रम केल्यावांचूनही मिळणार नाहीं, असें जेव्हां **स्पेन** देशीय लोकांनीं पाहिलें, तेव्हां त्यांचे मनांतील ज्या मोठ्या आशेच्या कल्पना होत्या त्यांचा भंग झाला, आणि त्यांचीं मनें खिन्न होऊन इतकीं निराश झालीं कीं तेणेंकरून सर्वांची चित्तवृत्ति उद्विग्न होऊन गेली.

त्याच्या लोकांस निराशा व खिन्नता प्राप्त होण्याचें कारण.

अशा प्रसंगीं त्या बेटांतील पिकाऊ जमीन दाखवून व तेथील वेगळ्या वेगळ्या प्रदेशापासून जे नेहेमी सोन्याचे मासले येत ते दाखवून त्या लोकांस पुनः उमेद आणावी ह्मणून जो **कोलम्बसानें** प्रयत्न केला तो व्यर्थ गेला; कारण कीं त्या पिकाऊ जमीनीपासून हळूहळू जी प्राप्ति होणार तिची वाट पाहण्याविषयीं त्यांस दम नव्हता, व ज्या सोन्याचे नमुने येत तें सोनें फार थोडें आणि दुर्मिळ होय ह्मणून त्याचा-

एक कट करितात.

ही त्यांनीं तिरस्कार केला. नंतर असें झालें कीं, त्या लोकांचे मनांत दौर्मनस्य अधिकाधिकच वाढत गेल्यामुळें त्यांनीं एक कट केला; तो जर न कळता तर त्या कटापासून कोलम्बस व कोलम्बसाचे ठाणेकरी लोक यांचा नाशच झाला असता, परंतु दैववशात् त्याचा यास शोध लागला, आणि त्यांत जे प्रमुख होते त्यांस धरून कांहींकांस शिक्षा केली, व बाकीच्यांस बंदिवान करून स्पेन देशास पाठविलें; आणि मनुष्यांची कुमक व सामानसुमानाची चांगली पुष्कळ पुरवणी करण्याकरितां तेथील सरकारास विनंतीपत्र लिहून, माल नेण्याआणण्याचीं जीं तारवें होतीं त्यांतून १२ तारवें लवकर स्पेन देशास पाठवून दिलीं.

यांतील मुख्यांस धरून शिक्षा करितो.

ते समयींच, आपले लोकांस निराशा प्राप्त झाली होती ती पुनः पुनः मनांत आणून तिचा विचार करण्यास त्यांस फुरसत सांपडली, तेणेंकरून त्यांचे आंगीं जो आळसीपणा असे तो वाढून दौर्मनस्य जाजती वाढलें असें कोलम्बसानें पाहून, तो आळस त्यांचे आंगांतून समूळ काढून टाकावा ह्मणून त्या देशांतील प्रदेशांवर यानें किंतीएक स्वाऱ्या करण्याचें योजिलें. कोलम्बसानें शाहाणा आणि महापराक्रमी असा जो अलोंजोदि ओजीडा या गृहस्थास मुख्य करून एक सैन्याची टोळी, ज्या सिबाओ प्रांतांत पुष्कळ सुवर्ण सांपडतें असें ह्मणत तो प्रांत घेण्याकरितां पुढें रवाना करून, आपण आपले मुख्य मुख्य सरदारांसहवर्त्तमान जातीनें तिचे पाठीमागून गेला. या स्वारीमध्यें कोलम्बसानें तद्देशीय लोकांस

बाकीच्यांचीं मनें दुसऱ्या उद्योगाकडे लावण्याकरितां उपाय योजितो.

सिबाओ प्रांताकडे जातो.

अगदीं चकभूल करून टाकावें ह्मणून, आपले युद्धकर्माचा जितका मोठेपणा होता तितका सर्व यानें मोठ्या डौलानें दर्शित केला. हा निशाणें फटकारीत व वीररसप्रधान गायनें गात आणि घोडेस्वारांची केव्हां केव्हां पुढें आणि केव्हां केव्हां पाठीमागें फेर करीतच चालला.

तेथील लोक याचे घोडे स्वार पाहून चकित होतात.

त्या नवीन खंडांत प्रथमतः घोडे काय ते हेच दृष्टीस पडले, तेणेंकरून, त्या **इन्दिअन** लोकांस भय वाटून मोठें आश्चर्यही झालें. त्यांचे जवळ पाळलेलीं जनावरें नसत ह्मणून तीं जनावरें आपले ताब्यांत ठेवण्यानें जी मनुष्याचे आंगीं मोठी शक्ति येते ती त्या लोकांस माहीत नव्हती.

घोडे आणि त्यावरील राऊत याविषयीं त्यांच्या कल्पना.

त्या लोकांनीं ते घोडे ज्ञानसंपन्न प्राणी आहेत असें कल्पिलें, व याप्रमाणेंच घोडा आणि त्यावरील राऊत हे उभयतां मिळून एकच जनावर आहे, आणि त्या जनावराचें चांचल्य पाहून परम आश्चर्यभारित होऊन त्या जनावराचा वेग व शक्ति हींही अनिवार्य आहेत असें त्यांनीं मानिलें. परंतु तद्देशीय लोकांचे मनांत **कोलम्बस** आपले शक्तीचे प्राबल्याविषयींची भीति उत्पन्न करायास यत्न करीत असतां, त्या लोकांची प्रीति आणि विश्वास या दोन गोष्टी संपादित करण्याविषयीं युक्ति योजायासही यानें हयगय केली नाहीं. **कोलम्बस** त्या लोकांबरोबर जो जो व्यापार करी त्यामध्यें मुख्यत्वेंकरून प्रामाणिकपणा व न्याय या दोन गोष्टींचें मूळ धरून चाले, आणि त्या लोकांबरोबर हा प्रसंगीं मोठ्या नम्रतेनें आणि प्रीतीनें वागे.

तद्देशीय लोकांबरोबर कोलम्बसाची वागणूक.

तद्देशीय लोकांनीं **सिबाओ** या प्रांताचें जसें वर्णन

केलें होतें तसेंच तेथें गेल्यावर अनुभवास आलें. तो देश डोंगरी आणि गैरलागवडीचा होता, परंतु प्रत्येक नदीमध्यें आणि ओढ्यामध्यें सुवर्णाचा चूर अथवा बारीक रज सांपडत आणि त्या रजांपैकीं कांहींकांची आकृति बरीच मोठी असे. इन्दिअन लोक सुवर्णाच्या शोधार्थ कधीं खाणी उकरीत नसत. पृथ्वीच्या गर्भांतील प्रदेशांत शिरणें व मिश्र धातूंचें शोधन करणें हीं कृत्यें त्यांचे बुद्धीस आणि उद्योगास फारच दुर्बोध आणि श्रमदायक होतीं, व त्या सुवर्णाचें संपादन करण्याकरितां आपली कल्पनाशक्ति चालवून नवीन युक्ति काढण्याजोगें त्यांस तें अमोलिकही वाटत नव्हतें. त्या लोकांजवळ जो थोडासा सुवर्णाचा संचय असे तो त्यांनीं नद्यांचे वाळवंटामधून वेंचलेला अथवा मोठा पर्जन्य पडून पर्वतापासून वाहून आलेल्या उदकांतून काढून घेतलेला असा होता. परंतु या चिन्हांवरून स्पेन देशीय लोकांस ज्या देशाचें स्वामित्व आपले हातांत लवकरच येईल असें वाटत होतें त्याचे गर्भीं मोठमोठीं भांडारें भरलेलीं आहेत याविषयीं शंका राहिली नाहीं. अशा मोठ्या उत्पन्नाचा देश हस्तगत करावा ह्मणून तेथें कोलम्बसानें एक किल्ला बांधिला; आणि याचे बराबर ज्या लोकांस कोणतीही गोष्ट खरी वाटत नसे व आपले दृष्टीनें पाहिल्यावांचून अथवा हातानें स्पर्श केल्यावांचून त्या देशामध्यें सुवर्ण उत्पन्न होतें ही गोष्ट ज्यांस प्रमाण वाटत नसे, त्यांचा उपहास व्हावा ह्मणून कोलम्बसानें त्या किल्ल्याचें सन्त थोमस असें नांव ठेविलें.

तद्देशीय लोक सोनें कसें साचवित याविषयीं.

तेथील वसाहतींत संकट प्राप्त होण्यास नानाप्रकारचीं कारणें.

**सिवाओ** देशांतील संपत्तीचीं सफल होण्याजोगीं जीं दर्शनें त्यांचें वर्णन, जे **कोलम्बसाचे** लोक नानाप्रकारच्या संकटेंकरून व्याप्त होऊन अगदीं निराश होऊन गेले होते त्यांच्या चित्ताचें समाधान करण्याकरितां, वेळेसच येऊन पोहोंचलें. **यूरोप** खंडाहून जी धान्यसामग्री आणिली होती ती तर बहुतकरून खपलीच होती, परंतु त्यांतून जी कांहीं शिलक राहिली होती ती उष्ण आणि दमसर अशा हवेमुळें इतकी नासून गेली होती कीं तिचा कांहींच उपयोग नाहींसा झाला होता. तद्देशीय लोकांनीं आपल्या अल्पस्वल्प कौशल्यानें ज्या जमीनीचे प्रदेशांत लागवड केली होती तो प्रदेश इतका संकुचित होता

धान्याचा तोटा.

कीं त्यांत त्यांचे उपजीविकेपुरतें धान्य होण्याचेंही कठीण होतें. **इसाबेला** शहरामध्यें **स्पेन** देशीय लोकांस श्रम करून तेथील जमीन साफ करून तीपासून पुष्कळ फलप्राप्ति करून घेण्यास हा कालपर्यंत फुरसत सांपडली नाहीं. या सर्व गोष्टींवरून क्षुधेमुळें आपण मरून जाऊं असें **स्पेन** देशीय लोकांस भय पडलें, व त्यांची पोटगीही नुकतीच कमी केली होती, आणि त्या समयींच उष्णकटिबंधामध्यें ज्या रोगांचें प्राबल्य

उष्ण कटिबंधांत ज्या रोगांचें प्राबल्य असतें ते रोग पसरूं लागतात.

असतें व जे मुख्यत्वेंकरून पडीचे देशांत म्हणजे ज्या ठिकाणीं उद्योगी लोक उद्योग करून झाडी तोडून जागा मोकळी करीत नाहींत, व पाणथळ जाग्यापासून पाटांनीं पाणी काढून टाकीत नाहींत, आणि नदींचें

पात्र नियमित करीत नाहींत, त्यांत उत्पन्न होतात, ते रोग **कोलम्बसाच्या** लोकांत उत्पन्न होऊं लागले. तेव्हां त्या रोगांचें प्राबल्य व अपूर्व चिन्हें पाहून ते लोक भयभीत होऊन **कोलम्बसाची** व याचे बराबर पूर्वीच्या जलपर्यटनांतील जे लोक होते त्यांची निंदा करूं लागले; कारण कीं त्या लोकांनीं **हिस्पान्योला** या बेटाचें कपटानें शोभवून वर्णन करून या अशा रानटी आणि ओसाड देशांत येऊन दुष्काळामुळें अथवा या अशा अज्ञात रोगामुळें मरून जाण्यासाठीं त्यांस भूल घालून त्यांनीं **स्पेन** देश सोडावा असें केलें असें त्यांस वाटत होतें. अशा समयीं कामगार लोकांतून व संभावित लोकांतून कितीएकांनीं अशा वितंडवादी फिर्यादींस प्रतिबंध न करितां उलटे ते त्यांत सामील झाले, पाद्रे **बोइल** या नांवाचा मुख्य पाद्रे हा जे अतिशय बंडखोर व शीघ्रकोपी लोक होते त्यांतलाच होता. अशा लोकांमध्यें नम्रता आणि शांति या दोहोंची पुनः स्थापना करण्याकारतां **कोलम्बसास** आपला सर्व अधिकार आणि युक्ति खर्चावी लागली. असें करण्याकरितां कधीं कधीं **कोलम्बस** त्या लोकांस भीति घालीत असे, आणि कधीं कधीं मी तुह्मांस बक्षीस देईन अशीं वचनें देत असे. परंतु त्या त्रिथरलेल्या लोकांचें, **सिबाओ** देशांत द्रव्याच्या भांडारानें परिपूर्ण भरलेल्या खाणी सांपडतील अशा आशेमुळें जसें समाधान झालें तसें कोणत्याही गोष्टींनीं झालें नाहीं, कारण तेथें इतकें द्रव्य सांपडण्याची आशा होती कीं तेणेंकरून त्यांस जितकीं दुःखें भोगावीं लागलीं होतीं त्या सर्वांचा

असमाधान आणि अप्रीति हीं उत्पन्न होतात.

सुवर्ण सांपडण्याच्या आशेमुळें त्यांचें शांतवन होतें.

परिहार होऊन पूर्वीच्या सर्व निराशांचें विस्मरण होण्या-सारिखें होतें.

**कोलम्बसाच्या** दीर्घ प्रयत्नामुळें एकमत आणि व्यवस्था या दोन गोष्टी पुनः इतक्या पूर्वस्थितीवर आल्या कीं तेणेंकरून तें बेट सोडून जाण्याची याचे आंगांत हिंमत आली; त्या समयीं ज्या देशांबराबर आपण दळणवळण पाडलें आहे ते देश भूगोलावरील ज्ञातप्रदेशांतील आहेत किंवा आजपर्यंत जो प्रदेश अगदीं पाहण्यांतच आला नाहीं त्यांतील आहेत, हें ज्ञान करून घेण्याकरितां **कोलम्बसानें** नवीन नवीन शोध करण्याचा क्रम पुढें चालविण्याचा निश्चय केला. नंतर यानें, आपल्यामागें आपला भाऊ **दोन दीएगो** यानें कामगार मंडळीच्या मसलतीनें त्या बेटांतील हकिमाचें काम चालवावें असें केलें, आणि त्या बेटाचे दुसरे भागांत जाऊन ज्या सैन्यानिशीं तेथें **स्पेन** देशीय लोकांचा अधिकार स्थापायाचा होता त्या सैन्याचें स्वामित्व **दोन पेद्रो मार्गारिता** यास सांगितलें. त्यांनीं कोणत्या रीतीनें चालावें याचा सर्व नियम बांधून देऊन **कोलम्बसानें** एप्रिल महिन्याच्या २४ वे तारिखेस एक गलबत व दोन होड्या आपले ताब्यांत घेऊन नांगर ओढून घेतला. हा पुरे पांच महिनेपर्यंत हें त्रासदायक जलपर्यटन करीत असतां, असा रोजगार करणारे पुरुषांस जीं अनेक संकटें भोगावीं लागतात त्यांपैकीं बहुतेक संकटांचा यास अनुभव घ्यावा लागला; इतकें झालें तरीं **जमेका** बेटाशिवाय दुसऱ्या बेटांचा शोध ला-

आपलेपाठीमागें त्या बेटांतील कारभार चालविण्याची व्यवस्था करून ठेवितो.

एक तारूं व दोन होड्या आपले ताब्यांत घेऊन एप्रिल महिन्याच्या २४ वे तारखेस हा कूच करितो.

गला नाहीं. **कोलम्बस कूबा** बेटांच्या दक्षिण कांठानें जात असतां हजारों लहान लहान बेटें मिळून जी एक घोंटाळ्याची जागा झाली आहे तींत हा गुंतून पडला, ह्मणून त्या बेटांस यानें राणीची बाग असें नांव दिलें. या अशा अज्ञात गर्तीत **कोलम्बस** खडकामध्यें सांपडला असतां, तेथें मोठें भयंकर तुफान होऊन तोंडचा वारा लागून याचे गमनास प्रतिबंध झाला, आणि अयनवृत्तांमध्यें बहुधा ज्या भयंकर मेघगर्जना होतात, व भयंकर विजा एकसारख्या लवतात, त्या सर्व गोष्टी या ठिकाणीं जेव्हां होऊं लागल्या तेव्हां **कोम्बलस** अगदींच भयभीत होऊन गेला. शेवटीं असें झालें कीं, **कोलम्बसाची** धान्यसामग्री संपली, याचे खलाशी लोक श्रमामुळें व क्षुधेमुळें अगदीं जिकीरीस येऊन कुरकूर करूं लागले, आणि **कोलम्बसास** भयप्रदर्शन करून त्याजवर तुटून पडायास ते सर्व सिद्ध होऊन बसले. अशा अनेक प्रकारच्या संकटांमध्यें **कोलम्बस** सांपडला ह्मणून यास एकासारिखें लक्ष राखणें, हरएक गोष्ट घडली असतां ती आपल्या नेत्रांनीं पाहणें, हुकूम करणें, आणि तो हुकूम बजाविला किंवा नाहीं याची वास्तपुस्त राखणें या सर्व गोष्टी जातीनें कराव्या लागल्या. **कोलम्बसास** नौकाशास्त्रामध्यें जी कुशलता व माहिती होती त्यांचा या प्रसंगीं जितका उपयोग करावा लागला तितका कोणत्याही प्रसंगीं करावा लागला नाहीं. अशा प्रकारचा यत्न **कोलम्बसानें** केला ह्मणूनच याचे तारवांचा बचाव झाला. **कोलम्बस** जरीं शरीरानें मूळ-

अशा नानाप्रकारच्या संकटांत सांपडल्यामुळें यांस जिवापरता श्रम होतो.

याची धान्य सामग्री खपून याचे लोक याजवर तुटून पडायास सिद्ध होतात.

चाच सुदृढ आणि पुष्ट असा होता, तरीं यास जो हा जि-वापरता शारीर आणि मानस श्रम झाला तेणेंकरून ज्वराची

यामुळें जिवावर-चें दुखणें येतें.

कसर येऊन यास जी झांपड पडली तीमुळें बुद्धि आणि स्मृति हीं दोनही नाहींशीं होऊन शेवटीं प्राणावर येऊन बेतली.

परंतु सप्तेंबर महिन्याच्या २७ व्या तारिखेस **हिस्पान्योला** एथें पुनः आल्यावर **इसाबेल्ला** एथें **कोलम्बसाचा** भाऊ **बार्थोलोमेओ** जेव्हां यास

हिस्पान्योला एथें आल्यावर हा आपला भाऊ बार्थोलोमेओ यास भेटतो.

येऊन भेटला तेव्हां जो यास एकाएकीं परम आनंद झाला त्यामुळें याच्या चित्तवृत्तीची इतकी प्रसन्नता होऊन गेली कीं तीपासून यास उतारच पडला. ज्यांची बुद्धि समसमान ह्मणून ज्यांचें अतिशयित सख्य पडलें होतें असे जे हे दोघे बंधु यांचा तेरा वर्षेंपर्यंत वियोग झाला होता, आणि अशा दीर्घकालामध्यें उभयतांचा पत्रद्वारांही संबंध घडला नव्हता. **बार्थोलोमेओ** हा **इंग्लान्दाचे** दरबारांत आपला करारनामा ठरावून **फ्रान्स** देशाच्या वाटेनें **स्पेन** देशीं येत होता. तो जेव्हां **पारीस** शहरास येऊन पोहोंचला तेव्हां त्यानें, **कोलम्बसानें** पहिल्या जलपर्यटनांत जे लोकोत्तर शोध केले होते त्यांचें व हा दुसऱ्या जलपर्यटनाकरितां तयारी करीत आहे याचें वर्त्तमान ऐकिलें. या वर्त्तमानावरून अतिशय त्वरेनें आपलें गमन व्हावें अशी त्याची स्वभावतः प्रवृत्ति झाली होती; परंतु तो **स्पेन** देशास पोहोंचण्याच्या पूर्वींच **कोलम्बसानें हिस्पान्योला** एथें जाण्याकरितां गलबत हाकारिलें होतें. ज्या पुरुषानें आपली योग्यता व कामगिरी यांच्या योगानें आपणास प्रसिद्धीस आणिलें

त्या पुरुषाच्या फार जवळचे आप्तांस योग्य असा सन्मान देऊन **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** या उभयतांनीं **बार्थोलोमेओची** भेट घेतली, आणि याच्या भेटीपासून **कोलम्बसास** जो उल्हास होईल तो लक्ष्यांत आणून त्या उभयतांनीं **इसाबेल्ला** एथील ठाणेगारांस सामानसुमान पाठविण्याकरितां जीं तीन तारवें सिद्ध केलीं होतीं त्यांचा अधिकार घेण्याविषयीं **बार्थोलोमेओ** यास फार आग्रह केला.

ठाणेगार लोकांकरितां सामानसुमान भरून तीन तारवें याचे बरोबर देऊन राजा आणि राणी यास कोलम्बसाकडे पाठवितात.

**कोलम्बसास** मसलत सांगून साहाय्य करावयास अथवा राज्याचें ओझें व त्याजविषयींची काळजी या दोहोंचा वांटा घ्यावयास समर्थ अशा मित्राची जेव्हां त्यास फार अपेक्षा होती तेव्हांच हा येऊन पोहोंचला. **युरोप** खंडांतून यानें सांप्रत जी सामग्री आणिली होती ती **स्पेन** देशीय लोकांस दुष्काळाच्या संकटापासून अल्पकालपर्यंत मुक्त करण्यासच उपयुक्त होती, आणि हा कालपर्यंत त्या बेटापासून त्यांच्या उपजीविके पुरतें धान्यही उत्पन्न झालें नव्हतें. पुनः दुष्काळ पडण्याच्या संकटापेक्षां अधिक भयकारक जें संकट त्याचा धाक त्यांस येऊन पडला, ह्मणोन त्याजकडेसच त्वरित लक्ष्य देणें प्राप्त झालें. तो प्रकार असा कीं, **कोलम्बस**, नवीन शोधार्थ जलपर्यटन करण्याकरितां त्या बेटांतून निघतांच **मार्गारीता** याचे ताब्याखालीं जे लोक ठेविले होते ते, शिक्षा आणि ताबेदारी यांपासून आपण जसे कांहीं मुक्तच झालों

हीं सामग्री तात्कालिक आपत्ति दूर करायास उपयोगीं पडल्ये.

कोलम्बसानें त्या ठाण्यांत जे लोक ठेविले होते त्यांच्या गैरवर्त्तणुकीमुळें यास दुसरें एक संकट प्राप्त होतें.

असें मानून त्यांस जे जे प्रतिबंध होते त्या सर्वांचाही अनादर करूं लागले. **कोलम्बसानें** त्यांस जो शाहाणपणाचा उपदेश केला होता त्याप्रमाणें चालायाचें सोडून त्या बेटांत ते फुटकळ टोळ्या करून चोहींकडेस फिरूं लागले. त्या लोकांपासून चाहील तो पदार्थ जबरीनें घेऊन आपला निर्वाह करूं लागले, तद्देशीय लोकांच्या संग्रहीं जें धान्य होतें त्याची यांहीं अगदीं नासाडी करून टाकिली, त्यांच्या बायकांवर जबरी केली, आणि त्या लोकांच्या सात्विक जातीस शिपाईपणाच्या नात्यानें फार जुलूम करून त्यांहीं परम त्रास दिला.

हीं दुःखें एतद्देशीय लोकांस जशीं असह्य होतीं तशींच आतां शाश्वत राहतील असें दिसून येतें.

जोंपर्यंत **इन्दिअन** लोकांस, **स्पेन** देशीय लोक स्वेच्छेनें निघून जाऊन आपले दुःखांचा शेवट होईल, अशी आशा होती, तोंपर्यंत ते मुकाट्यानें त्यांस नमून राहिले, आणि आपलीं दुःखें छपावून टाकिलीं. परंतु सांप्रत त्यांस तें पारतंत्र्य जसें असह्य होतें तसेंच तें शाश्वत होऊन राहील असें दिसून आलें; **स्पेन** देशीय लोकांनीं एक नगर वसवून त्याचे सभोंवार तट बांधिले होते, आणि जागोजागीं किल्लेही बांधिले होते. त्यांनीं कितीएक शेतांस कुंपणें घालून त्यांत धान्य पेरिलें होतें यावरून, **स्पेन** देशीय लोक जे एथें आले आहेत ते हा देश पाहण्याकरितां आले आहेत असें नाहीं तर राहण्याच्याच उद्देशानें आले आहेत, असें उघड दिसून आलें. जरीं **स्पेन**देशीय लोकांचा समुदाय फार मोठा नव्हता तरीं या अनार्डी लोकांमध्यें कृषिकर्म इतकें अपूर्णावस्थेमध्यें होतें आणि त्याचेच निर्वाहास इतकें परिमित होतें कीं त्यांस त्या

पाहुण्यांची ह्मणजे **स्पेन** देशीय लोकांची उपजीविका करण्याची रीति फार आळशी आणि मंद, तेथील हवेची उष्णता फार शक्तिक्षीण करणारी, व त्यांची शरीरप्रकृति स्वभावतः फार अशक्त असे; आणि उद्योगाच्या श्रमदायक प्रयत्नास ते फार अनभ्यस्त होते ह्मणून जें त्यांस अगदीं थोडें धान्य मिळे तेणेंकरूनच ते समाधान पावत. शारीर अथवा मानस या दोहोंतून एकेहीं श्रमानें ज्या लोकांचें सामर्थ्य व मनाची हुशारी हीं नष्ट होत नसत त्यांचे उपजीवनास मूठभर मका अथवा कासडा नामक वनस्पतीच्या मुळांची निःसत्व भाकरी पुरेशी होई. **युरोप** खंडांतील सर्व लोकांमध्यें **स्पेन** देशीय लोक जरीं फार मिताहारी होते तरीं ते तद्देशीय लोकांस फार खादाड दिसले; कारण कीं जेवढ्या अन्नानें दहा पांच **इन्दिअन** लोकांचें पोषण होणार तितकें **स्पेन** देशांतील एकटाच मनुष्य खपवी. अशी अतिरिक्त क्षुधा पाहून त्या **इन्दिअन** लोकांस इतकें आश्चर्य वाटलें, आणि त्यांस ती क्षुधा इतकी अनिवार दिसली कीं तिणेंकरून **स्पेन** देशीय लोकांची अन्नाविषयीं जी अपरिमित इच्छा, ती तृप्त होण्याजोगें त्यांचे देशीं धान्य उत्पन्न होत नाहीं ह्मणून उपजीविकेच्या शोधार्थ ते आमच्या देशीं आले आहेत, असें त्यांनीं कल्पिलें. ज्या नवीन पाहुण्यांनीं त्या **इन्दिअन** लोकांचे धान्यसामग्रीच्या अल्पस्वल्प संचयाची इतके लवकर नासाडी करून टाकिली, त्या पाहुण्यांनीं आमचे देशांतून निघून जावें अशी इच्छा करायास, आपापलें संरक्षण

यांच्या उपजीवनार्थ साधें आणि थोडें अन्न लागे.

याकरितां स्पेन देशीय लोकांची अतिशयित क्षुधा पाहून यांस भय वाटून आश्चर्यही होतें.

आपल्यावर जुलूम करणाऱ्या लोकांपासून आपण मुक्त व्हावें अशी जी इ-

च्छा ती त्यांनीं दुःख दिल्यामुळें अधिकच वाढ-ल्ये.

व्हावें अशी जी बुद्धि तीच प्रयोजक झाली, आणि त्यांनीं त्या **स्पेन**देशीय लोकांपासून फार दुःखें भोगिलीं होतीं ह्मणून ह्या गोष्टीविषयीं ते फार उतावीळ होऊन बसले. **स्पेन**देशीय लोक आपोआप परत निघून जातील अशी त्यांनीं बहुत दिवस आशा धरिली होती, परंतु सांप्रत त्यांस असें दिसून आलें कीं हळूहळू दुष्काळ पाडून, अथवा ते जे जुलूम जाजती करितील तेणेंकरून जो आपला नाश होईल तो टाळण्याकरितां धैर्य धरून, सर्वांनीं एक होऊन त्यांचेवर हल्ला करावा, आणि त्यांनीं बलात्कारानें जीं ठाणीं घेतलीं आहेत त्यांतून त्यांस हाकून लावावें, हीच गोष्ट आवश्यक आहे.

या गोष्टीविषयीं दीर्घ प्रयत्न करण्याचा यांचा निश्चय.

जे समयीं **कोलम्बस इसाबेल्ला** एथें परत आला ते समयीं वर सांगितलेले विचार सर्व **इन्दिअन** लोकांचे मनांत भरून गेले होते, आणि त्यांस **स्पेन** देशीय लोकांनीं निरर्थक पीडा केल्यामुळें ते इतके संतापले होते कीं त्या ठाणेगार लोकांवर जाऊन पडायास आपले मुख्याच्या हुकुमाची ते वाट पाहत बसले होते; यासमयीं त्या **इन्दिअन** लोकांस जो संताप आला होता तो सहनशीलता व नम्रता या दोन गोष्टींकरितांच जे त्यांचे नम्र स्वभाव निर्माण केले होते त्यांस साहीनासा झाला. तेथील कार्जानीं फुटकळ टोळ्या करून जी मंडळी फिरत असे तींतून कितीएकांस पकडून ठार मारून टाकिलें होतें. हा जो प्रसंग त्यांचेवर येऊन, गुजरला याचे भयामुळें **स्पेन** देशीय लोक एकत्र जमून त्यांनीं **कोलम्बसाच्या** स्वामित्वाची पुनः स्थापना केली; कारण याच्या शाहाणपणाच्या रीतीस अनुसर-

त्यावांचून या संकटापासून मुक्त होण्याची त्यांस दुसरी कोणतीही आशा दिसेनाशी झाली. **इन्दिअन** लोकांवर **कोलम्बसानें** मोठ्या सावधगिरीनें आजपर्यंत जें शस्त्र धरण्याचें टाळिलें होतें त्याचा यासमयीं अवलंब करणें प्राप्त पडलें. नवीन खंडांतील नग्न लोकांजवळ दांडे, अग्नींत घालून कठीण केलेल्या काठ्या, लांकडी तरवारी, व टोकांस हाडें अथवा गारा बसविलेले बाण हीं कायतीं लढाऊ शस्त्रें होतीं; इकडे **स्पेन** देशीय लोकांचे घोडेस्वार युद्धकर्मामध्यें निपुण असून त्यांचे जवळ **युरोप** खंडांतील युद्धकलेमध्यें जितकीं घातुक शस्त्रें माहित होतीं तितकीं सर्व होतीं. या उभयतांमध्यें जी ही लढाई चालू झाली ती समसमान जरीं दिसत नव्हती, तरीं **स्पेन** देशीय लोकांची ही स्थिति संकटापासून मुक्त असण्याची दुरवरच होती. **इन्दिअन** लोकांची जमात पुष्कळ होती यामुळें त्यांचीं बहुतेक व्यंगें झांकून गेलीं होतीं; आणि इकडे **स्पेन** देशीय लोकांच्या अल्प समाजास त्या बेटांतील सर्व लोकांबरोबर युद्धार्थ उभे राहण्याचें पडलें होतें. अशा समयीं एखादी प्रतिकूल गोष्ट घडली असती, अथवा युद्धाचा सोक्षमोक्ष काय होतो याचे निश्चयार्थ अकल्पित विलंब लागला असता, तर त्यापासून **स्पेन** देशीय लोकांचा घातच झाला असता. हें कार्य आपले कृत्यांची हुशारी व त्वरा यांशिवाय सिद्धीस जाणार नाहीं असें **कोलम्बसाच्या** मनांत आल्यावरून यानें तत्काळ सैन्याची जमाजम केली. या सैन्याची जमात फारच कमी झाली होती. **स्पेन** देशीय लोक ज्या देशांत

तद्देशीय लोकांबरोबर जी लढाई चालविली ती प्रथम जितकी असमान दिसे तितकी नव्हती.

त्यांची पुष्कळ जमात.

स्पेनदेशीय लोकांची संख्या रोगामुळें व आपघातामुळें फार कमी होत्ये.

गेले होते त्या देशाची उष्णता व आर्द्र हवा यांमुळें अथवा त्यांच्याच मनःपूत आचरणामुळें जे रोग उत्पन्न झाले होते ते फारच बळावले; आणि **स्पेन** देशीय लोकांस स्वकीय अनुभवावरून ते रोग बरे करण्याची युक्ति, अथवा ते रोग होऊं नयेत याविषयींच प्रथम सावधगिरी राखणें, या दोन गोष्टींतून एकही गोष्ट माहित झाली नव्हती. यांमुळें मूळचे जितके लोक आले होते त्यांतील दोन तृतीयांश लोक मरण पावले, आणि जे अवशिष्ट राहिले होते ते चाकरीचे कामास उपयोगीं पडण्याजोगे नव्हते. जे लोक समरांगणीं आले त्यांत २०० पायदळ,

याचें जें सैन्य समरांगणीं आलें त्याविषयीं.

२० घोडेस्वार, आणि, २० मोठमोठे कुत्रे होते. या लढाऊ लोकांमध्यें जी कुत्र्यांची गणना केली आहे ती कशीही विलक्षण दिसो, परंतु त्या कुत्र्यांची नग्न आणि भित्रे असे जे **इन्दिअन** लोक त्यांचेवर घालण्यास योजना केली असतां ते ह्मणजे सर्व मंडळींतून कदाचित् थोडे भयंकर आणि नाशकारक होतील असें नव्हतें. यासमयीं ज्या **ग्वाकानाहारीनें स्पेन** देशीय लोकांबराबर कधीं न तुटण्यासारिखें इष्टत्व राखिलें होतें त्यावांचून त्या बेटांतील सर्व अधिकारी आपले सैन्या-

स्पेन देशीय लोकांच्या अनुरोधानें तद्देशीय लोकांच्या सैन्याची संख्या.

सहवर्तमान **कोलम्बसाचा** पराजय करण्याकरितां आपलीं शस्त्रें घेऊन सिद्ध झाले **स्पेन** देशांतील इतिहास कर्त्यांवर भरंवसा ठेवून पाहिलें तर त्यां बरोबर १००००० एक लक्ष सैन्य होतें. **इन्दिअन** लोकांनीं **स्पेन** देशीय लोक रानें अथवा पर्वत यांतील दृढ प्रदेशांत सांपडत असें

स्थळ धरण्याचें सोडून मूर्खपणानें **वेगा रेआल** ह्मणून जें एक मोठें त्या देशीं मैदान होतें तेथें आपणास जागा घेतली. इकडे **कोलम्बसानें** त्यांस आपली चुकी पाहायास अथवा आपलें स्थळ बदलायास फुरसतच पडूं दिली नाहीं. जे लढाऊ लोक अशिक्षित असतात त्यांस रात्रीं एकोप्यानें अथवा एकमतानें लढतां येत नाहीं, ह्मणून **कोलम्बसानें** त्या लोकांवर रात्रींच हल्ला करून आयासावांचून व रक्तस्राव झाल्यावांचून जय मिळविला. बंदुकांमुळें व घोडेस्वारांच्या झपाट्यामुळें आणि कुत्र्यांनीं चौताळून जो मोठा भयंकर हल्ला केला त्यामुळें जो कलकलाट आणि नाश झाला तो पाहून त्या **इन्दिअन** लोकांचे पोटांत इतकें भय शिरलें कीं, तेणेंकरून ते **इन्दिअन** लोक आपापलीं शस्त्रें टाकून देऊन शत्रूंस अडथळा करण्याचा प्रयत्न न करितां पळून गेले. त्यांतून पुष्कळांस ठार मारिलें आणि बहुतेकांस कैद करून चाकर करून ठेविलें. जे बाकी राहिले होते त्यांस इतका वचक बसला होता कीं, त्यांनीं आपले शत्रु अजेय आहेत असें कल्पून त्यांचेबरावर लढाई करण्याचे सर्व विचार सोडून देऊन त्या वेळापासून ते अगदीं निराश होऊन राहिले.

ह्या स्थलीं ते शत्रु उभे राहिले तें स्थल चांगलें नाहीं ही संधि साधून त्याजवर एकाएकीं हल्ला करून जय मिळवितो.

त्या बेटांत चोहोंकडेस फिरण्यामध्यें व तें, कोणताही अडथळा न येतां **स्पेन** देशचे सरकारच्या ताब्यांत आणण्यामध्यें, **कोलम्बसानें** कितीएक महिने मोडिले. त्या बेटांत १४ वर्षांपेक्षां अधिक वयाचे जे लोक होते त्यांचेवर **कोलम्बसानें** कर बसविला.

त्यांजवर कर बसवितो.

ज्यां प्रांतामध्यें सुवर्ण सांपडे त्यां प्रांतांतील प्रत्येक मनुष्यानें वहिरीससाण्याचे गळ्यांतील घांटभर सोन्याची माती तीन तीन महिन्यांनीं आणून द्यावी असें केलें; आणि अन्य प्रांतांतील लोकांनीं २५ पौंड कापूस आणून द्यावा असा हक्क बसविला. हा जो **इन्दिअन** लोकांवर प्रथमतः नियमित कर बसविला तो, पुढें त्या लोकांपासून हवातसा कर घ्यावयाचा शिरस्ता पाडण्याकरितां फार उपयोगीं पडला. **इन्दिअन** लोकांस वर्त्तावण्याच्या रीतीचे जे **कोलम्बसानें** आजपर्यंत विचारपूर्वक नियम चालविले होते त्यांस हा जो कर बसविला तो अगदीं विरुद्ध होता. परंतु या संधींत **स्पेन** देशचे दरबारांत **कोलम्बसाचे** चलतीचा गुप्तपणें नाश करण्याकरितां, व हा जीं कृत्यें करितो तीं सचोटीचीं नाहींत असें दर्शविण्याकरितां कारस्थानें चाललीं होतीं; त्यामुळें यास आपली कारभार करण्याची पहिली शिस्त सोडणें प्राप्त पडलें. **कोलम्बसाचे** वर्त्तणुकीचीं व यानें जे देश शोधून काढिले होते त्यांचीं **कोलम्बसास** प्रतिकूल अशीं वर्णनें **स्पेन** देशास गेलीं होतीं. **मार्गारीता** आणि पाद्रे **बोइल** हे दोघेही या समयीं दरबारांत होते; हे आपण केलेलीं कर्में यथान्याय आहेत असें दाखविण्याकरितां, व आपलें वैर साधण्याकरितां, मनांत दुष्ट वासना धरून **कोलम्बसाची** अपकीर्ति चोहोंकडेस पसरण्याचा जो हरएक प्रसंग तो केव्हां येतो ह्याकरितां टपत राहिले होते. दरबारी लोकांतून कितीएकांनीं **कोलम्बसाच्या** कीर्तीचा व सत्तेची जी वृद्धि होत चालली होती ती समत्सर दृष्टीनें पाहिली. **सेविल** एथील धर्मा-

कोलम्बस आजपर्यंत ज्या नीतीचे नियमास अनुसरून चालला ती नीति सोडण्याचीं कारणें.

ध्यक्ष **फोनसेका** ज्याचेकडे **इन्दिया** एथील सर्व कामकारभाराची मुकत्यारी सांगितली होती त्याचे पोटांत **कोलम्बसा**विषयीं इतकें वाईट भरून गेलें होतें कीं, तो **कोलम्बसाची** निर्भर्त्सना होण्याजोगी जी गोष्ट ती पक्षपात धरून ऐकत असे. त्या धर्माध्यक्षाचे मनांत इतकें वांकडें येण्याचें कारण त्या काळच्या इतिहासकर्त्यांनीं सांगितलें नाहीं. ज्यास मित्र नाहीं व जो दरबारी डावपेंचांमध्यें वागलेला नाहीं अशा परके गृहस्थास इतक्या शत्रूंच्या कपटी मसलतींतून पार पडण्याचें काम सुलभ नव्हे. यासमयीं **कोलम्बसानें** असें पाहिलें कीं आपली प्रतिष्ठा रक्षण करायास व आपले शत्रूंचीं तोंडें बंद करून टाकायास एकच उपाय आहे. तो असा; या देशांमध्यें इतकें सुवर्ण उत्पन्न केलें पाहिजे कीं, तेणेंकरून या देशांतील संपत्तीविषयीं जो मी स्पोट केला आहे तो यथान्याय आहे इतकेंच केवळ स्थापित होऊं नये, पण **फेर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांस माझे बेत सिद्दीस नेण्याविषयीं सतत उद्योग चालवायास उत्तेजनही यावें. इतकें सुवर्ण यास उत्पन्न करावयाचें होतें ह्मणून हा त्या लोकांवर भारी कर बसवूनच राहिला नाहीं, तर त्यांपासून तो यानें फार करडा अमंल चालवून उत्पन्नही करून घेतला. त्या दीन लोकांबराबर ज्या कृपेनें व दयेनें **कोलम्बस** वागला, ती कृपा व दया या प्रसंगीं यानें सोडून दिली याचें कारण, कोणत्या तरीं उपायानें सोनें अवश्य उत्पन्न केलें पाहिजे असें जें यानें कल्पिलें होतें तें असावें, असें दिसतें.

याच कारणावरून आजपर्यंत कोलम्बस तद्देशीय लोकांबराबर ज्या कृपेनें व दयेनें चालला ती कृपा व दया सोडून देतो.

इन्दिअन लोक कसे होते याविषयीं

**इन्दिअन** लोकांवर जो हा कर बसविला होता त्याची तरतूद करण्याकरितां त्यांस जो श्रम पडला व जें लक्ष द्यावें लागलें, आणि जी दूरदृष्टि ठेवावी लागली, त्यांपासून जीं दुःखें उत्पन्न झालीं तीं, ज्या लोकांस निष्काळजी, आणि उद्यांचें कसें होईल ही काळजी न वाळगतां, आलस्यानें आपले दिवस काढायाची सवई पडली होती त्यांस सर्व दुःखांतून फारच असह्य दिसलीं. उद्योग करण्यामध्यें असा नियमित आणि सतत श्रम करण्याविषयीं ते समर्थ होते, आणि हें कृत्य त्या लोकांस आपले स्वातंत्र्यास इतकें अपकारक वाटलें कीं त्यांपासून मुक्तता मिळिवण्याचे युक्तीचाच त्यांनीं अवलंब केला. यावरून ते अतिशय उतावीळ व निराश झाले होते असें दिसून येतें. ज्या जुलमी लोकांस हाकून लावण्याचा प्रयत्न करण्यास त्या **इन्दिअन** लोकांचा धीर होईना, त्यांस उपाशीं मारायाची त्यांनीं युक्ति काढिली; आणि **स्पेन** देशीय लोकांची क्षुधा फार प्रखर आहे अशी कल्पना त्यांचे मनांत पूर्वींच आली होती, तीवरून त्यांनीं जी ही युक्ति योजिली होती ती करून पाहाण्यास फार आयास लागणार नाहीं असा त्यांनीं सिद्धांत ठरविला. याच बुद्धीनें त्या **इन्दिअन** लोकांनीं कृषिकर्माचीं सर्व कृत्यें आटोपून धरिलीं; आणि मका नलावून मानिओक अथवा कामदा याचे जे रोपडे लाविले होते तेही उपटून टाकिले: नंतर या विन लागवडीच्या जमीनी आपल्या शत्रूंस ठेवून आपण पर्वतांवरील दुर्गम स्थलीं जाऊन राहिले. या अशा अघोर निश्चयापासून त्यांनीं इच्छिलेले परिणाम थोडेसे

स्पेन देशीय लोकांस उपाशीं मारण्याची युक्ति.

घडून आले. ते असे कीं, **स्पेन** देशीय लोकांस त्यामुळें सर्व वस्तूंची अतिशयच कमतर पडली; परंतु त्यांस **युरोप** खंडाहून सामानसुमानाची पुरवणी वेळेवर येऊन पोंहचली, व त्यांचा उद्योग आणि कल्पनाशक्ति यांमध्येंही ती सामग्री उत्पन्न करण्याचे उपाय पुष्कळ भरले होते यामुळें त्यांचीं मनुष्यें फार मेलीं नाहींत. त्या बापुड्या **इन्दिअन** लोकांनीं जी ही वाईट युक्ति योजिली होती ती त्यांची त्यांसच घातक झाली. **इन्दिअन** लोकांची मोठी जमात, आपोआप उत्पन्न होणाऱ्या धान्याशिवाय दुसरें धान्य जेथें उत्पन्न होत नाहीं असे जे पर्वत अथवा त्या देशांतील रानवट प्रदेश यांमध्यें कोंडली गेली, आणि तीस लवकरच दुष्काळाचीं परम संकटें अनुभवावीं लागलीं. यामुळें सांसर्गिक ह्मणजे एकमेकास एकमेकाचा स्पर्श झाला असतां लागणारे असे रोग उत्पन्न झाले, आणि थोडक्याच महिन्यांत त्या बेटांतील राहाणवाल्यांपैकीं एकतृतीयांशापेक्षां अधिक लोक नानाप्रकारच्या विपत्ति सोसून मरण पावले.

युरोप खंडाहून वेळेवर धान्य सामग्री आल्यामुळें यांचा थोडासा बचाव होतो.

इन्दिअन लोकांचीं नाशकारक युक्ति त्यांची त्यांसच घातक होत्ये.

**कोलम्बस** नवीन खंडामध्यें **स्पेन** देशीय लोकांच्या वर्चस्वाची चांगली संस्थापना करीत असतां याचे चाकरीमुळें व यानें बहुत संकटें भोगिलीं होतीं यामुळें ज्या कीर्तीचा व बक्षिसांचा उपभोग करायास यास योग्यता आली होती त्यांचा अपहार करायास याचे शत्रु एकसारिखें चित्त देऊन श्रम करीत होते. नवीन वसाहतींतील अपरिहार्य

या समयीं कोलम्बसाचे शत्रु स्पेन देशामध्यें उगीच बसले नव्हते.

संकटें, व शरीरास अपकारक अशा हवेमुळें उत्पन्न झालेले अनर्थ, आणि अज्ञात सागरामध्यें जलपर्यटन करीत असतां प्राप्त झालेलीं विघ्नें, हीं सर्व **कोलम्बसाची** अस्थिर आणि अविचारी जी महत्पदप्राप्तीची इच्छा तीणेंकरून उत्पन्न झालीं, असें ते ह्मणूं लागले. **कोलम्बस** व्यवस्था आणि नम्रता राहावी ह्मणून शाहाणपणाच्या रीतीनें जें लक्ष ठेवीत असे त्यास करडा अंमल ह्मणूं लागले, आणि जे दंगेखोर व अव्यवस्थित लोक होते त्यांस जी हा शिक्षा करीत असे तिजवर त्या शत्रूंनीं क्रौर्य हा दोष ठेविला. हे दोषारोप ज्या दरबारास दुसऱ्याचा उत्कर्ष साहत नसे त्या दरबारांत इतके मान्य झाले कीं, तेथून **हिस्पान्योला** एथें जाऊन **कोलम्बसाच्या** वहिवाटीवर देखरेख ठेवण्याकरितां एके कामगाराची योजना झाली. हें महत्कृत्य, **कोलम्बसाच्या** शत्रूंनीं शिफारस केल्यावरून, ज्याकडे खासगीचें काम होतें असा जो **आग्वादो** नामक गृहस्थ याचेवर सोंपविलें. ही जी त्यांनीं योजना केली ती ह्मणजे त्या पुरुषाच्या आंगीं हें काम करण्याचें सामर्थ्य होतें ह्मणून केली असें नाहीं, तर त्यानें त्यांस फार उपयोगीं पडून त्यांचें बहुत आर्जव संपादिलें होतें ह्मणून केली असें दिसतें. **आग्वादो** यास ही जी एकाएकीं उंच पदवी मिळाली तीणेंकरून तो अगदीं चढून गेला, आणि आपलें काम बजावीत असतां आपला सर्व क्षुल्लक मोठेपणा दर्शित करून लोकांस त्रास येण्याजोग्या उद्धतपणानें वर्तला. ज्यासमयीं हलक्या लोकांस एकाएकीं मोठी पदवी प्राप्त होते, अथवा जी

याचे शत्रूंनीं जे याजवर आरोप आणिले होते ते दरबारांत मान्य होतात.

याची चौकशी करण्याकरितां जो कामदार योजला होता तो कोणत्या योग्यतेचा होता याविषयीं.

कामें करायास ते योग्य नसतां त्यांजवर त्यांची नेमणूक होती, त्या समयीं अशा रीतीनें वर्त्तन करण्याची त्यांची स्वाभावीक प्रवृत्ति होती. त्याच्या मनांतून **कोलम्बसाचे** सर्व कारभार लोकांस फार उपद्रवकारक आहेत असें दाखवायाचें होतें ह्मणून, त्या देशास उपयुक्त व तेथील लोकांचे उपद्रव दूर होण्याजोगे जे कायदे ते न स्थापितां, **कोलम्बसा**वर जे दोषारोप आणिले होते ते **आग्वादो** यानें मोठ्या उत्सुकतेनें ऐकून घेऊन फंद कारणाऱ्या **स्पेन** देशीय लोकांस व **इन्दिअन** लोकांस, त्यांनीं आपलीं खरीं किंवा कल्पित जीं दुःखें असतील तीं बाहेर काढावीं अशी फूस देऊन, त्या बेटांत जी आग पेटली होती तिजवर तेल ओतिलें. माझी चाल बारीक दृष्टीनें पाहून माझे अधिकारावर चौकशी ठेवणारा ज्यापक्षीं असा पक्षपाती आहे त्यापक्षीं आपली वरीगत दिसत नाहीं, असें **कोलम्बसानें** पक्केपणीं मनांत आणून, हा व याचे शत्रू यांमध्यें मुख्यत्वेंकरून ज्या कृत्यांविषयीं तंटा पडला होता त्यांचें साद्यंत वर्त्तमान **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांस विदित केलें असतां, तीं उभयतां त्यांचा विचारपूर्वक न्याय करून बरोबर आणि आपणास अनुकूल असा निर्णय करतील, अशी यास आशा वाटून, यानें १४९६ मध्यें **स्पेन** देशास परत जाण्याचा निश्चय ठरविला. **कोलम्बसानें** आपला भाऊ **बार्थोलोमेओ** यास आपल्यामागें **अदेलान्तदोच्वी** पदवी देऊन अथवा दुय्यम हकीम करून ठेविलें आणि **फ्रांसिस रोल्दान** यास मुख्य न्यायाधीशाचें काम सांगून त्याच्याकडे मोठा अधिकार ठेविला. ही योजना चांगली झाली ना-

आपल्यामागें काम चालविण्याची व्यवस्था करितो.

हीं, कारण कीं, हीपासून ठाणेगारांस बहुत अनर्थ प्राप्त झाले.

कोलम्बस स्वदेशीं जाते वेळेस पूर्वीच्या जलपर्यटनापेक्षां वेगळाच मार्ग धरितो.

**कोलम्बसानें युरोप** खंडास परत येतांना पहिल्या जलपर्यटनामध्यें जो मार्ग धरिला होता त्याहून निराळाच धरिला. **कोलम्बस हिस्पान्योलापासून** वीस अक्षांशांचें अंतर धरून शुद्ध पूर्वेस चालिला; कारण कीं नैऋत्य दिशेकडील वायूच्या ओघांत पडण्याकरितां उत्तरेस सरण्याची अधिक निश्चयात्मक आणि अधिक त्वरेची युक्ति अद्याप कालपर्यंत यास स्वकीय अनुभवावरून समजली नव्हती. अशी जी ही गैर मसलत योजिली तीणेंकरून, जे नियमित दिशेचे वारे अयनवृत्तांमध्यें पूर्वेकडून एकसारिखे वाहत असतात त्यांच्या झपाट्यांत सांपडल्यामुळें **कोलम्बसास** अगणित श्रम आणि जिवावरचीं संकटें भोगावीं लागलीं. प्राचीन आणि नवीन खंडांमध्यें हें नौकागमन नुकतेंच चालू झालें होतें ह्मणून, यामध्यें ही जी अयोग्य योजना झाली ती ह्मणजे **कोलम्बस** नौकाशास्त्रीय कलेमध्यें पुरा नव्हे ह्मणून झाली असा आरोप ठेवणें फार कठीण.

यास पुष्कळ संकटें प्राप्त झालीं तरीं हा धैर्य सोडीत नाहीं.

अशा जलपर्यटनांत जरीं मोठमोठीं संकटें प्राप्त झालीं तरीं त्यांच्याकडे लक्ष न देतां, **कोलम्बसानें** आपली नेहेमीची सहनशीलता व अंतःकरणाची दृढता धरून आपलें गमन चालविलें. परंतु हा इतका थोडा चालला कीं तीन महिन्यांमध्यें याचे दृष्टीस जमीन पडली नाहीं. शेवटीं याच्या बराबरची सामग्री सरत आली ह्मणून खलाशी लोकांतील प्रत्येक जणास दर दिवसास ६ औंस भाकरी-

पर्यंत खाण्यास देण्याचें मान **कोलम्बसानें** उतरविलें. **कोलम्बसाचें** भोजनही फार हलक्या खलाशापेक्षां अधिक सुग्रासाचें नव्हतें; व अशा पराकाष्ठेच्या संकटामध्यें जरीं हा पडला होता, तरीं ज्या दयालू स्वाभावाविषयीं याची प्रसिद्धि असे तो दयालू स्वभाव यानें सोडिला नव्हता, ह्मणून याच्या खलाशांनीं मोठ्या अगत्यवादानें ज्या गोष्टींविषयीं प्रार्थना केली तिचाही यानें स्वीकार केला नाहीं. ती गोष्ट अशी; त्या खलाशी लोकांतून कांहीं असें ह्मणूं लागले कीं, **इन्दिअन** लोकांतील जे बंदिवान आपण आपल्या बराबर नेत आहों त्यांच्यावर आपलें उपजीवन करावें; दुसऱ्यांनीं असा आग्रह धरिला कीं आपले जवळ धान्याची शिलक फार थोडी उरली आहे तर त्याचा खप थोडा व्हावा ह्मणून त्या **इन्दिअन** लोकांस समुद्रांत ढकलून द्यावें. परंतु **कोलम्बसानें** त्यांस असें सांगितलें कीं, ते मानवी प्राणी आहेत, आणि आपल्यावर जो अनर्थ गुजरला आहे तोच त्यांजवर पडला आहे, त्यापक्षीं या दुर्दैवाचा वांटा सगळ्यांनीं समसमान उचलिला पाहिजे. **कोलम्बसाचा** अधिकार व याचीं हीं औपदेशिक वाक्यें यांनीं निराशेमुळें सुचलेल्या ज्या त्या अयुक्त कल्पना त्यांचा नाश करून टाकिला. नंतर त्या कल्पनांचा पुनः उद्भव होण्यास अवसरही राहिला नाहीं, कारण कीं **कोलम्बस** लवकरच **स्पेन** देशच्या किनाऱ्याच्या टप्यांत येऊन पोहोंचल्यामुळें त्या खलाशी लोकांच्या सर्व भयांची आणि संकटांची समाप्ति झाली.

याचा दयालू स्वभाव.

याचे लोकांची दुष्ट योजना.

आपल्या लोकांच्या दुष्ट कल्पनेचें निराकरण करण्याविषयीं याचा उपदेश.

हा मोठ्या विश्वासानें दरबारांत येतो.

आपल्या प्रमाणिकपणाविषयीं व आपण मोठमोठीं कामें बजाविलीं यांविषयीं ज्या पुरुषाची मनांतून खात्री असत्ये त्या पुरुषाप्रमाणें, **कोलम्बस** मोठ्या नम्रतेनें निश्चयात्मक विश्वास धरून दरबारांत आला. त्यासमयीं **फेर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांनीं, अप्रयोजक व शाबूद न केलेले असे **कोलम्बसाव**रील दोषारोप ऐकण्यांत विचार न करितां फार मन घातलें, ह्मणून लज्जित होऊन, **कोलम्बसाची** इतक्या आदरसत्कारानें भेट घेतली कीं तेणेंकरून याचे शत्रु लज्जायमान होऊन गेले. या संधीस त्या शत्रूंनीं **कोलम्बसावर** जे दोष काढिले होते व जे खोटे आरोप ठेविले होते त्यांविषयीं पुनः ऐकण्यांत आलें नाहीं. **कोलम्बसानें**, सोनें मोत्यें, कापूस, आणि दुसरे जे किंमतदार जिन्नस आणिले होते, तीहींकरून याच्याशीं द्रोह करणाऱ्यांनीं त्या देशाच्या गरीबीविषयीं जें सांगितलें होतें तें खोटें पडलें. **इन्दिअन** लोकांस आपल्या ताब्यांत आणून व त्यांच्यावर कर बसवून **कोलम्बसानें स्पेन** देशाच्या सरकाराकरितां नवीन प्रजा व पुष्कळ उत्पन्न होण्यासारिखा जो वसूल दिसत होता तो रक्षून ठेविला. **कोलम्बसानें** ज्या खाणी शोधून काढून तपासिल्या होत्या त्यांहींकरून तर या सर्वांपेक्षां अधिक मोठें असें संपत्तीचें मूळ प्रगट झालें. हे जे मोठे आणि अतर्कित लाभ ते तर पुढील प्राप्तीचीं चिन्हें, आणि अद्यापि माझ्या मनांतून जे यापेक्षांही मोठमोठे शोध करायाचे आहेत, व जे करायास सांप्रतकालीं केलेल्या शोधांवरून

याचा फार आदर झाला असें पाहून याचे शत्रु लज्जित होतात.

सांप्रतच्या शोधावरून पुढें फारच लाभ होतील असें कोलम्बस दर्शवितो.

निश्चयें माझी साहजिक प्रवृत्तिही होईल त्या शोधांचें पूर्वरूप होय, असें **कोलम्बसानें** सांगितलें.

या सर्व गोष्टींचा लक्ष देऊन ज्या समयीं विचार केला, त्यासमयीं त्या गोष्टी ह्मणजे केवळ **कोलम्बसाच्या** सर्व पराक्रमाच्या कृत्यांस साहाय्य देणारी काय ती मी असें वाटून हर्षभरीत झालेली जी **इसाबेल्ला** राणी तिचेच मनांत ठसल्या असें नाहीं, तर ज्यानें **कोलम्बसाच्या** युक्ति पूर्वी मान्य केल्या नव्हत्या व अद्यापही त्यांपासून सिद्धि झाली याचा ज्यास संशय होता असा जो **फर्दिनान्द** याच्याही मनांत भरून गेल्या; त्या इतक्या कीं, त्या उभयतांनीं **हिस्पान्योला** एथील ठाणेगारांस ती वसाहत स्थाईक करण्याकरितां ज्या वस्तूंची अपेक्षा होती त्यांची पुरवणी करण्याचा, व जे दुसरे नवीन देश आहेत ह्मणून **कोलम्बसाची** खात्री होती त्यांच्या शोधार्थ यानें जावें इतकें अरमार तयार करून देण्याचा निश्चय केला. हे दोन हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं ज्या उत्कृष्ट युक्ति होत्या त्यांचा **कोलम्बसा**बराबर अंतरंगीं निश्चय ठरविला. नवीन खंडाकडे पहिलें जें जलपर्यटन केलें त्याचा नवीन नवीन शोध करणें हाच मुख्य उद्देश होता, व दुसऱ्या जलपर्यटनामध्यें जरीं वसाहतींच्या योजना झाल्या होत्या तरीं त्यांच्याकरितां प्रथम जी सावधगिरी राखिली होती ती पुरी नव्हती, आणि **स्पेन** देशीय लोकांच्या दंगेखोर स्वभावामुळें आणि नानाप्रकारच्या कारणांपासून उपस्थित झालेल्या अकल्पित संकटांमुळें त्यांपासून फळही झालें नाहीं. सांप्रत ठाणेगार लो-

याचें बोलणें उभयतांच्याही मनांत ठसतें.

पूर्वी वसाहतींच्या स्थापनेस जे अडथळे आले ते.

कांच्या व्यवस्थेविषयीं पुढील सर्व वसाहतींमध्यें नमुना होण्यास उपयोगीं पडे असा बेत योजावयाचा होता; ह्मणून जितक्या बारीक मोठ्या गोष्टी होत्या तितक्यांचा लक्षपूर्वक विचार करून हरएक गोष्टीची काडीमात्र फेर न पडे अशी व्यवस्था केली. ती अशी; या उद्योगाकरितां जे लोक पाठवायाचे होते ते अमुकच पाठवायाचे असा ठराव केला. ते लोक वेगळ्या वेगळ्या अधिकारांचे व निरनिराळ्या धंद्यांचे असावे असें ठरवून, त्यांतून ज्यांचा जसजसा उपयोग पडावयासारिखा होता तसतसा त्यांचा समुदाय योजिला. या नवीन रहवासी लोकांबरावर जाण्यास अमुकच बायका असाव्या असें स्थापित केलें. ज्या देशांत दुष्काळामुळें इतके अनर्थ घडून आले त्या देशांत सामग्री उत्पन्न करण्याचाच प्रथम उद्देश होता ह्मणून शेतकऱ्यांची बरीच जमात तिकडेस न्यावी असें ठरविलें. ज्या नवीन खंडापासून **यूरोप** खंडास इतकी संपत्ति प्राप्त झाली त्या खंडांतील उत्पन्नापासून नफा करून घेण्याची **स्पेन** देशीय लोकांस अगदीं कल्पना नव्हती; परंतु तेथील खाणींमधील संपत्तीविषयीं मोठमोठ्या कल्पना बांधून पराकाष्टेचीच तद्विषयक आशा त्यांनीं मनांत बाळगली होती, ह्मणून ती मौल्यवान् धातू खणून गाळायाच्या ज्या नानाप्रकारच्या कृति त्यांमध्यें प्रवीण आशा कामगार लोकांची मंडळी बरावर द्यावी, व अन्य देशीं जाऊन राहण्याकरितां जे हे लोक निघाले होते, त्यांस कांहीं वर्षेंपर्यंत सरकारी खर्चांतून पगार देऊन त्यांची उपजीविका चालवावी, असा ठराव केला.

सांप्रत जी वसाहत करायाची होती तिची यथास्थित व्यवस्था राखण्याचा कायदा.

अशा प्रकारें जे कायदे केले ते विचार युक्त आणि इच्छिलेला अर्थ सिद्धीस नेण्याविषयीं चांगले उपयुक्त होते; परंतु नवीन शोधून काढलेल्या देशांतील दुष्ट हवेमुळें बहुत लोक मरण पावले, हें पाहून त्या देशांत जाऊन राहण्यास स्वसंतोषानें थोडकेच कबूल करितील, असें प्रथमच दिसून आल्यावरून, **कोलम्बसानें** असें योजिलें कीं, मोठे असून फार अघोर कर्माचे नव्हत, असे अपराध ज्या पुरुषांकडेस लागू आहेत त्यांस **हिस्पान्योला** एथें पाठवावें, व ज्या अपराध्यांस नेहेमी वल्हीं मारून चालवायाचे तारवांवर पाठवितात त्यांतून कांहीं एकांस ज्या नवीन खाणी खणावयाच्या आहेत तेथें जाऊन त्यांनीं काम करावें, अशी शिक्षा योजावी. यथायोग्य विचार न करितां जसा हा बुद्धिवाद दिला तसाच तो अविचारानें मान्य झाला. जी नवी वसाहत करावयाची होती तीकरितां लोक जमवावे म्हणून **स्पेन** देशांतील सर्व बंदिखानें धुऊन काढिले, आणि अपराधी लोकांची चौकशी करण्याचा ज्या न्यायाधीशांकडे अधिकार होता, त्यांस पुढील शिक्षेच्या योगानें त्या लोकांची पुरवणी करण्याकरितां सांगून ठेविलें. जी वसाहत चिरकालपर्यंत राही अशी करावयाची होती तिचा अशा साधनानिशीं पाया घालणें अनुचित, कां कीं नवीन वसाहतीमध्यें उद्योग, नम्रता, सहनशीलता, आणि परस्पर विश्वास, हीं अवश्य असलींच पाहिजेत, म्हणून अशा ठिकाणीं व्यवस्था राहण्याकरितां कायद्यांच्या बलापेक्षां सद्वर्तणुकीचेंच साधन योजावें हें आवश्यक होय.

त्या कायद्यांतील न्यूनता.

या न्यूनतेचा अविचारानें स्वीकार करितात.

स्पेन देशीय लोकांची वसाहत

स्थापण्याची जी रीति तीच दुसऱ्या लोकांनीं स्वीकारिल्यामुळें त्यांच्या वसाहतींतहि वाईट परिणाम होतात.

परंतु या वसाहतीकरितां जे प्रथमच लोक मिळविले त्यांमध्यें भ्रष्ट लोकांची ज्यापक्षीं मिसळ केली होती, त्यापक्षीं त्या अप्रतिष्ठित आणि न सुधारण्यासारिख्या लोकांच्या दुर्गुणांमुळें सर्व लोक बिघडून जाऊन दुष्ट आणि दुःखकारक असा परिणाम घडून येण्याचा संभव दिसला, व या गोष्टीचा त्या **स्पेन** देशीय लोकांस पक्का अनुभवही आला. **यूरोप** खंडांतील दुसरे लोक **स्पेन** देशाप्रमाणेंच वसाहतींची स्थापना करूं लागले, तेणेंकरूनच त्यांमध्यें वाईट परिणाम घडून आले, असे होण्याचें यावांचून दुसरें कोणतेंही कारण दिसत नाहीं.

याचा बेत सिद्धीस जाण्यास विलंब लागण्याचीं कारणें.

**कोलम्बसानें** जरीं मोठ्या सुलभतेनें आणि त्वरेनें आपण योजिलेली सर्व व्यवस्था व नियम यांविषयीं राजाची मान्यता मिळविली तरीं, ती व्यवस्था व ते नियम चालू करण्याविषयीं जे यानें प्रयत्न चालविले होते त्यांस बहुत कालपर्यंत इतकीं विघ्नें आलीं कीं, तींहींकरून ज्या मनुष्यांस संकटें भोगायाची विशेष सवई नसत्ये ते तर अगदीं थकून गेले असते. हा जो विलंब लागला त्यास **स्पेन** देशीय लोक ज्या स्थिरतेनें काम चालवीत त्या स्थिरतेचे त्रासदायक कायदे व शक्ति कांहींशी कारणीभूत झाली, आणि कांहीं **फर्दिनान्द** व **इसाबेला** यांच्या एकुलत्याएक मुलाचें **आस्त्रिआ** देशचे **मार्गारीते** बरावर, व त्या उभयतांच्या दुसऱ्या **ज्योहान्ना** या नांवाच्या मुलीचें **आस्त्रिआ** देशचे **फिलिप आर्चड्यूका** बराबर जें समारंभाचें लग्न झालें, त्यामुळें खजिन्यां-

तील द्रव्य सरलें होतें, हें दुसरें कारण झालें. परंतु मुख्यत्वें-करून **कोलम्बसाचे** शत्रूंच्या समत्सर युक्तिप्रयुक्तिच त्या विलंबास कारणीभूत झाल्या. **कोलम्बस** परत आल्यावर जो यास आदर सत्कार मिळाला तेणेंकरून ते शत्रु आश्चर्य-भरित होऊन व **कोलम्बसाच्या** प्रत्यक्ष दर्शनावरून भयभीत होऊन त्यांस कांहीं वेळपर्यंत **कोलम्बसावर** जी अतिरिक्त कृपा झाली ती मुकाट्यानें पाहावी लागली, कारण कीं तिचें परिमार्जन करण्याविषयीं त्यांच्या अंगांत शक्ति राहिली नव्हती. असें जरीं झालें होतें तरीं त्यांचें आणि **कोलम्बसाचें** हाडवैर पडलें होतें ह्मणून ते फार दिवसपर्यंत उगीच बसले नाहींत. त्यांनीं पुनः आपलीं कृत्यें चालू करून **इन्दियेंतील** कृत्यांचा अधिकारी **फोनसेका** जो हल्लीं **बादहोस** एथील बिशपाचे पदवीस चढला होता त्याच्या साहाय्यानें **कोलम्बसाच्या** स्वारीविषयीं जी तयारी चालली होती ती कालांतरावर घालविण्याकरितां इतके अडथळे आणिले कीं, तींहींकरून ठाणेगाराकरितां नेमलेल्या सामग्रीपैकीं थोडीशी सामग्री नेण्याकरितां दोन तारवें मिळविण्यास एक वर्ष लागलें; हें लहानसें आरमार जें यास जातीनें चालवायाचें होतें त्याची सिद्धता होण्याच्या पूर्वीं बहुतकरून दोन वर्षें मोडलीं.

याचे शत्रूंस थोडा वेळपर्यंत मुकाट्यानें राहवें लागतें.

परंतु पुढें ते यास विघ्न करण्याविषयीं उद्योग करितात.

या आरमारांत थोडथोड्या वजनाचीं सारीं ६ तारवें होतीं, आणि ज्यास बहुत दिवस लागणार व ज्यामध्यें अनेक संकटें प्राप्त होणार अशा जलपर्यटनाकरितां सामानसुमानाची तयारीही चांगली झाली

याचें तृतीय जलपर्यटन.

नव्हती. (१४९८) हें जें जलपर्यटन **कोलम्बसानें** योजिलें होतें याचा पूर्वीं केलेल्या जलपर्यटनापेक्षां भिन्नच मार्ग होता. आपण जे देश शोधून काढिले आहेत त्यांचे नैर्ऋत्य दिशेकडेस **इन्दियेंतील** फलद्रूप देश आहेत असें **कोलम्बसाच्या** मनांत त्रिंबून गेलें होतें, ह्मणून ते देश शोधून काढण्याकरितां आपण विषुवरेषेखालीं येऊन पोंहोचूं तोंपर्यंत शुद्ध दक्षिणेस व्हावें, नंतर आपल्या गतीस अनुकूल असा जो अयनवृत्तांमध्यें एकसारिखा वारा वाहत असतो त्याच्या साहाय्यानें पश्चिमेकडेस व्हावें, अशी अतिशय निश्चयात्मक युक्ति योजिली. याच कल्पनेनें यानें तारवें हाकारिलीं, आणि प्रथम **कानेरी** बेटांत जाऊन लागलाच **केप दिवेर्द** एथें गेला. **कोलम्बसानें कानेरी** बेटांहून **हिस्पान्योला** एथील ठाणेगार लोकांकरितां सामग्री भरून तीन तारवें रवाना केलीं, आणि बाकी राहिलेल्या तीन तारवांनिशीं दक्षिणेकडेस आपलें जलपर्यटन चालविलें. **कोलम्बस**

हा कानेरी बेटांहून पुढें तीन तारवें रवाना करतो.

व याचे लोक विषुवरेषेपासून पांच अंशांच्या आंत येऊन पोंहोंचत तोंपर्यंत कांहीं अद्भुत गोष्ट घडून आली नाहीं. या ठिकाणीं येई तोंपर्यंत त्यांचीं अंतःकरणें स्वस्थ होतीं, परंतु तेसमयींच उष्णता इतकी अतिशय झाली कीं, तिणेंकरून त्यांचीं दारवेचीं पिंपें तडकलीं, व दुसऱ्यांत जे पातळ पदार्थ भरून ठेविले होते ते आंवट होऊन गेले, आणि त्यांच्या बरोबरची धान्यसामग्री अगदीं करपून गेली. **स्पेन** देशीय लोकांनीं दक्षिणेकडेस इतकें दूर जाण्यास कधींही धीर केला नव्हता

हा दक्षिणेस जात असतां विषुवरेषेपासून ५ अंशांवर येतांच अतिशय उष्णतेमुळें याच्या जवळचे पदार्थ नासतात.

ह्मणून, त्यास आपलीं तारवें पेट घेतील असें भय पडलें व पृथ्वीवर उष्ण कटिबंधामध्यें जे देश आहेत तेथील हवा वगैरे फार दुष्ट आहे असें जें प्राचीन लोकांचें मत तें खरें आहे, असें ते मानूं लागले. परंतु यासमयींच पर्जन्य पडून त्यांच्या भीतीचें थोडेसें शांतवन झालें. मनुष्यांस तारवांवरील तक्तपोशीवर राहायाचें देखील कठीण इतका जरीं मोठा जबर व सतत पाऊस पडला तरीं, तेणेंकरून उष्णतेचा प्रखरपणा मोडला नाहीं. या पर्यटनाच्या आरंभापासून **कोलम्बस** मोठ्या तत्परतेनें स्वतः सर्व कामें वहिवाटीत होता, त्यांत फार श्रम झाले, व निद्राही सांपडली नाहीं, यामुळें ताप येऊन यास वायूचा उपद्रव झाला. या सर्व गोष्टींमुळें आपल्या लोकांच्या प्रार्थना यास कबूल कराव्या लागल्या, आणि **कारिबी** बेटांतील कोणत्या एका बेटास जाण्याकरितां वायव्य दिशेकडेस आपली गति पालटावी लागली, कारण तेथें जाऊन प्रकृतीस आराम होऊन सामानसुमानाची पूर्तता होण्यासारिखें होतें.

मोठा पाऊस पडल्यामुळें याच्या लोकांचे पोटांत उष्णतेमुळें आलेली भीति शमल्ये.

प्रकृति विघडल्यामुळें यास कारिबी बेटाकडे जावें लागतें.

जो मनुष्य तारवाच्या शिडाच्या शेंड्याकडेस वर्तुळाकार प्रदेशांत बसला होता त्यानें आगष्ट महिन्याच्या पहिल्या तारिखेस जमीन! हो जमीन! अशी आनंदाची आरोळी ठोकून, सर्वांस आश्चर्यभरित केलें, आणि ती पाहण्याकरितां जेव्हां सर्व उभे राहिले तेव्हां एक मोठें बेट त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यास या नौकाधिपतीनें **त्रिनिदाद** असें नांव दिल्हें, तेंच नांव अद्यापपर्यंत चालत आहे. हें बेट

ओरीनोको नदीच्या मुखाजवळ एक मोठें बेट दृष्टीस पडतें.

**गियाना** देशाच्या किनाऱ्यालगत **ओरिनोको** नदीच्या मुखाजवळ आहे. ह्या नदीचा मोठेपणा या नवीन खंडांतील नद्यांचा तृतीयांश किंवा चतुर्थांश इतका आहे, तथापि तिचा प्रवाह प्राचीन गोलार्धांतील सर्व प्रवाहांपेक्षां फार मोठा आहे. ही नदी समुद्राकडे वाहात जात असतां हिचे पाण्याचा लोट, व ही समुद्रास जाऊन मिळल्ये तेथें हिचा वेग, एवढा जबर असतो कीं, या किनाऱ्यावर समुद्रास जी विशेष भरती येल्ये तीस ही जाऊन मिळल्ये तेव्हां यांच्या आघातामुळें लाटा मोठमोठ्या होऊन खळखळूं लागतात, आणि तेणेंकरून मनुष्याच्या मनांत आश्चर्य आणि भीति हीं दोनही उत्पन्न होतात. या नस्तामध्यें या नदीचा तो अनिवार प्रवाह इतका दूरपर्यंत पसरतो कीं, याच्या पसरण्यानें समुद्राचें उदक पुष्कळ कोसपर्यंत गोडें होऊन जातें. यापासून धोका होईल असें **कोलम्बसाच्या** मनांत येण्याच्या अगोदरच हा समोरासमोर येणाऱ्या प्रवाहांच्या आणि तुफान झालेल्या लाटांच्या पेंचाटींत सांपडला; परंतु हा एका अरुंद सामुद्रधुनीच्या द्वारें परम संकटानें पार पडला. ही सामुद्रधुनी इतकी भयंकर दिसली कीं **कोलम्बसानें** हिला **बोकादेल द्रागो** ह्मणजे सर्पमुख असें नांव दिलें; या दर्शनामुळें तर **कोलम्बसाची** पाचांवर धारण बसली, परंतु हा जेव्हां या अलौकिक दर्शनाच्या स्वरूपाविषयीं विचार करूं लागला, तेव्हां त्यांत सुख आणि आशा त्यांचें मूळ आहे असें यास कळून आलें. एवढें मोठें पाणी जें या नदींत आहे हें कोणत्याही

त्या नदीच्या भलें मोठ्या लाटांचे पेंचाटींत हा सांपडतो.

या महान प्रवाहाच्या दर्शनानें यास भय वाटून संतोषही झाला त्याचीं कारणें.

लहानशा बेटांतून आलेलें नसावें, तर भल्या मोठ्या विस्तीर्ण देशांतून आलेलें असावें, आणि जें महाद्वीप माझ्या मनांतून फार दिवस शोधून काढावयाचें आहे त्याच्याजवळ मी येऊन पोंहोंचलों असा यानें यथायोग्य सिद्धांत केला.

हा पारिआ आणि कुमाना या प्रांताच्या किनाऱ्यानें पश्चिमेस जाऊन कितीएक स्थलें शोधून काढितो

अशी कल्पना मनामध्यें भरून हल्लीं ज्या प्रांतांस **पारिआ** आणि **कुमाना** असें ह्मणतात त्यांच्या किनाऱ्यानें हा पश्चिमेकडेस चालिला, आणि कितीएक ठिकाणीं उतरून तेथील लोकांबरोबर यानें व्यवहारही केला. ते लोक स्वरूपामध्यें व व्यवहारांतील रीतिभातीमध्यें **हिस्पान्योला** एथील लोकांप्रमाणेंच होते. सुवर्णाचीं लहान लहान पदकें आणि मोठ्या किमतीचीं मोत्यें हे त्या लोकांचे आंगावर घालण्याचे अलंकार असत. ते आपलीं भूषणें देऊन त्यांच्या मोबदला **यूरोप** खंडांतील खेळणीं स्वसंतोषानें घेऊं लागले. त्या लोकांस बेटांतील राहाणवाल्यांपेक्षां अधिक चांगलें ज्ञान आणि विशेष शौर्य होतें असें दृष्टीस पडलें. त्या देशांत तऱ्हेतऱ्हेचीं चतुष्पाद जनावरें आणि नानाप्रकारचे पक्षी व फळें हीं उत्पन्न होत असत. त्या जमीनींचें सौंदर्य आणि पिकाऊपणा पाहून या नौकाधिपतीस मोठा संतोष झाला, आणि यानें शोधकपणाच्या मोठ्या आवेशानें असें कल्पिलें

त्या देशाचें सौंदर्य पाहून त्यास स्वर्गभूमि असें मानितो.

कीं, सर्वशक्त भगवंतानें पुण्यवान् लोकांस राहण्याकरितां पृथ्वीवर एक स्थान योजिलें आहे, ज्यास धर्म पुस्तकांत स्वर्ग असें ह्मणतात, तें हेंच स्थान होय. अशा प्रकारेंकरून **कोलम्बसास**, केवळ नवीन खंड, शोधून काढिल्याचेंच यश आलें

असें नाहीं, तर त्याचें पूर्ण ज्ञान प्राप्त व्हावें एतद्विषयीं यानें जो पुष्कळ उद्योग केला त्याचेंही यास यश प्राप्त झालें. **स्पेन** देशांतील लोकांस ज्यानें त्या विस्तीर्ण महाद्वीपांत प्रथम नेलें तो हाच पुरुष. हें महाद्वीप त्या लोकांच्या राज्याचें मुख्यस्थान होय, आणि पृथ्वीच्या या भागांतील जितके त्यांचे खजिने आहेत त्यांचें मूळही हेंच महाद्वीप होय. या समयीं **कोलम्बसाचीं** तारवें अगदीं मोडकळीस आलीं, जवळची सामग्री संपली, आणि याची प्रकृतिही बिघडली, तशांत याचे खलाशी लोक फार उताविळी करूं लागले, यामुळें **कोलम्बसास** पुढें शोध करीत जावयास अडथळा आला आणि **हिस्पान्योला** एथें जाण्याचें प्राप्त पडलें. हा तिकडे जात असतां यानें **क्युबागुआ** आणि **मार्गारिता** अशीं दोन बेटें शोधून काढिलीं. तेथें ज्या माशांपासून मोत्यें निघतात त्या माशांस धरावयाचा व्यापार चालू लागल्यामुळें तीं बेटें प्रसिद्ध झालीं. जेव्हां हा **हिस्पान्योला** एथें येऊन पोंहोंचला तेव्हां दुखणें आणि श्रम इहींकरून हा फार खंगला होता, व तेथील ठाणेगार लोकांच्या कृत्यांची स्थिति पाहून यास ज्या विश्रांतीची फार अपेक्षा होती ती प्राप्त होण्याचा रंग दिसला नाहीं.

हिस्पान्योला एथें जात असतां क्युबागुआ आणि मार्गारिता अशीं दोन बेटें शोधून काढितो.

याच्या पाठीमागें त्या देशांत पुष्कळ फेरफार घडून आले; तो प्रकार असा, **कोलम्बसानें** तेथून परत जाण्याच्या अगोदर आपला भाऊ **आदेलान्तादो** यास जो बुद्धिवाद सांगीतला होता त्याप्रमाणें त्यानें **इसाबेल्ला** एथून ठाणें का-

याच्या पाठीमागें आदेलान्तादो यानें केलेलें कृत्य.

ढून त्याच्या समोर अधिक सोईची जागा होती त्या ठिकाणीं नेलें, आणि **सन्त दोमिंगो** या शहराचा पाया घातला. हें फार दिवसपर्यंत नवीन खंडांत **यूरोपिअन** लोकांचें प्रख्यात नगर होतें, आणि तेथें **स्पेन** देशच्या सत्ते खालचीं जित-कीं राज्यें होतीं त्यांमध्यें या ठिकाणीं न्याय मनसुबीचें मुख्य दरबार भरत असे. **स्पेन** देशांतील लोकांनीं हें ठाणें वसवितांच, **आदेलान्तादो** यानें, त्यांनीं आळसीपणांत दिवस घालवूं नयेत व त्यांस नवीन कष्ट करायास अवकाश मिळूं नये ह्मणून, त्या बेटाच्या ज्या प्रदेशांत आपला भाऊ गेला नव्हता व ज्यांच्याकडून त्यानें आपलें स्वामित्वही कबूल करविलें नव्हतें त्या भागांत स्वारी केली. तेथील लोकां-च्या आंगांत यास प्रतिहत करण्याची शक्ति नव्हती, ह्मणून यानें जी जी खंडणी मागितली ती ती सर्व ठिकाणीं त्यांनीं दिली. परंतु लवकरच त्यांनीं पाहिलें कीं, हें ओझें आपणांस सोसवत नाहीं, तेव्हां जरीं त्या जुलूमगारांचें मोठें सामर्थ्य पाहून यांस दहशत बसली होती तरीं त्यांजवर यांनीं शस्त्रें धरिलीं. असें जरी झालें तरीं हें बंड मोठें भयंकर होतें असें नाहीं. भितरे आणि नम्र अशा **इन्दिअन** लोकांबरावर जी लढाई चालली ती मोठ्या संकटाची नव्हती, व तीपासून सिद्धि होईल किंवा नाहीं असा संशयही नव्हता.

इन्दियन लोकांचें बंड.

परंतु जेव्हां **आदेलान्तादो** समरंगणांत त्यांच्या बरोबर युद्ध करण्यांत गुंतला, तेव्हां **स्पेन** देशच्या लोकांमध्यें एक मोठें बंड उद्भवलें. या बंडा-चा नाईक **फ्रांसिस रोल्दान** होता. या गृहस्थाकडे हुकूम राखण्याचें व लोकांमध्यें तंटाबखेडा उत्पन्न न होई असें

स्पेन देशीय लोकांचें बंड.

करण्याचें काम कोलम्बसानें दिलें होतें. त्याच्या मनांत मोठें पद प्राप्त व्हावें ह्मणून जी इच्छा होती ती केवळ हूडपणाची आणि अविचाराची होती. यामुळें आपले पदवीस अयोग्य अशा तामसी कृत्यांत तो निमग्न झाला. स्वदेशीय लोकांनीं अशा कुमार्गास लागावें ह्मणून जीं त्यानें कारणें सांगितलीं तीं अप्रयोजक होतीं, व त्यांचा पायाही शुद्ध नव्हता. **कोलम्बस** आणि याचे दोघे बंधु हे उन्मत्त आणि कडक आहेत असा त्यानें यांजवर आरोप ठेविला; आणि या देशामध्यें स्वतंत्र राज्य स्थापण्याचें यांचें धोरण दिसत आहे असें

असा मार्ग धरायास त्या बंडाचा नाईक रोल्दान यानें सांगितलेलीं कारणें.

उठविलें. त्यानें दुसरें असें बालंट घेतलें कीं **स्पेन** देशाच्या लोकांतून थोडेसे लोकांस क्षुधा आणि श्रम यांहींकरून मारून टाकावें. ह्मणजे, बाकीचे लोक सहज आपल्या ताब्यांत येतील असा याचा मनसुबा आहे. आणखी त्यानें असें दर्शविलें कीं, **कास्तील** एथील लोकांस, **जिनोवा** देशांतील जे हे तिघे साहसी लोक यांचे गरीब आणि सोशीक असे गुलाम होऊन राहणें हें अयोग्य होय. ज्या संकटांचा भार मनुष्यांस सोसावा लागतो तीं संकटें अधिकाऱ्याच्या गैरवर्तणुकीमुळें उत्पन्न झालीं असें ह्मणायाची त्यांस आवड असत्ये, आणि परदेशाची शक्ति व वर्चस्व हीं सर्व देशांचे डोळ्यांत सलत असतात; ह्मणून **रोल्दान** याच्या आंगीं दुसऱ्यास वश करून घेण्याचा जो गुण असे त्याच्या योगानें त्याच्या देशचे लोकांच्या मनांत त्याचें सांगणें पक्कें ठसलें. तो गृहस्थ अब्रूचा आणि

रोल्दानास पुढें करून दंडवाले

मोठ्या पदवीचा होता यामुळें त्याच्या सांगण्याचें वजनही पडलें. **स्पेन** देशाच्या बहु-

तेक लोकांनीं तो आपला पुढारी केला, आणि **अदेलान्तादो** व त्याचा भाऊ या उभयतांवर शस्त्र धरून त्यांनीं राजसामग्रीचें कोठार जबरीनें घेतलें, आणि **सन्त दोमिंगो** एथील किल्ला अवचित जाऊन घ्यावा याविषयीं प्रयत्न आरंभिला; परंतु **दोन देईगो कोलम्बस** याच्या सावधगिरीनें व धैर्यानेंच त्याचा बचाव झाला; आणि त्या बंडवाल्यांस **खारागुआ** प्रांतामध्यें जाण्याचें प्राप्त पडलें. ते तेथें गेल्यावर त्यांनीं स्वतांच **अदेलान्तादो** याचा अधिकार न मानण्याचें आरंभिलें असें नाहीं, तर **इन्दिअन** लोकांसही त्यांच्या अमलाखालीं राहूं नये ह्मणून भर दिली.

राजसामग्रीचें कोठार जबरीनें घेतात.

ते खारागुआ या प्रांतांत जातात.

ज्या वेळेस **कोलम्बस सन्त दोमिंगो** एथें येऊन उतरला त्या वेळेस त्या लोकांच्या स्थितीमध्यें कांहीं धरबंदच राहिला नव्हता. यानें **कानेरी** बेटांहून जीं तीन तारवें पुढें पाठविलीं होतीं तीं अद्याप येऊन पोंहोंचलीं नाहींत असें पाहून यास परम आश्चर्य वाटलें. त्या तारवांवरचे खलाशी लोक गलबतें चालविण्याच्या कामांत प्रवीण नव्हते, आणि पाण्याच्या प्रवाहास जोरही फार होता, सबब तीं तारवें **सन्त दोमिंगोच्या** पश्चिमेस सुमारें १६० मैलांपलिकडे झुकलीं त्यामुळें **खारागुआ** या प्रांतांतील बंदरीं त्यांस विसावा घेण्याकरितां येणें प्राप्त पडलें. तेथेंच **रोल्दान्** आणि त्याचे फंद करणारे लोक जाऊन राहिले होते. **रोल्दान्** यानें **अदेलान्तादो**-वर जें बंड केलें होतें तें त्या नौकाधिपतींस मोठ्या सावध-

यानें कानेरी बेटांहून जी तीन तारवें पाठविलीं होतीं तीं वाऱ्यानें झुकून खारागुआ एथें येऊन लागतात.

गिरीनें कळूं दिलें नाहीं. त्या लोकांचा विश्वास आपणावर बसावा याकरितां **रोल्दान्** यानें पराकाष्ठेची युक्ति खर्चून त्यांच्या मनांत असें भरवून दिलें कीं, नवीन ठाणें वसविण्याकरितां जे तुह्मी आपले बराबर लोक आणिले आहेत त्यांस एथील किनाऱ्यावर उतरवावें, ह्मणजे ते खुषकीच्या वाटेनें **सन्त दोमिंगो** एथें जातील. त्यांनीं आपल्या सांगण्याचा स्वीकार करावा ह्मणोन त्यांजवर शक्क चालवायास **रोल्दानास** बहुत कारणें सांगावीं लागलीं नाहींत. हे लोक **स्पेन** देशांतील बंदिवान लोकांमधील गाळ होते. आळशीपणा, अनाचार, आणि उद्धतपणाचीं कृत्यें, हीं त्यांच्या पुरीं माहितीचीं होतीं, आणि बहुतकरून त्यांच्या सवईतील रहाटीप्रमाणेंच जी ही उपजीवन करण्याची वृत्ति होती तीच त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें पुनः धरली. त्या नौकाधिपतींनीं वेळ टळून गेल्यावर आपल्या मनुष्यांतून इतके जण आपण एथें उतरलों हें मूर्खपण आहे असें जाणून ते **सन्त दोमिंगो** एथें जाण्यास निघाले, आणि **कोलम्बसाच्या** पाठीमागून थोड्या दिवसांनीं तेथील बंदरीं जाऊन पोहोंचले. परंतु त्यांच्या जलपर्यटनास फार दिवस लागल्यामुळें, त्यांच्या जवळची सामग्री बहुतेक खपून गेली, तेणेंकरून ठाणेगार लोकांस पुरावा थोडा सांपडला.

रोल्दान त्या तारवांतील लोकांस वश करून घेतो.

कानेरी बेटांतून पाठविलेलीं तीन तारवें पाठीमागून येऊन पोंचतात.

अशा हिंमतदार, आणि साहसी लोकांची टोळी **रोल्दानास** मिळाली, तेणेंकरून त्याचें सर्वांस भय वाटूं लागलें; आणि तो मागण्याही मोठमोठ्या मागूं लागला. त्याची कृतघ्नता पाहून **कोलम्बस** जरीं फार क्रुद्ध झाला

होता, आणि त्याच्या लोकांच्या दांडगाईमुळें जरीं यास फार संताप आला होता, तथापि यानें युद्धाची त्वरा केली नाहीं. आपसांत लढाई चेतीवण्याच्या कल्पनाही मनांत आणायास **कोलम्बस** थरत भीत असे; कारण कीं जरीं त्या लढाईंत कोणताही पक्ष प्रबळ झाला तरीं एकदा साधारण शत्रु येऊन दोघांचाही नाश करून टाकी, इतका उभयपक्षीं शक्ति आणि बल यांचा ऱ्हास होतो, असें हा समजत असे.

बंडवाल्यांबराबर लढाई न करण्याचीं कारणें.

त्याच वेळीं **कोलम्बसानें** असें लक्षांत आणिलें कीं, ज्या अविचारी बुद्धीनें व तैषानें बंडवाल्यांनीं शस्त्रें धरिलीं, त्या दोनही गोष्टी अद्यापि **रोल्दान** यास अनुसरून जे लोक आहेत, त्यांच्या मनांत इतक्या खवळताहेत कीं, तींहींकरून त्यांतील बहुतेक तर उलटून पडले आहेत, आणि सर्वांनींच चाकरीविषयीं सुस्तपणा धरिला आहे. अशा कल्पना मनांत येतांच सर्वांच्या कल्याणाकरितां व आपलें स्थान राखण्याकरितां यानें लढाई करण्याचें सोडून तह करण्याचें योजिलें. यानें यथायोग्य वेळीं सर्वांस जाहिर केलें कीं, जो पुनः आपल्या कामावर येईल, त्यास त्याच्या अपराधाची क्षमा होईल. तेणेंकरून बंडवाल्यांपैकीं बहुतेकांच्या मनांत ती गोष्ट ठसली.

त्यांचे बराबर जी कबुलात केली ती विषयीं.

**स्पेन** देशास परत जाण्याची मोकळीक ज्यांस पाहिजे असेल, त्यांस ती देण्याची कबुलात करून, जे आजारीपणामुळें व निराशेमुळें नवीन देशास फार कंटाळले होते त्या हतभाग्य साहसी पुरुषांस **कोलम्बसानें** मोहून घेतलें. **रोल्दान** यास पुनः पूर्वींच्या कामावर नेमण्याचें वचन देऊन त्याच्या गर्वाचा परिहार केला. रो-

**ल्दान** यानें आपले बरोबरच्या लोकांच्या कल्याणार्थ ज्या मागण्या मागितल्या होत्या त्या कबूल करून **कोलम्बसानें** त्या लोकांची द्रव्यविषयक इच्छा तृप्त केली. असे त्रासदायक करारनामे करून क्रमाक्रमानें रक्तस्राव केल्यावांचून, ज्या घातकी कटापासून ठाण्याचा नाश होईल, असें भय होतें, तो कट मोडून टाकिला, आणि सुरळीत क्रम, व्यवस्थेचें राज्य, आणि स्वस्थता, हीं पुनः चालू केलीं.

कबुलाती प्रमाणें याचें करणें.

बंडवाल्यांबरोबर ही कबुलात केली होती ह्मणून, त्यांस त्या बेटांतील वेगळ्या वेगळ्या प्रदेशांत जमीनी दिल्या, आणि प्रत्येक इलाख्यांतील **इन्दिअन** लोकांस त्या नवीन धन्याच्या उपयोगाकरितां जमीनीच्या कांहीं प्रदेशांत कृषिकर्म करावयास सांगितलें. निर्जीव आणि अशक्त अशा ठाण्यांमध्यें ती योजना कितीही उपयोगाची असो तथापि तीमुळें **स्पेन** देशांतील लोकांस, जे **इन्दिअन** लोक त्यांनीं आपल्या सर्व वसाहतींचे जागामध्यें ठेविले होते, ते वांटून घेण्यचें प्राप्त झालें,

हिस्पान्योला एथील बंडापासून झालेले वाईट परिणाम.

यामुळें त्या हतभाग्य **इन्दिअन** लोकांवर असंख्य अनर्थ गुजरले, आणि त्यांस अतिशय क्लेश होण्याजोगे जुलूम सोसावे लागले. **हिस्पान्योला** एथील बंडापासून एवढाच वाईट परिणाम झाला असें नाहीं, तर **कोलम्बसास** त्या महाखंडामध्यें पुढें शोध करायासही प्रतिबंध झाला कारण त्यास आपला भाऊ **अदेलान्तादो**, व ज्यांस हें काम सांगायाचें याचे मनांत होतें ते खलाशी लोक, यांस आपला जीव राखण्याकरितां जवळ ठेवून घेणें प्राप्त पडलें. या कृत्यांतून मोकळा होतांच हा जलपर्यटन करीत असतां

जें दर दिवसाचें वृत्त यानें लिहून ठेविलें होतें तें, व नवीन शोधून काढिलेल्या देशांचें वर्णन, आणि ज्या समुद्रकिनाऱ्यावरून हा गेला होता त्याचा नकाशा, तसेंच तद्देशीय लोकांबरोबर व्यापार करून त्यांच्यापासून जें सोनें, मोत्यें आणि मोठमोठ्या किंमतीचे व पाहण्यासारिखे पदार्थ मिळीवले होते त्यांचे नमुने, हे सर्व भरून आपल्या गलबतांतून कांहीं गलबतें **कोलम्बसानें स्पेन** देशास पाठविलीं. त्या वेळेसच यानें **हिस्पान्योला** एथील बंडाची सर्व हकीकत लिहून पाठविली. त्यांत फौजेंतील दंगेखोर लोकांनी ठाणें मोडून जाई इतका मोठा दंगा केला, आणि आपल्या अमलदारावर निष्कारण उठून नवीन शोध व सुधारणूक करण्याच्या यत्नास आडफांटा आणिला, असा त्यांजवर आरोप ठेविला, आणि त्या बेटांतील राज्याची चांगली व्यवस्था राखण्याकरितां, व सांप्रत काळीं दबलेलें बंड कदाचित् पहिल्यापेक्षां अधिक बळावून उपस्थित होईल तें समूळ नाहींसें करण्याकरितां, कितीएक कायद्यांविषयीं बोलणें लाविलें. **रोल्दान** आणि त्याचे साथी ह्यांनीं त्याच तारवांमध्यें आपल्या वर्तणुकेचा गुन्हा पदरीं घेऊन माफी मागायास, व **कोलम्बस** आणि याचे भाऊ यांजवर उलटा आरोप ठेवून **स्पेन** देशास लिहून पाठवावयास आळस केला नाहीं. **स्पेन** देशाची कीर्ति व्हावी आणि **कोलम्बसाचें** कल्याण व्हावें असा योग नव्हता यामुळें, **कोलम्बसा**वरील आरोप **फर्दिनान्द** आणि **इसाबेल्ला** यांचे दरबारांत खरा वाटून अकल्पित गोष्टी घडून आल्या.

हा नवीन देश शोधून काढून त्यांतील द्रव्य वगैरे स्पेन देशास पाठविलीं.

बंडवाले लोक हा व याचे भाऊ यांविषयीं भलतें-च सरकारास लिहून पाठवितात.

परंतु या गोष्टी सांगण्याच्या अगोदर दुसऱ्या कित्तीएक गोष्टी लक्ष लावण्याजोग्या आहेत, कारण त्या फार उपयोगाच्या व नवीन खंडाचे इतिहासाविषयींच्या आहेत याजकरितां त्यांचा विचार करणें उचित आहे. **कोलम्बस** पश्चिमेस अनुक्रमानें जलपर्यटन करीत असतां **पोर्त्तुगाल** देशामध्यें नवीन नवीन शोध करण्याची हौस मंदावली नाहीं. ती हौस या राज्यांतच प्रथम वळावली नंतर चोंहींकडेस प्रसृत झाली. ज्या **कोलम्बसाच्या** बोलण्याचा आपण प्रथम अविचारानें निषेध केला, त्यास सिद्धि प्राप्त झाली, हे विचार मनांत आल्यावरून **पोर्त्तुगीज** लोक केवळ आपणास धिक्कारून खिन्नच होऊन बसले असें नाहीं, तर **कोलम्बसा**पेक्षांही मोठमोठीं कृत्यें करून त्याजवर तोड करावी अशी ईर्षा, व आपल्याकडून चूक झाल्यामुळें आपल्या देशचें जें नुकसान झालें त्यास भर घालावी अशी इच्छा, त्या सर्वांनीं आपल्या मनांत धरिली. या हेतूनेंच **इमान्युएल**, ज्याची त्याच्या पूर्वजांसारिखीच अचाट कल्पनाशक्ति होती, त्यानें **केप गुड होपच्या** वाटेनें **ईस्त इन्दीज** एथें जाण्याकरितां रस्ता काढण्याची जी त्याच्या पूर्वजांनीं मोठी मसलत योजिली होती, तीच पुढें चालू केली, आणि तो सिंहासनारूढ होतांच त्यानें तेथें जाण्याकरितां आरमार सिद्ध केलें, व त्याचा अधिकार **वास्को दि गामा** यास दिला. तो गृहस्थ कुलीन होता, आणि त्याच्या अधिकारास शोभण्याजोगे त्याच्या अंगांत सद्वासना, शाहणपण, आणि शौर्य,

पोर्त्तुगीज लोक कोलम्बसास सिद्धि प्राप्त झालेली पाहून खिन्न होऊन न बसतां नवीन शोध करण्याचा क्रम चालवितात.

वास्को दिगामा कोणत्या प्रकारचा मनुष्य होता याविषयीं.

हे गुण होते. नौका चालविण्याच्या विद्येचा जेव्हां नुक्ताच आरंभ झाला होता तेव्हां नवीन शोध करण्याकरितां जीं तारवें तयार केलीं होतीं, त्याप्रमाणें ह्याचें आरमारही अल्पस्वल्पच होतें. त्यांत सारीं तीन तारवें होतीं, तीं ज्या कामाकरितां तयार केलीं होतीं त्या कामास जितकें सामानसुमान व सैन्याचें बळ पाहिजे तितकें त्यांजवर नव्हतें. त्या काळच्या **युरोपिअन** लोकांस नियमित दिशेचे वारे आणि मोसुमाचे वारे यांची गति माहीत नव्हती. त्या वायूमुळें **अतलान्तिक** महासागरांत, व **आफ्रिका** आणि **हिंदुस्थान** यांच्या मध्यभागीं जो समुद्र आहे त्यांत, कांहीं ऋतूंत तारवें जाण्यास फार सुलभ पडतें, आणि कांहीं ऋतूंत फार संकट पडतें एवढेंच नाहीं, पण मुळींच तारवें चालवितां येत नाहींत. **गामा** ज्या वेळेवर निघाला ती वेळ सर्व वर्षामध्यें फारच प्रतिकूळ होती. हा १४९७ त जुलई महिन्याच्या ९ वे तारिखेस **लिस्बोन** एथून तारवें हाकारून दक्षिणेस चालिला. तो नवेंबर महिन्याच्या २० वे तारिखेस **केप गुड होप** एथें येऊन पोंहोंचला. त्याच्या अगोदर यास सतत चार महिनेपर्यंत तोंडचा वारा खावा लागला. परंतु या ठिकाणीं त्या वाऱ्याचा जोर कमती होऊं लागला. नंतर ज्या दिवशीं वारा अनुकूळ होता त्या दिवशीं **गामानें** त्या भयंकर भूशिरास वळसा घातला, आणि **आफ्रिका** खंडाच्या कांठानें ईशानी कडेस आपल्या गमनाचा रोख धरिला. इतके दिवस या भूशिरापर्यंत गलबतें चालविण्याची हद्द होती. **गामा** कितीएक बंदरीं जाऊन

हा ज्या वेळेस निघाला त्या वेळेस वारा तोंडचा होता.

हा केप गुडहोप यास वळसा घालून ईशानीकडे होतो.

उतरला, आणि अनेक प्रकारचीं साहस कृत्यें करून **मेलिंदा** शहरापुढें येऊन नांगर टाकिला. **पोर्त्तुगीज** इतिहासकर्ते, त्याचें आचरण व शौर्य यांची प्रौढ परंतु वास्तव प्रशंसा करून, त्या साहसी कृत्याचें वर्णन करितात. **सेनेगाल** नदीपासून **झांजेबारच्या** हद्दीपर्यंत **आफ्रिका** खंडाच्या किनाऱ्यावरून जे मोठमोठे देश पसरलेले आहेत त्यामधील लोकांची जात रानटी, अज्ञानी, अक्षरशत्रू, आणि कलाकौशल्य व व्यापार यांमध्यें गैरमाहीत, अशी होती; याशिवाय त्यांचे तोंडवळे व आंगाचा वर्ण तशाच रीतीभाती **यूरोप** खंडांतील लोकांपेक्षां भिन्न होत्या, असें **पोर्त्तुगीज** लोकांच्या दृष्टीस पडलें. एथून ते जसजसे पुढें गेले तसतशी उत्तरोत्तर मनुष्यांची प्रकृति बदलत व सुधारत चालली हें पाहून, त्यांस जो आनंद झाला तो वर्णितां येत नाहीं. तो प्रकार असा कीं, त्यांस **आशिआ** खंडांतील लोकांसारिखेच चेहेरे जिकडे तिकडे दिसूं लागले, व सुधारणुकीचीं चिन्हें, तशीच विद्या, आणि मुसलमानी धर्म, यांची संस्थापना झाली आहे, आणि व्यापारही बराच चालू झाला आहे असेंही त्यांनीं पाहिलें. त्या वेळेस **मेलिंदा** बंदरांत **हिंदुस्थानां**तील कितीएक तारवें होतीं. **गामास** कार्यसिद्धीविषयीं पुरा भरवसा येऊन तो पुढें जलपर्यटन करीत चालला, आणि १४९८ चे मे महिन्याच्या २२ वे तारिखेस **मलबार** किनाऱ्यावर **कालिकोट** एथें मुसलमान सुकाणु धरणाराच्या मदतीनें येऊन पोंहोंचला. आजपर्यंत **यूरोपीअन** लोकांस जे अपुर्ते लेख मिळाले होते त्यांवरून,

यास कार्य सिद्धीविषयीं भरवसा वाटून हा आपलें पर्यटन पुढें चालवितो.

कालिकोट एथें आपल्यावर तेथील संपत्ति वगैरे पाहून यास

**फार आनंद होतो.**

अतिशय उत्तमावस्थेप्रत पावलेला जो हा देश एथील संपत्ति, दाट वस्ति, लागवड, उद्योग, आणि कलाकौशल्यें, यांविषयीं जी कल्पना यानें बांधिली होती, ती प्रत्यक्ष त्या गोष्टींचें दर्शन होतांच कांहींच नव्हे अशी झाली. परंतु त्याजवळ तेथें ठाणें घालण्यापुरतें सैन्य, अथवा प्राप्ति होण्यासारिखा व्यापार करायास चांगला माल नव्हता ह्मणून, नौकागमनविद्या प्रथम निघाल्यापासून जीं पर्यटनें आजपर्यंत झालीं त्या सर्वांत फार दिवस लागलेलें, आणि परम कठीण, असें जें आपण पर्यटन केलें, त्यांत सिद्धि प्राप्त झाली ही बातमी घेऊन, **पोर्तुगाल** देशास त्वरित परत गेला. तो **लिस्बोनचें** बंदर सोडल्यापासून दोन वर्षें दोन महिने आणि पांच दिवसांनीं १४९९ त सप्तंबर महिन्याच्या १४ वे तारिखेस तेथें जाऊन उतरला.

**पूर्वी नवीन शोध करण्याविषयींची उमेद.**

याप्रमाणें जितक्या भूगोलावर वस्ति आहे तितक्या प्रदेशाची स्थिति कोणत्या प्रकारची आहे, हा शोध करण्यांत पंधराव्या शतकांत जितका उद्योग मनुष्याच्या हातून झाला तितका त्या शतकाच्या पूर्वींच्या सर्व काळांत झाला नाहीं. नवीन देश शोधून काढण्याची उमेद प्रथम हलकी आणि सावधगिरीची असे, तेणेंकरून तिचा फार प्रसार झाला नाहीं, आणि तीपासून जितके प्रयत्न झाले तितके भित्रपणाचे व संशयाचे होते. त्याच उमेदीस सिद्धि होऊं लागल्यामुळें हुशारी येऊन तीपासून मोठ्या पराक्रमाच्या आणि साहसाच्या गोष्टी घडूं लागल्या.

**सांप्रत कालची नवीन शोध करण्याची उमेद.**

जसजशी ती उमेद वाढूं लागली तसतशी बळावत चालली; आणि शेवटीं ती इतक्या त्वरेनें व सपाट्यानें वृद्धि-

गत झाली, कीं तेणेंकरून अज्ञान व भीति यांमुळें मनुष्याचे हातून आजपर्यंत जे मोठमोठे शोध होत नसत ते होऊं लागले. **पोर्तुगीज** लोकांस **आफ्रिकेच्या** किनाऱ्यावरून **केप नोन** पासून **केपदि वेर्द** पर्यंत जातां जातां बहुतकरून ५० वर्षें लागलीं. **केपदि वेर्द** हें **केप नोनच्या** दक्षिणेस सारें १२ अंशांवर आहे. तीस वर्षांपेक्षां कांहीं अल्प काळांत विषुववृत्तेच्या पलीकडील गोलार्धांत जाऊन, ते **केपदि वेर्द**पासून ४९ अक्षांशांचे अंतरावर जें **आफ्रिकेचें** दक्षिण टोंक तिकडे गेलें. त्याच शतकाच्या शेवटच्या सात वर्षांत पश्चिमेकडेस एक नवीन खंड शोधून काढिलें. तें त्या काळीं मनुष्यमात्रास पृथ्वीवरील जितके प्रदेश माहीत होते त्या सर्वांपेक्षां कमी विस्तीर्ण नव्हतें. पूर्वेस जे समुद्र व देश अज्ञात होते तेही शोधून काढिले; आणि **यूरोप** खंड आणि **हिंदस्थानां**तील समृद्ध देश यांमध्यें व्यवहार चालू झाला. ह्या व्यवहाराची फार दिवसांपासून इच्छा होती, परंतु तो कालपर्यंत तो गुप्तच होता. आजपर्यंत ज्या गोष्टी थोर आणि वैभवाच्या मानिल्या होत्या त्या, अशा आश्चर्यकारक आणि असंभविक गोष्टींवरोबर ताडून पाहतांच, फिक्या पडून अदृश्य झाल्या. मोठमोठे विषय आपोआप दृष्टिगोचर होऊं लागले. त्या विषयांच्या दर्शनानें मनुष्याच्या मनास उत्तेजन येऊन, आनंद वाटून, तें मोठ्या हौसेनें त्याच्याकडेस लागलें, आणि त्यानें आपल्या ज्या उत्तम शक्ति त्या नवीन दिशेकडेस खर्चिल्या. ती उमेद **स्पेन** देशा-

प्राचीन आणि नवीन गोष्टींचा तुलना केली असतां जमीन अस्मानाचें अंतर दृष्टीं पडतें.

मध्यें नवीनच उत्पन्न झाली होती, तथापि लवकरच अतिशयें वृद्धिंगत झाली. त्या राज्यामध्यें नवीन देश शोधून काढण्याविषयीं जितके प्रयत्न झाले तितके सर्व सरकारी खर्चानें आजपर्यंत एकट्या **कोलम्बसानें** केले. परंतु सांप्रत **कोलम्बस** ज्या देशीं गेला होता त्याचें यानें जें उत्तम वर्णन केलें त्यास, व तेथील संपत्तीचे जे नमुने दाखविले त्यांस भुलून तेथील उमेदवार लोकांनीं आपल्या खर्चानें आरमार तयार करून नवीन देश शोधून काढा-यास कबूल केलें. इकडे **स्पेन** देशच्या दरबारचा वसूल मुळीं थोडा असून तो नवीन देश शोधून काढण्याच्या स्वा-रींत खर्च झाला होता, आणि जरीं या शोधापासून पुढें फार नफा होईल अशी आशा उत्पन्न झाली होती, तथापि सांप्रतच्या खर्चाप्रमाणें नफा झाला नाहीं, ह्मणून नवीन शोध करण्याचें ओझें आपल्या प्रजेवर घालावें अशी या दरबाराची इच्छा झाली होती. सर्व राज्यास कांहीं नफा होण्याचा विचार वृद्धिंगत करण्याकरितां, कल्पक लोकांचा लोभ, कल्पनाशक्ति, व प्रयत्न, यांस, साधनीभूत करण्याची संधि, त्या दरबारानें मोठ्या आनंदानें साधिली. परंतु या विचारांपासून त्या लोकांस नफा होण्याचा संदेहच होता. अशा प्रकारचें बोलणें **आलोन्सो दि ओजेदा** यानें लाविलें. तो शूर आणि चपल काम-गार होता, व तो **कोलम्बसाच्या** दुसऱ्या स्वा-रींत याच्या बराबर गेला होता, तो गृहस्थ पदवीचा आणि अब्रूचा होता सबब **सेवील** एथील व्यापारी लोक त्यास फार मानीत असत. या गृहस्थास पर्यटन करण्याकरितां

स्पेन देशचे लोक नवीन शोधांचें काम जातीच्या खर्चावर पत्करितात.

यांनं प्रथम ओजेदा बोलणें लाविलें.

सरकरचा हुकूम मिळत असल्यास आह्मीं चार तारवें तयार करून देतों असें त्यांनीं पत्करिलें. हें काम सरकारच हिताचेंच होतें; यांत **बादहोसचे** बिशप च्या सबल आश्रयानें अनायासेंकरून सि झाली. **कोलम्बसाचें** अनुमत न घेतां त्यानें १४९२ मध्यें करारनामा करून अक्त्यार व हक्क मिळविले होते त्यांचा विचार न करित **ओजेदा** यास नवीन खंडांत जावयास परवानगी दिली त्यास यथास्थित मार्ग कळावा ह्मणून त्या बिशपानें **कोलम्बसाच्या** शेवटल्या पर्यटनाचें दर दिवसाचें वृत्त आणि यानें शोधून काढिलेल्या देशांचे नकाशे त्यास दिल्हे. **ओजेदा** यानें आपलें पर्यटन नवीन रस्ता धरून चालविलें नाहीं, तर तो लाचार होऊन **कोलम्बसाचाच** रस्ता धरून मे महिन्यांत **पारिआच्या** किनाऱ्यावर येऊन पोहोंचला; आणि तद्देशीय लोकांबरोबर व्यापार करूं लागला नंतर पश्चिमेकडेस वळून **केप दि वेला** एथपर्यंत गेला आणि त्या किनाऱ्यावरून ज्या ठिकाणापर्यंत **कोलम्बस** गेला होता त्याच्या पलीकडे बराच लांब गेला. हा देश महाद्वीपाचाच भाग आहे असें जें **कोलम्बसाचें** मत त्याचा प्रत्यय घेऊन अक्टोबर महिन्यांत **ओजेदा हिस्पान्योलाच्या** वाटेनें **स्पेन** देशास परत आला. या पर्यटनामध्यें यास देशशोधक अशी थोडीशी कीर्ति मिळाली; परंतु या स्वारीकरितां ज्यांनीं पैशाची उभारणी केली होती त्यांस यापासून कांहीं नफा झाला नाहीं.

नें सरकारांत मान्य होऊन नों पर्यटन करितो.

या पर्यटनामध्यें **फ्लोरेन्स** एथील **अमेरिगो वेस्पुची**

त्याचे बरोबर अमेरिगो वेस्पुची गेला होता.

तो मोठ्या युक्तीनें महाद्वीप शोधून काढिल्याचें यश आपण घेतो.

या नांवाचा एक गृहस्थ **ओजेदा** बरोबर गेला होता, त्याच्या कडेस कोणतें काम असे तें निश्चितपणें माहीत नाहीं, परंतु तो खलाशाच्या कामांत मोठा माहितगार व नौकाशास्त्रोपयोगी सर्व विषयांमध्यें फारच कुशल होता, ह्मणून या समुद्रपर्यटनामधील सर्व कृत्यें चालविण्यांत त्यास प्रमुख करावा असे त्याचे सोबती स्वसंतोषानें मानीत इतका मोठेपणा यास मिळाला होता असें दिसतें. यानें परत येऊन लवकरच आपल्या पराक्रमाचें आणि नवीन शोधाचें वर्णन स्वदेशीय लोकांतून कितीएकांस विदित केलें, व प्रवासकर्त्ता काय तो मी अशा गर्वानें आपलीं महाकृत्यें मोठमोठीं दिसत असें करण्यास श्रम करून, त्यानें मोठ्या कुशलतेनें व खात्रीनें नवीन खंडामध्यें महाद्वीप प्रथम शोधून काढण्याचें यश आपण घेतलें असें दिसून येई अशी आपली गोष्ट बनाविली. हें **अमेरिगो** याचें वर्णन मोठ्या कौशल्यानें आणि अलंकारिक रीतीनें लिहिलें होतें. त्यांमध्यें याच्या समुद्रपर्यटनाची मनोरंजक गोष्ट, आणि स्वतःसिद्ध पदार्थांविषयीं जीं याचीं समर्पक भाषणें, तेथील लोक, आणि जे देश यानें पाहिले होते त्यांच्या रीतीभाती हीं सर्व लिहिलीं होतीं. नवीन खंडांतील भागांचें प्रथमतः छापिलेलें वर्णन काय तें हेंच होतें, आणि यापासून मनुष्यमात्राची नवीन व अद्भुत अशा गोष्टींविषयीं जी इच्छा ती तृप्त होईल असें होतें, ह्मणून त्याचा त्वरित प्रसार झाला, आणि मोठ्या आश्चर्यानें सर्व तें वाचूं लागले. जो देश **अमेरिगो** यानें शोधून काढिला

असेल असें कल्पिलें होतें, त्यास हळू हळू याचेंच नांव पडत चाललें. मनुष्याचे मनाचा कल बहुधा यथार्थ व कारण समजण्याकडेस नसतो; यामुळें ही चुकी तशीच राहिली. सर्व लोकांच्या संमतानें भूगोलावरील ह्या नवीन भागास **अमेरिका** हें नांव दिलें. या भाग्यवान् ठकानें धिट्टाईचीं मिषेंकरून ज्यानें हें नवीन खंड शोधून काढिलें होतें त्याच्या कीर्तीचें हरण केलें. **अमेरिगो** याच्या नांवानें **कोलम्बसाचें** नांव मागें पाडिलें; आणि अशा अन्यायाच्या कृत्याविषयीं मनुष्यानें खेद मात्र करावा, परंतु जी चुकी बहुत कालपर्यंत चालत आली ती नीट करण्याचा समय आतां राहिला नाहीं.

यावरून त्याचें च नांव त्या महाद्वीपास पडतें.

याच वर्षी नवीन देश शोधून काढण्याविषयीं दुसरें एक जलपर्यटन झालें. **कोलम्बसानें स्पेन** देशामध्यें नौकागमन व्यापाराची हौस उत्पन्न केली, एवढेंच नाहीं, परंतु या नवीन वर्तनक्रमामध्यें ज्यांनीं आपलें नांव गाजीवलें असे जे सर्व पहिले उमेदवार त्यांस याच्याच शिक्षेचें वळण होतें, आणि याचा फर्मा उतरण्याजोगी त्यांस युक्ति व माहिती याच्याच जलपर्यटनांत प्राप्त झाली होती. **आलोन्सो नीन्यो** जो **कोलम्बसाच्या** हाताखालीं याच्या शेवटच्या पर्यटनामध्यें चाकरीस होता तो, व **सव्हील** एथील व्यापारी **क्रिस्तोफर ग्वेरा** हे दोघे एक तारूं तयार करून **पारिआच्या** किनाऱ्यास गेले. हें जलपर्यटन, सर्वसाधारण, अथवा स्वदेशसंबंधी उद्देशापेक्षां स्वकीय लाभावर विशेष नजर ठेवून चालविलें असें

आलोन्सो नीन्यो याचें जलपर्यटन

याशसून दुसऱ्या लोकांस अशा कृत्यांत शिर-

दिसतें. **नीन्यो** आणि **ग्वेरा** ह्यांनीं जे शोध केले ते मोठ्या महत्वाचे होते असें नाहीं, परंतु त्यांनीं स्वदेशीं जें सुवर्ण आणि मोत्यें आणिलीं तेणेंकरून त्यांच्या देशचे लोकांस तशा महत्कृत्यांत शिरावें अशी इच्छा उत्पन्न झाली.

त्याची उमेद येथे.

नंतर लवकरच इसवी सन १५०० त जानेवारी महिन्याच्या १३ व्या तारिखेस **कोलम्बसाच्या** पहिल्या जलपर्यटनामध्यें जे याचे सोबती होते त्यांतून **विन्सेन्त यानेस पिंझोन** या नांवाचा एक गृहस्थ चार तारवें घेऊन **पेलास** एथून निघाला. तो मोठ्या धीटपणानें दक्षिणेकडे गेला, आणि विषुववृत्त उल्लंघन करायास **स्पेन** देशांतील लोकांतून यानेंच काय तें प्रथम धैर्य केलें. परंतु **माराण्योन** अथवा **आमझोन** लोकांची नदी इचे मुखाच्या पलीकडील किनाऱ्याच्या कोणत्याही प्रदेशावर तो उतरला नाहीं असें दिसतें. हे सर्व नौकागमन कर्ते यांनीं **कोलम्बसाचा** अशुद्ध सिद्धांत घेऊन त्यांनीं जे देश शोधून काढिले होते ते, विस्तीर्ण जो **हिंदुस्थान** देश त्याचेच भाग होत असें मानिलें.

पिंझोन याचें ता १३ माहे जानेवारी इसवी सन १५००.

**अमेरिका** खंडाच्या ज्या फलद्रूप प्रांतापर्यंत **पिंझोन** गेला होता त्या प्रांताचा पंधराव्या शतकाच्या शेवटल्या वर्षीं अधिक चांगला शोध लागला. **ईस्त इन्दीज** एथें जें **गामानें** जलपर्यटन केलें त्यांत सिद्धि प्राप्त झाल्यावरून **पोर्तुगाल** देशच्या राजास व्यापार चालवायास व देशही जिंकून घेण्यास समर्थ असें आरमार तयार करायाची उमेद आली. तें

पोर्तुगीज लोकांचे शोध.

आरमार तयार केल्यानंतर त्यानें त्याचा अधिकार **पेद्रो आल्वरेज काब्राल** यास सांगितला. **आफ्रिका** खंडाच्या किनाऱ्यावरून गेलें असतां अस्थिर वाऱ्याच्या झुळका लागून, अथवा वारा वारंवार बंद पडून, आपल्या पर्यटनास प्रतिबंध होईल, अशी याची खात्री होती म्हणून, तो किनारा चुकविण्याकरितां **काब्राल** भरसमुद्रांत होऊन पश्चिमेसच झाला, आणि विषुववृत्ताच्या पलीकडे दाहा अंशांवर एका अज्ञात देशाच्या तीरावर आपण आलों असें पाहून यास फारच आश्चर्य झालें. आजपर्यंत न पाहिलेलें असें हें **अतलान्तिक** महासागरामधील बेट आहे असें यानें प्रथम कल्पिलें, परंतु कितीएक दिवसपर्यंत त्याच बेटाच्या काठानें जात असतां हा इतका विस्तृत देश कोण्या एका मोठ्या महाद्वीपाचा भाग असावा असें हळूहळू यास वाटूं लागलें. या दुसऱ्या कल्पनेस चांगला अधार होता, कारण कीं, हा देश सांप्रत ज्या दक्षिण **अमेरिकेंतील** प्रदेशास **ब्रेझील** असें म्हणतात त्या प्रांतांतीलच होता. तेथें हा उतरला, आणि तेथील जमीनीची फलद्रूपता व हवेचें आनुकूल्य फार चांगलें आहे असें मानून, यानें **पोर्तुगालच्या** सरकाराकरितां तो प्रांत हस्तगत करून घेतला; आणि अशा मोठ्या अतर्कित कृत्याचें इत्थंभूत वर्तमान लिहून **लिस्बोन** शहरास एक तारू रवाना केलें. **कोलम्बसानें** जो नवीन खंडाचा शोध लाविला तो शास्त्रविद्येकरून प्रकाशित, अनुभवसिद्ध आणि युक्तिसिद्ध, अशी जी याची स्फुरद्रूप कल्पनाशक्ति, तिच्या प्रयत्नानें झाला; आणि तो मोठ्या धैर्यानें व निग्रहानें चालविला होता. परंतु जो महान् उद्देश

ब्रेझील प्रांत त्याच्या हस्तगत होतो.

उपस्थित करून समाप्तीस नेला, असा मनुष्यें आपल्या बुद्धीचा प्रौढपणा मिरवितात, तो उद्देश, दैवयोगानेंही कदाचित् घडून येतो, असें **पोर्त्तुगीज** लोकांच्या या पर्यटनावरून दिसून येतें. कारण कीं, जरीं **कोलम्बसाच्या** चातुर्यानें मनुष्यांस **अमेरिका** खंडास नेलें नसतें तरीं **काब्राल** यानें दैवयोगानें थोड्या वर्षांनंतर त्यांस या विस्तीर्ण महाद्वीपाची माहिती करून दिली असती.

अपूर्व गोष्ट कदाचित दैवयोगानेंही घडून येत्ये.

**स्पेन** देशीय लोक व **पोर्त्तुगीज** लोक एका पाठीमागून एक अशीं पर्यटनें करून **कोलम्बसानें** जो पृथ्वीवरील प्रदेश त्यांस माहीत करून दिला होता त्याचा विस्तार आणि संपत्ती यांविषयीं प्रतिदिवशीं अधिकाधिक ज्ञान करून घेत होते; व इकडे **कोलम्बस** आपल्या चाकरीस योग्य अशी जी प्रतिष्ठा आणि स्वास्थ्य, यांचा उपभोग करण्यापासून दूर राहून, आपल्या ताब्यांतील लोकांचा हेवा, व दुष्ट बुद्धि, आणि ज्या सरकाराजवळ हा चाकरीस होता त्याची कृतघ्नता, यांपासून जितकीं संकटें प्राप्त होत, तितक्यांही बरोबर झुजत होता. **रोल्दाना**बरोबर एकी केल्यामुळें जरीं बंडवाल्यांचा कट मोडून त्याचें बळ कमी झालें होतें तरीं त्या बेटामधील कलहाचें बीज समूळ नाहींसें झालें नाहीं. ज्यांस **कोलम्बसाचें** करणें आवडलें नाहीं त्यांतून कितीएक याच्या ताब्यांत राहण्याचें नाकबूल करून शस्त्रेंच धरून बसले. तेव्हां त्यांच्या बंडाव्यास प्रतिबंध करण्याकरितां, व त्यांच्या अपराधांबद्दल शिक्षा करण्याकरितां **कोलम्बस** व याचे भाऊ

कोलम्बस व त्याचे भाऊ यांस बंडवाल्यांबरोबर लढाई करावी लागल्ये.

यांस पाळीपाळीनें लढाई करावी लागे. या गोष्टीपासून सतत उद्योग आणि काळजी उत्पन्न होई, त्यामुळें **स्पेन** देशच्या दरबारांत याचे शत्रु ज्या घातकी मसलती करीत त्यांकडेस **कोलम्बसास** नीट लक्ष ठेवायास सांपडत नसे. ज्यांस

त्यांतील कित्येक स्पेन देशास परत येतात.

**कोलम्बसाचा** कारभार फारच आवडत नसे त्यांतील पुष्कळ लोकांनीं, यानें **सन्त दोमिंगो** एथून जीं तारवें पाठविलीं होतीं त्यांवराबर **यूरोप** खंडास परत जाण्याची संधि साधिली होती असा जो त्यांचा शेवटचा सर्व आशांचा भंग झाला तेणेंकरून त्या हतभाग्य लोकांचा **कोलम्बसावर** जो राग होता तो पराकाष्टेचाच वाढला. त्यांचें दारिद्र्य

ते राजा व राणी यांस कोलम्बसाविषयीं गाऱ्हाणीं सांगून त्रास देतात.

आणि विपत्ति पाहून अंतःकरणांत दया उत्पन्न होई, तेणेंकरून ते **कोलम्बसावर** जे आरोप ठेवीत ते खरेसे वाटत, व ते जीं गाऱ्हाणीं सांगत त्यांत लोक मन घालीत. त्यांनीं आपणास दुःख देणाऱ्या गोष्टींचा तपशीलवार मजकूर, आणि **कोलम्बसा**वरील फिर्यादींचीं कलमें लिहून, **फेर्दिनान्द** आणि **इसावेला** यांस लागोपाठ अर्ज्या करून त्रास दिला. जेव्हां जेव्हां राजा आणि राणी दरबारांत दृष्टीस पडत तेव्हां तेव्हां त्या सभोवतीं ते लोक गोळा होऊन आपली जी बाकी थकली होती तिचा फडशा करावा ह्मणून फार जिकिरीनें कोलाहल करीत. याशिवाय ज्या पुरुषामुळें आपणास दुःखें भोगावीं लागलीं त्याचा सूड उगवण्यास आग्रहपूर्वक विनंती करीत; याप्रमाणेंच जेथें जेथें **कोलम्बसाच्या** मुलांची गांठ पडे, तेथें तेथें ते त्यांचा अपमान करीत, आणि **स्पेन** देशांतील सर्व संपत्ति ज्यामुळें धुतली गेली,

व एथील लोक ज्यामध्यें जाऊन मरणार मात्र असे नाश-कारक देश ज्यानें आपल्या घातकी अपूर्व दर्शनाच्या इच्छे-वरून शोधून काढिले, त्या धूर्त पुरुषाचीं तुह्मी पोरें, असा उपहास करीत. **अमेरिका** खंडापासून आलेले बंडखोर लोक **कोलम्बसाचा** नाश करावा ह्मणून जो असा धड-धडीत प्रयत्न करीत होते त्या प्रयत्नास, दरबारी लोकां-तील ज्या लोकांच्या मनांत **कोलम्बसाची** कार्यसिद्धि आणि मानमान्यता पाहून हेवा उत्पन्न झाला होता, व जे याच्या युक्तीस सर्वदा प्रतिबंध करीत असत, त्यांच्या गुप्त व नाशकारक कारस्थानामुळें चांगलें साहाय्य मिळालें..

या कृत्यास दर-बारी लोकांचें-ही साहाय्य मि-ळतें.

त्या गृहस्थांनीं **कोलम्बसावर** जे दोषारोप आणिले होते ते स्वसंतोषानें व पक्षपातानें ऐकण्यावि-षयीं **फर्दिनान्द** प्रवृत्त झाला. **कोलम्बसा-नें अमेरिका** खंडांतील संपत्तीविषयीं जरीं अतिशयोक्तीचीं वर्णनें केलीं होतीं तरीं, त्या खंडापासून आजपर्यंत इतकें अल्प द्रव्य आलें होतें कीं ते-णेंकरून जें आरमार तयार करून पाठविलें होतें त्याचा खर्च भागण्याचेंही फार दूर होतें. **स्पेन** देशानें महाप्र-यास केला त्याबद्दल, त्यास नवीन देश शोधून काढण्याची कीर्ति, आणि दूर दूरच्या देशावरावर व्यापार करण्याच्या लाभाची आशा, या दोन गोष्टी मात्र कायत्या प्राप्त झाल्या. परंतु नवीन खंड शोधून काढल्यामुळें जो प्रथमतः आनंद झाला होता तो काळगतीनें कमती झाला, व **फर्दिनान्द** याचें मन **कोलम्बसाच्या** कामाविषयीं उदासीन होतें, ह्म-णून त्याचें केवळ कीर्तीनेंच समाधान व्हावयाजोगें नव्हतें.

फर्दिनान्द को-लम्बसावरील दोषारोप पक्ष-पातानें ऐकतो.

त्या वेळेस व्यापाराच्या स्वरूपाविषयीं लोकांचें ज्ञान इतकें अल्प होतें कीं ज्या गोष्टींत तात्काल लाभ होत नसे, तींत कालेंकरून प्राप्ति होण्याची अथवा हळु हळु आणि सुमाराचें निष्पन्न होण्याचीं आशा ते अगदींच धरीत नसत. यास्तव **कोलंबसाच्या** साहस कृत्यांमुळें **स्पेन** देश खराबीस आला, आणि याच्या गैरवर्तणुकीमुळें व याच्या आंगीं राजकीय कारभार चालविण्याचें सामर्थ्य नाहीं यामुळें सुवर्णानें परिपूर्ण असा देश ज्यांनीं जिंकिला, त्यांस त्यापासून कांहींच प्राप्त झालें नाहीं, असें **फर्दिनान्द** यानें कल्पिलें. **कोलम्बसा**विषयीं जिच्या मनांत फार चांगली कल्पना होती, व जिनें यास सतत आश्रय दिला होता अशी जी **इसाबेल्ला** राणी तीही **कोलम्बसाचे** दावेदार लोकांचा मोठा समाज व त्यांची धिट्टाई पाहून फिरली; ज्यापक्षीं सर्वांच्या मनांत **कोलम्बसा**विषयीं वैमनस्य आलें आहे, त्यापक्षीं हें वास्तविक जीं यानें दुःखें दिलीं त्यांपासूनच उत्पन्न झालें असावें अशी शंका ती धरूं लागली. **बादहोस** एथील बिशप याचा आणि **कोलम्बसाचा** फार दिवसांचा द्वेष होता ह्मणून त्यानें **इसाबेल्ला** राणीच्या मनांतील शंकेस उत्तेजन देऊन ती दृढ करून टाकिली.

यानें स्पेन देश खराबीस आणिला असें तो मानितो.

इसाबेल्ला राणीचे मनांनहीं या विषयीं वाईट भरलें.

**कोलम्बसावर** जो असा आरोपांचा वर्षाव केला होता तो मनास आणावयास **इसाबेल्ला** राणीनें आरंभ करितांक्षणींच **कोलम्बसास** घातक अशी गोष्ट घडण्यांत आली. ती अशी; **कालाद्रावा** एथील नैट पदवींचा **फ्रांसिस दि बोवादिला** यास, **कोलम्बसा**-

त्याचा दुष्ट परिणाम.

च्या वर्तणुकीविषयीं शोध करण्याची, व **कोलम्बसावर** गैरवर्तणुकीचा आरोप लागू झाला असतां त्यास काढून त्याचें काम आपलेकडे करून घेण्याची, मुकत्यारी सांगून, **हिस्पान्योला** एथें जाण्याकरितां त्याची योजना केली. असा गैरचालीचा अधिकार सांगून ज्यास **कोलम्बसाच्या** चौकशीकरितां पाठविलें होतें, त्याचा **कोलम्बसास** दोषी ठरविण्यामध्येंच स्वार्थ होता, ह्मणून अशा दोषापासून मुक्त होणें **कोलम्बसास** फारच अशक्य होतें. यासमयींच **कोलम्बसानें** त्या बेटांतील सर्व कलह मिटवून टाकून **स्पेन** देशीय लोक आणि **इन्दिअन** लोक या उभयतांनीं आपले ताब्यांत स्वस्थ मुकाम्यानीं राहावें असें केलें होतें, आणि **स्पेन** देशच्या राजास पुष्कळ वसूल व लोकांस मोठे लाभ प्राप्त होण्यासारिखें, खाणींचें काम चालविण्याकरितां, व देशांमध्यें कृषिकर्म करण्याकरितां, सामानसुमान सिद्ध केलें होतें. अशीं जरीं कृत्यें केलीं होतीं तरीं त्यांच्या स्वरूपाकडे अथवा त्यांच्या मोठेपणाकडे लक्ष न देतां **बोवादिला** यानें त्या बेटांत जाऊन उतरलेल्या क्षणापासून **कोलम्बसास** गुन्हेगाराप्रमाणें वर्तविण्याचें निश्चयात्मक कारण उघड केलें. **बोवादिला** यानें **सन्तदोमिंगो** एथील **कोलम्बसाचें** घर हाताखालीं घातलें, यासमयींच **कोलम्बसानें** तेथें नसावें असा योग घडून आला होता; नंतर त्यानें **कोलम्बसाची** सर्व चीजवस्त अशा जबरीनें घेतली कीं, जसें कोणी ह्मणेल **कोलम्बसावरील** गुन्हा त्यानें पुर्तेपणीं शाबुदच करून दिला होता काय! याप्रमाणेंच तेथील किल्ला व राजाचीं कोठारें यांचें स्वामित्व जबरीनें आपणाकडे

याचे महत्कृत्यांकडे बोवादिला लक्ष देत नाहीं.

घेऊन लोकांनीं आपणास मुख्य अधिकारी मानावें अशी ह्यानें त्यांस सत्तेनें आज्ञा केली. **कोलम्बसानें** जे बंदिवान प्रतिबंधांत ठेविले होते त्यांस सोडून दिले, आणि यानें आपले वर्तणुकीचा जाब सांगण्याकरितां समक्ष यावें असा **कोलम्बसास बोवादिला** यानें हुकूम पाठविला, त्या हुकुमाबराबर राजापासून जें त्यास अधिकारपत्र मिळालें होतें त्याची नकल पाठविली, तींत **कोलम्बसानें बोवादिलाच्या** आज्ञेप्रमाणें वागावें असें लिहिलें होतें.

परंतु कोलम्बस आपणास जें उचित तें करितो.

यासमयीं **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** यांची कृतघ्नता व अन्याय या दोन गोष्टी जरीं **कोलम्बसा**च्या अंतःकरणास फार लागल्या, तरीं आपणास जें करणें उचित तें करायास यानें एक क्षणमात्रही मागें पुढें घेतलें नाहीं. हा यथायोग्य जरीं मौन्य धरून, आपल्या उभयतां प्रभूंची आज्ञा मान्य करून, त्यांनीं याची चौकशी करण्याकरितां ज्याचेकडे अधिकार सांगितला होता त्या जुलमी आणि पक्षपाती न्यायाधीशाच्या दरबारास लागलाच गेला. परंतु **बोवादिला** यानें **कोलम्बसास** आपले समक्ष न आणितां यास कैदी करून याच्या पायांत मोठमोठ्या बिड्या ठोकून यास गलबतावर पाठवून द्यावें असा हुकूम केला. अशा प्रकारें प्रतिष्ठेची हानि होई इतकें जरीं दैव प्रतिकूळ झालें तरीं ज्या धैर्याविषयीं **कोलम्बसाची** प्रसिद्धि होती तें धैर्य यानें सोडिलें नाहीं. स्वकीय प्रमाणिकपणाविषयीं मनोमय साक्षी बाळगून, व आपण संपादित केलेल्या मोठमोठ्या वस्तूंचा विचार करून, **कोलम्बसानें** आपलें समाधान करून घेतलें,

याची जरीं इतकी अप्रतिष्ठा झाली तरीं हा धैर्य सोडीत नाहीं.

आणि आपल्या आब्रूची जी अशी हानि केली तिचें यानें स्वस्थचित्तानें व प्रौढपणानें सहन केलें. यासमयीं याच्या दुःखांचा परिहार करण्याकरितां याच्या जिव्हाळ्याचेंही कोणी नव्हतें. **बोवादिला** यानें तेथील ठाणेगार लोकांस हवी तशी माफी देऊन, व इंदिअन लोक आमच्या ताब्यांत द्यावे असा ज्यांनीं अर्ज केला होता, त्यांस त्या मोठ्या उदारपणाच्या देणग्या देऊन, आणि शिक्षा करण्याची व राज्यकारभार चालविण्याची लगाम सैल सोडून, त्या लोकांची इतकी अतिशयित कृपा संपादिली कीं, ज्या **स्पेन** देशीय लोकांस दारिद्र्यामुळें अथवा गुन्हा लागू झाल्यामुळें स्वदेश सोडणें प्राप्त झालें होतें, व जे दैवावर हवाला घालून उद्योग पहाण्यास निघाले होते, त्यांनीं अशी **कोलम्बसाची** अप्रतिष्ठा व प्रतिबंध पाहून, अनुचित समाधान दर्शविलें, आणि आपले स्वभाव व आपल्या उपजीविकेच्या प्राचीन चालीं यांस योग्य अशी मनःपूत स्वतंत्रता आतां आपणास भोगायास सांपडेल अशी आपली आपणास थोरवी दिली. अशा प्रकारें **कोलम्बसाचीं** कृत्यें दूषित करण्याकरितां, व याच्या आब्रूस कलंक लाविण्याकरितां जे पुरुष सिद्ध होऊन बसले होते, त्यांपासून **बोवादिला** यानें **कोलम्बसावर** आरोप आणण्याकरितां साधनें जमा केलीं. कधीं न घडण्याजोगे आणि विलग दिसण्याजोगे असे जे **कोलम्बसावर** दोषारोप आणिले होते त्या सर्वांचा त्यानें स्वीकार केला. **कोलम्बसाच्या** अपराधांची बातमी सांगणारा कसाही दुष्कीर्तीचा असला

बोवादिला ठाणेगारांच्या अनुमतानें वागून त्यांची कृपा संपादितो.

याची मानहानि इच्छिणाऱ्यांपासून याचे चौकशीचीं साधनें जमवितो.

तरीं **बोवादिला** यानें त्याचा निषेध केला नाहीं. अशी रीतीनें चौकशी करून जो अनुचित आणि पक्षपाताचा निर्णय ठरवीला तो **स्पेन** देशास पाठवून दिला, आणि त्या समयींच **कोलम्बस** व याचे दोघे बंधू यांस बिड्यां-सकट **स्पेन** देशास घेऊन जावें असा हुकूम केला. अशा प्रकारें त्यांचा मानभंगच करून राहिला नाहीं, तर त्या तिघांनीं परस्पर सुख समाधानाच्या गोष्टी सांगून आपल्या दुःखाचा परिहार करूं नये ह्मणून **बोवादिला** यानें दुष्ट बुद्धीनें त्यांस वेगळ्या वेगळ्या तारवांत अडकून टाकिलें.

अशा दुराचरणास मान्यता देऊन स्पेन देशीय लोक स्वदेशास बट्टा लावितात.

**बोवादिला** याचीं मनःपूत आणि मानहानि करणारीं कृत्यें पाहून **हिस्पान्योला** एथील सर्व **स्पेन** देशीय लोकांनीं आपल्या नांवास व देशास बट्टा लागे अशी त्या कृत्यांस जरीं मान्यता दिली तरीं, त्यांमधील एका मनुष्यास **कोलम्बसानें** जीं महत्कृत्यें केलीं होतीं त्यांविषयींचा बराबर समज होता, ह्मणून याच्या पदवीस व वयास आणि मोठेपणास योग्य जो श्रेष्ठपणा व करूणा या दोहोंचेही विचार त्याच्या मनास अगदीं लागून गेले होते. ज्या गलबतामध्यें **कोलम्बसास** कैद केलें होतें त्याचा मुख्य अधिकारी **आलोन्सो दिवाली** जो हा होता, तो त्या बेटाच्या हद्दींतून पार पडताक्षणींच मोठ्या सन्मानानें **कोलम्बसा**जवळ आला, आणि अन्यायानें याच्या पायांत ज्या बिड्या घातल्या होत्या त्या मी काढून टाकितों असें ह्मणाला.

कोलम्बस नौकाधिपतीस यथोचित उत्तर करितो.

त्या समयीं **कोलम्बसानें** शुद्ध अंतःकरणास उचित अशा संतापानें उत्तर केलें कीं, "मी आपल्या

उभयतां प्रभूंच्या आज्ञेस्तव या बिड्या धारण केल्या आहेत, येणेंकरून त्यांच्या इतर आज्ञेप्रमाणें ही आज्ञाही मी मान्य केली आहे असें त्यांचे दृष्टीस पडेल. आणि त्या उभयतांच्या आज्ञेवरून ज्यापक्षीं मला हा प्रतिबंध प्राप्त झाला आहे त्यापक्षीं यापासून त्यांचीच आज्ञा मला मुक्त करील."

यास बंदिवान करून आणिताहेत हें ऐकून राजा व राणी चकित होतात.

**स्पेन** देशास जाण्याकरितां जें हें जलपर्यटन चालविलें होतें तें दैवयोगेंकरून फारच लवकर समाप्तीस गेलें. **कोलम्बसास** बंदिवान करून व पायांत बिड्या ठोकून स्वदेशीं आणीत आहेत ही बातमी **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** यांस कळतांच, या कृत्यापासून सर्व लोकांस परम आश्चर्य वाटेल, आणि आपणास दोषावह अशा गोष्टी त्यांच्या मनांत ठसून जातील, असें त्यांस तत्काळ कळून आलें. त्या उभयतांस प्रथमच दिसून आलें कीं, पराकाष्टेचीं मोठीं बक्षिसें देण्यास योग्य अशीं कामें ज्यानें बजाविलीं, त्याची अशी अयोग्य फेड केलेली पाहून सर्व **युरोप** खंड क्रोधभरित होऊन जाईल, आणि ज्या लोकांचें **कोलम्बसानें** मोठें हित केलें त्या लोकांची अनीति व ज्या राजाचें आणि राणीचें राज्य यानें एवढ्या लौकिकास चढविलें त्यांची कृतघ्नता, यांविषयीं तें वल्गना करूं लागेल. त्या उभयतांनीं स्वकीय आचरणाविषयीं लज्जित होऊन, याचा जो हा आब्रूचा तोटा झाला तो भरून देण्याकरितां, व त्यापासून आपले आब्रूस जो डाग लागेल तो काढून टाकण्याकरितां, तत्काळ **कोलम्बसास** बंधनिर्मुक्त करण्याचा हुकूम देऊन, यास दरबारास येण्याकरितां आमंत्रण केलें, आणि याच्या पदवीस योग्य असा जामानिमा करून यानें दरबारांत यावें

ह्मणून द्रव्यही पाठवून दिल्हें. **कोलम्बस** जेव्हां समक्ष येऊन पोहोंचला तेव्हां हा जाऊन आपल्या उभयतां प्रभूंचे पायीं लागला. त्या समयीं **कोलम्बस** कांहीं वेळपर्यंत उगाच स्तब्ध राहिला, कारण कीं याच्या मनांत जे नाना-

हा समक्ष आल्यावर आपली वर्तणूक निर्दोष आहे असें सप्रमाण स्थापित करितो.

प्रकारचे विकार घोळत होते तींहींकरून याच्यानें कांहीं काळपर्यंत तोंडांतून एकही अक्षर काढवेनासें झालें. शेवटीं सावधान चित्त होऊन, **कोलम्बसानें** विस्तारपूर्वक संभाषण करून आपला प्रामाणिकपणा तसेच चांगले उद्देश यांविषयीं मुद्यापत्यानिशीं खात्री होण्याजोगीं प्रमाणें दाखवून, आपली वर्तणूक निर्दोष आहे असें सिद्ध केलें, आणि जे शत्रू याचें केवळ द्रव्यद्वारा नुकसान करून समाधान न पावून याची जी केवळ प्रतिष्ठा आणि कीर्ति मात्र उरली होती तिचाही अपहार करण्याविषयीं उद्योग करीत होते, त्यांची दुष्टबुद्धि साक्षिपूर्वक उघड करून दिली. या समयीं **फर्दिनान्द** यानें मोठ्या सौजन्यानें व **इसाबेल्ला** राणीनें मोठ्या प्रीतीनें आणि सत्कारानें **कोलम्बसाचें** आदरआतिथ्य केलें. जी गोष्ट घडली

राजा व राणी आपल्यावरील दोष उडविण्याकरितां बोवादिलास पदच्युत करितात.

तीविषयीं उभयतांनीं फार खेद करून ती गोष्ट आपणास कळून झाली नाहीं असें दर्शविलें; आणि **कोलम्बसास** यापुढें आश्रय व हुद्दा हीं देण्याविषयींचें त्यांनीं कबूल केलें. परंतु **बोवादिला** यानें जीं धट्टाईचीं कामें केलीं त्यांत आपलें अंग नाहीं असें दाखविण्याकरितां, जरीं त्यास पदच्युत केलें तरीं **कोलम्बसानें** जे देश शोधून काढिले होते त्यांची सुभेदारी, व तेथील हक्क, पुनः

याच्याकडे सांगितले नाहींत. **कोलम्बसास** दिलेल्या उपद्रवांचा सूड उगवणारे आपण आहों असें दाखविण्याचें जरीं त्या उभयतांच्या मनांत होतें तरीं ज्या दुष्ट मत्सरामुळें **बोवादिला** यास **कोलम्बसाची** अप्रतिष्ठा करण्याजोगा अधिकार दिला होता तो मत्सर अद्याप त्यांच्या पोटांत होताच. ज्या पुरुषानें त्या उभयतांवर महान् उपकार करून त्यांस बद्ध करून टाकिलें होतें त्यांवर विश्वास टाकायास त्यांच्या मनांत भीति उत्पन्न झाली, म्हणून त्यांनीं **कोलम्बसास** नानाप्रकारचीं मिषेंकरून दरबारांत ठेवून घेतलें, आणि **अलकान्तेरा** एथील लष्करी खात्यांतील नैट पदवीचा **निकोलास दि ओवान्दो** या नांवाचे गृहस्थास **हिस्पान्योला** एथील राज्य कारभार सांगितला.

त्याचे जाग्यावर ओवान्दोस पाठवितात.

ज्या उभयतांच्या हस्तांपासून **कोलम्बसानें** पूर्वीं भोगिलेल्या दुःखांचा परिहार होण्यासारिखा दिसला, त्यांपासूनच ही नवीन हानि उपस्थित झाली असें पाहून **कोलम्बस** फारच खिन्न झाला. स्वकीय प्रामाणिकपणाविषयीं अंदेशा आणणारी अथवा छल करण्याच्या मिषानें योजिलेली गोष्ट महात्मे पुरुषांच्या अंतःकरणास फारच लागते. **स्पेन** देशीय लोकांपासून **कोलम्बसानें** त्या दोन्ही गोष्टींचा अनुभव घेतला होता; आणि त्यांच्या अयोग्य आचरणावरून **कोलम्बसास** इतका संताप आला कीं, त्यामुळें याच्या मनांत जे विचार उद्भवले ते याच्यानें मनांत ठेववले नाहींत. जेथें जेथें हा जाई तेथें तेथें **स्पेन** देशीय लोकांची कृतघ्नता दर्शविण्याकरितां, याच्या पायांत ज्या बिड्या घातल्या

जेथें जातो तेथें आपल्या बराबर बिड्या नेऊन स्पेन देशीय लोकांची कृतघ्नता दर्शवितो.

होत्या त्या दाखविण्यासाठीं आपले बराबर नेई. याच्या खोलीमध्यें त्या सदोदित टांगलेल्या असत. मी मेलों म्हणजे त्या माझ्यासमागमें पुरून टाकाव्या असें यानें सांगून ठेविलें होतें.

अशा समयीं नवीन शोध करण्याचे उमेदीस, **स्पेन** देशामध्यें ज्या पुरुषानें ती प्रथम उपस्थित केली होती त्याची अशी दुर्दशा करून टाकिल्यामुळें, जरीं मोठा धोका प्राप्त झाला होता, तरीं, ती उमेद मंद आणि निर्बल होऊन राहिली नाहीं. जानेवारी महिन्यामध्यें **रोडरीगो दि बास्तीदास** या नांवाच्या एका विख्यात गृहस्थानें **ज्युअन दिलाकोसा** यास पातीदार घेऊन दोन तारवें सिद्ध केलीं. **ज्यूअन दिलाकोसा** यानें **कोलम्बसाच्या** हाताखालीं याच्या दोन्ही जलपर्यटनांमध्यें चाकरी केली होती, म्हणून **स्पेन** देशामध्यें त्यास नौका चालविण्याच्या कामांत फार कुशल मानीत असत. ते दोघे शुद्ध महाद्वीपाकडे गलबताची नाळ धरून **पारिआच्या** किनाऱ्यावर येऊन पोहोंचले; नंतर पश्चिमेकडेस जाऊन हल्लीं ज्या प्रांताची **तिएराफिर्मा** या नांवानें प्रसिद्धि आहे, त्याचा **दिवाला** भूशिरापासून **दारियेनच्या** अखातापर्यंत सर्व किनारा त्यांनीं शोधून काढिला. नंतर थोड्याच दिवसांनीं **ओजेदा** हा आपला पूर्वीचा सोबती **अमेरिगो वेस्पुची** या बराबर दुसऱ्या जलपर्यटनाकरितां निघाला; आणि **बास्तीदास** हा कोण्या ठिकाणीं जाऊन उतरला होता तें यास माहीत नव्हतें म्हणून त्याचीच वाट धरिली, आणि तो ज्या ज्या ठिकाणीं येऊन लागला होता त्या त्या ठिकाणीं हा येऊन लागला. **बास्तीदास** याचें जलपर्यटन सुखावह

बास्तीदास आणि दिलाकोसा हे जलपर्यटनाकरितां निघतात.

ओजेदा याचें दुसरें जलपर्यटन.

आणि लाभदायक असें होतें, आणि तेंच **ओजेदा** यास फार क्लेशदायक व लाभशून्य झालें; परंतु या दोहींपासून शोध करण्याची उत्सुकता फारच वाढली, कारण **स्पेन** देशीय लोकांस **अमेरिका** खंडाचा जसा जसा अधिक शोध लागत गेला, तशी तशी त्यांची तेथील संपत्ति आणि फलद्रूपता यांविषयींची कल्पना अधिकाधिक वाढूं लागली.

ओवान्दोचे पर्यटनाची तयारी.

हे पराक्रमी पुरुष आपलीं जलपर्यटनें करून माघारे येण्याच्या अगोदरच नवा नेमलेला हकीम **ओवान्दो** यास **हिस्पान्योला** एथें नेण्याकरितां सरकारी खर्चावर एक आरमार तयार केलें होतें. **बोवादिला** यानें जो अविचाराचा वर्त्तनक्रम चालविला होता तो बंद करण्याकरितां, **ओवान्दो** याचें तेथें जाणें आवश्यक होतें; त्यानें जें तेथें गैररीतीचें काम चालविलें होतें तेणेंकरून वसाहतीचा नाश होऊन जाईल असेंही भय वाटूं लागलें होतें. **कोलम्बसास** नाशावह अशीं जीं आपण कृत्यें केलीं तीं फार जुलुमाचीं आणि अन्यायाचीं आहेत, असें मनामध्यें पक्केपणीं समजून, आपल्या स्वदेशीय लोकांच्या मनोभाव व त्यांच्या अविचाराच्या कल्पना यांप्रमाणें वागून, त्यांची कृपा व आश्रय हीं दोनही संपादन करावीं हाच मुख्य हेतु त्यानें आपल्या मनांत धरिला होता; याच हेतूनें त्यानें हरएक गोष्टीविषयीं वसाहतीची भरभर होण्याकरितां उपयोगी पडण्यासारिखे जे **कोलम्बसानें** कायदे ठरविले होते त्यांची अगदीं उलटापालट करून टाकिली. तो प्रकार असा; दुराचारी आणि दुर्वृत्त असे जे त्या वसाहतींत लोक होते, त्यांस कायदा व ताबेदारी यांच्या प्रतिबंधांत वागण्याची सवई लागण्याकरितां उपयोगी जीं मो-

ठी शिक्षा करायाची ती न करितां, त्यानें त्यांस इतकी निरंकुश मोकळीक दिली होती कीं तिणेंकरून ते हवेतसे नाचूं लागले. **इन्दिअन** लोकांचें रक्षण करण्याचें सोडून त्या बापुड्यांवर जुलूम चालविण्याची त्यानें शिकेमोरतबानिशीं परवानगी दिली होती. जे पूर्वीचे अनर्थ भोगून जिवंत राहिले होते त्यांच्या वेगळ्या वेगळ्या टोळ्या बांधून, आपणास अनुसरून जे लोक होते त्यांस ते मालमत्तेप्रमाणें वांटून देऊन, त्या बेटांतील सर्व लोकांस त्यानें पूर्ण दासत्वावस्थेस आणून मिळविलें. **स्पेन** देशीय लोकांचा द्रव्यविषयक लोभ फारच अतिरिक्त होता, यामुळें संपत्तीच्या प्राप्त्यर्थ सुवर्णाच्या शोधावांचून दुसरी युक्ति ते करून पाहात नसत; याकरितां तें दास्य जसें अन्याय्य होतें तसेंच दुःखदायकही झालें. मनामध्यें दया न धरितां, व सारासार विचार न पाहतां जे मालक त्या **इन्दिअन** लोकांपासून हवें तसें काम घेत ते मालक त्या **इन्दिअन** लोकांच्या जुटीच्याजुटी पर्वतावर हाकून नेत, आणि त्यांस खाणीमध्यें काम करायास लावीत. हा जो त्यांस श्रम पडे तो त्यांच्या बळास व त्यांच्या उदरनिर्वाह करण्याच्या पुरातन चालीस अगदींच अनुसरून नव्हता, ह्मणून त्या लोकांची ती अशक्त जात इतकी लवकर खंगून गेली कीं, त्या देशांतील प्राचीन राहाणवाल्यांचें बीज लवकरच निर्मूल होण्याच्या दशेस आलें होतें.

बोवादिला कोलम्बसाचे कायदे सोडून हवी तशी वर्त्तणूक करितो.

हीं जी अशी अव्यवस्था झाली होती तिचा लवकर बंदोबस्त करावा ह्मणून, **ओवान्दो** यास तिकडे जाण्यास फार जलदी करावी लागली.

नवीन खंडांत अव्यवस्था झा-

नवीन खंडास जाण्याकरितां आजपर्यंत जीं आरमारें तयार झालीं होतीं त्यांपेक्षांही मोठें आरमार याच्या ताब्यांत होतें. या आरमारांत ३२ तारवें होतीं, आणि नवीन खंडांत जाऊन राहण्याच्या उद्देशानें निघालेलीं २५०० मनुष्यें त्यांजवर होतीं. जेव्हां तो एवढी थोरली कुमक घेऊन तेथें जाऊन पोहोंचला, तेव्हां **बोवादिला** यानें आपला अधिकार त्याच्या स्वाधीन केला. नंतर **बोवादिला** यानें आपल्या वर्त्तणुकीचा जाब सांगण्याकरितां तत्काल **स्पेन** देशास परत जावें, असा त्या नवीन हाकीमानें हुकूम केला, व त्या समयींच **रोल्दान** व बंडवाल्यांतील जे दुसरे प्रमुख होते त्या सर्वांनींही तें बेट सोडून जावें असें केलें. तद्देशीय लोक **स्पेन** देशच्या राजाची स्वतंत्र प्रजा होय, ह्मणून त्यांच्या मनांत नसतां, व त्यांस त्यांच्या कामाप्रमाणें मोल न देतां, त्यांच्या पासून चाकरी घ्यायाची नाहीं, असें त्या हाकीमानें सर्व लोकांस जाहीर केलें. **स्पेन** देशीय लोकांच्या बंदोबस्ताविषयीं नाना प्रकारचे कायदे केले, त्यांमध्यें ज्या मनःपूत आचरणानें वसाहतीचा इतका नाश झाला, तसल्या आचरणाची अगदीं मनाई केली; आणि ज्या कायद्यांच्या व ज्या व्यवस्थेच्या अनुरोधानें वसाहतीची स्थापना झाली, व ज्यांहींकरून तिची वृद्धि आणि स्थिरता होणार त्या कायद्यांस व त्या व्यवस्थेस सर्वांनीं मानावें असें केलें. सरकारी काम ज्या लोकांकडे नव्हतें ते खाणींमध्यें कामें करून मोठी मिळकत मिळवितात असें लोक कल्पीत असत; याचा नियम बांधून टाकावा ह्मणून असा

त्यामुळें ओवान्दो यास त्वरित पाठवितात.

तो जाऊन तेथें व्यवस्था करितो

सोन्याविषयीं नियम बांधितो.

हुकूम फिरविला कीं, सर्व सोनें, मिश्र धातूपासून शुद्ध धातू काढण्याचें जें सरकारी स्थल आहे, तेथें आणावें, आणि त्यांतील अर्धें सरकारास द्यावें.

**कोलम्बसानें** ज्या वसाहतीची स्थापना केली होती ती-मध्यें स्वस्थता व सुख हीं राहण्याकरितां अशा प्रकारचे यत्न चालले असतां इकडे **कोलम्बस** त्या कृतघ्न दरबाराची कृपा संपादन करण्याचा जो असंतोषकारक उद्योग त्यामध्यें गुंतला होता. हा मोठ्या योग्यतेचा आणि मोठमोठीं कामें बजावलेला असा जरीं होता, तरीं यानें जी त्या दरबारास विनंती केली होती ती निष्फल झाली. यानें अशी मागणी घातली होती कीं, १४९२ त जो करारनामा ठरला आहे, त्याप्रमाणें मी शोधून काढलेल्या देशांतील हाकिमाच्या जाग्यावर माझी पुनः स्थापना करावी. परंतु या समयीं दैवाची प्रतिकूलता अशी विलक्षणिक आली कीं, **कोलम्बसानें** आपल्या हक्काच्या मागणीस लागू पडे अशी जी जी गोष्ट सांगितली, ती ती त्या मत्सरी राजास त्या मागणीचा निषेध करायास साधक झाली. **कोलम्बसानें** जे शोध केले त्यांचें महत्व व त्यांच्या मौल्यवृद्धीची आशा या दोन गोष्टींवरून **फर्दिनान्द** याच्या मनांत असा विचार आला कीं, करारनाम्यामध्यें ज्या देणग्या लिहिल्या आहेत त्या फारच मोठ्या व न्यायविरुद्ध आहेत. सांप्रत कालींच जो अधिकार इतका मोठा दिसतो व पुढें भयप्रद होण्यासही जो कमी नव्हे तो आपल्या रयतेंतील मनुष्यांवर टाकायास **फर्दिनान्द** या-

कोलम्बसानें स्थापिलेल्या वसाहतीची अशी व्यवस्था होत असतां, इकडे कोलम्बस त्या कृतघ्न दरबाराची व्यर्थ उपासना करितो.

फर्दिनान्द आणि इसाबेल्ला

च्या पोटांत भीति आली. **फेर्दिनान्द** यानें **इसाबेल्ला** राणीच्या मनांतही त्याच शंका भरवून दिल्या; नंतर त्या उभयतांनीं, क्षुल्लक व अयोग्य अशीं नानाप्रकारचीं मिषें करून, देवास स्मरून केलेल्या करारनाम्यांत ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्याप्रमाणें करावें, अशी **कोलम्बसानें** विनंती केली होती, तिची उडवाउडव केली. **कोलम्बस स्पेन** देशच्या दरबारांत सुमारें दोन वर्षेंपर्यंत एक्या दीन अर्जदाराप्रमाणें जात होता; नंतर यास असें वाटलें कीं **फेर्दिनान्द** याच्या मनांतील अविचाराच्या कल्पना व भयें या दोन गोष्टी काढून टाकण्याचें फार अशक्य आहे. शेवटीं अशा मतलबी आणि निर्दय राजाजवळ मी न्यायाच्या अथवा योग्यतेच्या हक्कांची मागणी मागण्यामध्यें वृथा श्रम केला, असें **कोलम्बसास** समजून आलें.

यांचे पोटांत अधिकार देण्याविषयीं भीति येते.

परंतु ही जी अप्रौढपणाची **फेर्दिनान्द** यानें फेड केली तिणेंकरूनही, ज्या मोठ्या उद्देशानें **कोलम्बसाचे** शोधक कल्पनाशक्तीस जागृत करून याची नवीन शोध करण्याविषयीं प्रवृत्ति केली होती, तो उद्देश एकसारिखा पुढें चालविण्याची याची उमेद खचली नाहीं. **ईस्तइन्दीज** एथें जाण्याकरितां नवीन मार्ग शोधून काढावा हीच याची मूळची आणि आवडती युक्ति होती. या युक्तीविषयीं अद्यापकालपर्यंतही याच्या मनांत विचार घोळतच होते. **कोलम्बसानें पारिआ** एथें जें स्वतः जलपर्यटन केलें त्यामध्यें यानें जें लक्षपूर्वक अवलोकन केलें होतें तेणेंकरून, व तद्देशीय लोकांच्या संशययुक्त सांगण्यावरून, आणि **वास्तोदास** व **दिलाकोसा** यांनीं जें आप-

याची मूळची आवडती युक्ति.

त्या जलपर्यटनाचें वृत्त सांगितलें त्यावरून, यानें **अमेरिका** महाखंडाच्या पलीकडे **ईस्तइन्दीज** एथपर्यंत विस्तृत झालेला असा एक समुद्र आहे अशी यानें कल्पना मनांत आणिली, आणि त्यांत **ईस्तइन्दीज** व ज्ञातसमुद्र यांच्यामध्यें व्यापार चालू होण्यासारिखी एकादी सामुद्रधुनी अथवा संयोगीभूमि सांपडेल अशी आशाही धरिली. पुढें मोठा उदय होण्यासारिखी जी ही कल्पना सुचली तिणेंकरून **कोलम्बसानें** असें कल्पिलें कीं ती सामुद्रधुनी अथवा संयोगीभूमि **दारियेनच्या** अखाताजवळच असावी. ही

हा अगदीं अशक्त झाला होता तरीं हा नवीन पर्यटन करण्यास प्रवृत्त होतो.

कल्पना मनांत भरतांच, **कोलम्बस** जरीं वयस्क, व श्रमेंकरून थकलेला, आणि दुखण्यामुळें अगदीं जर्जर झालेला, असा होता, तरीं तरूण पराक्रमी पुरूषांस जो आनंद असतो त्या आनंदानें, ज्या जलपर्यटनामुळें ही मोठी गोष्ट सिद्धीस जाऊन पहिल्यापासून जी महायुक्ति तडीस नेण्याचें यानें योजिलें होतें तिची पूर्णता होण्यासारिखें होतें, तें पर्यटन करण्याचा पत्कर घेण्याचें यानें बोलणें लाविलें. यासमयीं **फर्दिनान्द** आणि **इसाबेला** या उभयतांनींही याच्या बोलण्याकडे चांगला कान द्यावा अशा कितीएक गोष्टी जुळून आल्या. ज्या पुरूषाच्या मागण्या कबूल करणें त्या उभयतांस अयुक्तिक दिसलें, व ज्याच्या सेवेची उपेक्षा करणें तर अयोग्य होतें, अशा पुरूषास एकाद्या प्रतिष्ठित उद्योगाच्या मिषानें दरबारांतून काढून टाकण्याचा त्यांस आनंदच होता. **कोलम्बसास** बक्षिसें देण्याविषयीं जरीं त्या उभयतांची इच्छा नव्हती, तरी **कोलम्बसाच्या** गुणांविषयीं तीं अजाण नव्ह-

तीं; आणि याचे कौशल्याचा व याचे वर्तणुकीचा जो त्यांस अनुभव आला होता तेणेंकरून याच्या कल्पनेस मान्यता देण्यास, व याच्या सिद्धीवर भरंवसा ठेवण्यास, एक सबल कारण होतें. या विचारांस यापेक्षांही प्रबल असें तिसरें एक कारण उपस्थित झालें, तें असें; सुमारें याच वेळीं **काब्राल** याच्या ताब्यांतील **पोर्तुगीज** लोकांचें आरमार **ईस्तइन्दीज** एथून परत आलें; त्यांतील वारदानाची समृद्धि पाहून **युरोप** खंडांतील लोक पूर्वेकडील संपत्तीची व सुपीकाची आजपर्यंत जी कल्पना बांधीत तीपेक्षां अधिक निश्चयाची कल्पना करायास ते समर्थ झाले. **स्पेन** देशीय लोकांपेक्षां **पोर्तुगीज** लोकांचे शोध अधिक सफल होत गेले. कारण ज्या देशांमध्यें उद्योग, कलाकौशल्यें, आणि शोभा, हीं वृद्धिंगत झालीं होतीं, व ज्या ठिकाणीं पृथ्वीवर अन्य देशांपेक्षां फारच पूर्वीं व्यापार चालू होऊन त्याची अधिक वृद्धि झाली होती, असे देश त्यांनीं शोधून काढून त्यांच्या बराबर व्यवहार चालू केला होता. जे जिन्नस फारच मौल्यवान होते, व ज्यांची अपेक्षाही फार होती, त्या जिनसांमध्यें **पोर्तुगीज** लोकांस पहिल्या जलपर्यटनांतच त्वरित आणि पुष्कळ नफा मिळाला; व **लिस्बोन** शहर तत्काळ व्यापाराचें आणि संपत्तीचें स्थान झालें; आणि इकडे **स्पेन** देशास तर पश्चिमेकडील खंडांतून दीर्घ कालानें प्राप्त होणारीं सुखें व भविष्यकालीं प्राप्त होणारे लाभ यांची आशा मात्र होती. या कारणावरून **पोर्तुगीज** लोक ज्या मार्गानें गेले त्यापेक्षां जवळचा असून निर्भय अशा रस्त्यानें **स्पेन** देशीय लोकांस

याचे पराक्रमाच्या अनुभवावरून याचे सिद्धीविषयीं उभयतांचे मनांत संशय राहत नाहीं.

नेण्याचें जें **कोलम्बसानें** बोलणें लाविलें होतें यावांचून अधिक स्वीकार करण्यासारिखी त्यांस कोणतीही गोष्ट नव्हती. या आशेवरून **फेर्दिनान्द** यास उत्तेजन येऊन यानेंही ती गोष्ट मनापासून मान्य केली.

या पर्यटनाचें जरीं सर्व लोकांस अगम्य होतें तरीं तें करण्याकरितां **कोलम्बसास** सगळीं चार तारवें मिळालीं; त्यांमध्यें जें तारूं सर्वांपेक्षां मोठें होतें त्यांत ७० टनांपेक्षां अधिक ओझें राहत नसे. **कोलम्बसास** संकटें भोगण्याची व थोडक्या सामग्रीनिशीं बिकट कृत्यांत पडण्याची सवई असे, ह्मणून, हें आरमार जरीं थोडें होतें तरीं त्याचा अधिकार पत्करण्यास यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. याचा भाऊ **बार्थोलोमेओ** आणि याचे कृत्यांचा इतिहास लिहिणारा जो याचा दुसरा मुलगा **फेर्दिनान्द** हे उभयतां याच्याबरावर गेले. मे महिन्याच्या ९ व्या तारिखेस **केडाज** एथून **कोलम्बस** निघाला, आणि नेहेमीप्रमाणें **कानेरी** बेटास येऊन पोंहोंचला. तेथून थेट महाद्वीपास जाण्याकरितां निघावें असें यानें योजिलें होतें, परंतु सर्वांपेक्षां जें मोठें गलबत होतें तें फार नादान व उपयोगी न पडण्यासारिखें झालें होतें, ह्मणून यास **हिस्पान्योला** एथें जाण्याचें प्राप्त पडलें. कारण तेथें **ओवान्दो** यानें जीं गलबतें नेलीं होतीं त्यांतून त्या थोरल्या गलबताबद्दल दुसरें एक गलबत मिळेल अशी आशा होती. जेव्हां **कोलम्बस सन्त दोमिंगो** एथें येऊन पोंहोंचला तेव्हां त्या तारवांतील १८ तारवें सामानसुमान भरून **स्पेन** देशास जाण्याकरितां अगदीं तयार झालीं आहेत असें

मे महिन्यांच्या ९ व्या तारिखेस हा केडीज एथून निघतो.

जून महिन्याच्या १९ वे तारखेस सन्त दोमिंगो एथें येतो.

यानें पाहिलें. **कोलम्बसानें ओवान्दो** यास आपल्या जलपर्यटनाचें जें नियमित स्थल होतें तें, व ज्या अपायामुळें त्या स्थलाची वाट सोडावी लागली तो अपाय, तत्काल विदित केला, आणि बंदरांत येण्याकरितां परवानगी मागितली. ही परवानगी मागायास दोन कारणें होतीं; एक त्या बंदरीं जाऊन गलबताचा मोबदला करायाचा होता, व दुसरें असें कीं, यास स्वकीय अनुभवाच्या व कल्पनाशक्तीच्या योगानें जीं चिन्हें पाहातां येत असत, त्या मोठ्या नानाप्रकारच्या चिन्हांवरून वादळ होण्याचा समय जवळ आला आहे असें यास यथार्थ ज्ञान झालें होतें; या वादळांत त्या बेटामध्यें याच्या मनांत राहावयाचें होतें. याच कारणावरून **स्पेन** देशास जाण्याकरितां जीं तारवें तयार केलीं होतीं त्यांचें जाणें कांहीं दिवस तहकूब करावें असें यानें **ओवान्दो** यास सांगितलें. परंतु **ओवान्दो** यानें याची गलबताविषयींची जी विनंती तिचा निषेध केला, आणि याची मसलतही तुच्छ मानिली. ज्या प्रसंगीं एका परके गृहस्थासही दयेनें आश्रय देणें योग्य होतें त्या प्रसंगीं जो देश **कोलम्बसानें** शोधून काढून हस्तगत केला होता त्या देशांत यास येऊं देण्याचीही **ओवान्दोनें** मनाई केली. जी **कोलम्बसाची** हितावह सूचना लक्ष देण्यास योग्य होती, ती **ओवान्दोनें** मनुष्याची दूरदृष्टि ज्या गोष्टीकडे पोंचत नाहीं ती गोष्ट घडेल म्हणून उगीच अहंकारानें ढोंग करणारा जो कल्पक भविष्यभाषी त्याच्या स्वभावप्रमाणें मानिली; आणि तें अरमार

ज्या कारणामुळें यास सन्त दोमिंगो एथें यावें लागलें तें कारण ओवान्दोस सांगतो.

ओवान्दो कोलम्बसास त्या बेटांत येऊं देण्यास परवानगी देत नाहीं.

**स्पेन** देशास जाण्याकरितां चालतें केलें. दुसऱ्या दिवशीं रात्रीं मोठ्या भयंकर वेगाचें **कोलम्बसानें** सांगितल्याप्रमाणें तुफान झालें. **कोलम्बसा**स ही जोखीम प्राप्त होईल ह्मणून ठाऊकच होतें, याकरितां यानें प्रथमच सावधगिरी राखून आपल्या लहानशा आरमाराचें रक्षण केलें. **स्पेन** देशास जाण्याकरितां जें आरमार निघालें होतें त्यांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या अविचारास व दुराग्रहास योग्य अशी त्याची दुर्दशा झाली. त्या अठरा तारवांतून दोन अथवा तीन मात्र काय तीं निभावलीं. या अनर्थामध्यें हीं जीं तारवें फुटलीं यांत **वोवादिला रोल्दान** आणि **कोलम्बसाचा** छल करण्यामध्यें व **इन्दिअन** लोकांस गांजण्यामध्यें जे प्रमुख होते त्यांतून बहुतेक लोक नाशाप्रत पावले; त्यांनीं अन्यायानें व क्रौर्यानें जी संपत्ति मिळविली होती तिचाही त्यांच्याबरोबर लोप झाला. त्या संपत्तीची किंमत साडेचार लाख रुपयांपेक्षां अधिक होती. ही ह्मटली ह्मणजे त्याकाळीं मोठी रक्कम, आणि त्यांच्या वर्त्तणुकीचा कसाही जरी छडून छडून शोध केला तरीं त्यापासून मुक्त होण्यास, व **स्पेन** देशच्या दरबारांत मोठ्या कीर्तीचें आगतस्वागत मिळण्यास ती पुरेशी होती. जीं तारवें बचावलीं त्यांतून एकावर **कोलम्बसाचे** जिनगीचा नाश होऊन बाकी जी चीजवस्त राहिली होती ती सर्व होती. अशा प्रसंगीं त्या लोकांचे गुणदोष निवडून त्याप्रमाणें त्यांस यथान्याय शिक्षा व बक्षिसें मिळालीं, तीं पाहून इतिहासकर्त्यांनीं आश्चर्यभरित होऊन सर्व संमतानें असें ठरविलें, कीं,

कोलम्बसानें सांगितल्याप्रमाणें तुफान होतें.

त्या तुफानांत सकीय आचरणानुरूप फल प्राप्त होतें.

हें पाहून इतिहास कर्त्ते आ-

मानहानि पावलेल्या पुरुषास ज्यांनीं इजा दिली होती त्यांचा सूड उगवावा, आणि निरूपद्रविक लोकांवर ज्यांनीं जुलूम केला होता त्यांचें पारिपत्य करावें ह्मणोन साक्षात् ईश्वर मध्यें होऊन त्यानें अशा गोष्टी घडविल्या. ही गोष्ट घडली त्यावेळेस जे अज्ञानी व देवभोळे लोक होते त्यांच्या मनांत भलतीच गोष्ट ठसून गेली. जे पुरुष आपल्या चातुर्यानें व आपल्या नवीन कल्पनेनें आपणास प्रसिद्धीस आणितात, त्या पुरुषांविषयीं साहजिक आश्चर्य होण्याजोगें जें अशिक्षित लोकांचें मत असतें त्या मताप्रमाणें त्या भोळे लोकांनीं असें कल्पिलें कीं **कोलम्बसाच्या** आंगांत कांहीं ईश्वरी शक्ति आहे, आणि यानें जादूगिरी व मंत्रसामर्थ्य यांच्या योगानें आपल्या शत्रूंचा सूड उगवावा ह्मणून असें भयंकर तुफान उत्पन्न केलें. ज्या **हिस्पान्योला** बेटांत आदर आतिथ्य करून यास आंत येऊं दिलें नाहीं तें बेट यानें लवकर सोडिलें, आणि महाद्वीपाकडे चालिला. जोखिमीचें आणि त्रासदायक असें जलपर्यटन केल्यानंतर **ग्वानाया** हें बेट शोधून काढिलें, तें **हान्दुरासच्या** किनाऱ्यापासून विशेष दूर नव्हतें. या ठिकाणीं जे त्या महाद्वीपांतील लोक मोठमोठ्या होड्यांत बसून तेथें आले होते त्यांची आणि याची भेट झाली. आजपर्यंत जे देश **कोलम्बसानें** शोधून काढिले त्यांतील लोकांपेक्षां हे लोक अधिक सुधारलेले आणि यांचा उपयुक्त कलांचे ज्ञानांत प्रवेशही फार झाला होता असें दिसलें. ज्या समयीं **स्पेन** देशीय लोकांनीं आपल्या

थर्य भरित होतात.

कोलम्बसानें मंत्र सामर्थ्येंकरून आपले शत्रूंच्या नाशार्थ तें तुफान उत्पन्न केलें असें भोळे लोक कल्पितात

असें त्रासदायक जलपर्यटन करून ग्वानाया बेट शोधून काढून तेथें सो-

त्याचा शोध करितो.

नेहेमीच्या उत्कंठेनें **इन्दिअन** लोकांनीं ज्या सुवर्णाचे अलंकार आंगावर घातले होते तें सुवर्ण कोणत्या स्थलीं त्यांस प्राप्त झालें, अशी चौकशी केली, तेव्हां त्या लोकांनीं पश्चिमेकडील देशांकडे बोट दाखविलें. त्या देशांत सुवर्ण इतकें विपुल सांपडे कीं त्याचा साधारण कृत्यांतही अतिशय उपयोग करीत. अशा मनोहर देशांच्या शोधार्थ **कोलम्बसानें** गमन केलें असतें तर हा **युकतानच्या** कांठानें **मेक्सिकोच्या** संपत्तिमान राज्यांत आला असता; परंतु हिंदुमहासागराबरोबर संबंध राखणारी एक सामुद्रधनी आहे असें जें यानें कल्पिलें होतें, तिचा शोध लावण्याची जी याची आवडती युक्ति तीचेकडेस याचें मन इतकें प्रवण झालें होतें कीं, यानें त्या समृद्ध देशाकडे जाण्याचें सोडून हा पूर्वेस **दारियेनच्या** अखातांकडे चालला. या पर्यटनांत **कोलम्बसानें ग्राशिआस आदीओस** या नांवाच्या भूशिरापासून बंदरापर्यंत महाद्वीपाचा सर्व किनारा शोधून काढिला. हें बंदर फार सुंदर आणि निर्भय स्थान होतें, ह्मणून **कोलम्बसानें** त्यास **पोर्त्तो बेल्लो** असें नांव दिलें. **कोलम्बसानें** ज्या कल्पित सामुद्रधुनीच्या द्वारें अज्ञात सागरामध्यें जाण्याची आशा धरिली होती त्या सामुद्रधुनीचा यानें निरर्थक शोध केला; आणि हा कितीएक वेळां कांठावर जाऊन त्या देशाच्या आंत जरी गेला होता तरी **मेक्सिकोचें** अखात आणि दक्षिणमहासागर यांच्यामध्यें जी एक अरुंद संयोगीभूमि आहे ती वलांडून जाई इतका दूर गेला नाहीं. तथापि त्या देशाची फलद्रूपता व तद्देशीय लोकांनीं आणि-

त्यावेळीं न राहतां दारियेनच्या अखाताकडे जातो, परंतु कल्पित सामुद्रधुनीचा शोध लागत नाहीं.

लेले सुवर्णाचे नमुने पाहून यास इतका संतोष झाला, व त्या देशाच्या संपत्तीविषयीं इतकी कल्पना याच्या मनांत भरून गेली, कीं, यानें **वेराग्वा** प्रांतांतील **बेलेम** नदीजवळ आपल्या भावाच्या ताब्यांत थोडेसे लोक ठेवून त्या देशांत पुरेतपणीं वसाहतीची स्थापना करण्याकरितां ज्या वस्तूंची अपेक्षा होती त्या आणण्यासाठीं स्वतां **स्पेन** देशास जाण्याचा निश्चय केला. परंतु **कोलम्बसाच्या** ताब्यांत जे लोक होते त्यांच्या वृत्ति आकलित करण्याजोग्या नव्हत्या, ह्मणोन **अमेरिका** खंडांत प्रथम वसाहत स्थापण्याची कीर्त्ति **कोलम्बसास** प्राप्त झाली नाहीं. त्या लोकांच्या दांडगाईमुळें व लुटारूपणामुळें तद्देशीय लोकांनीं संतप्त होऊन हातीं शस्त्रें धरिलीं, आणि हे लोक **कोलम्बसानें** शोधून काढलेल्या बेटांतील लोकांपेक्षां अधिक बलाढ्य व शूर होते, ह्मणून यांनीं **स्पेन** देशीय लोकांतील कांहींएकांस कापून काढिलें, आणि बाकीच्यांनीं वसाहत सोडून जावें असें केलें. त्या वसाहतीचें त्यांच्या हांतून रक्षण होण्यासारिखेंही दिसत नव्हतें.

याचे लोकांच्या दांडगाईमुळें तद्देशीय लोकांपासून अडथळा प्राप्त होतो.

**अमेरिका** खंडांतील लोकांपासून हा जो प्रथमच **स्पेन** देशीय लोकांस अडथळा आला एवढाच ह्मणजे **कोलम्बसावर** अनर्थ गुजरला असें नाहीं, तर नौकागमन कर्त्यांस ज्या विपत्ति प्राप्त होतात त्या सर्व **कोलम्बसास** अनुक्रमानें भोगाव्या लागल्या. भयंकर तुफानें, मोठमोठ्या मेघगर्जना, आणि विजांचा कडकडाट, यांहींकरून **कोलम्बसाचीं** बुडीं फुटलेलीं तारवें बुडून जातील असें भय वाटूं लागलें; तशांत

कोलम्बसावर दुसरा अनर्थ गुजरतो.

**कोलम्बसाचे** उदासीन झालेले खलाशी लोक श्रमानें थकून गेल्यामुळें, व जवळची सामग्री संपल्यामुळें **कोलम्बसाचा** हुकूम बजावण्यांत ते निरिच्छ अथवा असमर्थ झाले. याच्या गलबतांपैकीं एक गलबत नाशाप्रत पावलें, व दुसरें गलबत अगदीं कामांतून गेलें होतें, ह्मणून तें सोडून द्यावें लागलें; आणि जीं बाकी दोन उरलीं होतीं तेवढ्यानिशींच यानें जो महाद्वीपाचा भाग ज्यास यानें **कोस्ट आफ् वेक्सेशन** असें चिंतेंत असतां नांव दिलें होतें त्यास सोडून **हिस्पान्योलाची** वाट धरिली. या पर्यटनांस नवीं नवीं संकटें जाणों याची वाटच पाहत बसलीं होतीं.

तुफानांत याचीं तारवें एकमेकांवर आपटून खिळखिळीं होतात.

**कूबा** बेटाच्या किनाऱ्यापासून **कोलम्बस** भल्ले मोठ्या तुफानांत सांपडून माघारा हटला, याचीं तारवें एकमेकांवर वांकडीं तिकडीं आपटलीं, आणि त्या धक्यानें तीं इतकीं खिळखिळीं झालीं कीं त्यांस **जमेका** एथें येऊन पोंहोंचण्यास फार प्रयास लागला. तेथें तीं बुडून जाऊं नयेत ह्मणून **कोलम्बसास** त्यांस लवकर कडेस आणणें भाग पडलें. या समयीं **कोलम्बसा**वरील अनर्थांचें मान पूर्ण झालें असें दिसतें. **अमेरिका** खंडांत **स्पेन** देशीय लोकांची जी वसाहत होती तीपासून बऱ्याच अंतरावर एक बेट आहे त्याच्या किनाऱ्यावर **कोलम्बस** येऊन लागला. याचीं तारवें इतकीं मोडकळीस आलीं होतीं कीं, तीं पुनः तयार करणें असंभाव्य होतें, आणि याच्या अशा अवस्थेचें वर्तमान **हिस्पान्योला** एथें नेण्याचें विननोड दिसून आलें, व त्यावांचून या संकटांतून पार पडण्याची आशा तर निर-

र्थक होती. परंतु नानाप्रकारचे उपाय योजण्यामध्यें महासमर्थ, आणि जीं नाशकारक संकटें प्राप्त झालीं असतां निर्बल पुरुष निराश होऊन बसतात त्यांमध्यें अतिगंभीर, अशी जी **कोलम्बसाची** कल्पनाशक्ति तिनें, या संकटापासून मुक्त होण्याची कांहीं आशा प्राप्त होण्यासारिखी युक्ति शोधून काढिली. तद्देशीय लोक **स्पेन** देशीय लोकांस ईश्वरी अंश मानीत असत ह्मणून त्यांच्या इच्छा तृप्त करण्याकरितां ते फार उत्कंठित असत. अशा प्रकारें त्या लोकांचा आदरपूर्वक दयेचा **कोलम्बसास** आश्रय होता ह्मणून, त्यांपासून अग्नीनें पोखारलेल्या एकाच वृक्षाच्या बुंधापासून केलेल्या दोन होडक्या यास मिळाल्या.

यामुळें हिस्पान्योला एथें जाण्याचें अशक्य होतें परंतु तेथें जाण्यास हा एक युक्ति काढितो.

त्या युक्तीनें यास तद्देशीय लोकांपासून दोन होडक्यां मिळतात.

त्या इतक्या ओबड धोबड आणि वांकड्या तिकड्या होत्या कीं त्यांस होडक्यां हें नांव देखील शोभायाचें नाहीं. हीं होडक्यां किनाऱ्या किनाऱ्यानें जाण्यास, अथवा अखाताच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत जाण्यास मात्र योग्य होतीं. अशा होडक्यांतून ४५ पंचेताळीस कोसांपेक्षांही पलीकडे जें **हिस्पान्योला** बेट तेथें जाण्याचा **स्पेन** देशांतील **मेन्डेज** आणि **जेनोआं**तील **फेसची** या दोन गृहस्थांनीं मोठ्या धैर्यानें पत्कार घेतला; विशेषेंकरून या दोघांची **कोलम्बसावर** फार प्रीति असे. त्यांनीं हें पर्यटन, लोकांस खरीं न वाटण्याजोगीं संकटें भोगून, व ज्या श्रमांमुळें त्यांच्या बरोबरच्या **इन्दिअन** लोकांतून कितीएक थकून जाऊन मरण पावले असे श्रम सोसून १० दिवसांत संपविलें. **हिस्पान्योला** एथील

तीं होडक्यां घेऊन याचे दोन

आसामी १० दिवसांत हिस्पान्योला एथें जातात.

अधिकाऱ्यानें त्या दोघांची जी बर्दास्त ठेविली ती त्यांच्या धैर्यास शोभेशी नव्हती, व ज्या पुरुषाकडून ते आले होते त्याच्या विपत्तीस जितकी पाहिजे होती तितकीही नव्हती. **ओवान्दो** याच्या मनांत **कोलम्बसा**विषयींचा जो हलकेपणाचा मत्सर होता तेणेंकरून ज्या बेटांत तो कारभार चालवीत होता तेथें येऊन उतरण्यास **कोलम्बसास** परवानगी द्यावयास त्याच्या पोटांत भीती उत्पन्न झाली. अशी जी त्याची औदार्यशून्यवृत्ति होऊन गेली तिणेंकरून त्या मोठ्या मनुष्याचीं कृत्यें व त्याजवर गुजरलेलीं संकटें याचा विचार मनांत येऊन, अथवा तशाच अनर्थामध्यें सांपडलेले जे याच्या देशचे लोक त्यांकरितां दया उत्पन्न होऊन, जो यास द्रव येण्यास योग्य होता तो नाहींसा झाला. **मेन्डेज** आणि **फेसची** हे, आपला अधिकारी व आपले सोबती यांस मुक्तता प्राप्त व्हावी ह्मणून ८ महिनेपर्यंत **ओवान्दो** पाशीं विनंती करीत होते, परंतु ती मिळण्याचा रंग दिसून आला नाहीं.

मेन्डेज आणि फेसची ८ महिनेपर्यंत ओवान्दो पाशीं विनंती करितात.

या कालामध्यें **कोलम्बस** व त्याच्या बरोबरचे लोक यांच्या मनांत अशा संकटसमयीं नानाप्रकारचे विकार उत्पन्न होऊन उद्विग्नता प्राप्त झाली होती. प्रथम **मेन्डेज** आणि **फेस्ची** यांचें जलपर्यटन सफल होऊन आपली त्वरित मुक्तता होईल या आशेनें त्या अगदीं निराश झालेल्या लोकांच्या वृत्ति आनंदभरित झाल्या होत्या, परंतु कांहीं कालानंतर जे अतिशय भित्रे लोक होते ते अशी शंका धरूं लागले कीं, **मेन्डेज** आणि **फेस्ची** यांनीं जें

पराक्रमाचें कृत्य स्वीकारिलें आहे त्यांत ते मार्ग चुकले. शेवटीं जे मोठे पराक्रमी लोक होते त्यांनीं त्या उभयतांचा नाश झाला असा सिद्धांत केला. याप्रमाणें त्यांच्या आशेचा अंकुर भग्न होतांक्षणीं त्या लोकांची अवस्था अधिकच दुःखकारक दिसून आली. निरिच्छेच्या योगानें वृद्धिंगत झालेली जी निराशा ती प्रत्येकाच्या हृदयांत स्थिर होऊन बसली. त्या लोकांचा शेवटचा उपाय थकला, आणि स्वकीय देशापासून व स्वकीय मित्रांपासून फार दूर असणारे जे हे नग्न व रानटी लोक यांमध्यें दुःखाचे दिवस काढून देहांत होण्याचा मात्र रंग त्यांस दिसून आला; दुसरी कशाची आशा राहिली नाहीं. ते खलाशी लोक उघड बंड करायास प्रवृत्त झाले, आणि **कोलम्बसाच्या** जिवास धोका देण्याची धास्ति घातली. या सर्व अनर्थांचा कर्त्ता काय तो **कोलम्बस** असा याचा उपहास करून, यानें **इन्दिअन** लोकांपासून ज्या होड्या विकत घेतल्या होत्या त्या दहा होड्या बलात्कारानें घेऊन, **कोलम्बसाचीं** उपदेशपर वाक्यें व विनवण्या यांचा धिक्कार करून त्या बेटापासून एक दूर प्रदेश होता तेथें ते गेले. तद्देशीय लोक, आपले देशांत **स्पेन** देशीय लोक फार दिवस राहिले ह्मणून कुरकुरूं लागले, आणि त्यांच्या आंगांत त्यांच्या शेजारीं राहणारे जे **हिस्पान्योला** एथील लोक त्यांपेक्षां अधिक उद्योग नसे, ह्मणून त्यांप्रमाणें या लोकांसही त्या इतक्या परके लोकांचें पोषण करण्याचे ओझें अगदीं असह्य दिसून आलें. ते मनापासून धान्य-

कोलम्बसाच्या लोकांच्या मनातील विचार.

ते याचा धिक्कार करून याच्या जवळचीं तारवें घेऊन जवळच्या बेटांत जातात.

सामग्री आणिनातसे झाले, त्यांस जें देत तें हात राखून देऊं लागले, आणि ही कुमक देण्याचेंही अगदीं आटोपून धरण्याचें भय घातलें. अशा कृतनिश्चयापासून **स्पेन** देशीय लोकांचा त्वरित घातच झाला असता, कारण यांचें संरक्षण, **इन्दअन** लोकांची यांस अनुकूल जी इच्छा तिच्या स्वाधीन होतें. या प्रसंगीं प्रथमतः त्या भोळे लोकांस **स्पेन** देशीय लोकांविषयीं जें आश्चर्य व जो मोठेपणा वाटला होता, त्यास पुनः उत्तेजन आल्यावांचून या नाशाचा परिहार होईल असें नव्हतें. बंडखोर लोकांच्या मनःपूत आचरणावरून **स्पेन** देशीय लोकांस हितावह अशी जी गोष्ट **इन्दअन** लोकांच्या मनांत ठसून गेली होती ती जरीं पुष्कळ कमी झाली होती तरीं **कोलम्बसास** स्वकीय रक्षणार्थ आपल्या कल्पनाशक्तीच्या योगानें दुसरी चांगली हितावह अशी युक्ति सुचली. या युक्तीवरून **इन्दअन** लोकांचो **स्पेन** देशीय लोकांविषयीं प्रथम जी मोठी कल्पना होती ती पुनः त्यांनीं धरिली एवढेंच झालें नाहीं तर तिला अधिकच पुष्टीकरण मिळालें. **कोलम्बसास** जें ज्योतिःशास्त्राचें ज्ञान होतें तेणेंकरून लवकरच पूर्ण चंद्रग्रहण पडेल असें यास समजून आलें. तें ग्रहण लागण्याच्या पूर्वदिवशीं **कोलम्बसानें** त्या प्रांतांतील जे मुख्य गृहस्थ होते त्यांस आपल्या सभोंवार जमविलें, आणि ज्या लोकांचा तुह्मीं मान राखिला होता त्या लोकांवर प्रीति करण्याचें सोडून दिलें ह्मणून, त्यांचा धिक्कार करून, त्यांस असें सांगितलें कीं हें जग निमार्ण करून त्याचें पालन करणारा

तद्देशीय लोकांचे स्पेन देशीय लोकांविषयींचे विचार.

आह्मांवर परमेश्वराची फार प्रीति आहे असें

जो स्वर्गस्थ परमात्मा त्याचे **स्पेन** देशीय लोक सेवक आणि अत्यंत कृपापात्र होत; त्याचा सांभाळ करण्याचा तुह्मीं निषेध केला ह्मणून त्यास फार क्रोध येऊन, या अपराधाबद्दल परम क्रौर्यानें तुह्मांस शिक्षा करावी याकरितां तो यत्न करीत आहे; ईश्वरी क्षोभाचा प्रत्यय, व तुमचा जो लवकर सूड घ्यावयाचा आहे त्याचें चिन्ह दर्शविण्याकरितां, आज रात्रीं चंद्राचा प्रकाश अगदीं नष्ट होऊन तो रक्ताप्रमाणें तांबडा लाल दिसेल. हें जें **कोलम्बसानें** अमानुष भविष्य कथन केलें तें, **अमेरिकें**तील लोकांनीं तादृश लक्ष न देतां ऐकून घेतलें, परंतु कित्येकांनीं, अशिक्षित लोकांच्या ठायीं भोळेपणामुळें जें स्वभावतः आश्चर्य उत्पन्न होतें तें धरून, त्या गोष्टीचें श्रवण केलें. **कोलम्बसाच्या** सांगण्याप्रमाणें जेव्हां चंद्र काळा काळा होत गेला आणि शेवटीं तांबडा दिसला, तेव्हां ते सर्व चकित होऊन गेले. अशा प्रकारची भीति त्यांच्या पोटांत येतांच ते आपापल्या घरीं धांवतच गेले, आणि सामग्रीचीं ओझीं भरून घेऊन **कोलम्बसा**जवळ येऊन त्याच्या पायांजवळ तीं ओतिलीं, आणि ज्या अनर्थामुळें आह्मीं भयभीत होऊन गेलों आहों, त्याचें दूरीकरण करण्याकरितां, ईश्वराजवळ आपण मध्यस्थी करावी, असें त्यांनीं **कोलम्बसास** शपथ पुरःसर सांगितलें. अशा ज्या त्यांनीं विनवण्या केल्या त्यांहींकरून आपणास द्रव आला असें दर्शवून, **कोलम्बसानें** त्यांच्या इच्छेप्रमाणें करण्याचें वचन दिलें. इतक्यांत इकडे ग्रहण सुटून चंद्र पहिल्याप्रमाणें प्रकाशित झाला. या दिवसापासून **स्पेन** देशीय लोकांस

तद्देशीय लोकांस दर्शवितो.

असें करितांच ते त्यास शरण जातात.

पुष्कळ सामग्री प्राप्त होऊं लागली एवढेंच नाहीं, तर तद्देशीय लोक देवभोळेपणाच्या दृष्टीनें त्या **स्पेन** देशीय लोकांस संताप येण्यासारिखी गोष्ट आचरिनातसे झाले.

याचे लोक पुनः यास त्रास देतात.

अशीं कृत्यें चालली असतां इकडे दंगेखोर लोकांनीं ज्या होड्या बलात्कारानें घेतल्या होत्या त्यांच्या योगें **हिस्पान्योला** एथें जाण्याकरितां त्यांनीं बहुत प्रयास केले, परंतु त्यांच्या गैर वर्तणुकीमुळें अथवा वायु आणि प्रवाह यांच्या झपाट्यामुळें त्यांचे ते सर्व प्रयत्न निष्फल झाले. ही निराशा झाली तिणेंकरून त्यांस फारच संताप येऊन ते त्या बेटांतील ज्या प्रदेशामध्यें **कोलम्बस** होता तिकडे गेले, आणि यास नवीन संकटें व निंदापर शब्द यांहींकरून त्यांनीं भय प्रदर्शन केलें. त्यांचा हा क्रम चालला असतां जी एक गोष्ट घडून आली ती **कोलम्बसास** त्या लोकांपासून ज्या अनर्थाचें भय होतें त्यापेक्षां अधिक दुःखकारक आणि त्रासदायक होती.

ओवान्दो एस्कोबर याजकडे तारवाचा अधिकार देतो.

**हिस्पान्योला** एथील हाकीमाच्या मनांत **कोलम्बसा**विषयीं अद्याप कालपर्यंत काळ्याबेऱ्या कल्पना भरलेल्या होत्या. त्या हाकीमानें **जमेका** एथें एक लहानसें तारूं पाठवून दिलें. तें त्यानें आपल्या देशच्या विपत्तिग्रस्त लोकांस संकटापासून मुक्त करावें ह्मणून पाठविलें नव्हतें, तर त्यांची अवस्था कशी काय आहे ही बातमी काढण्याकरितां पाठविलें होतें. त्यानें त्या तारवाचा अधिकार **कोलम्बसाचा** हाडवैरी जो **एस्कोबर** यास सांगितला; कारण दुसऱ्याची नेमणूक केली असतां त्यास त्या लोकांची करुणा येऊन ते आपल्या इच्छेच्या विरुद्ध

त्यांस संकटापासून मुक्त करितील, असें त्या हकीमास वाटलें होतें. त्या **एस्कोबरानें** द्वेषबुद्धीच्या योगें आपल्या धन्याच्या हुकुमास बरोबर अनुसरून त्या बेटापासून कांहींशा अंतरावर नांगर टाकिला, आणि तेथून एका लहानशा होडींत बसून किनाऱ्याजवळ आला, व **स्पेन** देशीय लोकांची दुर्दशा पाहून **कोलम्बसास** कोरड्या सलामालकीचें पत्र पाठवून त्याचें उत्तर घेऊन पुनः माघारा गेला. जेव्हां प्रथम **स्पेन** देशीय लोकांनीं त्या बेटाजवळ गलबत आलेलें पाहिलें तेव्हां त्या सर्वांच्या अंतःकरणांत मोठा हर्ष झाला, कारण फार दिवसपर्यंत दुःखनिर्मुक्त होण्याचा दिवस प्राप्त होईल ह्मणून जी ते मार्गप्रतीक्षा करीत बसले, होते, तो दिवस आतां प्राप्त झाला आहे असें त्यांस वाटलें होतें. परंतु तें गलबत जेव्हां एकाएकीं दिसेनासें झालें, तेव्हां त्यांचे हातपाय मोडून त्यांच्या सर्व आशा नष्ट होऊन गेल्या. **ओवान्दो** यानें पूर्वीं जी **कोलम्बसाची** अवहेलना केली होती तींत जी ही त्यानें स्वैच्छिक दुष्ट आचरणाची भर घातली तिणेंकरून **कोलम्बसास** फारच वाईट वाटलें. परंतु अशा प्रसंगींही यानें आपल्या मनांत इतकें स्वास्थ्य राखिलें होतें कीं तेणेंकरून याच्या आंगीं आपल्या लोकांचें समाधान करण्याची शक्ति राहिली होती. **कोलम्बसानें** आपल्या लोकांस **मेन्डेज** आणि **फेस्ची** हे दोघेजण **हिस्पान्योला** एथें जाऊन सुखरूप पोंहोचले, व तुह्मांकरितां ते लवकर तारवें घेऊन येणार आहेत असें सांगितलें. **एस्कोबर** याच्या

तो येऊन यास सलामालकीचें पत्र पाठवून परत जातो.

अशा प्रकारें निराशा झाल्यामुळें याचे लोक भिऊन गेले होते त्यांचें शांतवन करितो.

तारवांत आपण सर्वजण मावणार नाहीं ह्मणून त्या तारवामध्यें जाण्याचें मी स्वीकारिलें नाहीं, कारण माझ्या दुःखाचे विश्वासू सोबती जे तुह्मी त्या तुह्मांस सोडून जावयाचें नाहीं असा माझा निर्धार आहे. लवकर मुक्तता प्राप्त होण्याची आशा दृष्टीस पडल्यामुळें समाधान पावून, व **कोलम्बसाचे**, आपल्या जिवापेक्षां आमच्या संरक्षणाकडे लक्ष ठेवण्याविषयींचें उघड औदार्य पाहून संतोषभरित होऊन, त्यांनीं पुनः उमेद धरिली, आणि **कोलम्बसावर** विश्वास ठेविला.

अशा विश्वासावांचून समीप वासकरणारे जे बंडखोर लोक यांचें **कोलम्बसाच्यानें** निवारण करवलें नसतें; परंतु त्या जिवावर उदार होऊन बसलेल्या बंडखोर लोकांस आपलेसे करून घेण्याकरितां जे प्रयत्न यानें योजिले तींहींकरून तर ते अधिकच विथरले. त्यांच्या मागण्या दिवसानुदिवस अधिकाधिकच वाढत चालल्या, आणि त्यांचे हेतू फार दांडगेपणांचे आणि क्रूरतेचे होत चालले.

हा आजारी होता ह्मणून याचा भाऊ बंडवाल्यावरावर युद्ध करितो.

सर्वांचें रक्षण व्हावें ह्मणून त्यांच्याबरोबर युद्ध करून त्यांचा पराभव करणें प्राप्त पडलें. **कोलम्बस** फार दिवस वायूचा उपद्रव झाल्यामुळें जर्जर झाला होता ह्मणून याच्यामध्यें युद्ध करण्याची शक्ति राहिली नव्हती; याकरितां याचा भाऊ **अदेलान्तादो** हा त्या बंडखोर लोकांवर चालून गेला, आणि ते लोकही युद्धार्थ त्वरित उभे राहिले. त्या लोकांनीं पुनः एकवेळ जें सामोपचाराचें बोलणें पडलें होतें त्याचा धिक्कारपूर्वक निषेध केला, आणि मोठ्या आवेशानें हल्ला करण्याकरितां ते पुढें झाले. ते ज्या

शत्रूवर जाऊन पडले तो ह्मणजे त्यांच्याबरोबर युद्ध करण्याकरितां तयार झाला नव्हता असें नव्हतें. पहिल्या झपाट्यासच त्या लोकांचे मोठमोठे धैर्यवान् सरदार मारिले गेले. मोठा धैर्यवान् व मोटा बलवान् असा जो **अदेलान्तादो** यानें त्यांच्या मुख्य सरदारास जाऊन गांठिलें, आणि त्यास वार करून व त्याचे हात तोडून त्यास कैद केलें. असें पाहतांक्षणींच बाकीचे जे होते ते आपल्या पूर्वीच्या उन्मत्तपणास योग्य अशा हलकेपणाच्या भीतीनें पळून गेले. नंतर लवकरच ते सर्व मिळून **कोलम्बसास** शरण आले, आणि त्यांनीं मोठमोठ्या शपता वाहून आपलीं आज्ञा आह्मीं मान्य करूं असा याशीं करार केला. पुनः जिकडे तिकडे स्वस्थता होत होती इतक्यांत **कोलम्बसास** तादृश निश्चय नसतां जीं तारवें येतील ह्मणून मोठ्या युक्तीनें यानें सांगितलें होतें, तीं तारवें दृष्टीस पडलीं. त्या समयीं ज्या बेटांत **ओवान्दो** याच्या निर्दय मात्सर्यामुळें नानाप्रकारचीं संकटें भोगून त्या लोकांस एक वर्ष काढावें लागलें, तें बेट त्यांनीं परमानंदानें सोडिलें.

सन्त दोमिंगो एथून तारवें येतांच हा जमेका बेट सोडितो.

ज्या वेळीं ते **सन्त दोमिंगो** एथें येऊन पोहोंचले, त्या वेळीं, हलके लोक अतिशय नम्रतेनें, आपण केलेल्या उद्धतपणाचें आच्छादन करायास ज्या नीच कापट्ययुक्तीनें पराकाष्ठेचा प्रयास करितात, त्या युक्तीस अनुसरून, तेथील हाकीमानें ज्या पुरुषाचा हेवा करून त्याच्या नाशार्थ प्रयत्न केला होता त्यास फारच प्रेमळता दर्शविली. त्यानें **कोलम्बसास** बाह्यात्कारें मोठा सन्मान देऊन याचें आदर-

सन्त दोमिंगो एथें येऊन पोहोंचल्यावरचा प्रकार.

आतिथ्य केलें, तसेंच आपलें घर यास राहायास देऊन याचा सर्व प्रकारें बहुमान राखिला. परंतु असा बाह्याकारें सन्मान राखीत असतां, याच्या अंतःकरणांत जो द्वेष आणि मत्सर गुप्तरूपें होता तो याच्यानें आवरवला नाहीं. **कोलम्बसानें** जे दंगेखोर लोक पायांत बिड्या घालून आणिले होते त्यांच्या सरदारास त्या हाकीमानें त्याच्या अपराधाची चौकशी करण्याकरितां बंधनिर्मुक्त केलें; आणि **कोलम्बसाच्या** पक्षाचे जे लोक होते त्यांची यथान्याय चौकशी करण्याचें उपस्थित करून त्यांस भयप्रदर्शन केलें. ज्या गोष्टीचें निराकरण करण्याविषयीं **कोलम्बसाचा** उपाय चालेना ती गोष्ट यानें मुकाट्यानें सोशिली. परंतु हरएक प्रसंगीं निर्दयपणानें व अन्यायानें ज्यानें **कोलम्बसास** वर्त्तविलें त्याच्या अधिकाराखालीं जो देश होता तो सोडण्याविषयीं यानें फारच उतावीळी दाखविली.

ईवेट लवकर सोडून दोन तारवांनिशीं स्पेन देशास निघतो.

जाण्याची तयारी लवकर करून **कोलम्बस** दोन तारवें बरोबर घेऊन **स्पेन** देशास निघाला. आजपर्यंत ज्या प्रकारचीं संकटें यास भोगावीं लागलीं त्या प्रकारचींच संकटें याचा वर्त्तनक्रम समाप्त होईपर्यंत यास सोसावीं लागलीं.

हा सन्त ल्युकारच्या बंदरीं जाऊन लागतो.

याच्या तारवांपैकीं एक तारूं अगदीं नादान होतें ह्मणून तें मागें हटून **सन्त दोमिंगो** एथें येऊन लागलें, आणि दुसरें तारूं मोठमोठ्या तुफानांत लाटांवर हचकून त्याची डोलकाठी मोडल्यामुळें दुसरी एक काठी उभी करून तिच्या योगें सुमारें ९०० कोस चालून तें मोठ्या संकटानें **सन्त ल्यूकारच्या बंदरीं** जाऊन लागलें.

या ठिकाणीं ज्या गोष्टीचें यानें वर्त्तमान ऐकिलें त्या गोष्टीप्रमाणें दुसरी कोणतीही गोष्ट घातक झाली नसती. या गोष्टीमुळें याच्या सर्व दुर्दैवाची परिपूर्णता झाली. ती गोष्ट ही कीं, जिची नीति, दया, व कृपा, यांजवर **कोलम्बसाचा** परिणामींचा आश्रय होता अशी जी याची आश्रय देणारी **इसाबेला** राणी ती मरण पावली. ज्यानें बहुत काळपर्यंत **कोलम्बसाच्या** विरुद्ध वागून यास बहुत दुःखें दिलीं, असा जो **फेर्दिनान्द** त्यावांचून, सांप्रत **कोलम्बसाचें** दुःखविमोचन करणारा व यानें पुष्कळ संकटें भोगून जीं कामें बजाविलीं त्याबद्दल बक्षिस देणारा दुसरा कोणी राहिला नव्हता. तर ज्या राजाच्या मनांत **कोलम्बसा**विषयीं विपरीत विचार भरून गेले होते त्यास विनंती करण्याचें काम त्रासदायक व निष्फळ असें होतें तथापि अशा कृत्यांत **कोलम्बसास** आपल्या आयुष्याचे दिवस घालविणें प्राप्त पडलें. याची प्रकृति थोडीशी पूर्वस्थितीवर येतांच हा दरबारांत गेला, आणि याची जरीं तादृश यथायोग्य सौजन्यानें भेट घेतली नाहीं तरीं यानें लागोपाट अर्ज्या करून याजवर ज्यांनीं जुलूम केला होता त्यांचें पारिपत्य करण्याकरितां व १४९२ त जो करारनामा केला होता त्यांत लिहिलेले सर्व अधिकार परत देण्याकरितां हक्काच्या मागण्या मागितल्या. **फेर्दिनान्द** यानें गोड गोड शब्द बोलून व ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशीं वचनें देऊन **कोलम्बसास** नाद लाविला. **फेर्दिनान्द** यानें याच्या ज्या सत्तेच्या मागण्या होत्या त्या बहाल न करितां त्यांची उडवाउडव करावी ह्मणून त्यानें

हा स्पेन देशास येऊन फेर्दिनान्दापाशीं करारनाम्यांतील अधिकाराविषयीं विनंती करितो.

फेर्दिनान्द गोड बोलून यास नाद लावितो.

नानाप्रकारच्या युक्ति सांगून तें कृत्य अशा डावानें लांब- णीवर घातलें कीं तेणेंकरून त्याची फेर्दिनान्द याच्या म- नांतून समाप्ति करावयाची नाहीं असें उघड दिसून आलें. कोलम्बसाची शरीरप्रकृति क्षीण झाल्यामुळें सदोदित विनंती करणाऱ्या अर्जदारापासून लवकर मुक्त होण्याची आशा दिसून, फेर्दिनान्द यास फार चांगलें वाटून, आपला अ- योग्य मार्ग आचरण्याविषयीं उत्तेजन आलें. फेर्दिनान्द यानें जी ही आशा धरिली होती तींत तो फसलाही नाहीं. ज्या राजाची अशा विश्वासानें आणि फलसिद्धीनें चाकरी केली, त्याच्या कृतघ्नतेमुळें संतापून, व यानें जे श्रम आणि संकटें भोगिलीं होतीं तींहींकरून अगदीं जर्जर होऊन आणि या सर्व गोष्टींमुळें जी अशक्तता याच्या आंगांत आली होती तिणेंकरून अगदीं थकून जाऊन, १५०६ त मे महिन्याच्या २८ व्या तारिखेस वालाडोली एथें यानें आपला देह ठेविला. त्या- समयीं याच्या वयास ५९ एकुणसाठ वर्षे होतीं. कोलम्बसानें मरणसमयीं आपली आब्रू ज्या महात्मतेनें प्रसिद्ध झाली होती त्या महात्मतेस उचित अशी अंतःकरणाची स्वस्थता राखिली; व आप- ल्या आयुष्यांत हरएक प्रसंगीं जी धर्मविषयक अतिशय मान्यता यानें दर्शित केली होती तीस योग्य अशी जी धर्मपरायण बुद्धि तिचे विचार मनांत वाळगले.

हा १५०६ मे महिन्याच्या २८ व्या तारिखेस देह ठेवितो.

समाप्त.

Is it not true?

These [illegible]

you that we all

go through [illegible] these

we must be as

very simple, they

may go to my

[illegible]


[illegible]

[illegible] [illegible] पटवर्धन

यांचे स्मरणार्थ,

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,

या संस्थेस नजर.

ग. [illegible] पटवर्धन

९-१०-१२.